


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, रविवार २३ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४







## हिडमाच्या मृत्यूनंतर नक्षलवादी मोहिमेला मोठा धक्का

# 37 नक्षलवाद्यांचे एकाचवेळी आत्मसमर्पण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** केंद्र सरकारच्या नक्षलवादविरोधी मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. कुख्यात नक्षलवादी हिडमाच्या मृत्यूनंतर आता, प्रतिबंधित नक्षलवादी संघटना भाकपा (माओवादी) च्या ३७ सदस्यांनी हैदराबादमध्ये एकाचवेळी शरणागती पत्करली आहे. समर्पण करणा-यांमध्ये हिडमाचा जवळचा साथीदार कोय्याडा सम्बैयाह उर्फ आजाद याचाही समावेश आहे. आजाद हा मुलुगू जिल्ह्याचा रहिवासी असून तो तब्बल ३१ वर्षे अंडरग्राउंड होता.समर्पित नक्षलींच्या ताब्यातून ८ बंदुका, एक AK-४७ रायफल आणि मोठ्या प्रमाणात गोळाबारु द जप्त



करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, शरणागती स्वीकारणा-यांमध्ये २५ महिला नक्षलवाद्यांचाही समावेश आहे. तेलंगानाचे पोलिस महासंचालक बी. शिवधर रेड्डी यांनी सांगितले की, हा माओवादी संघटनेसाठी अलीकडच्या वर्षांतील सर्वात मोठ्या आघातांपैकी एक आहे.

**पत्करणा-यांमध्ये संघटनेचे तीन महत्त्वाचे नेते :** कोय्याडा सम्बैयाह उर्फ आजाद, अप्पासी नारायण उर्फ रमेश,मुचाकी सोमाडा उर्फ एर्रा हे तिघेही आंध्र-तेलंगाना सीमेवर आणि दक्षिण बस्तर परिसरात सक्रिय होते. अनेक नक्षली कारवायांमध्ये सहभागी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**राज्य सरकारच्या पुनर्वसनाच्या आवाहनाचा प्रभाव**

DGP यांच्या मते, ३७ नक्षलवाद्यांनी हा निर्णय एकत्र घेतला. राज्य सरकारने अलीकडेच हिंसा सोडून मुख्य प्रवाहात येण्याचे आवाहन केले होते, त्याचा या नक्षलवाद्यांवर मोठा प्रभाव पडला. (पान २ वर)

# मुंबई, पुण्यापेक्षा नागपुरात अधिक प्रदूषण !

**नागपूर/प्रतिनिधी-** शहरात थंडी वाढताच हवेची गुणवत्ता धोक्याच्या पातळीवर पोहोचली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, शुक्रवारी पहाटे ५ वाजता नागपूरच्या अनेक भागांत वायू गुणवत्ता निर्देशांक अर्थात एअर क्वालिटी इंडेक्स (एक्यूआय) २५० च्या पुढे नोंदवला गेला, जो 'खराब' श्रेणीत मानला जातो आणि त्याचा आरोग्यावर थेट परिणाम होउ शकतो. मुंबई, पुण्याच्या तुलनेत नागपुरात अधिक प्रदूषण असल्याचे 'एक्यूआय' मधून स्पष्ट होते.

शुक्रवारी सकाळच्या वेळी सिव्हिल लाइन्सची स्थिती सर्वात चिंताजनक



होती, जिथे एक्यूआय २६१ पर्यंत पोहोचला होता. महाल भागात २५८ पातळीची नोंद झाली. रामनगरमध्ये २४७ आणि अंबाझरीमध्ये २१७ एक्यूआय नोंदवला गेला. पहाटेच्या थंड आणि जड हवेत प्रदूषित कण खालीच साचून राहतात,ज्यामुळे हवा अधिक दूषित होते. प्राप्त माहितीनुसार, पुण्याचा सरासरी एक्यूआय हा १६० तर मुंबईचा एक्यूआय १८० पर्यंत नोंदविला जात असल्याने त्या पार्श्वभूमीवर नागपूरची हवा अधिक प्रदूषित आहे.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विभागीय अधिकारी हेमा देशपांडे यांनी सांगितले की, हिवाळ्यात 'इन्व्हर्शन'ची स्थिती निर्माण होते. या काळात गरम हवा वर जाउ शकत नाही आणि खाली असलेल्या थंड हवेत धुळीचे कण व इतर प्रदूषक अडकून राहतात. यामुळे सकाळच्या वेळी वायुप्रदूषणाची पातळी वेगाने वाढते.

धूर, धुके एकत्र येउन 'स्मॉग'चे रूप पर्यावरणतज्ज्ञ (पान २ वर)

# शिंदेंचे 35 आमदार भाजपात जाणार

## ठाकरेंच्या सेनेचा खळबळजनक दावा

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना आणि भाजपा या दोन्ही पक्षांमध्ये सध्या कोल्ड वार सुरू आहे. भाजपाकडून शिंदे गटाचे स्थानिक नेते आणि पदाधिकारी फोडण्याचे काम सुरू आहे. पण आता लवकरच शिंदेंचे ३५ आमदार भाजपात जाणार असल्याचा दावा शिवसेना ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे.



गेल्या काही दिवसांपासून महायुतीत काहीच आलबेल नसल्याचे पाहायला मिळत आहे. शिवसेना शिंदे गटाचे स्थानिक पदाधिकारी आणि काही स्थानिक प्रमुख नेते आता भाजपाने आपल्याकडे घेण्यास सुरु वात केली आहे. ज्यामुळे शिंदे गटामध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. याविरोधात मंगळवारी (ता. १८ नोव्हेंबर) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीवर सुद्धा शिंदेंच्या मंत्र्यांनी बहिष्कार घालत आपली नाराजी व्यक्त केली. तर यानंतर लगेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली गाठून भाजपा नेते अमित शहांना तक्रार केली. पण याचा फारसा फायदा झाल्याचे पाहायला मिळत नाही.

अशातच आता शिंदे गटातील किमान ३५ आमदार भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सामना या वृत्तपत्रातून केला आहे.

ठाकरे गटाने सामनाच्या अग्रलेखातून शिवसेना शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ठाकरे गटाने खळबळजनक दावा करत म्हटले आहे की, पुढील विधानसभेला भाजपा शिंदेंशिवाय निवडणुका लढणार हे नक्की. भाजपाने एक पक्ष निर्माण केला आणि त्याला संपवण्याची तयारी आता भाजपानेच सुरू केली आहे. शिंदे गटातले किमान ३५ आमदार भाजपामध्ये प्रवेश करतील हे स्पष्ट झाले आहे. (पान २ वर)

# महामार्गावर भीषण अपघात; 5 ठार

**सोलापूर : प्रतिनिधी-** सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर धाराशिव येथे शनिवारी भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर काहीजण जखमी झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, शनिवारी सकाळी क्रुझर गाडी सोलापूर-हैदराबाद महामार्गावरून जात होती. या गाडीतील प्रवासी सोलापूरवरून नळदुर्ग येथे देवदर्शनासाठी निघाले होते. त्यावेळी धाराशिवमधील अणदूर परिसरात त्यांच्या जीपचे टायर अचानक फुटले. त्यामुळे चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि ही जीप एका ट्रॅक्टरला धडकून रस्त्यावर पलटी झाली. अपघात झाल्यानंतर आजूबाजूचे नागरिक तातडीने मदतीसाठी धावले. काही नागरिकांनी जोर लावून क्रुझर गाडी सरळ करून त्यामधून मृतदेह बाहेर काढले. आतापर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार, या अपघातामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये तीन महिलांचा समावेश आहे. या अपघातामध्ये सात ते आठजण गंभीर जखमी झाले आहेत.




# लोकशाही पायदळी तुडवून निवडणुका बिनविरोध

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात अनेक ठिकाणी सत्ताधा-यांचे नातेवाईक त्यात बायको, वहिनी, मामे भाउ, दीर, बहीण, मुलगा बिनविरोध निवडणूक जिंकून आले आहेत, अनेक ठिकाणी गुलाल उधळला. येथे लोकशाही पायदळी तुडवण्यात आली आहे. सत्तेच्या बळावर दबाव टाकून



निवडणुका बिनविरोध करून सत्ताधारी पाठ थोपटून घेत आहेत, अशी टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. नागपूर येथे माध्यमांशी बोलताना वडेट्टीवार म्हणाले, सत्ता महायुतीची असल्याने संपूर्ण यंत्रणा वापरली जाते आहे. कुठे पैशाचे प्रलोभन दाखवून, (पान २ वर)




# मी पण निधीत काट मारेन

## अजित पवारांच्या वक्तव्याचा विरोधकांनी घेतला समाचार

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार हे नेहमी त्यांच्या रोखठोक विधानांमुळे अडचणीत सापडतात. त्यांनी केलेली विधानांची जोरदार चर्चा राज्याच्या राजकारणात होत असते. आता पुन्हा एकदा अजित पवार हे एका विधानामुळे चर्चेत आले आहेत. त्यांनी केलेल्या विधानाचा समाचार विरोधी पक्षातील नेत्यांनी घेतला आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ बारामतीमधील माळेगावातून शुक्रवारी (२१ नोव्हेंबर) झाला. बारामतीमधील माळेगाव नगरपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या प्रचारसभेत बोलताना अजित पवार यांनी स्थानिकांना थेट धमकीच देणारे विधान केले. तुम्ही मला मतदान करा मी तुम्हाला कामे करून देईन. तुम्ही काट मारली तर मी पण निधीत काट मारणार, असे विधान अजित पवार यांनी केले आहे.




आपल्याच उमेदवारांना निवडून आणावे असे आवाहन त्यांनी केले. असे झाले नाही तर निधीमध्ये कपात होईल असे अजित पवार यावेळी बोलताना म्हणाले. त्यांनी केलेल्या या विधानावर आता विरोधकांकडून समाचार घेतला जात असून, काँग्रेसचे विजय वडेट्टीवार आणि उद्धवसेनेचे नेते अंबादास दानवे यांची प्रतिक्रिया समोर आली आहे विजय वडेट्टीवार म्हणाले, सगळीकडेच तसे धमकावणे सुरू आहे. एक व्हीडीओ व्हायरल होत आहे. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार मतदारांना खुलेआम धमकी देत आहेत. त्यांच्या (अजित पवार) हातात निधी आहे ते धमकी देतात. मुख्यमंत्री भारतीय जनता पक्षाचे आहेत. म्हणून हे खालचे लोक सगळे धमक्या देतात. धमक्या देणे सुरू आहे. निधी देणार नाही, विकास होणार नाही, बघून घेउ, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. राज्याचे (पान २ वर)

# रघुनाथपूर शेतशिवारात बिबट्याची दहशत

## अडकलेल्या दोघांना वनविभागाने केले मुक्त

**तिवसा/प्रतिनिधीः-**

शुक्रवारी सायंकाळी दोन शेतकऱ्यांची बिबट्याशी आमनेसामने नजरानजर झाली.आणि घाबरलेल्या शेतकऱ्यांना वनविभागाने बिबट्याच्या दहशतीतुन मुक्त करून सुटकेचा श्वास सोडला.बिबट्या समोरच दिसत असल्याची माहिती वनविभागाला मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन शेतकऱ्यांना तेथून सुखरूप बाहेर काढले. तिवसा तालुक्यातील रघुनाथपूर, बनसापूर, वाठोडा खुर्द व भांबोरा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या सततच्या वावराने नागरिक घाबरलेले आहेत. दरम्यान आज २१ नोव्हेंबर २०२५ रोजी एका मागोमाग दोन धक्कादायक घटना घडल्या आणि संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरले.संध्याकाळी पाच ते सहा दरम्यान खांडेकर यांच्या शेतात ट्रॅक्टरने नांगरणी करताना अचानक बिबट दिसल्याचा व्हिडिओ स्थानिकांनी सोशल मीडियावर शेअर केला. हा व्हिडिओ क्षणात व्हायरल झाला आणि गावोगावी बातमी वणव्याप्रमाणे पसरली.याच भीतीच्या वातावरणात, सायंकाळी मौजा



बनसापूर येथे पोल्ट्री फार्मजवळ शेतकरी सागर मोयेकर आणि प्रदीप निवाळ यांच्या समोर भीषण वास्तव उभे राहिले.बिबट्याने त्यांना समोरासमोर पाहिले. जीवघेणा क्षण ओळखून दोघेही थरथरत शेतातील एका कोपऱ्यात लपून बसले. घाबरलेल्या युवकांनी किंचितही आवाज न करता मोबाईलवरून गावकऱ्यांना मदतीसाठी संदेश पाठवला.गावकऱ्यांनी तात्काळ वनविभाग तिवसा कार्यालयाशी संपर्क साधला.या गंभीर घटनेची माहिती मिळताच वनाधिकारी जि. डी. जांभे व एम. डी. गवई यांनी एक क्षणही न दवडता घटनास्थळ गाठले. परिसरात बिबट शिरला असल्याची खात्री असूनही, दोन्ही अधिकाऱ्यांनी स्वत:च्या जिवाची पर्वा न करता शेतात प्रवेश केला.

गावकरी चिंतेने थरारलेले असताना कायद्याचे रक्षक व वन्यजीवनाचे संरक्षक असलेल्या या अधिकाऱ्यांनी अत्यंत शांत चित्ताने परिस्थिती हाताळली आणि काही मिनिटांच्या अत्यंत धाडसी प्रयत्नांनंतर सागर मोयेकर व प्रदीप निवाळ यांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश मिळवले.

दोन्ही युवकांच्या सुरक्षित सुटकेनंतर गावात आनंदाचा एकच जल्लोष पसरला.वनाधिकाऱ्यांनी नंतर संपूर्ण परिसराची पाहणी करत लोकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरून घराबाहेर पळू नये, तसेच सतर्क राहण्याचे आवाहन केले.

# मनपाच्या प्रारूप मतदार यादीवर २५ आक्षेप

## -२७ नोव्हेंबर पर्यंत मुदत

अमरावती/प्रतिनिधीः-

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अमरावती महापालिकेच्या वतीने नुकतीच प्रारूप मतदार यादी घोषित करण्यात आली आहे. या मतदार यादीवर आक्षेप नोंदविल्या जात आहे. शनिवार पर्यंत एकूण २५ नागरिकांनी यावर आपले आक्षेप नोंदवले आहेत.

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने महापालिकेच्या २२ प्रभागातील ८७ जागेसाठी आरक्षण नंतर प्रारुप मदत यादी घोषित केली. या मतदाता यादीवर २५ लोकांनी



आक्षेप नोंदविले आहेत. अनेक मतदारांचे नाव दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सुधारित मतदार यादी घोषित करण्याची मागणी करण्यात येत आहे. मतदार यादीवर आक्षेप नोंदवणाऱ्यामध्ये प्रतिभा वानखडे, आशिष भोजने ,दिलीप पांडे ,प्रवीण उदासी ,सुखदेव शेवणे ,राहुल आमले, सुनील आमले ,दिलीप पांडे ,विक्रांत देशमुख ,वैशाली जाखोरे ,प्रमोद ठाकरे ,पराग देशपांडे, पवन ठाकूर, उज्वल कौर मोंगा ,माजी नगरसेवक धीरज हिवसे, शेख इमरान, बंटी रामटेके, जितेंद्र वाघ, वैभव नंदागवळी यांचा समावेश आहे. अनेक नागरिकांचे नाव एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आले आहे. प्रभागाची लोकसंख्या आधारित प्रारूप मतदार यादी तयार करण्यात आली आहे. आगामी २७ नोव्हेंबर पर्यंत आक्षेप, तक्रारी नोंदवण्यात येतील. विशेष असे की निवडणूक आयोगाच्या वतीने अमरावती महानगरपालिकेतील मतदार संख्या ६,७७,१६७ सांगितल्या गेली आहे. ही मतदार यादी घोषित होण्यापूर्वीच वादाच्या भोवऱ्यात अडकली होती. काँग्रेसचे मुन्ना राठोड आणि समीर जवंजाळ यांनी अनुमानित मतदार यादी पत्रकार परिषदेत जाहीर केली होती. मतदार यादी घोषित झाल्या नंतरही दोन्ही काँग्रेस नेत्यांनी आरोप केले की मतदार यादीत प्रचंड घोळ आहे. अनेक मृत मतदारांची नावे यादीत आहे, स्थानांतरित मतदारांची नावे रद्द करण्यात आली नाही. घोषित मतदार यादीवर नोंदवलेल्या आक्षेप आणि तक्रारीवर जिल्हाधिकारी सुनवाई करतील. त्यानंतर अंतिम मतदार यादी घोषित करण्यात येईल.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय खेळाडूचा सत्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-**ढाका (बांगलादेश) येथे झालेल्या एशियन आर्चरी चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत जिल्ह्यातील खेळाडू यशदीप भोगे याने वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले. यानिमित्ताने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात त्याचा सत्कार केला.यावेळी आमदार सुलभा खोडके, कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी, विनोद पिदुरकर, उपअभियंता एन. प्रकाश रेड्डी, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, मनपा शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, पोलिस निरीक्षक आनंद पिदूरकर, गटशिक्षणाधिकारी मोहने, आदी उपस्थित होते.यशदीप भोगे याने आर्चरी चॅम्पियनशिपमध्ये क्वालिफिकेशन राऊंडमध्ये जागतिक क्रमवारीत नंबर एकचा कोरियाच्या खेळाडूसोबत क्वॉलिफिकेशन राऊंड खेळून वैयक्तिक प्रकारात ७२० पैकी ६८७ गुण प्राप्त करून वर्ल्ड आर्चरी चॅम्पियनशिपकरिता निवड झाली आहे. जिल्हाधिकारी येरेकर आणि आमदार सुलभा खोडके यांनी आंतरराष्ट्रीय खेळाडूंकरीता अद्ययावत क्रीडा सुविधा, क्रीडा साहित्य त्यांच्या मागणीनुसार उपलब्ध करून द्याव्यात. तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली युवा खेळाडू तयार करण्यावर भर द्यावा. इतरांना प्रेरणा मिळावी, यासाठी या खेळाडूंचा सार्वजनिक कार्यक्रमात सत्कार करण्यात यावा, अशी सूचना केली.

# 'रिसर्च मेथडॉलॉजी व डिसर्टेशन प्रिपरेशन' विषयावर अतिथी व्याख्यान

अमरावती/प्रतिनिधीः-

सुशिला सुर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट (एस.एस.एम.आय.टी.ए.), अमरावती यांच्या वतीने दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी 'रिसर्च मेथडॉलॉजी आणि डिसर्टेशन प्रिपरेशन' या विषयावर माहितीपूर्ण आणि मार्गदर्शनपर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या शैक्षणिक उपक्रमाची रूपरेषा महाविद्यालयाचे प्रभारी संचालक प्रा. अमोल करमरकर यांनी तयार केली होती. विद्यार्थ्यांच्या संशोधन कौशल्यविकासाला चालना देणे आणि प्रबंध लेखन प्रक्रियेतील समज दृढ करणे हा या व्याख्यानामागील मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी अचलपूर येथील जगदंबा महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील प्रा. डॉ. मायुरेश शिंगरूप यांना अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले. डॉ. शिंगरूप यांनी संशोधन उद्दिष्टे व अनुमाने ठरविण्यापासून योग्य पद्धतींची निवड, डेटा संकलन–विश्लेषण, तसेच सिनॉप्सिस व डिसर्टेशन रिपोर्टची संरचना अशा प्रमुख घटकांवर स्पष्ट, सविस्तर आणि प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. त्यांच्या मोलाच्या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन कार्याबद्दलची दृढ समज आणि आत्मविश्वास वाढल्याचे जाणवले.

एम.बी.ए. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन एम.बी.ए. प्रथम वर्षातील विद्यार्थिनी वसुंधरा निस्ताणे हिने केले. उपक्रमाचे नियोजन, समन्वय व अंमलबजावणी यशस्वी करण्यामध्ये प्रा. अमित देशमुख, प्रा. माधुरी निस्ताणे, प्रा. भार्गवी पांडे, प्रा. लुंबिनी सरदरे आणि प्रा. स्वप्नील तिजारे यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या संघभावना, जबाबदारी आणि उत्साहामुळे अतिथी व्याख्यान अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रभावी रीतीने पार पडले.

या प्रसंगी संस्थेचे खजिनदार अभय सुर्यवंशी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत, अशा शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या संशोधनक्षमता आणि शैक्षणिक प्रगतीमध्ये सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन एम.बी.ए. विभागप्रमुख प्रा. श्रीराम बालेकर यांनी केले.

# १ व १० वरिल उर्वरित

## ३७ नक्षलवाद्यांचे एकाचवेळी

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सततच्या अँटी-नक्षल ऑपरेशन्स, विचारधारेतील मतभेद, गटांतर्गत तणाव, हालचालींवरील मर्यादा यामुळे क्ष्क्ष (माओवादी) संघटना या भागात कमकुवत झाली आहे. समर्पण केलेल्या स्टेट कमिटी सदस्यांना २० लाख रुपये, तर एकूण जप्त इनामाची रक्कम १ कोटी ४१ लाख ५ हजार रुपये दिले जातील. काही दिवसांपूर्वीच कुख्यात हिडमा ठरया मोठ्या शरणागतीच्या काही दिवस आधी कुख्यात नक्षली कमांडर माडवी हिडमा (४३) याला आंध्र प्रदेशमध्ये सुरक्षा दलांनी ठार केले. हिडमा २०१३ च्या दरभा घाटी हत्याकांड, २०१७ च्या सुकमा हल्ल्यांसह किमान २६ मोठ्या नक्षली हल्ल्यांचा मास्टरमाइंड मानला जात होता.

## मुंबई, पुण्यापेक्षा नागपुरात

लीना बुद्धे म्हणाल्या की, थंडीसोबत वाहनांचा धूर आणि धुके एकत्र येउन 'स्माग'चे रूप घेतात. यामुळे धुळीच्या कणांचे प्रमाण वाढते आणि एक्यूआय थेट वर चढतो. पहाटेची वेळ सर्वात धोकादायक असते, कारण हवेतील प्रदूषक सहजासहजी वर जात नाहीत. त्यामुळे मार्निंग वाकला जाणा-यांनी सकाळी अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, मास्कचा वापर करावा आणि संवेदनशील गट जसे की दमा रुग्ण, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले यांनी अतिरिक्त काळजी घ्यावी, असा सल्ला त्यांनी दिला आहे.

## शिंदेंचे ३५ आमदार

भाजपाने ऑपरेशन लोटस करून बाळासाहेब ठाकरे यांची मूळ शिवसेना फोडली. त्या फुटीचे सूत्रधार हेच शिंदे होते. आता दुस-या ऑपरेशन लोटसमध्ये शिंदे गटावरच घाव घालणे सुरू आहे. शिंदे यांचा पक्ष म्हणजे बुडबुडे आहेत. अमित शहा यांनी निवडणूक आयोग व सुप्रीम कोर्टाच्या संगनमताने शिंदे यांना शिवसेना हा पक्ष व धनुष्यबाण हे चिन्ह दिले. शिंदे यांनी शिवसेना फोडताना जी तलवार वापरली, त्याच तलवारीने आता त्यांचा घात होत आहे. शिंदे हे ठेकेदार सेना चालवतात. त्यामुळे गुळाच्या ढेपेला मुंगळे चिकटावेत तसे शिंदे यांना लोक चिकटलेले आहेत, अशी टीका ठाकरे गटाने केली आहे. तसेच, भाजपाच्या रवींद्र चव्हाणांनी शिंदेंसमोर मोठी गुळाची ढेप ठेवली. शिंदे यांचे मुंगळे हे

भाजपाच्या ढेपेवर चढले. शिंदे यांनी जे पेरले तेच उगवले आहे. भाजपाला शिंदे नकोसे झाले आहेत. शिंदे यांना त्यांची जागा दाखवण्याचा लोटस कार्यक्रम सुरू झाला आहे. रवींद्र चव्हाणांनी मोठी रक्कम देउन आमची माणसे फोडली या तक्रारीवर अमित शहांना हसू आवरले नाही. जे शिंदे स्वतःच फुटले, त्यांनी माणसे फोडण्यावर चिंता व्यक्त करावी, हा मोठाच विनोद आहे. महाराष्ट्रात सत्तापक्षांतील नाराजी नाट्य सुरूच राहील. या नाराजी नाट्याचा तिसरा अंक आता सुरू झाला आणि हा अंक संपवणारी घंटा वाजत आहे. नाराज शिंदे यांना भाजपा कवडीचीही किंमत द्यायला तयार नाही. नाराजीचे महानाट्य कोसळून पडणार हे नक्की आहे!, असा दावाही आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून करण्यात आला आहे. त्यामुळे आता ठाकरे गटाच्या या दाव्यावर शिवसेना शिंदे गटाच्या नेतेमंडळींकडून काय प्रत्युत्तर देण्यात येते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## लोकशाही पायदळी तुडवून

कुठे पोलिस बळ वापरून निवडणुका बिनविरोध केल्या आहेत . दादागिरी, गुंडगिरी करून सत्ताधा-यांचे नातेवाईक बिनविरोध निवडून आले आहेत .त्यामुळे जिथे निवडणुका होतील तिथे निवडणुका पारदर्शक होतील का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे. एके ठिकाणी प्रचारात तर भाजपची महिला उमेदवार थेट सांगत आहे, मतदान करा नाहीतर गाठ माझ्याशी आहे, निधी देणार नाही, विकास होणार नाही. मुख्यमंत्री भाजपचा असल्याने पदाधिका-यांना पण जोर चढला आहे. जनताच आता याबाबत ठरवेल, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर कंत्राटदारांनी पुन्हा एकदा काम बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे चित्र आहे. सरकार शेतक-यांना पैसे देत नाही, कंत्राटदारांची एक लाख कोटीची बिले थकवली आहेत.

त्यांना पैसे देत नाही पण निवडणुका आल्या म्हणून आपल्या आमदारांना द्यायला सरकारकडे पैसे आहेत. राज्य तर दिवाळखोरीकडे निघाले आहे पण सरकारची पण अकलेची दिवाळखोरी जास्त झाली आहे, अशी टीका काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर केली. निवडणुका आल्या की भाजपचे सर्व्हे येतात. भाजपाला बहुमत मिळणार अशा बातम्या येतात. हे सर्व्हे भाजप करते. बातम्या पण भाजपच देते. लोकांना मूर्ख बनवण्याचे हे भाजपचे उद्योग आहेत. मुंबईत आता मतदार आयडी सापडले आहेत,

जसे महाराष्ट्र आणि बिहारमध्ये केले तशीच मुंबई महापालिकेची निवडणूक जिंकायची असेल. बॅलेटवर निवडणुका झाल्या की, दूध का दूध होईल, खरे जनमत स्पष्ट होईल, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

## मी पण निधीत काट

उपमुख्यमंत्री अजित पवार हे जाहीर भाषणातून आम्हाला मदत करा, विकास निधी देउ असे सांगत असल्याचा आरोप करत ही सौदेबाजी असल्याचे दानवे म्हणाले. मला वाटते ही सौदेबाजी किंवा धमकी आहे. निधी अजित पवार यांच्या घरचा नाही. निधी करातून येतो, घरातून येत नाही. अजित पवार मतांसाठी धमकी देत असतील तर निवडणूक आयोग काय करत आहे? असा संताप त्यांनी व्यक्त केला.

## सिटीलॅंड व्यापारी संकुलामध्ये

आरोपी मागून आले आणि त्यांनी चोरी केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. सिटीलॅंड व्यापारी संकुल मध्ये या पूर्वीही चोरीच्या घटना घडल्या आहे, पण अजून पर्यंत पोलिसांनी या प्रकरणात कोणालाही ताब्यात घेतलेले नाही. या प्रकारानंतर परिसरात पोलीस पेट्रोलिंग वाढवण्याची मांगणी करण्यात येत आहे.

## अग्निशमन अधीक्षक केंद्रे

केले होते. त्यावरून त्यांना जातीवरून शिविगाळ करणे, विनाकारण त्यांना कामावरून सस्पेंड करण्यात आले होते. लक्ष्मण पावडे हा संतोष केंद्रे यांचे सूचनेनुसार काम करीत होता. राजेश मोहन यांना मानसिक त्रास देत होता. यामुळे मोहन त्रस्त झाले होते आणि त्यामुळे त्यांनी आत्महत्या केली. त्यांचा आत्महत्येपूर्वीचा व्हिडिओ समोर आल्यानंतर मनपा आयुक्त सौम्य शर्मा यांनी दोन्ही अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे.

## महाप्रसादाच्या नावावर दुकानदाराला

माहितीनुसार १७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता अशोक चांदवानी आपल्या विजय किराणा दुकानात हजर होते. त्यावेळी त्यांच्या मोबाईलवर एका अज्ञात इसमाने फोन केला आणि त्यांना सांगीतले की, अँटी करप्शन ब्युरो कार्यालयाजवळ असणाऱ्या हनुमान मंदिरात महाप्रसाद आहे, त्यासाठी ५ कट्टे गहू, ३ कट्टे तूरडाळ ,४ कट्टे तांदूळ, १कट्टा चनाडाळ ,३ तिळाचे पिंप पाहिजे. आरोपीने त्यांना ऑटो मध्ये हे सामान भरून दिलेल्या पत्त्यावर पाठवण्यासाठी सांगीतले आणि सोबतच किराणा मिळताच मालवाहू चालकासोबत पैसे पाठविण्यात येईल असे म्हटले. यावरून चांदवाणी यांनी संपूर्ण सामान भरून आरोपीने सांगितलेल्या पत्त्यावर पाठवले. यावेळी आरोपीने तिथे उभ्या एका दुसऱ्या ऑटोमध्ये हा किराणा माल टाकायला सांगितले. माल टाकताच आरोपी पैसे न देता माल घेऊन पळाला. दरम्यान अशोक चांदवानी यांनी त्याला पुन्हा फोन लावला तर त्याचा मोबाईल नंबर बंद येत होता. आपल्यासोबत फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यावर चांदवाणी यांनी गाडगे नगर पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध तक्रार दिली.पुढील तपास पोलिस करत आहेत.

## अखेर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी

असतांना आयोगाच्या जाचक अटीमुळे थांबलेला प्रचार अखेर निवडणुक अधिका-यांनी त्या अटीतून माघार घेत असल्याचे पत्र दिल्यानंतर आजपासून प्रचाराला सुरवात होणार आहे. आणि हा एका गरिब उमेदवाराने आयोगाशी केलेल्या लढाईचा विजय असल्याचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार विनीत डोंगरदिवे यांनी सांगीतले.

नगरपरिषद निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या २१ तारखेला आज दोन दिवस होत आहे.तरीही शहरात उमेदवारांचे बॅनर ,झेंडे किंवा कॉर्नर सभा याला सुरवात झालेली दिसत नव्हती.यासाठी निवडणुक आयोगाने फलक,झेंडे,कॉर्नर सभा यासाठी दिलेल्या संमती पत्राचा नमुना.ज्यात फलक,झेडे,लावातांना त्या घरमालकाच्या समंती पत्रासह त्याचे घरावर टॅक्स नसल्याची पावती जोडणे, तसेच कॉर्नर सभेसाठी सुद्धा घरमालकाच्याघराची टॅक्सपावती जोडणे चा उल्लेख असल्याचे एमआयएम चे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनीत डोंगरदिवे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ पत्रकार परिषद घेऊन आयोगाच्या तुघलकी आदेशाविरोधात दंड थोपटण्याचा निर्णय घेतला.

तसेच ईतर पक्षातील उमेदवारांनाही आवाहन करुन काल दि.२२ ला दुपारी ३ वाजता शेकडो कार्यकर्त्यासह उपस्थीत राहण्याचे सांगीतले.परंतू प्रशासनाच्या विनंतीवरुन फक्त उमेदवारांनी हजर राहुन ही जाचक अट काढायला बाध्य केले.तशा आशयाचे लेखी पत्र विनीत डोंगरदीवे आणि भाजपचे माजी शहर अध्यक्ष मनोहर मुरकुटे यांना देऊन २०२५-२६ कराची पावती लावण्याची अट शिथील करण्यात आली .ज्यामुळे आर्थीक कमकुवत उमेदवारांचा हा विजय असल्याचे डोंगरदिवे यांनी सांगीतले. फलकाच्या दरपत्रकातही सुट देण्यात आली आहे.

## माहुली जहागीरच्या सरपंचांना

स्थगिती देण्याची मागणी केली.या युक्तिवादाला मंजुरी देत न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाचा आदेश स्थगित ठेवत 'जैसे थे' स्थिती कायम ठेवण्याचे निर्देश शुक्रवारी दिले. या निर्णयामुळे प्रीती बुंदीले यांचे सरपंच पद अबाधित राहणार असून ग्रामपंचायतीचा सर्वसाधारण प्रशासनिक कारभार पूर्ववत सुरू राहणार आहे. गेल्या काही दिवसांपासून पसरलेल्या अशांतता व अफवांनाही या निकालाने पूर्णविराम मिळाला आहे. ग्रामस्थांनी या निर्णयाचे उत्स्फूर्त स्वागत करत 'न्यायालयाने योग्य हस्तक्षेप करून न्याय दिला,' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. सरपंचपदावरील स्थिरतेमुळे ग्रामविकासाची कामे नव्या जोमानं गतिमान होतील, असा विश्वासही ग्रामस्थांनी व्यक्त केला असून खा. डॉ. अनिल बोंडे, आ. राजेश वानखडे,आ. रवी राणा, भाजप नेत्या नवनीत राणा,विवेक गुल्हाने यांनीही या निर्णयाचे स्वागत करत प्रीती बुंदीले यांना शुभेच्छा दिल्यात.

**सत्याचा खऱ्या अर्थाने विजय**

'सत्याचा आता खऱ्या अर्थाने विजय झाला आहे.ग्रामस्थांच्या विश्वासानेच मला शक्ती दिली.हा निर्णय ग्रामविकासाच्या कामांना नवा वेग देईल. **-प्रीती बुंदीले, सरपंच, माहुली जहागीर**

## प्रा.नरेंद्र राऊत राष्ट्रवादी काँग्रेस

विश्वास दर्शवून जबाबदारी सोपविली आहे. प्रा. नरेंद्र राऊत यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा प्रदेश उपाध्यक्ष म्हणून नियुक्तीपत्र मिळताच त्यांनी अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके व राष्ट्रवादीचे संघटक महासचिव आ. संजय खोडके यांची भेट घेतली. जिल्ह्यातील कृषी विकासाच्या मुद्यांवर चर्चा केली. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात शेतकरी व कृषी विकासाचे अनेक प्रश्न आहेत. यावर चांगले काम करण्यासाठी 'गांव तिथे राष्ट्रवादी किसान सभा' स्थापन करण्याबाबतची एक अभिनव संकल्पना आ. संजय खोडके यांनी व्यक्त केली. दरम्यान आमदार महोदयांनी प्रा. नरेंद्र राऊत यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. प्रा. नरेंद्र राऊत हे ग्राम-भारवाडी तालुका तिवसा जिल्हा अमरावती येथील रहिवासी असून कृषी संदर्भातील उपक्रम, मेळावे तसेच कृषी विकासाच्या चळवळीत त्यांचा नेहमीची सहभाग राहिला आहे. त्यांना आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा प्रदेश उपाध्यक्ष पदी नियुक्ती मिळाल्याने त्यांच्याकडून शेतीजीवन समृद्ध करण्यासाठी चांगले प्रयत्न होतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी सहकारी व कार्यकर्ते देखील उपस्थित होते.

## दुचाकीच्या धडकेत वृद्धाचा

परतवाडा ते अंजनगाव कडे जाणाऱ्या एका दुचाकी स्वाराने आपले वाहन निष्काळजीपणाने चालून दोघांना धडक दिली. यामध्ये विश्वास राणे आणि डॉ. मालू गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान विश्वास राणे यांचा मृत्यू झाला तर डॉ. मालू यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती

क्षेत्रातील व्यक्ती किंवा संस्थांना 'स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार' देऊन गौरवान्वित करण्याचा हा उपक्रम आहे. मागील वर्षी स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे. पुरस्कार निवडताना जो निकष लावण्यात आला आहे तो म्हणजे पुरस्कार प्राप्त व्यक्ति किंवा संस्थेचे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचले जावे, किंबहुना तशी निकड असावी, पुरस्कार राशीची गरज असलेली व्यक्ति किंवा संस्था असावी, पुरस्कार प्राप्त व्यक्ति किंवा संस्थेच्या कार्याला गती मिळावी. पुरस्काराचे स्वरुप रु. १ लक्ष गौरव राशी, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे असणार आहे.

कार्यक्रमाला अमरावतीकर नागरिकांनी तसेच स्व. डॉ. रमेश गोडबोले यांच्या स्नेहीजनांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजन समिती तसेच प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

## वाढत्या थंडीत हौशी मराठी

वैवाहिक जीवनावर प्रहसनात्मक पद्धतीने केलेले भाष्य हा या नाट्यकृतीचा गाभा आहे.

रसिक प्रेक्षकांना या सुसज्ज नाट्यगृहात अतिशय सुंदर वातावरणात नाट्यानुभव घेता येत आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी नमूद केलेले आहे. या स्पर्धेमध्ये दि. २३ रोजी समर्पण संस्था निर्मित सखी ग सखी हे नाटक सादर होईल. राज्यनाट्य स्पर्धेतील सर्व नाटकांना जास्तीत जास्त प्रेक्षकांनी उपस्थित राहावे आणि हौशी रंगकर्मींचा उत्साह वाढवावा असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केलेले आहे. या स्पर्धेकरिता तिकिटांचा दर अतिशय अल्प असून रोज रू.१०/- आणि १५/- फक्त असणार आहे. अशी माहिती स्पर्धा समन्वयक विशाल फाटे यांनी दिली आहे.

## राजू बाविस्कर यांच्या 'काळ्या

'काळ्या निळ्या रेषा' या आत्मकथनाचे लेखक राजू बाविस्कर यांची प्रकट मुलाखत प्रा. बबन इंगोले हे घेणार असून यावेळी मी महात्मा फुले बोलतोय हा एक पात्री प्रयोग सुशील दत्त बागडे सादर करणार आहे. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती संत गाडगेबाबा असता फाउंडेशन अमरावती व इंगोले परिवाराच्यावतीने प्रा डॉ.जगदीश इंगोले, एड.भरत खडसे, विजय सगळे, कैलास बांगर, विठ्ठल पडघान, नागोराव वानखडे, शिवराज स्वर्गे सुरेश बंगाले, सुखदेव कांबळे, देवानंद वानखडे व जिजा आमटे यांनी केले आहे.

## शिंदे सेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख

आली आहे. भाजपा सोडून शिंदे सेनेमध्ये सहभागी झालेले माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांना वाशीम तर माजी आमदार व शिंदे सेनेचे राष्ट्रीय सचिव अभिजीत अडसूळ यांना अकोलाची जबाबदारी देण्यात आलेली आहे.

यवतमाळ मध्ये हेमंत गोडसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वर्धासाठी राजेंद्र साप्ते यांना जबाबदारी देण्यात आली आहे.शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या वतीने जारी केलेल्या प्रेस विज्ञप्ती नुसार पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी आणि येणाऱ्या निवडणुकीमध्ये पार्टीचे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी ह्या नुकत्या करण्यात आल्या आहे. संपर्क प्रमुखांना सक्रिय राहून कार्यकर्त्यांशी संवाद साधून पार्टी मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहे. काही नगरपरिषद आणि नगरपालिका मध्ये अविरोध निवडणूक पार पडली आहे. काही ठिकाणी तिरंगी लढत पाहायला मिळत आहे तर काही ठिकाणी चौकोनी मुकाबला होणार आहे. नगर पंचायत, नगर परिषदा आणि आगामी जिल्हा परिषदा व महापालिका निवडणुकीत भक्कमपणे लढण्यासाठी जिल्हा संपर्क प्रमुखपदी पक्षातील ज्येष्ठ नेते, खासदार आणि आमदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत संपर्क प्रमुखांनी जिल्ह्यातच थांबावे, असे स्पष्ट निर्देश शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. शिवसेना सचिव संजय मोरेंकडून प्रसिद्धी पत्रक जारी करण्यात आले असून जिल्हा संपर्क प्रमुख पदांची घोषणा करण्यात आली आहे.

## अचलपूरमध्ये २२९ जन्म

दिवसापासून अवैध कागदपत्राद्वारे जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र देणाऱ्या विरुद्ध आवाज उचलत आहे. बांगलादेशी आणि रोहिंग्यांनी अवैध कागदपत्र द्वारे जन्मदाखले प्राप्त केले आहे असे त्यांचे म्हणणे होते. या आधारे त्यांनी आधार कार्ड बनवले आणि स्वतःला भारतीय नागरिक दाखवत आहे. गेल्या काही दिवसापासून किरीट सोमय्या राज्यातील विविध शहरामध्ये जाऊन ते याबद्दल माहिती घेत आहे. त्यामुळे आतापर्यंत हजारो लोकांचे दाखले राज्यभरात रद्द झाले आहे. जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र रद्द करण्यासोबतच बोगस कागदपत्रांच्या आधारे प्रमाणपत्रासाठी अर्ज करणाऱ्या विरुद्ध गुन्हे दाखल झाले आहे.

**जाहीर नोटीस**

या जाहीर सुचनेद्वारे सुचित करतो की, माझे पक्षकार **पूजा प्रमोद शिरभाते व सोनी विशाल शिरभाते**, रा.हातगांव, मुर्तिजापूर, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला यांच्या मालकीत व ताब्यात मौजे-हातगांव, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला येथील जुना सर्व्हे नं.१५०/१, नवीन सर्व्हे नं.२३० मधील प्लॉट नं.११ ज्याचे क्षेत्रफळ १८६.०० चौ.मी. असून त्यावरील बाधकाम सह आहे आणि सदर मालमत्ता त्यांना दि.२०.०३.२०२५ रोजीचे बक्षीसपत्र दस्त अ.क्र.१२२० नुसार **प्रमोद सुरेश शिरभात** व **विशाल सुरेश शिरभाते** यांचेकडून प्राप्त झाली आहे.

सदर मालमत्तचे पूजा प्रमोद शिरभाते व सोनी विशाल शिरभाते यांचेजवळ दि.२०.०३.२०२५ रोजीचे बक्षीसपत्र दस्त अ.क्र.१२२०, दि.३०.०४.२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र. ११८२, दि.०१.०६.२००१ रोजी खरेदी दस्त अ.क्र.१७२४ या सर्व मूळ खरेदी दस्तांपैकी **खरेदी दस्त अ.क्र. ११८२, दि.३०.०४.२०१०** चे मूळ खरेदी दस्त माझे पक्षकाराकडून गहाळ झालेले आहेत व ईतर मूळ दस्त त्यांच्याकडे आहे.

तरी माझे वरील नामे पक्षकार पूजा प्रमोद शिरभाते व सोनी विशाल शिरभाते यांना सदर प्लॉट गहाण करावयाचा आहे. तरी याबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशीर वाद, लवाद, दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

**तारीख - २२.११.२०२५**

**(ॲड.राहुल व्ही.मोहोड)**
**प्रेरणा कॉलनी, राधा नगर,**
**अमरावती-४४४६०३**
**मो.क्र.९०९६४६०६७०**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### सपकाळांच्या आक्षेपार्ह वक्तव्याचा पालकमंत्र्यांद्वारे तीव्र निषेध

**परभणी-** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विषयी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पाथरी येथील जाहीर सभेत केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा या जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. तर सेलूतील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी सपकाळ यांच्या ताफ यास काळे झेंडे दाखवून रोष व्यक्त केला. प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी पाथरी येथील जाहीर सभेत मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर टीका करतेवेळी आक्षेपार्ह भाषा वापरल्याचा आरोप पालकमंत्री सौ. बोर्डीकर यांनी केला. काँग्रेसजणांच्या पायाखालची वाळू आता सरकली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत पराभव दिसतो आहे. त्यातूनच तोल ढासळतो आहे. त्याचे प्रत्यंतर हे पाथरीतील सभेत काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या आक्षेपार्ह विधान होय, असे त्या म्हणाल्या. दरम्यान, सेलू येथील भारतीय जनता पार्टीच्या संतप्त कार्यकर्त्यांनी सपकाळ यांच्या ताफ यासमोर काळे झेंडे दाखवून जोरदार निदर्शने केली. सपकाळ यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी केली.

### अजीत पवारांच्या ताफ यातील गाडीचा अपघात, एकाच कुटुंबातील चौघे जखमी

**बीड** - उपमुख्यमंत्री अजित पवार हे आज, शनिवारी दुपारी धारू रवरू न केजकडे जात असताना, त्यांच्या ताफ यातील ऑक्सिजन गाडी (MH ०२ क्क्त ५७३२) चालकाने निष्काळजीपणे गाडी चालवली. त्यामुळे भोगलवाडी येथील विष्णू सुदे यांच्या दुचाकीला (MH ४४ V १५१८) ताफ यातील ऑक्सिजन टँकर असलेल्या वाहनाने धडक दिली. या भीषण अपघातात विष्णू सुदे, त्यांची पत्नी कुसुम सुदे आणि त्यांच्या दोन लहान मुली गंभीर जखमी झाल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री पवार धारू रवरून केजकडे जात असताना त्यांच्या ताफ यातील गाडीचा धूनकवड फाटा परिसरात अपघात झाला. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदत करत जखमींना धारू र ग्रामीण रु ग्णालयात हलवले. मात्र दुखापतीचे स्वरू प गंभीर असल्याने त्यांना तातडीने पुढील उपचारांसाठी अंबाजोगाई येथील शासकीय रु ग्णालयात हलविण्यात आले आहे. त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. या धडकेत ताफ यातील सुरक्षा रक्षकही जखमी झाला असून त्याच्यावरही उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करू न पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण अद्याप समजले नाही. ताफ यातील गाड्यांचा वेग, अचानक आलेली दुचाकी, रस्त्यावरील गर्दी यामुळे अपघात झाल्याचे सांगण्यात येते. घटनेनंतर परिसरात काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. या घटनेमुळे तेलगाव-धारू र रस्त्यावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. ताफ यातील गाड्यांच्या वेगामुळे आणि निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याचा आरोप स्थानिकांनी केला असून, एका सामान्य कुटुंबावर आलेल्या या संकटाबद्दल परिसरात हळहळ व्यक्तहोत आहे. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने ताब्यात घेउन चालक आणि वाहनाविरु द्ध गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.



### गडचिरोली : बावनकुळेंच्या उपस्थितीत काँग्रेसचे डझनभर कार्यकर्ते भाजपात

**गडचिरोली-** नगरपरिषद निवडणुकीची मतदानाची तारीख जवळ येत असताना, राजकीय हालचालींना वेग येत आहे. दररोज एका ना एका पक्षातील नेते आपली नाराजी व्यक्त करत इतर पक्षात सामील होत आहेत. आज, शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी गडचिरोली शहरात असेच दृश्ये पाहायला मिळाली. युवक काँग्रेसचे सरचिटणीस आणि सक्रिय पक्षनेते अतुल मल्लेलवार, अमित संगीडवार आणि इतर डझनभर ज्येष्ठ नेते काँग्रेस पक्षाशी असलेले संबंध सोडून भाजपमध्ये सामील झाले आहेत. राज्याचे महसूल मंत्री आणि ज्येष्ठ भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी या काँग्रेस नेत्यांचे भाजपमध्ये स्वागत केले आणि त्यांना भाजपचा दुपट्टा देउन पक्षाला बळकटी दिली. सध्या, नागरपारिषाद निवडणुकी भोवतीचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. भाजपच्या नगर अध्यक्ष पदाचा उमेदवार प्रणोती सागर निंबोरकर आणि इतर सर्व २७ नगर सेवक उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे शनिवारी गडचिरोलीत पोहोचले. शहरातील चामोर्शी रोडवरील भाजपच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन त्यांनी केले. या कार्यक्रमात भाजपला एक नवी धार लाभल्याचे दिसत असले तरी, नगरपरिषद निवडणुकीपूर्वीच काँग्रेस पक्ष पूर्णपणे मागे पडल्याचे दिसून आले. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बंडोपंत मल्लेलवार यांचे पुत्र आणि युवक काँग्रेसचे सरचिटणीस, अनेक वर्षे समर्पणाने काँग्रेस पक्षाची सेवा करणारे ज्येष्ठ नेते अतुल मल्लेलवार यांनी काँग्रेस पक्षाच्या विचारसरणीबद्दल नाराजी व्यक्त करू न काँग्रेसला राम राम ठोकून भाजपमध्ये प्रवेश केला. अमित संगीडवार आणि दहा वर्षांपासून पक्षात सामील झालेले इतर नेतेही पक्षात सामील झाले. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व नवीन नेत्यांचे हार्दिक स्वागत केले. दरम्यान, निवडणुकीला फक्त १० दिवस शिल्लक असताना, मतदान आणि मतमोजणीपूर्वी निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश काँग्रेसला थेट नुकसान पोहोचवेल अशी चर्चा शहरात पसरली आहे.



### नार्कोटिक्स विभागाने ४.७९ कोटींचे ड्रग्ज केले जप्त

ऐझॉल - सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) गुप्त माहितीवरू न कारवाई करताना, बीएसएफ ऐझाल आणि उत्पादन शुल्क आणि नार्कोटिक्स विभाग, मिझोराम यांच्या संयुक्त पथकाने शनिवारी पश्चिम ऐझाल परिसरात मोठे यश मिळवले. संयुक्त कारवाईदरम्यान, पथकाने ५.८९ किलो मेथाम्फेटामाइन आणि ४१ ग्रॅम हेराइन जप्त केले, ज्याची एकूण किंमत अंदाजे ४.७९ कोटी रु पयांपेक्षा जास्त आहे.अधिका-यांनी सांगितले की, कारवाईदरम्यान म्यानमारच्या दोन नागरिकांसह चार ड्रग्ज तस्करांना अटक करण्यात आली. सर्व आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे आणि आवश्यक कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.बीएसएफ आणि राज्याच्या नार्कोटिक्स विभागाने या यशस्वी कारवाईचे वर्णन ड्रग्ज तस्करीविरु द्ध सुरू असलेल्या मोहिमेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून केले आहे. अधिका-यांच्या मते, सीमावर्ती भागात अशा प्रकारच्या कारवाया आणखी तीव्र केल्या जातील.

### पंजाबमध्ये 50 किलो हेरॉइनसह एका तरु णाला अटक

**चंडीगड** - पंजाब पोलिसांनी सीमापार ड्रग्ज तस्करी माड्यूलचा पर्दाफाश केला आहे, एका तरु णाला ५० किलो हेराइनसह अटक केली आहे.एक किलो हेराइनची किंमत सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात ५ कोटी रु पये आहे. पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी शनिवारी येथे पत्रकारांना सांगितले की, अमली पदार्थ विरोधी कार्यदलाने कपूरथळा येथील रहिवासी संदीप सिंग उर्फ सीमा याला अटक केली आहे, ज्याचे पाकिस्तानमधील आयएसआय समर्थित संघटनांशी संबंध आहेत.हे हेराइन सीमेपलीकडून येथे तस्करी करण्यात आले होते. त्यांनी पुढे सांगितले की, संदीप उर्फ सीमा याच्यावर ड्रग्ज तस्करीचे आधीच पाच गुन्हे दाखल आहेत. आरोपी नुकताच जामिनावर तुरु ंगातून बाहेर आला आणि त्याने तस्करी सुरू केली.त्यांनी सांगितले की, पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे आरोपीवर लक्ष ठेवले आणि माहिती दिलेल्या ठिकाणी छापा टाकला आणि हेराइन जप्त केले. आरोपीचे पंजाब आणि इतर राज्यांमधील इतर तस्करांशी संबंध आणि तो हेराइन कुठे पुरवायचा याचा हेतू होता हे शोधण्यासाठी चौकशी सुरू आहे, असे डीजीपींनी सांगितले. आरोपीविरु द्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.

# संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आणणार १० नवी विधेयके

## परमाणु क्षेत्रात खाजगी कंपन्यांना प्रवेशाची तयारी



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** संसदेचे हिवाळी अधिवेशन १ डिसेंबरपासून सुरू होउन १९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. या कालावधीत एकूण १५ बैठका होतील. सरकार या अधिवेशनात १० नवी विधेयके सादर करणार असून, मागील अधिवेशनातील दोन विधेयकेही या वेळी चर्चेसाठी व मंजुरीसाठी सूचीबद्ध केली आहेत. यासोबतच वित्त वर्षाचे पहिले अनुपूरक बजेट देखील सादर केले जाईल.

परमाणु उर्जा विधेयक, २०२५ खाजगी क्षेत्रासाठी दारे उघडणार-हिवाळी अधिवेशनातील सर्वात महत्त्वाचे विधेयक म्हणजे परमाणु उर्जा विधेयक, २०२५.या विधेयकाद्वारे देशातील नागरी परमाणु क्षेत्र प्रथमच खाजगी कंपन्यांसाठी खुलं होणार आहे. आतापर्यंत हा संपूर्ण क्षेत्र सरकारी नियंत्रणाखालीच होता. सरकारच्या मते, या नव्या कायद्यामुळे परमाणु उर्जेचा वापर व नियमन अधिक आधुनिक आणि कार्यक्षम होईल. उर्जा उत्पादनाला नव्या गतीची प्राप्ती होईल आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान विकासाला प्रोत्साहन मिळेल

**उच्च शिक्षण आयोग विधेयकही अजेंड्यावर-**सत्राच्या कार्यक्रमात हायर एज्युकेशन कमिशन ऑफ इंडिया बिल देखील समाविष्ट आहे.लोकसभेच्या बुलेटिननुसार, या विधेयकाद्वारे असा आयोग स्थापन केला जाईल जो विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांना अधिक स्वायत्तता देईल. त्यांना स्वतंत्र आणि स्वयं-शासित बनविण्यास मदत करेल. तसेच मान्यता प्रक्रियेतील पारदर्शकता आणि काटेकोरपणा वाढवेल. हे विधेयक बराच काळ सरकारच्या नियोजनात होते आणि आता ते पुढे नेले जात आहे. सरकार काही जुन्या कायद्यांना अधिक सोपा, आधुनिक आणि प्रभावी बनवण्याची तयारी करत आहे. त्यामध्ये खालील महत्त्वाची विधेयके आहेत:

१. नॅशनल हायवेज (सुधारणा) विधेयक राष्ट्रीय महामार्गांसाठी जमीन अधिग्रहण प्रक्रिया, अधिक जलद, पारदर्शक आणि सोपी करण्याचे उद्दिष्ट २. कार्पोरेट लाज (सुधारणा) बिल, २०२५ कंपन्या अधिनियम २०१३ आणि एलएलपी कायदा २००८ मधील बदल. ईज ऑफ डूइंग बिझनेस सुधारण्यासाठी नवे प्रावधान ३. सिक्युरिटीज मार्केट्स कोड बिल, २०२५. तीन महत्त्वाचे कायदे एकत्र करू न एकच व्यापक कोड तयार करण्याचा प्रस्ताव:

सेबी अधिनियम, डिपाझिटरी अधिनियम

सिक्युरिटी कान्ट्रॅक्ट रेग्युलेशन अधिनियम

यामुळे शेअर बाजाराशी संबंधित सर्व नियम एकसमान आणि सुटसुटीत होतील.मध्यस्थता आणि तडजोड कायद्यातही बदलांची शक्यताआहे. सरकार मध्यस्थता आणि तडजोड अधिनियम सुधारण्याचाही विचार करत आहे.यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली आहे, विशेषता सेक्शन ३४ मध्ये आवश्यक बदलांसाठी नवा प्रस्ताव तयार केला जात आहे.

# G20 शिखर परिषदेने परंपरा मोडली

## अमेरिकेच्या बहिष्काराला न जुमानता ठराव मंजूर



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**दक्षिण आफ्रिकेत आयोजित G२० शिखर परिषदेत सहभागी देशांनी हवामान बदलावर ऐतिहासिक संयुक्त घोषणापत्र पारित केले आहे. विशेष म्हणजे, या घोषणापत्राला अमेरिकेचा विरोध आणि परिषदेतून बहिष्कार असूनही G२० सदस्य देशांनी सर्वानुमते मंजुरी दिली. यामुळे या निर्णयाला परंपरेला छेद देणारे असे म्हटले जात आहे.

अमेरिकेचा बहिष्कार अन् दक्षिण आफ्रिकेसोबतचे राजनैतिक मतभेद

अमेरिकेने जोहान्सबर्ग परिषदेत सहभागी होण्यास आधीच नकार दिला होता. रायटर्सच्या अहवालानुसार, दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामफोसा यांनी सांगितले की, अमेरिका संयुक्त घोषणापत्रातील काही शब्दांवर आक्षेप घेत होता. रामफोसा म्हणाले, हवामान बदलावरील घोषणापत्र पुन्हा चर्चेसाठी आता उघडू शकत नाही. त्यांच्या या वक्तव्यामुळे अमेरिकेसोबतच्या वाढत्या तणावाला अधोरेखित केले आहे.

**शिखर परिषद सुरू होताच घोषणापत्राला मंजुरी**

सामान्यत G२० चे घोषणापत्र बैठकीच्या शेवटी पारित केले जाते. मात्र, या वेळी परंपरा मोडत शिखर परिषद सुरू होताच घोषणापत्र एकमताने स्वीकारण्यात आले. राष्ट्राध्यक्ष रामफोसा यांनी आपल्या संबोधनात सांगितले की, या घोषणापत्रासंदर्भात व्यापक सहमती आहे, त्यामुळे शिखर परिषद सुरू होताच ते स्वीकारले पाहिजे. त्यांचे प्रवक्ते विन्सेंट मॅग्वेन्या यांनी सांगितले की, घोषणापत्राला शिखर परिषदेच्या सुरुवातीला मंजुरी देणे हा असामान्य निर्णय होता, परंतु याला मिळालेल्या जबरदस्त पाठिंब्यामुळे हे संभव झाले.

**ट्रम्प सरकारचा दबाव, पण दक्षिण आफ्रिकेचा नकार**

दक्षिण आफ्रिकेच्या अधिका-यांनी पुष्टी केली की, डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अनुपस्थितीत G२० चे संयुक्त घोषणापत्र स्वीकारू नका, असा दबाव टाकलो हात. पण दक्षिण आफ्रिकेने हा दबाव न मानता हवामान बदलावरील जागतिक सहमतीला प्राधान्य दिले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी शिवसेनेकडून जिल्हा संपर्क प्रमुखांची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी-**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेकडून जिल्हा संपर्क प्रमुखांची आज घोषणा करण्यात आली. नगर पंचायत, नगर परिषदा आणि आगामी जिल्हा परिषदा व महापालिका निवडणुकीत भक्कमपणे लढण्यासाठी जिल्हा संपर्क प्रमुखपदी पक्षातील ज्येष्ठ नेते, खासदार आणि आमदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत संपर्क प्रमुखांनी जिल्ह्यातच थांबावे, असे निर्देश शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.





शिवसेना सचिव संजय मोरेंकडून प्रसिद्धी पत्रक जारी करण्यात आले असून राज्यातील ४० ठिकाणी पक्षाकडून जिल्हा संपर्क प्रमुख पदांची घोषणा करण्यात आली आहे. खासदार नरेश म्हस्के यांच्याकडे ठाणे, नवी मुंबई आणि पुण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा संपर्क प्रमुख पदाची जबाबदारी किरण पावसकर आणि राजेश मोरे यांच्याकडे देण्यात आली आहे. रत्नागिरीसाठी यशवंत जाधव, रायगड ग्रामीणसाठी संजय घाडी, पालघरसाठी रवींद्र फाटक, ठाणे ग्रामीण प्रकाश पाटील, पिंपरी चिंचवड शहरासाठी सिद्धेश कदम, पुणे ग्रामीणसाठी खासदार श्रीरंग बारणे आणि राम रेपाळे, सातारा शरद कणसे, सांगली राजेश क्षीरसागर, कोल्हापूर खासदार धैर्यशील माने आणि संजय मंडलिक, सोलापूर संजय कदम, नाशिक लोकसभेसाठी राम रेपाळे, दिंडोरी लोकसभेसाठी राम रेपाळे यांच्यासह भाउसाहेब चौधरी यांची जिल्हा संपर्क प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

जळगाव जिल्ह्यासाठी सुनिल चौधरी, नंदुरबारसाठी राजेंद्र गावित, धुळ्याची जबाबदारी मंजुळा गावित यांच्यावर सोपवण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरात महानगरचो संपर्कप्रमुख विलास पारकर, छत्रपती संभाजीनगर ग्रामीणसाठी अर्जुन खोतकर, जालनासाठी अर्जुन खोतकर आणि भास्कर आंबेकर यांची निवडणूक केली आहे. बीडमध्ये टी. पी मुंडे आणि मनोज शिंदे, धाराशीवसाठी राजन साळवी, नांदेडसाठी सिद्धराम म्हेत्रे, लातूरसाठी किशोर दराडे, बुलढाणामध्ये हेमंत पाटील, परभणीमध्ये आनंद जाधव, नागपूर ग्रामीण आणि नागपूर शहरसाठी दिपक सावंत तसेच गडचिरोलीसाठी दिपक सावंत यांच्यासह किरण पांडव यांच्यावर जिल्हा संपर्क प्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. भंडारासाठी गोपीकिशन बाजोरिया, अमरावतीसाठी नरेंद्र भोंडेकर, वर्धासाठी राजेंद्र साप्ते, यवतमाळमध्ये हेमंत गोडसे, वाशिममध्ये जगदीश गुप्ता, हिंगोलीमध्ये हेमंत पाटील, अकोलामध्ये अभिजित अडसूळ, चंद्रपूर किरण पांडव आणि अहिल्यानगरमध्ये विजय चौघुले यांची जिल्हा संपर्क म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# अजित पवारांपेक्षा देवेंद्र फडणवीसांवर विश्वास ठेवा : मंत्री चंद्रकांत पाटील

**पुणे/प्रतिनिधी-** राज्यात आज युतीचे सरकार असले तरी, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आपले पक्ष स्वबळावर लढत असल्याचे चित्र राज्यात दिसतं आहे. भोर नगरपरिषद निवडणूकीमध्ये भारतीय जनता पार्टी सर्व जागा २० लढवत आहे. पुण्याचे पालकमंत्री राष्ट्रवादीचे जरी असले तरीही मुख्यमंत्री भारतीय जनता पक्षाचे आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री यांच्याकडे पाहून कमळाच्या चिन्हासमोरील बटण दाबून सर्व उमेदवार विजयी करा, असे आवाहन कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भोरच्या प्रचार सभेमध्ये केले.



माजी आमदार संग्राम थोपटे यांनी लोककल्याणासाठी भाजपा पक्षात प्रवेश केला आहे. विधानसभेच्या अगोदर त्यांनी भाजपात प्रवेश केला असता तर ते आज भोर विधानसभेचे आमदार असते, असे उद्गार उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काढले. भोर शहरातील वाघजाई मंदिराच्या शेजारी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, भोर नगरपरिषद निवडणुकीचे भाजपा प्रभारी अध्यक्ष राजेंद्र शिळीमकर, पुणे जिल्हाध्यक्ष दक्षिण विभाग शेखर वढणे, राजगड ज्ञानपीठच्या मानद सचिवा स्वरूपा थोपटे, पृथ्वीराज थोपटे, भाजपा नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार संजय जगताप, भाजपा राज्य परिषद सदस्य बाळासाहेब गरु ड, पुणे जिल्हा उपाध्यक्ष जीवन कोंडे, भाजपा भोर तालुका अध्यक्ष संतोष धावले, सर्व उमेदवार व इतर भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### मतदार यादी संदर्भातील तक्रारी संबंधित मनपा आयुक्तांकडे दाखल करव्यात

-राज्य निवडणूक आयोग

**मुंबई** : महानगरपालिका निवडणुकांसाठी मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन संबंधित महानगरपालिका आयुक्तांच्या स्तरावर करण्यात आले असून, त्याबाबत हरकती व सूचना किंवा काही तक्रारी असल्यास त्या २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत संबंधित महानगरपालिकेत दाखल करव्यात, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केलो आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्यांकरिता १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून, त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्या या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहेत. या मूळ मतदार याद्या भारत निवडणूक आयोगाने तयार केल्या आहेत. त्यांचे प्रभागनिहाय विभाजन संबंधित महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्तांच्या देखरेखीखाली करण्यात आले आहे.

# भाजप नेत्यांचे नातेवाईकच कसे बिनविरोध निवडून येतात?

**छ. संभाजीनगर : प्रतिनिधी-**भाजपला सत्तेचा माज चढला आहे, प्रचंड दबावतंत्र आणि प्रशासनाचा गैरवापर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये सुरू आहे. शंभर उमेदवार अन् अनेक नगराध्यक्ष बिनविरोध निवडून आल्याचा दावा त्यांचे नेते, प्रवक्ते करत आहेत. मुळात हा विजय नाही तर भाजप नेत्यांचा आणि या पक्षाचा माज आहे. सगळ्या नेत्यांचे नातेवाईकच बिनविरोध कसे निवडून येतात? एखादा सामान्य कार्यकर्ता उमेदवार नगराध्यक्ष किंवा नगरसेवक म्हणून बिनविरोध निवडून का येत नाही? असा सवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. राज्यातील विविध घडामोडींवर अंबादास दानवे यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये माध्यमांशी संवाद साधला.



**अंबादास दानवे यांचा सवाल**

भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी भाजपच्या बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेवकांची वाटचाल शतकाकडे जात असल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अभिनंदन केले आहे. या संदर्भात प्रश्न केला असता अंबादास दानवे यांनी भाजपला सत्तेचा माज चढला असल्याची टीका केली. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री, आमदार भाजपमध्ये जाणार का? या प्रश्नाला उत्तर देताना दानवे म्हणाले, आत्ताच्या घडीला शिंदे यांचे कित्येक मंत्री ऐकत नाहीत, त्यांना फडणवीस ऑपरेटिंग करत आहेत. उदय सामंत अशा मंत्र्यांना लीड करत आहेत. आज नाहीतर उद्या हे लोक भाजपमध्ये जाणार आहेत, असा दावा करतानाच गद्दारांना पुन्हा आमच्याकडे प्रवेश नाही, असेही दानवे यांनी स्पष्ट केले.

# ताडोबा व्याघ्र प्रकल्प परिसरातील 800 एकर जागेचे होणार पर्यावरणीय पुनरूज्जीवन

**मुंबई/प्रतिनिधी-**विदर्भातील विविध विकास कामांबरोबरच तेथील जंगल संपदा राखण्यासाठी व त्याच्या वाढीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नेहमीच आग्रही आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील ८०० एकर जागेचा पर्यावरणीय पुनरु ज्जीवन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाला झिरोधा कंपनी व रेन मॅटर फाउंडेशन सामाजिक उत्तरदायित्वातून सहकार्य करणार आहेत.



रिवाईल्डिंग म्हणजे जंगल, गवताळ प्रदेश किंवा जलक्षेत्रात मानवी हस्तक्षेप कमीत कमी ठेवून तेथील नैसर्गिक भूभाग, वन्यजीव आणि जैवविविधतेचे पर्यावरणीय पुनरु ज्जीवन करणे होय. या संकल्पनेनुसार ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील ८०० एकर क्षेत्राचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रकल्प ताडोबामध्ये राबविण्यात येणार असून यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाबरोबरच फार्मर्स फार फारेस्ट यांच्या सहकार्याने झिरोधा व रेनमॅटर फाउंडेशन ही संस्था काम करणार आहे. यासाठी सुमारे १०० कोटी रु पयांच्या झिरोधा रिवाइल्डिंग फंड हा विशेष निधी तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पासंदर्भातील औपचारिक घोषणा लवकरच होणार आहे.


झिरोधा आणि रेनमॅटर फाउंडेशन या संस्थांच्या माध्यमातून पर्यावरणीय व सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. रेनमॅटर फाऊंडेशनमार्फत हवामान बदल व पर्यावरणीय -हास या समस्यांवर कामे करण्यात येतात. यासाठी झिरोधा ही कंपनी आपल्या नफ यातील १० टक्के निधी सामाजिक उत्तरदायित्व व पर्यावरणीय कामांसाठी राखीव ठेवते. या राखीव निधीतून झिरोझाने संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त १०० कोटी रु पये गुंतवणुकीचा झिरोधा रीवाइल्डिंग फंड जाहीर केला आहे. या उपक्रमांतर्गत देशातील पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या परिसरातील निसर्गाचे पुनरु ज्जीवन करण्यात येणार आहे. त्यामध्ये देशात विविध ठिकाणी मोनोकल्चर वृक्षलागवडी ऐवजी जैवविविधता टिकवणा-या पद्धतीने निसर्गाचा समतोल राखण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये विदर्भातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील ८०० एकरच्या प्रकल्पाचा समावेश आहे.

विदर्भातील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी रिवाइल्डिंग सारखे प्रकल्प उपयुक्त आहे. अशा कामांमध्ये झिरोधा सारख्या कार्पोरेट कंपन्या सहभागी होत असून हा पर्यावरणपूरक उपक्रम केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर देशातील कार्पोरेट क्षेत्रासाठीही एक आदर्श ठरणार आहे. या उपक्रमाबद्दल अत्यंत उत्साही आहोत. महाराष्ट्र शासन आणि वन विभागासोबतचे हे सहकार्य फलदायी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

### डीपीसीच्या निधी वाटपावरून महायुतीत तणाव

# राष्ट्रवादी व शिंदेंच्या सेनेला भोपळा

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारमध्ये निधी वाटपावरू न सातत्याने खटके उडत आहेत. अजित पवार यांना महायुतीत घेण्यास शिंदेसेनेने याच कारणासाठी विरोध केला होता. आता निधी वाटपाची भांडणे जिल्हा पातळीवर पोहोचू लागली आहेत. त्यावरू न महायुतीत खटके उडायला सुरु वात झाली आहे. अमरावती जिल्ह्यात महायुतीतील मित्रपक्ष राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना (शिंदे) पक्षाला जिल्हा नियोजन समितीकडून निधी वाटपात डच्चू देण्यात आला आहे. भाजपच्या पदाधिकारी, माजी नगरसेवक व भावी उमेदवारांना मात्र खिरापत वाटण्यात आली.



मित्रपक्षांमध्ये यामुळे असंतोष उफाळला असून त्याचे पडसाद मनपा निवडणुकीत उमटण्याची शक्यता आहे निधी वाटपाच्या माध्यमातून भाजपने मनपा निवडणूक स्वतंत्र लढण्याचे संकेत दिले आहेत. महापालिका क्षेत्रातील कामांसाठी जिल्हा नियोजन समितीकडून महापालिकेस १६ कोटी २० लाख रु पयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीचे वाटप भाजपचे पदाधिकारी, माजी नगरसेवक व इच्छुक उमेदवारांनी सुचविलेल्या कामांसाठी करण्यात आले आहे. सर्व कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहेत. निधी वाटपात शहरातील महत्त्वाकांक्षी भुयारी गटार योजनेसाठी दीड कोटी रु पये मंजूर करण्यात आले असले तरी उर्वरित सर्व निधी भाजपच्या पदाधिकारी व माजी नगरसेवकांनी सुचविलेल्या कामांसाठी वळविण्यात आला आहे. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर हे निधी वाटप करण्यात आले आहे. महायुतीत मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) व शिंदे गटाला या निधीत स्थान देण्यात आलेले नाही. त्यावेळी माजी खासदार नवनीत राणा यांना निधी देण्यात आला आहे. नवनीत राणा भाजपच्या सदस्या असल्या तरी त्यांचे मूळ युवा स्वाभिमान पक्ष आहे. निधी वाटपात स्थान न मिळाल्याने महायुतीमधील मित्रपक्षांत धुसफूस सुरू झाली आहे. दरम्यान, भाजपने या माध्यमातून आगामी महापालिकेच्या निवडणुकीत दोन्ही मित्रांना दूर ठेवण्याचा पहिला टप्पा पूर्ण केला असून स्वबळाचे संकेतही दिले आहेत, त्यामुळे मित्रपक्षांमध्ये धुसफूस सुरू झाली आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, २३ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# तीन वर्षीय चिमुरडीवरील अत्याचार प्रकरणी आरोपीला फाशी देण्याची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**मौजे डोंगराळे (ता. मालेगाव, जि. नाशिक) येथील तीन वर्षांच्या निरागस चिमुरडीवर अमानुष अत्याचार करून तिचा दगडाने ठेचून निर्घृण खून करणाऱ्या आरोपी विजय खैरनारला तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी तीव्र मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) नेते व ऑल इंडिया ब्लू टायगर सेनेचे संस्थापक अध्यक्ष जगदीश मानवतकर यांनी केली आहे. या मागणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत लेखी निवेदन सादर करण्यात आले.**




निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, तीन वर्षीय चिमुरडीवरील क्रौर्याला राज्य सरकारने कडकात कडक शिक्षा देण्यासाठी विलंब न लावता सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्या नेतृत्वाखाली फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवावा, जेणेकरून आरोपीला शक्य तितक्या कमी कालावधीत मृत्युदंडाची शिक्षा मिळेल. तसेच या गुन्हेगारावर कोणताही सरकारी खर्च न करता, त्याला कोणताही बचाव पक्षाचा वकील उपलब्ध करून न देता, थेट कडक कायद्यानुसार कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली. यासोबतच अशा प्रकारचे अत्याचार वाढत असल्याने 'कुमारी यज्ञा कायदा' नावाने नव्या विशेष कायद्याची राज्याने निर्मिती करावी, या कायद्यानुसार अल्पवयीन मुलींवरील अत्याचारप्रकरणी कोणतीही दया न दाखवता तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची तरतूद असावी, अशी मागणीही मानवतकर यांनी निवेदनात मांडली. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले की, मौजे ध्यानोरा बुजुर्ग (ता. वाशिम) येथील २४ वर्षीय तरुण अभिषेक जनार्दन मानवतकर याची जातीवादातून हत्या झाल्याचा संशय त्याच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. या घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि दोषींना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली. वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयात २५ वर्षीय गर्भवती महिला स्व. श्वेता अजय पडघाने यांचा अति रक्तस्त्रावामुळे मृत्यू झाल्याचे गंभीर प्रकरणही निवेदनात नमूद करण्यात आले. या प्रकरणात डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला असल्याचा आरोप करत, संबंधित डॉक्टरांना तात्काळ निलंबित करावे, पिडीत कुटुंबाला न्याय द्यावा, तसेच अकोला जिल्हा शल्य चिकित्सक यांनी या प्रकरणातील व्हिसेरा रिपोर्ट पोलीस तपासासाठी तात्काळ हस्तांतरित करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली. 'जर व्हिसेरा रिपोर्ट दहा दिवसांत प्राप्त झाला नाही तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) आणि ऑल इंडिया ब्लू टायगर सेनेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येईल,' असा इशाराही जगदीश मानवतकर यांनी दिला. निवेदनाच्या प्रती राज्यपाल, गृहमंत्री आणि आरोग्यमंत्र्यांना या निवेदनाच्या प्रती राज्यपाल, गृहमंत्री, आरोग्यमंत्री यांना पाठवण्यात आल्या असून, राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाहीची मागणी करण्यात आली.

# वाशिममध्ये बालकामगार मुक्ती अभियानाची कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■

बाल व किशोरवयीन कामगारमुक्त समाजाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत आज वाशिममध्ये विशेष बाल व किशोरवयीन कामगार मुक्ती अभियान राबवण्यात आले. अमरावती कामगार उपआयुक्त चंद्रकांत राऊत , अकोला सहाय्यक कामगार आयुक्त राहुल काळे आणि अमरावती सहाय्यक कामगार आयुक्त श्रद्धा वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यवाही करण्यात आली.

अभियानाचे नेतृत्व पंकज खांडेकर, सरकारी कामगार अधिकारी वाशिम आणि दुकाने निरीक्षक योगेश गोटे यांनी केले. त्यांच्या सोबत वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल रुईकर, जिल्हा प्रकल्प सहाय्यक निलीमा भोंगाडे, जिल्हा प्रकल्प पर्यवेक्षक चाईल्ड हेल्पलाइन (१०९८) गोपाल आरू, कामगार विभागातील धीरज राजगुरू, वैभव राठोड, अतुल ढेले, महेश पाटणकर यांचे सहकार्य लाभले.




## दोन किशोरवयीन मुलांची सुटका, आस्थापना मालकांवर कारवाई

या संयुक्त कारवाईत पोलीस स्टेशन वाशिम शहर येथील पो.हे.कॉ. गजानन काळे (ब.न. १००५) यांचाही सक्रिय सहभाग होता. बाल व किशोरवयीन कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम १९९६ तसेच सुधारित अधिनियम २०१६ अंतर्गत घेतलेल्या या विशेष मोहिमेत दोन आस्थापनांवर छापे टाकण्यात आले. छाप्यादरम्यान दोन किशोरवयीन मुलांची सुटका करण्यात आली असून, संबंधित मालक १) नवीन मदनलाल मालवी २) ज्ञानेश्वर पांडुरंग सरनाईक यांच्या विरुद्ध वाशिम पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल करण्यात आली आहे.

या कारवाईमुळे परिसरात बालकामगार निर्मूलनाबाबत सकारात्मक संदेश पसरला असून, कामगार विभागाकडून अशा अभियानांना पुढेही गती देण्याचे संकेत देण्यात आले.

# मालेगावची राजकीय रणधुमाळी : नवे चेहरे चमकणार की जुनेच 'तोल-मोल' करून खुर्ची राखणार?

## मतदार म्हणतात – आम्हाला पुन्हा मुंगेरीलाल के हसीन सपने नको!

**मालेगाव :** नगरपंचायत निवडणुकांच्या तोंडावर मालेगावचे राजकारण अक्षरशः फुटायला आले आहे. शहरभर एक वावटळ उठली आहे.

यावेळी नवा चेहरा संधी मिळवणार का? की जुने, गंजलेले चेहरे पुन्हा तोल-मोलाचे बोल करून सत्ता पकडणार? जुने नेते पंधरा दिवसांत एवढे सक्रिय झालेत की पाहूनच जनता हसते वर्षभर गायब काम शून्य आणि आता निवडणूक आली की भाषणं, आश्वासनं, आणि चक्क गोडगोड वागणूक!

नागरिकांचे ताशेरे कोरडे नाहीत साहेब, आम्हाला या वेळी माहिती आहे हे सगळं फक्त आवाज आणि आव आणणं! 'मुंगेरीलाल के हसीन सपने' आम्ही आता बघत नाही. दुसरीकडे, नव्या चेहऱ्यांनी मात्र शहरात वेगळा माहोल तयार केला आहे. तरुण, स्वच्छ प्रतिमा, सोशल मीडियावर सक्रिय, आणि धारदार मुद्दे यामुळे तरुण मतदारांमध्ये नवे उमेदवार प्रचंड चर्चेत आहेत.

जुन्या नेत्यांची हवा मात्र वेगळीच गुप्त बैठकांचा खेळ वचनांची फटाकेबाजी गल्लोगल्ली पैज लावल्यासारखी चर्चा आणि 'तोल-मोलाचे बोल' करून मतदारांना भुरळ घालण्याचा प्रयत्न पण यावेळी मतदार जागे आहेत. त्यांचा सूर स्पष्ट विकास कुठे? काम काय? फोटोशूटने आणि बोलबच्चन ने शहर चालत नाही! निवडणुकीच्या अवघ्या काही दिवसांत शहरात नुसता राजकीय धुरळा आहे. प्रत्येक गटात आतापर्यंत न दिसलेली धडपड सुरू आहे. जुन्या नगरसेवकांनी आधीच घराघरात स्वप्नांची थाळी नेऊन ठेवली आहे पण जनता म्हणते

**आम्हाला स्वप्नांची प्लेट नको, कामाची हमी हवी! :** मालेगावची निवडणूक यावेळी एकदम ५०-५० चा खेळ बनली आहे. नवे चेहरे दमदार जुने नेते अनुभवी पण प्रश्नचिन्हाखाली आणि मतदार — सगळं बघून शांतपणे निर्णय तयार करत आहेत. आता बघायचं इतकंच शहर नवे नगर सेवक स्विकारते की जुनेच चेहरे पुन्हा एकदा जुगार जिंकतात?

# तांत्रिक अचूकता व पारदर्शकता निवडणूक प्रक्रियेची दोन मजबूत स्तंभ - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**मतदानापूर्वीची ईव्हीएम तपासणी व सीलिंग प्रक्रिया असो किंवा मतमोजणीसारखी संवेदनशील जबाबदारी या दोन्ही टप्प्यांत अचूकता, शिस्त आणि पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची आहे. संपूर्ण जिल्हा प्रशासनाने एकसंघपणे आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम पद्धतीने काम केल्यास उत्तम, निर्दोष आणि विश्वासार्ह निवडणूक प्रक्रिया पार पडेल. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**



नगर परिषद/पंचायत निवडणूकीच्या पारदर्शक, सुरक्षित आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम अंमलबजावणीसाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या ईव्हीएम कमिशनिंग (मतदानापूर्वी ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची तपासणी, चाचणी, उमेदवारांची नावे सेट करणे व सीलिंग प्रक्रिया) व मतमोजणी प्रशिक्षण सत्राचे आयोजन आज जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीपणे पार पडले. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते.

प्रशिक्षणावेळी अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, नगरपालिका प्रशासन सहआयुक्त बाबुराव बिक्कड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी धनाजी तोरसकर, महसूल उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव आदींची प्रमुख उपस्थित होती.

अपर जिल्हाधिकारी श्री. पाटील आणि उपविभागीय अधिकारी कैलास देवरे यांनी ईव्हीएम कमिशनिंग व मतमोजणी प्रक्रियेचे सविस्तर सादरीकरण केले.

यामध्ये ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची तपासणी व चाचणी, उमेदवारांची नावे सेट करणे, डेमो मतदान, मशीनची सीलिंग प्रक्रिया, स्ट्राँगरूम व्यवस्थापन,

मतमोजणी केंद्रांची मांडणी, टेबल मॅनेजमेंट, नियम व खबरदारी याबाबत अधिकाऱ्यांना सखोल मार्गदर्शन देण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी तांत्रिक अचूकता व पारदर्शकता ही निवडणूक प्रक्रियेची दोन मजबूत स्तंभ आहेत. मतमोजणी हा अत्यंत संवेदनशील टप्पा असल्याने नियमांचे काटेकोर पालन करून प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने कर्तव्य पार पाडावे. असेही निर्देश दिले.

या सर्वंकष प्रशिक्षणामुळे ईव्हीएम कमिशनिंगपासून मतमोजणीकडे जाणाऱ्या प्रक्रियेबाबत सर्व अधिकाऱ्यांमध्ये स्पष्टता व आत्मविश्वास निर्माण झाला असून आगामी निवडणूक कामकाज अधिक गतिमान आणि शिस्तबद्ध होणार आहे. जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी आणि निवडणूक यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी हे दुरदृष्यप्रणालीद्वारे प्रशिक्षणास जोडले गेले. त्यामुळे संपूर्ण प्रशासन एकाच वेळी एकसमान पद्धतीने प्रशिक्षित होण्याचा लाभ मिळाला. मतदानपूर्व तसेच मतमोजणीच्या अंतिम टप्प्यातील तांत्रिक कामकाजाबाबत जिल्हा प्रशासन अधिक सज्ज झाले आहे.

# गणेश राऊत विनोबा पुरस्काराने सन्मानित



■ प्रतिनिधी | कारंजा ■

जिल्हा परिषद वाशिम व ओपन लिंक फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करारानुसार राबविण्यात येणाऱ्या आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम विनोबा(बा) ॲपच्या माध्यमातून जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांना प्रत्येक महिन्यात प्रोत्साहनपर पुरस्कार देवून सन्मानित करण्याची योजना राबविली जाते.

या अनुषंगाने ऑक्टोबर महिन्यातील 'पोस्ट ऑफ द मंथ' हा सन्मान जि.प.शाळा अनई येथिल उपक्रमशिल शिक्षक गणेश राऊत यांना प्रदान करण्यात आला. महिला शिक्षिका माधुरी उंदरे यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिक्षण विभाग कारंजा येथे आयोजित कार्यक्रमात सदर पुरस्कार गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने विस्तार अधिकारी सुनील उपाध्ये, केंद्रप्रमुख नानासाहेब मुंदे तसेच जिल्हा समन्वयक अजय राठोड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# बँक प्रतिनिधी पदी स्वाती देशमुख यांची निवड



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील श्रीक्षेत्र कोडोली येथील सेवा सहकारी सोसायटी च्या दि २० नोहेंबर च्या विशेष सभेत कोंडोली येथील सहकार नेते स्व. गजाननराव अण्णासाहेब देशमुख यांच्या सुनबाई सौ स्वातीताई सुनील देशमुख यांची जिल्हा बँक प्रतिनिधी पदी अविरोध निवड करण्यात आली. कोडोली सेवा सहकारी संस्थेची सर्व संचालक मंडळ मीटिंग आयोजित करण्यात आली होती.

# जगद्गुरू रामानंदाचार्यजी पादुका दर्शन सोहळा प्रचारार्थ बैठक संपन्न

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

मंगरुळपीर येथे दिनांक १३ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळ्या संदर्भात प्रचार व प्रसारासाठी एक महत्त्वाची सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली.

ही सभा ईचोरी (ता. मंगरुळपीर) येथील श्री गजानन महाराज मंदिरात आयोजित करण्यात आली होती. सभेत सोहळा यशस्वी करण्यासाठी आवश्यक नियोजन, कार्यपद्धती, जबाबदाऱ्या आणि प्रचाराची रूपरेषा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या सभेला नानिजधामचे प्रोटोकॉल



अधिकारी अतुल कुलकर्णी, प्रभाकर लाकडे, जीवन आगाम, सुनिल कठाळे तसेच वाशिम जिल्हा निरीक्षक अविनाश देशमुख हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्यांची आखणी करण्यात आली असून सोहळ्याचे नियोजन अधिक शिस्तबद्ध करण्यावर भर देण्यात आला.

या सभेत संजय महाजन, संजय वाणी, वाशिम तालुका अध्यक्ष भानुदासराव शिरसाट, हरणे, सोनकर, विश्वास परांडे, शेळके काका, जेजेराम गाडे, मानोरा तालुका अध्यक्ष राजू ठाकरे, मंगरुळपीर तालुका अध्यक्ष दत्ता नागरे, सरपंच संतोष घोडके, गजानन लागडे, मनोज गव्हाणे, हरिचंद्र हुबरे, दिलीप लागडे, योगीराज हुबरे, सिताराम नागरे, गजानन कालापाड, मुर्ली लोणारे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक, कार्यकर्ते व भाविक उपस्थित होते. यावेळी बोलताना अतुल कुलकर्णी यांनी सांगितले की, 'हा पादुका दर्शन सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजाला एकत्र आणणारा आणि आध्यात्मिक ऊर्जा देणारा सोहळा आहे. जास्तीत जास्त भाविकांपर्यंत याची माहिती पोहोचविणे हे सर्वांचे कर्तव्य आहे.' सभेमध्ये गावोगावी प्रचार, भित्तिपत्रके, बॅनर, लाऊडस्पीकर द्वारे जाहिरात, सोशल मीडिया माध्यमातून प्रचार भाविकांसाठी वाहतूक, पिण्याचे पाणी, पार्किंग आणि शिस्त व्यवस्थापन यासंदर्भातही नियोजन करण्यात आले.

# महाटीईटी २०२५ वाशिममध्ये कलम १६३(३) लागू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत आयोजित महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२५ ही परीक्षा २३ नोव्हेंबर रोजी सकाळ व दुपार अशा दोन सत्रांमध्ये पार पडणार आहे. वाशिम शहरातील २२ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात येत असून, परीक्षेच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

# ओबीसी मुद्दा; न्यायालयाच्या आदेशाकडे लक्ष

## २५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या सुनावणी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

ओबीसी आरक्षणासंदर्भातील महत्त्वाच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागल्याने नगर पंचायत निवडणुकीच्या रणधुमाळीत सहभागी झालेल्या उमेदवारांनी सध्या प्रचाराचा हात आखडला आहे. परिणामी, शहरातील प्रचार 'कोरडा' झाला असून, ग्रामीण भागातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या इच्छुकांनीही आपले दौरे थांबवले आहेत.

***निवडणुका थांबणार का, न प जि. प., पं. स. च्या निवडणुकांसाठीचे आरक्षण बदलणार का, की काही प्रभागांचे गट गणाचे बदलणार या बद्दल तर्कवितर्क लढवले जात आहेत.***

९ वर्षापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम अखेर जाहीर झाला. उमेदवारी अर्ज भरले गेले आणि आता अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू असतानाच २७ टक्के ओबीसी आरक्षणांचा मुद्दा २५ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात निर्णायक टप्प्यावर आला आहे. येणाऱ्या निकालाची चिंता सर्वच राजकीय नेत्यांना लागून राहिली आहे आणि याच चिंतेमुळे निवडणुकीच्या रंगात भंग पडल्याचे चित्र आहे. न्यायालयाच्या निकालाबाबत अनिश्चितता असल्याने, नगर पंचायत निवडणुकीच्या प्रचारात गुंतलेल्या उमेदवारांनी मोठी थास्ती घेतली आहे. आरक्षणाचा फटका कोणाला बसेल? किंवा निवडणुका थांबतील का? अशा प्रश्नांमुळे प्रचाराच्या उत्साहाला मोठा ब्रेक लागला आहे. याचा थेट परिणाम प्रचारात शांतता जाणवत आहे. सुनावणी दरम्यान २७ टक्के ओबीसी आरक्षणाचा वाद निकाली लागण्याची शक्यता आहे.

# डोंगराळे गावातील चिमुकलीवरील बलात्कार-हत्येप्रकरणी अनसिंगमध्ये तीव्र संताप

- नराधमाच्या प्रतिकृतीचा पुतळा जाळत निषेध
- आरोपीस तात्काळ फाशीची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात चार वर्षांच्या निरागस चिमुकलीवर झालेल्या बलात्कार व निर्घृण हत्येच्या घटनेविरोधात संपूर्ण राज्यभर संताप व्यक्त होत असताना वाशिम तालुक्यातील अनसिंग शहरातही आज तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. जुने बसस्टँड परिसरात नागरिकांनी आरोपी नराधमाचा प्रतिकृती पुतळा तयार करून जाळत तीव्र रोष व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ता यश सतीश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली प्रतिनिधी मंडळाने अनसिंग पोलीस स्टेशन मार्फत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस निवेदन देऊन आरोपीस



तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची ठाम मागणी नोंदवली. 'फास्ट ट्रॅक कोर्टातील प्रक्रिया आणखी वेगाने पूर्ण करून चिमुकलीला न्याय मिळावा, समाजात निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर अशा नराधमांना फाशीची शिक्षा मिळणे अत्यावश्यक आहे,' असे स्पष्ट करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की ,ही घटना समाजाला हादरवणारी असून अशा विकृत प्रवृत्तीला रोखण्यासाठी कठोर भूमिका घेणे अनिवार्य आहे. यज्ञा बाळाला आणि तिच्या कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे, अशी सर्व अनसिंगकरांची एकमुखाने मागणी आहे. निषेध आंदोलनात सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील मोठी उपस्थिती होती. सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल सातव, यश चव्हाण, चंद्रकांत ठाकरे, बालू माल, गजानन कुठे, अनंता लांडगे, सागर सातव, रमेश पुरी, विनोद गाभणे, गजानन नवगणकर, आनंदा ढोके, साईनाथ वाघमारे तसेच सुवर्णकार संघटनेचे सदस्य आणि शहरातील सर्व व्यापारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

महिलांवरील आणि लहान मुलींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी राज्याने अधिक कठोर पावले उचलावीत, कठोर शिक्षा देण्यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया गतिमान करावी, अशी सर्वांची एकमुखाने मागणी आंदोलनादरम्यान करण्यात आली.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३५४ ■ रविवार, २३ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# वर्ध्यात गौतमी पाटीलच्या कार्यक्रमात गोंधळ; खुर्च्यांची उडती देवाणघेवाण

## -पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील सांस्कृतिक महोत्सवाच्या कार्यक्रमांतर्गत शनिवारी रात्री प्रसिद्ध लोकनर्तकी गौतमी पाटीलच्या नृत्य प्रदर्शनात प्रचंड गर्दी आणि अपुरी व्यवस्था यामुळे तुफान गोंधळ झाल्याची घटना स्वावलंबी मैदानावर घडली. या प्रसंगी, मागच्या बाजूला बसलेले प्रेक्षक स्टेजवरून नृत्य प्रदर्शन नीट न पाहता नाराज झाले. त्यांनी जोरदार ओरडल्याने तणाव वाढला आणि काही तरुणांनी एकमेकांवर खुर्च्या फेकून राडा सुरू केला.स्थिती अधिक चिघळल्यावर आयोजकांनी व बाऊन्सर्सनी गोंधळ थांबवण्यासाठी प्रयत्न केला, मात्र काही ठिकाणी बाऊन्सर व प्रेक्षकांमध्ये धक्काबुक्की, आणि शिवीगाळ सुरूच राहिली. काही लोकांनी स्टेजवर चढण्याचाही प्रयत्न केला, काहींनी मोबाइल फ्लॅश लावून कार्यक्रम थांबवण्याचा प्रयत्न केला. गोंधळ वाढल्यामुळे पोलिसांना तातडीने हस्तक्षेप करावा लागला आणि त्यानी काही जणांना




मैदानाबाहेर काढले तसेच सुरक्षित जागेवर नेले.या घटनेनंतर प्रेक्षकांनी आयोजकांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. अपुरी सुरक्षा, बसण्याच्या व्यवस्था नसणे आणि गर्दी नियंत्रणाचा अभाव यामुळे कार्यक्रमाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. कार्यक्रम काही काळासाठी थांबवण्यात आला, नंतर बसण्याचे व्यवस्थापन करून पुन्हा सुरू करण्यात आला, पण प्रेक्षकांच्या मनामध्ये भीती आणि असंतोष कायम राहिल्याचे जाणवले.गोंधळामुळे काही खुर्च्या तुटल्या आणि उपकरणांना देखील नुकसान झाले. वर्धा पोलिसांनी गोंधळ घालणाऱ्या तरुणांची ओळख पटवण्यासाठी तपास सुरू केला असून, कार्यक्रमांसाठी कठोर सुरक्षा उपाययोजना करण्याचे निर्देश आयोजकांना दिले आहेत. गौतमी पाटीलच्या टीमने या घटनेबद्दल खंत व्यक्त केली असून, प्रेक्षकांची सुरक्षा हे त्यांचे पहिले प्राधान्य असल्याचा उल्लेख केला आहे. स्थानिक नागरिकांनीही अपुरी व्यवस्थापनामुळे असल्या प्रकारांच्या पुनरावृत्तीवर नाराजी व्यक्त केली आहे.या घटनेमुळे वर्ध्यातील सांस्कृतिक कार्यक्रमांच्या व्यवस्थापनावर, विशेषतः सुरक्षा व्यवस्था आणि प्रेक्षकांवरील नियंत्रणावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. आयोजकांनी यातील त्रुटींचे निराकरण करणे गरजेचे असल्याचे नागरिकांच्या मतांमधून स्पष्ट झालं आहे.

# पुलगाव निवडणूकीत आरक्षणाबाबत तणाव

## -नगरपालिकेत ५० टक्क्यांहून अधिक आरक्षणामुळे निवडणूक होणार की स्थगित?

### -राजकीय पक्षांची रणनीती आणि उमेदवारांची संख्या यामुळे तापलेले वातावरण

**पुलगाव जनमाध्यम :** पुलगाव नगरपालिकेतील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाढलेल्या आरक्षण टक्क्यांमुळे सध्या राजकीय वातावरण तापलेले आहे. या प्रकरणामुळे निवडणूक होणार की स्थगित होणार, हा प्रश्न सर्वांच्याही मनात आहे, आणि त्यामुळे राजकीय गल्लीपासून ते चहाटळांपर्यंत चर्चा जोरदार सुरू आहे. जिल्ह्यातील इतर नगरपालिकांच्या तुलनेत, पुलगावमधील आरक्षणाचा टक्का ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे, ज्यामुळे निवडणुकीच्या प्रक्रियेला प्रश्नचीन्ह निर्माण झाला आहे.आरक्षणाचा मुद्दा आणि निवडणूक स्थगितीराज्य निवडणूक आयोगाकडून आणि सर्वोच्च न्यायालयाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारी संदर्भात उपाययोजना केल्या जात आहेत. महाराष्ट्रातील अनेक नगरपरिषदा आणि जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण जाहीर झालेले असून, सर्वोच्च न्यायालयाने या मर्यादेचे उल्लंघन न होण्याचे निर्देश दिले आहेत. या संदर्भात पुलगावात देखील निवडणूक आयोगाने आरक्षण कमी करण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. यातून निवडणूक स्थगित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे, परंतु स्थगितीत निवडणूक आयोग प्रभाग रचनेचा आणि आरक्षणाचा नवीन अहवाल तयार करेल, अन्यथा विद्यमान आरक्षणानुसार मतदान सुरळीतपणे केले जाईल.नामांकन प्रक्रिया आणि उमेदवारनाव नोंदणीची अंतिम मुदत संपल्यावर नगरपालिका अध्यक्ष पदासाठी ८ उमेदवार आणि नगरसेवक पदासाठी १२३ उमेदवारांनी अर्ज केले असून, अजूनही निवडणुकीसाठी तयारी सुरू आहे. काही उमेदवारांनी मागे हटण्याचा निर्णय घेतला आहे तरी बहुसंख्य अर्ज प्रामाणिक आहेत, ज्यामुळे निवडणूक लढतेची शक्यता वाढली आहे.राजकीय पक्षांचे युती आणि सामनामहाविकास आघाडीतील शरद पवार गट आणि काँग्रेसमध्ये युती असून त्यांचा उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी आहे, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) सुद्धा उमेदवार उभा करत आहे. मात्र महायुतीत भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट), आणि शिवसेना (शिंदे गट) स्वतंत्र आहेत, ज्यामुळे मतांची विभागणी होण्याची चिन्हे स्पष्ट आहेत. याशिवाय अपक्ष उमेदवार, वंचित बहुजन आघाडी आणि बहुजन



समाज पार्टीही सक्रिय आहेत, जे निवडणुकीला बहुकोनी स्पर्धा बनवत आहेत.राजकीय तापमान आणि मतदारांची स्थितीवाढलेले आरक्षण आणि निवडणूक स्थगित होण्याची शक्यता या कारणांमुळे पुलगावात राजकीय वातावरण तापलेले असून मतदार, पक्षकार आणि उमेदवार सगळे एका निर्णयाची वाट पाहत आहेत. यामुळे निवडणुकीची प्रक्रिया, निकाल आणि पुढील राजकीय समीकरणे काय ठरतील, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.हे सर्व मुद्दे पाहता, पुलगाव नगरपालिकेतील वाढलेल्या आरक्षणामुळे निवडणूक स्थगित होईल की सुरळीत पार पडेल, हा प्रश्न अद्याप अनिश्चित आहे; पण प्रभाग रचना आणि आरक्षणाबाबत होणाऱ्या निर्णयांनंतरच हाच निकष ठरवला जाईल.हे विद्यमान परिस्थितीवर एकदाट मैदानात राजकीय तणाव आणि चर्चा निर्माण करत आहेत.

# रोठा शिवारात सावंगी पोलिसांची कारवाई, गावठी दारूसह एकाला अटक

## -९१ हजार ६०० रुपयांचा माल जप्त

**सावंगी मेघे (वर्धा) :** गावठी मोहा दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या एका इसमाला सावंगी मेघे पोलिसांनी सापळा रचून पकडले. त्याच्याकडून तब्बल ९१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.दि. २१ नोव्हेंबर रोजी पोलिस पथक पेट्रोलिंगवर असताना मुखबीराकडून माहिती मिळाली की वायफड पारधी बेडा येथे राहणारा मुकेश रमेश भोसले (वय ३९) हा कथीया रंगाच्या हिरो डेस्टिनी (क्र. एमएच-३२ एव्ही-८७५४) मोपेडवरून गावठी मोहा दारू रोठा शिवारातील पुसाटे यांच्या शेताजवळ आणत आहे. मिळालेल्या माहितीनुसार पथकाने सांगितलेल्या ठिकाणी सापळा रचला. काही वेळातच आरोपी त्या ठिकाणी येताच त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले.तपासात त्याच्या मोपेडवर दोन प्लास्टिक डब्यांत प्रत्येकी २८ लिटर असा एकूण ५६ लिटर गावठी मोहा दारू आढळली. या दारूसह मोपेड आणि साहित्य मिळून ९१ हजार ६०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध सावंगी मेघे पोलीस ठाण्यात अप. क्र. ९०६/२०२५ कलम ६५ (अ)(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये तसेच वाहतूक कायद्यान्वये गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली आहे.ही



कारवाई सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे यांच्या पथकाने केली. या पथकात हेडकॉन्स्टेबल संजय पंचभाई, अनिल वैद्य, निखील फुटाणे आणि हर्षवर्धन मून यांचा समावेश होता.

# खस्ताहाल दवाखाना आणि राजकीय दबावांमुळे गावकऱ्यांचे आरोग्य अंधारात

## -वरिष्ठ प्रशासनाकडे लक्ष देण्याची मागणी; विरूळवासीयांचे तीव्र आंदोलन इशारा

**विरूळ (आ) जनमाध्यम :** आर्वी तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या आणि राजकीयदृष्ट्या महत्व असलेल्या विरूळ गावातील आरोग्य सेवा आता पूर्णपणे तडाखल बसली आहे. गेल्या वर्षभरात येथे कोणताही डॉक्टर नाही आणि सायंकाळी दवाखाना ५ वाजता कुलूपबंद होता. त्यामुळे आजारी रुग्णांना प्राथमिक उपचारांनाही मिळणे कठीण झाले आहे, त्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

विरूळच्या आरोग्य उपकेंद्राची इमारत अत्यंत जीर्णावस्था झाली असून मागील महिन्यातसुद्धा छताचा स्लॅब कोसळल्याची भीती निर्माण झाली आहे. यामुळे आता आरोग्य उपकेंद्राच्या परिस्थितीची गंभीर प्रकटीकरण झाली असून, रुग्णांची संख्या अधिक असतानाही सुविधा पुरेशी नाहीत. गावच्या आरोग्य केंद्राच्या निर्मितीसाठी ३०-४० वर्षांपासून मागणी चालू असून, त्याला शासनाकडून अनास्था दाखवली जात आहे. राजकीय दबावामुळे मंजुरी इतर गावाकडे वळवली गेली, ज्यामुळे या महत्त्वाच्या गावातील आरोग्य सेवा खालावल्या आहेत.रात्री उपकेंद्राला कुठलाही कर्मचारी राहत नाही आणि दवाखान्याला कुलूप लावले जाते. आपत्कालीन रुग्णांना उपचारासाठी किमान १०-१५ किलोमीटर दूर असलेल्या



पुलगाव सारख्या गावात जावे लागते, ही घोडदौड चिंता वाढवणारी बाब आहे. यामुळे गावकऱ्यांमध्ये आरोग्यसेवा बद्दल मनोधैर्य आणि विश्वास कमी झाला असून उच्च अधिकाऱ्यांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी सतत होत आहे. ग्रामस्थांनी सरकारी दुर्लक्ष आणि राजकीय क्रियांवर तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला आहे. हे प्रकरण स्थानिक प्रशासन आणि आरोग्य विभागासाठी मोठी कलंक असून, राज्य सरकारकडून तातडीने यावर उपाययोजना सुरू करण्याची अपेक्षा आहे.

आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना असूनही, अशा ठिकाणी सुविधा उपलब्ध न होणे आरोग्य धोरणातील मोठा फोल ठरतो. रुग्णसेवा ही मूलभूत गरज असून सरकारने याकडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे. विरूळसारख्या जागतिक आरोग्य मोहिमांखाली टाकलेल्या गावात अशी धोकेदायक स्थिती सद्यस्थितीत कशी टिकून राहिली आहे, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. या प्रकरणाचा गांभीर्याने अभ्यास होऊन तातडीने मुलभूत उपाययोजना करा, अन्यथा गावाच्या जनतेत सरकारविरोधी आंदोलनाचा धग धडगणार आहे.

# रोही डुक्करांनी कपाशी व तुरीचे पिके उद्ध्वस्त; शेतकरी आर्थिक संकटात

**विरुळ (आ) जनमाध्यम :** येथील शेतकरी रोही डुक्करांच्या हल्ल्याने कपाशी आणि तुरीच्या पिकांत मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करत आहेत. यंदा नापिकी आणि अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झाले असता, शेतकऱ्यांनी कपाशी व तुरीच्या पिकांवर आपली आशा ठेवली होती. मात्र, या पिकांवरही डुक्करांनी हल्ला करून पिके फस्त केली आहेत, ज्यामुळे शेतकरी खूपच चिंतेत आहे.स्थानीय शेतकरी भाऊराव रंदळे आणि इतरांनी वन विभागाकडे तक्रार करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. हे नुकसान अर्थिक त्रासाला भर टाकत असून, शेतकरी संकटात सापडले आहेत. वन विभागाने या प्रकरणाकडे गंभीरतेने लक्ष देऊन डुक्करांपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी त्वरित कारवाई करावी अशी शेतकऱ्यांची मागणी सतत वाढत आहे. शेतकऱ्यांना पीक विमा व सरकारकडून मदत देऊन



आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचा या वेळी मोठा प्रश्न आहे. पिकांचे रक्षण करण्यासाठी कुंपण, उपाय योजना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या समस्येवर मात करणे अत्यंत आवश्यक आहे.

# शिवसेनेत गटबाजी, भ्रष्टाचाराचा कट; निहाल पांडेंचा उद्धव गटाला राजीनामा


**वर्धा जनमाध्यम :** शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या वर्धा उपजिल्हा प्रमुख निहाल पांडे यांनी पक्षातील गटबाजी, भ्रष्टाचार व पक्षाचे भविष्य धोक्यात आणणाऱ्या गंभीर आरोपांमुळे पक्षाला रामराम करत अत्यंत खळबळजनक राजीनामा दिला आहे. त्यांच्या या निर्णयाने शिवसेना उद्धव गटाच्या अंतर्गत संघर्षांना नव्या उंचीवर नेले आहे. निहाल पांडे यांनी पत्रकार परिषदेत उल्लेख केला की, पक्षातील कार्यकर्त्यांवर होत असलेल्या कटकारस्तानामुळे आणि मुंबईतील एका उच्चपदस्थ नेत्याला कंटाळून त्यांनी हे पाऊल उचलले आहे. पांडे म्हणाले की, पक्षातील काही नेते भाजपशी गुपित धोरणे रचून राजकीय फंडाच्या खेळी करत आहेत. आमच्या पक्षासाठी काहीच ठोस निर्णय घेतला गेला नाही, अपवादात्मक भ्रष्टाचाराच्या पद्धतींची माहिती आम्ही उद्धव ठाकरेंना पेन ड्राईव्हद्वारे सादर केली आहे, मात्र प्रतिबंध झाला नाही. नगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षाची इच्छुक सामान्य कार्यकर्ते



निवडणूक रिंगणाबाहेर ठेवली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला, ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेत पक्षाची पारदर्शकता धोक्यात आली आहे. पांडे यांनी संज्ञा दिली की, राजकारणात वर्ध्याला गाभा तोंडवावा लागत आहे, पण पक्षनेते मात्र भ्रष्टाचार आणि पक्ष कुलाबाजी करत पक्षाचे नुकसान करत आहेत. राजीनाम्यासह त्यांनी नाडा ढिल्ला झालेल्या एका वरिष्ठ नेत्याला मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने काळजी घेण्याची हाक दिली आहे, ही नाडा कडक करण्याची वेळ आली आहे, असेही त्यांनी सांगितले. त्यांच्या मतानुसार, पक्षातील खरे गद्दार लोक हेच आहेत जे पक्षात राहून कटकारस्ती करून पक्षाच्या विकासाला अडथळा आणत आहेत.या राजीनाम्यानंतर उद्धव ठाकरे गटाला वर्धा जिल्ह्यात मोठा धक्का लागल्याची चर्चा आहे. शिवसेना उद्धव गटातील या अंतर्गत संकटामुळे आगामी निवडणुकांमध्ये पक्षाचा स्वाभिमान टिकवणे संकटात येईल असा अंदाज वर्तवला जात आहे.शिवसेना पक्षाच्या भवितव्यासाठी या घटनांनी एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याचे स्पष्ट होत आहे; या राजकारणी संघर्षाचा आणि पक्षाच्या अंतर्गत घडामोडींचा राज्यातील राजकारणावर खोल परिणाम होईल, अशी भूमिका आहे.

# धाम नदीतून रेती माफियांच्या मनमानीवर तहसील प्रशासनाची कडक कारवाई

**सेलू जनमाध्यम :** सुरगाव परिसरातील धाम नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळूची चोरी करण्याचा घाटनांचा सुळसुळाट मागील काही महिन्यांपासून सुरू होता. मात्र, स्थानिक प्रशासनाकडून कुणी ठोस कारवाई करण्याचा धाडस करत नव्हता. या पार्श्वभूमीवर नव्या महिला तहसीलदार डॉ. शकुंतला पराजे यांनी पदभार घेताच या मनमानीवर मोठी टाकवाजोड केली आहे.२२ नोव्हेंबरच्या पहाटे साडेचारच्या सुमारास तहसील कार्यालयाच्या अधिकाऱ्यांसह त्यांनी सुरगाव शिवारात अवैधरित्या वाळू भरलेला ट्रॅक्टर पकडून जप्त केला. हे प्रकार झटक्यात थांबवणे अत्यंत गरजेचे होते, असे तहसीलदारांनी सांगितले.तालुका प्रशासनातील मंडळ अधिकारी यशवंत लडके, गुणवंत मुरले व राहुल तडस यांनीही या कारवाईत सक्रिय सहभाग घेतला. चोरी केली जात असलेल्या रेतीची विक्री चढ्या दराने होत असल्याची तक्रार नागरिकांकडून प्रशासनाला मिळत होती. तहसीलदारांनी नागरिकांना आव्हान केले की, तालुक्यात कुठेही रेती चोरी होत असल्यास त्वरित प्रशासनाला माहिती द्यावी. अशी माहिती दिल्यास तत्काळ कारवाई केली जाईल व सत्ताधारी यंत्रणेची कारवाई कशी असावी हे दाखवले जाईल.



## मतदान करू, मतदार संख्या वाढवू

# लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाची जबाबदारी

### -गणेश खताळे यांचे आवाहन : २ डिसेंबर रोजी नवा विक्रम करायला सज्ज व्हा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा नगरपालिकेची आगामी निवडणूक २ डिसेंबर रोजी ८९ मतदान केंद्रांवर थेट होणार आहे. मात्र गत निवडणुकीत केवळ ५६३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता, हा आकडा चिंताजनक आहे, असे निवडणूक निर्णय अधिकारी गणेश खताळे यांनी स्पष्ट केले.



लोकशाहीची खरी ताकद मतातूनच जपली जाते. त्यामुळे या वर्षी मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रत्येक मतदाराने मतदान केंद्रावर येणे गरजेचे आहे. आपला मतदान हा आपल्याच हक्कासाठी आणि आपल्या भविष्यासाठी आहे, असे खताळे यांनी आवाहन केले.

वर्धा नगरपालिकेतील ८८,०१३ अंतिम मतदारांमध्ये ४३,१३८ पुरुष तर ४४,८६६ महिला मतदार आहेत. या निवडणुकीत या मोठ्या संख्येने मतदारांनी सहभागी होऊन मतदानाचा टप्प्याटप्प्याने नवा विक्रम रचावा, निवडणूक दिवशी मतदार केंद्रांवर सर्व प्रकारच्या प्राथमिक सुविधांची सोय केली जाईल. दिव्यांग मतदारांसाठीही विशेष व्यवस्था केली जात आहे, जेणेकरून कोणालाही मतदानात अडचण येऊ नये, असे खताळे यांनी सांगितले.शासनाचे या निवडणुकीला मोठे महत्त्व असून, आदर्श आचारसंहितेचे पालन करून निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि संकटमुक्त पार पडावी, असा यत्किंचित प्रयत्न प्रशासनाकडून चालू आहे.शहरातील प्रत्येक नागरिकांनी मतदान करून लोकशाहीत आपला हक्क जपण्याची जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडायला हवी, नाहीतर आपल्या स्वारस्यांच्या बाबतीत निर्णय दुसऱ्यांकडे सोपवावा लागेल, अशी भीषण जबाबदारीसह खताळे यांनी नागरिकांना आवाहन केले.

# मतदारांच्या बोटांवर ‘मार्कर’ची छाप, यंदाच्या निवडणुकीत नवा प्रयोग

**वर्धा जनमाध्यम:** वर्धा जिल्ह्यात होणाऱ्या नगरपरिषद निवडणुकांमध्ये यंदा मतदान प्रक्रियेत महत्त्वाचा बदल पाहायला मिळणार आहे. मतदारांच्या बोटांवर पारंपरिक निवडणूक शाईऐवजी आता विशेष मार्कर पेनने चिन्हांकन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सहा नगरपरिषदांमध्ये एकत्रितपणे २ लाख ७६ हजार ६८७ मतदार मतदानासाठी पात्र असून प्रत्येक मतदाराला मतदानानंतर या नवीन पद्धतीने मार्क केले जाणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

२ डिसेंबर रोजी वर्धा, हिंगणघाट, आर्वी, देवळी, पुलगाव व सिंदी रेल्वे येथील नगरपरिषदांसाठी मतदान होत आहे. यासाठी जिल्ह्यातील ३०७ मतदान केंद्रांवर सर्व तयारी पूर्ण झाली असून निवडणूक साहित्य, उपकरणे व कर्मचाऱ्यांची नियुक्ती पूर्ण झाली आहे.

मतदारसंख्या शहरनिहाय आकडेवारी वर्धा नगरपरिषद क्षेत्रात ८८ हजार १३ मतदार असून त्यापैकी ४३,१३८ पुरुष आणि ४४,८६६ महिला मतदार आहेत. हिंगणघाटमध्ये ९४ हजार ३५६ मतदार; त्यातील ४७,२६५ पुरुष आणि ४७,०९१ महिला. आर्वीसाठी एकूण ३६ हजार ४०७ मतदार नोंदवले गेले आहेत. पुलगावमध्ये २९ हजार ६५, तर देवळीमध्ये १६ हजार ४५८ मतदार



मतदान करणार आहेत. सिंदी रेल्वे नगरपरिषद क्षेत्रातील १२ हजार ३८८ नागरिक मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

पहिलाच प्रयोग मतदान प्रक्रियेत तंत्रज्ञानाची साथ नगरपरिषद निवडणुकांमध्ये प्रथमच अशा विशेष मार्करचा वापर होत असल्याने हा प्रयोग चर्चेत आला आहे. या मार्करमध्ये वापरलेली शाई जाड, गडद आणि टिकाऊ असल्याने मतदान केल्यानंतर चिन्ह सहज न पुसता राहील. त्यामुळे मतदान प्रक्रियेतील अनियमितता किंवा डुप्लिकेट मतदानावर बंधने येणार आहेत. याआधी हा प्रकार लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये यशस्वीरीत्या वापरण्यात आला होता.

**निवडणूक साहित्याची तयारी पूर्ण**

मतदान प्रक्रियेसाठी लागणारे कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, सील्स, टॅग्स, स्ट्रिप्स तसेच प्रशिक्षण घेतलेले निवडणूक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या निवडणुकांसाठी अंदाजे ९७० विशेष मार्कर पेनची आवश्यकता असून त्यांचा पुरवठा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

**CHANGE IN NAME**

I, Jasvinder Singh, residing Wardha, hereby declare that I have changed my name from 'Jasvinder Singh' to 'Jasvinder Singh Shergill' for passport issuance (where 'Jasvinder Singh' is the old name & 'Jasvinder Singh Shergill' is the new name.) Hereafter I shall be known as Jasvinder Singh Shergill for all purpose.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## रण तापले!

पाच-सात वर्षांनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. न्यायप्रविष्ट बाबीमुळे या निवडणुका लांबल्या होत्या. आता निवडणूक होत असल्याने तरुण, महिलांना नेतृत्वाची संधी मिळणार आहे. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका जिंकून देणाऱ्या कार्यकर्त्यांच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या माध्यमातून राज्याच्या सत्तेतील तीन प्रमुख राजकीय पक्षांनी २०२९ च्या विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. कार्यकर्त्यांची निवडणूक असली, तरी ती आता राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या नेत्यांनी निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. महाराष्ट्रात विरोधकांचे राजकीय अवकाश मर्यादित आहे. त्यातच महाविकास आघाडीतही बिघाडी होण्याच्या मार्गावर आहे. राज ठाकरे यांना बरोबर घ्यायची उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांची तयारी असली, तरी काँग्रेसची तयारी नाही. त्यामुळे काँग्रेसने निवडणुकीच्या रिंगणात स्वबळावर उतरण्याची घोषणा केली आहे. विदर्भात तर काँग्रेसमध्ये सुनील केदार यांच्याविरोधात नाराजी उफाळून आली. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सामूहिक राजीनाम्याचे अस्त्र उगारले आहे. दुसरीकडे गेल्या ३५ वर्षांपासून संगमनेर नगरपालिकेवर काँग्रेसच्या बाळासाहेब थोरात यांचे वर्चस्व होते. त्यांच्या भगिनी दुर्गा तांबे नगराध्यक्ष होत्या. आता त्यांची भाचेसून निवडणुकीच्या रिंगणात असून आमदार सत्यजित तांबे यांनी नगरपालिकेसाठी व्यूहरचना केली आहे. थोरात निवडणुकीपासून अलिप्त असून प्रथमच काँग्रेसच्या चिन्हावर निवडणूक लढवली जाताना दिसत नाही. या पार्श्वभूमीवर अलीकडेच भाजप आणि शिंदेसेनेमध्ये जणू युध्द पेटले. अलीकडेच उल्हासनगरमध्ये शिंदे यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना गळाला लावले, तर अन्य ठिकाणी शिंदे यांच्या महत्त्वाच्या नेत्यांना भाजपने प्रवेश देऊन 'एकला चलो रे' म्हणत तयारी सुरू केली. त्यामुळे शिंदेंच्या काही मंत्र्यांचे मतदारसंघ अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यातून भाजप आणि शिवसेनेच्या शिंदे गटात कमालीची दरी निर्माण झाली. शिंदेसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांची संतप्त प्रतिक्रिया महायुतीतील दोन घटक पक्षांमध्ये किती बिनसले आहे, हे दाखवण्यासाठी पुरेशी होती. त्यातूनच शिंदे गटाच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळाच्या कामकाजावर बहिष्कार टाकून आपले उपद्रवमूल्य दाखवून दिले. निधी मिळत नाही, सन्मान ठेवला जात नाही अशी कारणे पुढे केली असली, तरी खरे कारण शिवसेनेच्या नेत्या, कार्यकर्त्यांनी हाती घेतलेले कमळ हेच होते. शिंदे गटाने नाराज नसल्याचे सांगितले असले, तरी प्रत्यक्षात वस्तुस्थिती काय होती, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. नाराजी व्यक्त करायला गेलेल्या मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांनीच सुनावले. भाजपकडून सध्या मुंबईपाठोपाठ झपाट्याने विस्तारणाऱ्या मुंबई महानगर प्रदेशातील सर्वच शहरांवर ताबा मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न सुरू आहे. नवी मुंबई, पनवेल, उरणसारखी शहरे यापूर्वीच भाजपच्या ताब्यात आली. या भागात विमानतळ, तिसरी मुंबईसारख्या मोठ्या प्रकल्पांची पायाभरणी सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांना पालघर जिल्ह्यात चौथ्या मुंबईची पाळेमुळे रोवायची आहेत. येथेच देशातील सर्वात मोठे वाढवण बंदर उभे राहणार आहे. गुजरात-महाराष्ट्राचा सीमावर्ती भाग असलेल्या या प्रदेशात बुलेट ट्रेन, मुंबई-बडोदे महामार्ग, लॉजिस्टिक पार्क, विरार-जेएनपीटी एक्स्प्रेस कॉरिडॉर अशा उद्योगभिमुख प्रकल्पांची आखणी सुरू आहे.नागरीकरणाच्या या वेगात या शहरांचा मराठी चेहराही मागे पडत आहे. नागरीकरण आणि स्थलांतरितांचा हा प्रदेश भाजपसाठी सुपीक जमीन ठरेल, अशा पद्धतीची आखणी सुरू आहे. या वेगात स्वतःचे वेगळे अस्तित्व टिकवून ठेवण्याचे आव्हान विरोधकांपेक्षा शिंदे यांच्यापुढे अधिक आहे. मुंबई, ठाणे परिसरावर लक्ष केंद्रित करणाऱ्या भाजपवर नांदेड जिल्ह्यात मात्र नामुष्कीची वेळ आली आहे. राज्यसभेचे दोन खासदार, त्यातील एक राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि प्रभावशाली नेते तसेच वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये पाच आमदार अशा भक्कम बळावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमधून जिल्ह्यात अव्वल स्थान प्राप्त करण्याचा निर्धार करणाऱ्या भारतीय जनता पक्षाने बिलोली नगरपालिकेच्या निवडणुकीत शेवटच्या क्षणी पळ काढल्यानंतर राजकीय वर्तुळात तसेच पक्षातही आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगरपालिकेत भाजपचे सर्व म्हणजे १७ उमेदवार एकीकडे बिनविरोध विजयी झाले असताना नांदेड जिल्ह्यात मात्र नगरपालिकेत उमेदवार न देण्याची नामुष्की पक्षावर ओढवल्यामुळे समाजमाध्यमांतून त्यावर बरीच चर्चा होत आहे. महायुतीतील अंतर्गत तणाव शिगेला पोहोचला असतानाच शिवसेना (उबाठा) चे माजी उपनेते तथा मालेगावचे बडे नेते अद्वय हिरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. हिरे यांच्या या घरवापसीमुळे मालेगाव आणि नाशिक जिल्ह्यातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. हिरे यांच्या प्रवेश सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकला. भाजपकडून शिंदे गटाच्या नेत्यांची मोठ्या प्रमाणात फोडाफोडी सुरू असल्याचा आरोप करत शिंदे गट सध्या संतापला आहे. नाशिक-मालेगाव परिसरात हिरे कुटुंबीयांचा राजकीय दबदबा गेल्या अनेक दशकांपासून आहे. मालेगाव बाह्य मतदारसंघात सध्या शिंदे गटाचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांची पकड मजबूत मानली जाते. हिरे पुन्हा भाजपमध्ये आल्याने २०२९ मध्ये 'भुसे विरुद्ध हिरे' हा सामना रंगणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिंदे गटाच्या आमदार-नेत्यांच्या विरोधात मजबूत पर्यायाशिवाय भाजपची ही खेळी केवळ मालेगावापुरती मर्यादित नसून राज्यातील अनेक ठिकाणी शिंदे गटाच्या आमदार-नेत्यांच्या विरोधात मजबूत पर्याय तयार करण्याची रणनीती असल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी शिवसेनेचे दोन्ही गट, तर काही ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आले आहेत. सोयीचे राजकारण केले जात आहे. कुटुंबशाही आणि घराणेशाहीवर टीका करणाऱ्या भाजपने एका नगरपालिकेत एकाच कुटुंबातील सहा जणांना उमेदवारी देऊन आपले पायही मातीचे असल्याचे दाखवून दिले आहे. भाजप तसेच अन्य मित्रपक्षांनी महाविकास आघाडीवर घराणेशाहीचे राजकारण करताना स्वतःच कुटुंबशाहीला प्राधान्य दिले जात असल्याचे दिसून येत आहे.

**वाढता हिंसाचार, बॉम्बस्फोटांची वाढती संख्या, समाजातील तणाव, सरकारी निष्क्रियता, निवडणुका जवळ येताना वाढणारा दबाव या सर्वांचा परिणाम म्हणून पश्चिम बंगाल भारतात एक सतत अशांत आणि असुरक्षित राज्य म्हणून पाहिले जाऊ लागले आहे. राष्ट्रीय एकात्मता, कायद्याचे राज्य आणि लोकशाही मूल्यांसाठी हे धोक्याचे आहे. पश्चिम बंगालमधील हिंसाचार हा केवळ स्थानिक किंवा धार्मिक तणावाचा परिणाम नसून राजकीय सत्तास्पर्धा, पोलीस आणि प्रशासनाची निष्क्रियता व सांप्रदायिक राजकारण यांच्या संयुक्त परिणामातून निर्माण झाला आहे.**

# पश्चिम बंगालमधील वाढता हिंसाचार



दिल्लीतील बॉम्बस्फोटांनी तसेच फरिदाबादमध्ये हस्तगत झालेल्या स्फोटकांच्या प्रचंड साठ्यामुळे देश हादरलेला असताना पश्चिम बंगालमधूनही चिंताजनक माहिती समोर आली आहे. मागील आठवड्यात प. बंगालमध्ये ८० पेक्षा अधिक बॉम्ब जप्त झाले असून केवळ सहा दिवसांत ७७३ कच्चे बॉम्ब निष्प्रभ करण्यात आले आहेत. पश्चिम बंगालमधील गेल्या वर्षभरातील (नोव्हेंबर २०२४ ते नोव्हेंबर २०२५) हिंसाचार, बॉम्बस्फोट, राजकीय संघर्ष, सांप्रदायिक घटना कश्मीरमध्ये झालेल्या हिंसाचारापेक्षा किंवा नक्षलवादी भागात झालेल्या हिंसाचारापेक्षा जास्त आहेत. येणाऱ्या काळात ही हिंसा वाढण्याची शक्यता आहे.

२०११ मध्ये ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली ऊश्ण सत्तेत आल्यानंतर डाव्या पक्षांच्या कार्यकर्त्यांनी जी राजकीय जागा व्यापली होती, त्यावर TMC च्या कार्यकर्त्यांनी ताबा मिळवण्यास सुरुवात केली. यामुळे ग्रामीण भागातील नियंत्रण, सरकारी योजनांचे लाभ आणि स्थानिक पातळीवरील वर्चस्व यावरून जुन्या व सत्ताधारी पक्षांच्या समर्थकांमध्ये संघर्ष वाढला आहे.गेल्या वर्षी प. बंगालमध्ये अंदाजे ६८ बॉम्बस्फोट नोंदवले गेले आणि चालू वर्षांत फक्त मुर्शिदाबाद जिल्ह्यात ७ नव्या बॉम्बस्फोटांच्या घटना घडल्या आहेत. असे crude बॉम्ब सहसा निवडणुकांच्या वेळेस निर्माण केले जातात आणि वापरले जातात. काही घटनांमध्ये बॉम्ब बनवताना घरातच स्फोट झाल्याने मृत्यू व जखमींमध्ये वाढ झाली. अनेक घटना 'राजकीय' म्हणून नोंदवल्या न जाता जमिनीचा वाद, वैयक्तिक वैमनस्य किंवा दंगल म्हणून नोंदवल्या जातात. त्यामुळे NCRB आकडेवारी राजकीय संघर्षाचे संपूर्ण चित्र स्पष्टपणे दर्शवत नाही.

पश्चिम बंगालमध्ये बॉम्ब तयार करून वापरण्याची जुनी पद्धत आहे. बहुतांश बॉम्ब दंगली, राजकीय संघर्षादरम्यान प्रतिस्पर्धी गटांना घाबरवण्यासाठी आणि मालमत्तेचे नुकसान करण्यासाठी वापरले जातात. स्थानिक पोलिसांकडून अशा घटनांची नोंद केलीच जात नाही. कारण त्यांना राज्यात कायदा आणि सुव्यवस्था चांगली आहे असे दाखवायचे असते. मात्र लोकल वर्तमानपत्रांमध्ये याविषयीच्या बातम्या येत असतात आणि बहुतेक वेळा लोकल वर्तमानपत्रांमध्ये आलेली आकडेवारी व सरकारची आकडेवारी यामध्ये खूपच फरक असतो.

राजराजेश्वर पंचायतीच्या निवडणुकीत व वक्फ कायद्याच्या सुधारणेमुळे उफाळलेल्या हिंसाचारात किमान ४० ते ५० लोकांचा बळी गेला. केवळ एका आठवड्यात १३ मृत्यू व १५० पेक्षा जास्त जणांना अटक करण्यात आली होती. सांप्रदायिक दंगलीत दोन आठवड्यांत १९ जणांचा मृत्यू झाल्याची अधिकृत नोंद उपलब्ध आहे. अनेक हिंदू आसाम आणि बिहार या शेजारी राज्यांमध्ये सुरक्षेच्या कारणामुळे पळून गेले.

प. बंगालमध्ये सध्या समाज माध्यमांवरून किंवा स्थानिक गुंडांद्वारे हिंदूंना थेट धमक्या दिल्या जात आहेत. खासकरून हिंदू महिलांवर झालेल्या अत्याचारांची अनेक प्रकरणे लोकल मीडियामध्ये अनेक वेळा बाहेर आलेली आहेत. अनेक हिंदूंना आपली प्रॉपर्टी कमी किमतीमध्ये विकून स्थलांतर करावे लागते.

पश्चिम बंगालमधील निवडणुका नेहमीच कायदा आणि सुव्यवस्थेसाठी मोठे आव्हान राहिलेल्या आहेत. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान भारत निवडणूक आयोगाने (ECI) अनेक कठोर पावले उचलली होती. हिंसाचार रोखण्यासाठी ECI ने मोठ्या संख्येने केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचे (CAPF) जवान तैनात केले होते. ECI ने अनेक निरीक्षणांमध्ये असे नमूद केले की, बूथ बळकावणे (Booth Capturing) आणि मतदारांना भीती दाखवण्याचे प्रकार अजूनही खालच्या स्तरावर चालू आहेत. अनेक वेळा ECI ने स्थानिक पोलिसांवर पक्षपातीपणा केल्याचा आणि केंद्रीय दलांना आवश्यक सहकार्य न केल्याचा ठपका ठेवला.

२०२१ च्या निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर राज्यभर मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाल्याची माहिती ECI आणि केंद्रीय गृह मंत्रालयापर्यंत पोहोचली. यासंदर्भात ECI ने राज्याच्या प्रशासनाला तत्काळ आणि कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. कलकत्ता उच्च न्यायालयानेदेखील या घटनांची दखल घेऊन राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून (NHRC) अहवाल मागवला होता.

पश्चिम बंगालच्या मीडियामध्ये असे पण रिपोर्टस आले आहेत की, निवडणुकीच्या वेळेला लाखो बांगलादेशी हे बांगलादेशमधून पश्चिम बंगालमध्ये येतात आणि मतदान करतात. अशाच प्रकारचे खोटे मतदार नेपाळमधून आणले जातात. त्यामुळे मतदार यादी पूर्णपणे तपासली जावी. त्यापैकी बऱ्याच घटनांमध्ये पोलीस किंवा प्रशासनाकडून कारवाई होत नाही. राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरो (NCRB) व इतर संस्थांना संपूर्ण माहिती मिळत नाही. सामाजिक कार्यकर्ते आणि RTI कार्यकर्त्यांनी मिळवलेल्या माहितीनुसार प्रत्यक्ष संख्या अधिक आहे.

वाढता हिंसाचार, बॉम्बस्फोटांची वाढती संख्या, समाजातील तणाव, सरकारी निष्क्रियता, निवडणुका जवळ येताना वाढणारा दबाव या सर्वांचा परिणाम म्हणून पश्चिम बंगाल भारतात एक सतत अशांत आणि असुरक्षित राज्य म्हणून पाहिले जाऊ लागले आहे. राष्ट्रीय एकात्मता, कायद्याचे राज्य आणि लोकशाही मूल्यांसाठी हे धोक्याचे आहे. पश्चिम बंगालमधील हिंसाचार हा केवळ स्थानिक किंवा धार्मिक तणावाचा परिणाम नसून राजकीय सत्तास्पर्धा, पोलीस आणि प्रशासनाची निष्क्रियता व सांप्रदायिक राजकारण यांच्या संयुक्त परिणामातून निर्माण झाला आहे. भविष्यातील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर येथे कायदा आणि सुव्यवस्था राखणे, निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता आणि सर्व समाजघटकांचे रक्षण, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. पेंद्र सरकार, निवडणूक आयोग आणि राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणांनी पश्चिम बंगालमधील परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने लक्ष घालणे ही काळाची गरज आहे.

**ब्रि.हेमंत महाजन**

# विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आत्मपरीक्षणाची गरज

महाराष्ट्रात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीचा धुरळा उडाला असल्याने उमेदवारांची अडवाअडवी-पळवापळवी, कार्यकर्त्यांच्या हाणामाऱ्या आणि कोट्यवधींच्या रोख रकमेच्या पकडापकडीला नुसता ऊत आला आहे. या गदारोळात आपल्या चिमुकल्यांच्या देहत्यागाकडे किती संवेदनशील मनांचे लक्ष असेल, कुणास ठाऊक? गेला आठवडाभर शाळकरी विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे. कारणं वेगवेगळी आहेत, ठिकाणं वेगवेगळी आहेत. पण, या कोवळ्या जीवांना जगण्याचा ताण सोसेनासा झाला आहे. ज्यांनी जन्म दिला, त्यांच्या पिढीने हे जग इतके क्रूर केले आहे की, या जगात उमलण्यासाठी त्यांचे मन धजावेनासे झाले आहे. अनावश्यक ताणतणावांचे ओझे घेऊन जगण्यापेक्षा या जगातून स्वतःहूनच गेलेले बरे, या जाणिवेने हे चिमुकले मोठ्या धैर्याने आपले जीवन संपवत आहेत. कोणी मेट्रोखाली जीव दिला आहे, तर कोणी गळफास घेतला आहे; कोणी शाळेच्या इमारतीवरून उडी मारली आहे, तर कुणाला शाळेने दिलेली शारीरिक शिक्षा इतकी असह्य झाली की, त्यातच तिचे प्राणोत्क्रमण



झाले आहे. ही सगळी उदाहरणे महाराष्ट्र किंवा महाराष्ट्राशी संबंधित आहेत. पण, इथे महाराष्ट्राचा अपवाद नाही. हे देशभर घडते आहे. पण, त्याकडे 'राष्ट्रीय समस्या' म्हणून पाहावे, कारणांच्या खोलात जावे, असे कुणालाही वाटलेले दिसत नाही.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतात २०१७ मध्ये आत्महत्यांचे प्रमाण एक लाख लोकसंख्येमागे ९.९ होते. ते आता १२.४ पर्यंत पोहोचले आहे. दुर्दैवाची बाब अशी की, या वाढीला विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचंच प्रमाण कारणीभूत आहे. भारतात गेल्या वर्षात तब्बल १४ हजार विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या अहवालातील आकडेवारी पाहिली, तर २०२३ मध्ये देशात १३ हजार ८९२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसते. २०१९ च्या तुलनेत २०२३ मध्ये ही वाढ ३४ टक्के आहे. गेल्या दशकात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांत ६५ टक्क्यांची भयानक वाढ आहे! विद्यार्थ्यांच्या आत्महत्या म्हटलं की, दोषदिग्दर्शनाची सुरुवात नेहमी शिक्षण आणि परीक्षांपासूनच सुरू होते. परीक्षेतील अपयश, अपयशाची भीती आणि त्यातून येणारे नैराश्य हेच विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत आहे, असे मानून मध्यंतरी आठवीपर्यंतच्या सर्व परीक्षा रद्द केल्या होत्या. कुणालाच नापास करायचे नाही, असे शिक्षण क्षेत्रातील धुरिणांनी ठरवून टाकले होते. त्यानंतरच्या परीक्षांची काठिण्य पातळी खाली आणण्यात आली. १०० पैकी १०० गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची त्यामुळे रीघ लागली. प्रत्यक्ष परीक्षेऐवजी त्यांच्या विषय शिक्षकांना गुणांची खैरात करण्याची मुभा देण्यात आली. मुले नापास व्हायची जवळजवळ थांबली. 'जवळजवळ' म्हणण्याचे कारण असे, की एवढे करूनही काही मुले नापास झालीच. त्यांच्यासाठी आता विषयांचे गट करून त्यात कमीतकमी एकत्रित गुण मिळाले, तरी उत्तीर्ण करण्याची सुविधा येते आहे. याने फक्त शिक्षणाचा दर्जा घसरतो आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या कायम आहेत! या आत्महत्यांमध्ये अभ्यासक्रम न झेपणे किंवा परीक्षेचे दडपण हे मुद्दे आहेत, पण त्याचे प्रमाण अगदी कमी आहे. अशा मुलांची विद्यालय-महाविद्यालयांतील उपस्थिती एकदा तपासली पाहिजे. विद्यार्थी उपस्थितच राहात नसेल, तर त्यासाठी अभ्यासक्रम किंवा परीक्षांना कसा दोष देता येईल? त्यामागे अन्य कारणे असू शकतात. ती शोधून दोष तिथे दिला पाहिजे. तिथे उपाययोजना केली पाहिजे. पालकांच्या विद्यार्थ्यांकडून असलेल्या (सर्व प्रकारच्या) अवास्तव अपेक्षांनी त्यांच्याच लेकरांचा जीव गुदमरला, तर त्याचा दोष अभ्यासक्रम किंवा परीक्षा पद्धतीला, परीक्षेतील काठिण्य पातळीला कसा देता येईल? दुखणे एकीकडे आहे आणि मलम भलतीकडेच लावले जाते आहे. ज्यांना मुळात पुस्तकातले शिक्षणही विद्यार्थ्यांपर्यंत नीट पोहोचवण्याची जबाबदारी घ्यायची नाही, त्यांनी उभा केलेला हा बागुलबुवा आहे. शक्य तेवढ्या लवकर ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन शिक्षण क्षेत्रातील धुरिणांनी आपल्या मनातली ही अंधश्रद्धा दूर केली पाहिजे.

अभ्यासक्रम आणि परीक्षेतले वारंवार प्रयोग ताबडतोब थांबवले पाहिजेत.

विद्यालयीन किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नैराश्याला अभ्यासक्रम किंवा परीक्षा पद्धती कमी आणि शिक्षण संस्था, शिक्षण संस्थांतील वातावरण जास्त जबाबदार आहे. हे सुधारायचे असेल, तर शिक्षण संस्थाचालक आणि शिक्षकांचे संवेदीकरण करण्याची नितांत गरज आहे. सामाजिक शास्त्रांतील तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांची योग्य सांगड घालून त्यासाठी तातडीने विशेष कार्यक्रम राबवला पाहिजे. वैचारिक छटांचा विचार न करता सरकारने यासाठी तळमळीच्या विषय तज्ज्ञांचीच निवड केली पाहिजे. बालकांच्या आत्महत्यांना शाळा, महाविद्यालयातले वातावरणही कारण ठरते आहे. कारण, त्या आवाराबाहेरचे प्रदूषण रोखण्याची ताकद आवारातील जबाबदार व्यक्तींमध्ये राहिलेली दिसत नाही. प्राचार्य-मुख्याध्यापक-शिक्षकांच्या मूल्यविवेकाचा हा प्रश्न आहे. समाजात सर्व प्रकारच्या विषमता वेगाने वाढत आहेत. जगभरात द्वेष, हिंसाचाराची लाट उसळली आहे. अविवेकाच्या काजळीने आसमंत झाकोळला असताना चिमण्या बालकांमध्ये आशेची ज्योत जागवण्याची गरज आहे. सकारात्मक विचारांच्या प्रकाशाने त्यांचं भावविश्व उजळेल, अशा साहित्याची, मूल्य शिक्षणाची, विशेष तासांची जोड विचारपूर्वक दिली पाहिजे. तरुणांच्या मनात सळसळती ऊर्जा, उद्याची स्वप्ने पेरली पाहिजेत. शाळेतल्या पालक सभा बारावीच्या वर्गापर्यंत वाढवल्या पाहिजेत आणि त्यातली औपचारिकताही संपवली पाहिजे. कितीही लिहिले, तरी हा विषय अपुराच राहणार आहे. जाणत्या पिढीने, पालकांनी आपल्या वंशाच्या दिव्यांना जपण्यासाठी तातडीने पावले उचलली पाहिजेत. त्यासाठी सर्वप्रथम आत्मपरीक्षण केले पाहिजे. इतर कोणावरही जबाबदारी न ढकलता स्वतःच जबाबदार झाले पाहिजे!!

**दिपक थेर**

# प्रादेशिक राजकारणातून उद्भवणारे वाद आणि आव्हाने

**माझेही मत**

राज्यात मनसे (महाराष्ट्र नवनिर्माण सेना) आणि उबाठा (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांच्याकडून हिंदी विरोधी आंदोलन केले जात असल्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. नुकतीच डोंबिवलीत हिंदीत बोलल्यामुळे झालेल्या मारहाणीतून एका मराठी १९ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. भाषिक वादामुळे युवकावर झालेल्या हल्ल्यानंतर त्याने मानसिक तणावात आत्महत्या केली, असे त्याच्या वडिलांनी सांगितले आहे. याआधीही मीरा-भाईंदर उपनगरात एका अमराठी व्यावसायिकाला मराठी भाषा येत नसल्याच्या कारणावरून मनसेच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे.अशा घटना मुंबईत मनसेच्या वतीने सातत्याने होत आहेत.एकमेकांचे विचार व्यक्त करण्यासाठी काहीतरी माध्यम लागते आणि ते माध्यम म्हणजे भाषा आहे. एकेकाळी मुंबईत शिवसेना (उबाठा गट) मराठी माणसाच्या विचारांनी स्थापन झाली होती; नंतर ती हिंदुत्ववादी झाली. आता शिवसेनेची तिसरी पिढी 'सर्वधर्म समभाव' विचाराकडे झुकलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला हा मुद्दा मिळाला आहे आणि ते मराठी भाषा वादावरून हिंदूंनाच लक्ष्य करत आपले प्रादेशिक राजकारण खेळत आहेत.

सत्तारूढ महायुती सरकारने मनसे आणि उबाठा यांची भाषेवरून होणारी ही गुंडगिरी मोडून काढली नाही, तर उद्या आपली मराठी मुले-मुली जी विविध कारणांसाठी परराज्यात जातात, त्यांच्या बाबत भविष्यात तेथे हीच समस्या उद्भवू शकते. काही दिवसांपूर्वी कर्नाटकात भाषा विवादामुळे असेच उग्र रूप धारण केल्यामुळे तेथील उद्योग इतर राज्यांत स्थलांतरित होत आहेत; कारण तेथील कर्मचारी सुरक्षित नसतील, तर उद्योगपती कामकाज कसे करतील?

मराठीत एक म्हण आहे.'म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावतो आहे.' याचा अर्थ एखादी घटना अनपेक्षितपणे घडली इथपर्यंत ठीक आहे, पण ती घटना वारंवार घडत असेल तर वेळीच त्याविरुद्ध पाऊल उचलणे आवश्यक आहे.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# नेर नगर परिषद निवडणूक, दलित–मुस्लिम मतदान ठरणार निर्णायक

## वंचित बहुजन आघाडीची बाजू भक्कम, रुबीना सलीम शहा यांच्या उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष



जनमाध्यम प्रतिनिधी

नेर : नेर नगर परिषद निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढत असून यंदाच्या निवडणुकीत दलित व मुस्लिम मतदार वर्ग निर्णायक ठरणार असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर वंचित बहुजन पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी उच्चशिक्षित उमेदवार म्हणून रुबीना शहा सलीम शहा यांची उमेदवारी दाखल करण्यात आली आहे. त्यांच्या उमेदवारीनंतर नेर शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार, अशी चर्चा नागरिकांत जोरात सुरू आहे.

रुबीना शहा सलीम शहा या ज्येष्ठ विधीतज्ज्ञ, माजी नगरसेवक सलीम शहा यांच्या पत्नी आहेत. सलीम शहा यांच्या घराण्याला राजकीय वारसा असून त्यांचे कुटुंब हिंदू–मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जाते.

सलीम शहा यांचे वडिल उमर शाह यांच्या राजकीय कार्यकाळात दोन्ही समाजात ऐक्य व सलोखा टिकवून विकासाचे भक्कम पायाभूत कार्य झाले होते.

त्याच परंपरेत रुबीना शहा त्याची सून या नगराध्यक्ष म्हणून सर्वसमावेशक विकासाचा ध्यास घेत मैदानात उतरल्या आहेत.रखडलेल्या विकास कामांवर नागरिकांचा रोष वाढला असून नेर शहरातील अनेक महत्त्वाची कामे अनेक वर्षांपासून रखडलेली आहेत.

घरकुल प्रकल्पांचे प्रलंबित प्रस्ताव, पाणीपुरवठा, नाली व्यवस्था, रस्त्यांची खराब अवस्था झाली असून मुस्लिम परिसरातील लेआउटमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव काही विशिष्ट भागातच विकासाची एकतर्फी केंद्रिता दिसून येते मात्र दलित व मुस्लिम वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधांचा ठप्प विकास नागरिकांच्या या तक्रारींना दुजोरा देत वंचित बहुजन पक्षाकडून शहरात सर्वसमावेशक विकासाची हमी दिली गेली आहे.

### सत्तेतील मक्तेदारीविरुद्ध नागरिकांची नाराजी

काही वर्षांपासून नेर नगर परिषदेत एकाच पक्षाची व वर्गाची सत्ता टिकून राहिली असून पैशाच्या बळावर व प्रभावाचा वापर करून मक्तेदारी निर्माण केल्याचा आरोप नागरिकांतून केला जात आहे. विकासातील असमतोल व जनतेच्या मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे मतदारांमध्ये बदलाची लाट दिसत आहे. सलीम शाह यांना कायदा व प्रशासनातील ज्ञानामुळे नगर परिषदेला बळ मिळणार असल्याचे नागरिकाचे मत व्यक्त केले जात आहे.रुबीना शहा यांचे पती सलीम शहा हे विधीतज्ज्ञ वकील असल्याने कायद्याचे, संविधानाचे तसेच नगरपरिषद प्रशासनाचे चांगले ज्ञान आहे. शासनाकडून निधी खेचून आणण्याची क्षमता, प्रलंबित कामे मार्गी लावण्याची दूरदृष्टी आणि न्याय्य प्रशासन देण्याची ताकद असल्याचा विश्वास त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे. नेर मधील मुस्लिम व बौद्ध मतदार ही यंदाच्या निवडणुकीत निर्णायक भूमिका बजावणारी आहे.तसेच सर्वात मोठी घटक संख्या आहे. या दोन मतदार वर्गाचा झुकता कल वंचित बहुजन पक्षाकडे दिसत असल्याने प्रस्थापित पक्षांना मोठी धडकी बसली आहे.

### नवा इतिहास घडविण्याची वेळ

रुबीना सलीम शहा यांच्या उमेदवारी नंतर नेर शहरात उत्सुकता निर्माण झाली असून 'अनेक वर्षांनंतर स्थिर, स्वच्छ व सर्वसमावेशक नेतृत्व शहराला मिळणार' अशी चर्चा जनतेमध्ये आहे. या निवडणुकीत प्रस्थापित पक्षांची मक्तेदारी मोडीत काढत वंचित ची उमेदवार विजयाचा नवा इतिहास रचतील, अशी चर्चा शहरभर पसरली आहे. नेर नगर परिषदेसाठीची ही निवडणूक त्यामुळे अत्यंत चुरशीची, तर निर्णायक मतदार वर्गा मुळे अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

# लोकशाहीत 'पक्ष संपवण्याची' भाषा गंभीर

## बावनकुळे यांच्या वक्तव्याने सामान्य नागरिकांना निर्माण झाले प्रश्न

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - देशाच्या स्वातंत्र्यानंतर राजकीय विचारसरणी, पक्षांची निर्मिती, मतभिन्नता हे सर्व लोकशाहीच्या चौकटीत राहूनच गत ७५ वर्ष घडत आले. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप, विचारांची टक्कर, निवडणुकीतील स्पर्धा हा भाग असला तरी 'पक्ष संपवण्याची' थेट भाषा मात्र कधीही भारतीय राजकारणात ऐकू आली नव्हती. मात्र आता काही उच्चपदस्थ नेत्यांच्या भाषणातून असे संकेत मिळताना दिसतात की राजकारणातील या नव्या 'प्रवृत्ती'ने लोकशाहीच्या परंपरावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

यवतमाळ येथे आयोजित भाजपा कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी "काँग्रेस पक्ष २०२९ पर्यंत संपणार आहे" असे विधान केले.त्याला कारणे सुद्धा दाखविली काँग्रेसमध्ये होत असलेली गळती, जुने नेते पदे न सोडणे, अंतर्गत मतभेद यामुळे हा पक्ष क्षीण होत जाईल, असे भाकित त्यांनी यावेळी केले. मात्र लोकशाहीत पक्षाचे अस्तित्व संपवण्याची भाषा कितपत योग्य? असा प्रश्न त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये उपस्थित झाला आहे. देशाच्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला आपल्या विचारांचा, मताचा आणि पक्ष स्थापनेचा मूलभूत अधिकार दिला आहे. मोठ्या पक्षांनी कधीही लहान व विरोधी पक्षांना संपवण्याची भाषा केली नाही. मतभेदांना स्थान देणे, विरोधकांच्या उणिवा काढणे, त्यांच्या पक्षातील नेत्यांना आमिष दाखवून पक्षांतर करून घेणे. विविधतेतूनच लोकशाही व राजकीय पक्ष मजबुत करणे हेच या व्यवस्थेचे सार आहे.

मात्र सध्या राजकारणात बदला, द्वेष आणि विरोधकांचा नायनाट अशा शब्दांचा वापर वाढताना दिसत आहे. विशेषत: संविधानिक पदावरील किंवा राष्ट्रीय स्तरावरील पक्ष प्रमुखांच्या तोंडून असे वक्तव्य होत असेल, तर सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत कोणता संदेश पोहोचेल याचा विचार करणे आवश्यक आहे.

उच्च पदावरील नेत्यांकडून अशी भाषा वापरली तर साध्या कार्यकर्त्यांमध्ये काय संदेश तयार होईल? भारतातील लोकशाहीची मूळ शक्ती ही विविध मतांच्या सह अस्तित्वात आहे. प्रत्येक पक्षाला जगण्याचा, विचार मांडण्याचा आणि लोकांचा कौल मागण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. मात्र आता जे चित्र दिसते आहे.त्याने राजकारण कोणत्या दिशेने जात आहे याबद्दल सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंता वाढत आहे.लोकशाहीतील वादविवाद, निवडणूक, विजय-पराजय हे सर्व स्वीकार्य आहे. परंतु 'विरोधी पक्ष संपवण्याची भाषा' ही भारतीय लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांवर आघात करणारी ठरू शकते असे अनेकांचा मतप्रवाह आहे.

### यवतमाळ नगराध्यक्ष निवडणूक मडावी यांच्या उमेदवारीवर कोर्टाची नोटीस

# मतदार यादी सुनावणी २५ नोव्हेंबरला

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - यवतमाळ नगरपरिषद नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत माजी मुख्याधिकारी माधुरी मडावी यांच्या उमेदवारीवरून उभा राहिलेला वाद अधिक तीव्र झाला असून शुक्रवारी जिल्हा न्यायालयात या प्रकरणी महत्त्वपूर्ण सुनावणी संपन्न झाली. मतदार यादीतील नावाच्या वादावर कोर्टाने यवतमाळचे निवडणूक अधिकारी, सहाय्यक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी तसेच नगरपरिषद मुख्याधिकारी यांना नोटीस बजावून त्यांचे म्हणणे सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

मडावी यांचे गडचिरोलीतील नाव रद्द करण्याचे पत्र कोर्टात सादर केल्याने या प्रकरणात वेगळे वळण लागले असून सुनावणी दरम्यान मडावी यांच्या वकिलांनी कोर्टासमोर स्पष्ट केले की, माधुरी मडावी यांनी गडचिरोली येथील मतदार यादीतून नाव वगळण्याकरिता अधिकृत अर्ज संबंधित अधिकाऱ्यांकडे पूर्वीच दाखल केला होता. हे पत्र शुक्रवारी कोर्टात सादर करण्यात आले. त्यामुळे भाजप उमेदवार प्रियदर्शनी उईके यांनी घेतलेला मडावी यांचे नाव गडचिरोलीतही आहे. हा आक्षेप कमजोर झाल्याचे चित्र आहे.मडावी यांच्या वकिलांनी न्यायालयासमोर गंभीर आरोप करताना सांगितले की, माधुरी मडावी यांचे नाव यवतमाळ मतदार यादीत कायम असताना कोणतीही पूर्वसूचना किंवा चौकशी न करता ते नाव अचानक व अनधिकृतपणे वगळण्यात आले. एका वैध मतदाराचा मताधिकार हिरावून घेण्याचा हा प्रयत्न असून निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी कृती असल्याचे युक्तिवाद सादर करण्यात आले.या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेतील सर्व उमेदवारांनाही नोटीस बजावली आहे. संबंधित अधिकारी व उमेदवारांनी आपले स्पष्टीकरण कोर्टात दाखल करणे बंधनकारक केले आहे.

२५ नोव्हेंबरला पुढील सुनावणी जिल्ह्याचे लक्ष कोर्टाकडे : या प्रकरणातील पुढील सुनावणी मंगळवार, २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. माधुरी मडावी यांची प्रशासकीय, सामाजिक आणि राजकीय ओळख लक्षात घेता संपूर्ण यवतमाळचे लक्ष आता न्यायालयाच्या निर्णयाकडे लागले आहे. नगराध्यक्ष पदासाठी त्यांची उमेदवारी कायम राहणार की रद्द होणार, याचा निर्णय निवडणुकीच्या राजकीय समीकरणांवर मोठा परिणाम करणारा ठरणार आहे. असे जाणकारांचे मत आहे.

# पुसदच्या राजकीय रणांगणात 'नकली' उमेदवाराची चर्चा

## हिंदुत्वाचे आवरण आतून 'बंगल्या'शी निष्ठा? मतदारांत संभ्रम

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - पुसद नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या एका 'नकली' हिंदुत्ववादी उमेदवाराची मोठी चर्चा राजकारणात रंगू लागली आहे. अर्ज माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उमेदवाराचे खरे राजकीय संबध उघडकीस आल्यानंतर शहरात खळबळ उडाली आहे. बाहेरून भगवा झेंडा हातात घेतला असला, हिंदुत्वाचा नारा देत मतदारांमध्ये फिरत असला तरी त्याची खरी निष्ठा 'बंगल्या'कडेच असल्याचे समोर येत आहे. या उमेदवाराबाबत स्थानिक राजकीय जाणकारांचा दावा आहे की, तो वरकरणी आक्रमक, हिंदुत्ववादी आणि कार्यकर्त्यांमध्ये सक्रिय असल्याचा आभास निर्माण करतो. मात्र प्रत्यक्षात त्याच्या राजकीय हालचाली 'बंगल्या'च्या सूचनांवरच चालतात. त्यामुळे भाजपच्या स्थानिक गटातही संताप व्यक्त केला जात असून मतदारांची दिशाभूल करण्याचा हा एक प्रकारचा राजकीय प्रयोग असल्याचा आरोप होत आहे.पुसदच्या राजकीय आकाशात या उमेदवाराची वाढती लोकप्रियता पाहता अनेकांना तो खरा हिंदुत्ववादी चेहरा वाटत होता. परंतु निवडणुकीच्या काही दिवस आधीच त्याचे पडद्यामागील व्यवहार आणि 'बंगल्या'तील दिग्गजांशी असलेली गुप्त हातमिळवणी उघडकीस आल्याचा दावा कार्यकर्त्यांनी केला आहे. हिंदुत्ववादी गटांनी स्वतः या उमेदवाराला उघड विरोध दर्शवला असून हा उमेदवार निवडून आला तर पुसदची हिंदुत्ववादी विचारसरणी थेट बंगल्याच्या चरणी गहाण पडेल असा इशारा ते देत आहेत. स्थानिक नागरिकांच्या चर्चेनुसार,उमेदवार स्वतःला कठोर हिंदुत्ववादी म्हणवत असला तरी त्याची खरी निष्ठा एका विशिष्ट 'बंगल्या'शी असल्याचे आता शहरात उघडपणे बोलले जात आहे. बाहेरून भगवे प्रेम प्रत्यक्षात बंगल्याची सेवा करा असा आरोपही नागरिक करताना दिसत आहेत. स्थानिक सुज्ञ नागरिकांच्या म्हणण्यानुसार, "हा उमेदवार बाह्य आवरणाने लोकांना आकर्षित करतो, पण त्याची खरी निष्ठा 'इंद्राशी' आहे. त्यामुळे मतदारांनी गोड बोलण्यामागचा हेतू ओळखणे आवश्यक आहे. निवडणुकीची हवा तापत असताना 'नकली चादरवार' उमेदवाराचा पर्दाफाश झाल्याने राजकीय समीकरणात मोठी हालचाल झाली आहे.

## वेचक

### ट्रॅक्टरचे साहित्य चोरी प्रकरणी तिघेजण पोलिसांच्या ताब्यात



बाभुळगाव - येथील तहसिल आवारातील जप्त करण्यात आलेल्या टॅक्टरमधील हायड्रोलीक पंप, पट्टे, पंपसेट, व इतर साहित्य अज्ञात चोरट्यांनी १३ नोव्हेंबरच्या रात्री लंपास केले. या प्रकरणी वाहन मालक प्रज्वल मसराम, रा. वाटखेड खुर्द यांनी तहसिलदारांकडे तक्रार दाखल केली होती. तहसिल कार्यालयाद्वारे १८ नोव्हेंबर रोजी या प्रकरणी पोलीसांत फिर्याद नोंदविण्यात आली होती. या प्रकरणी पोलीसांनी तीन संशयीतांना ताब्यात घेतले असून त्यांचेकडून चोरीतील साहित्य जप्त करण्यात आले आहे. बाभुळगांव येथे २८ मार्च २०२५ रोजी रेतीची अवैध वाहतूक करीत असताना प्रज्वल मसराम यांचे वाहन तहसीलदारांनी जप्त केले होते. सदर वाहन सोनालिका निळा टॅक्टर, ट्रॉली क्रमांक एमएच २९ बीव्ही २७८३ हे तहसिल कार्यालयांचे आवारामध्ये ठेवण्यात आले होते. सदर वाहन १२ नोव्हेंबर रोजी पावेतो सुस्थितीत होते. परंतू १३ नोव्हेंबर रोजी रात्री दरम्यान अज्ञात इसमांनी टॅक्टर मधील हायड्रोलीक पटटे, पंप, व इतर साहीत्य अंदाजे किंमत ५० हजार ते ५५ हजार रु.चे चोरी करुन नेले या प्रकरणी वाहन मालक प्रज्ज्वल मसराम यांनी तहसीलदारांकडे तक्रार दिली होती. त्यावरून राजेश बोबडे, शिपाई तहसिल कार्यालय बाभुळगांव यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद नोंदविली. सदर गुन्हयाचे तपासामध्ये पोलीस स्टेशनच्या पथकाने शोध घेवून गुन्हयामध्ये अज्ञात आरोपी बाबत गोपनीय माहीती मिळविली. त्यावरून संशयित म्हणून शेख अदनान मोहम्म्द रफिक वय २२ वर्ष रा. राणी अमरावती, शेख महेफुज शेख मेहबुब वय २१ वर्ष रा. नेहरु नगर, बाभुळगांव यांना ताब्यात घेण्यात आले. या दोघांना पोलिसी खाक्या दाखवताच व कसून विचारपूस केल्यावर त्यांचे कडून मिळालेल्या माहीती वरुन मोहम्मद जैद शेख रफिक वय १९ वर्ष रा. मज्जीदपुरा बाभुळगांव याचे सांगण्यावरुन चोरी केल्याचे सांगीतले. यावरून तिसऱ्या आरोपीला सुद्धा ताब्यात घेण्यात आले. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्यावरून त्यांचे कडून तहसिल कार्यालय येथे जप्त असलेले टॅक्टर/ट्रॉली मधील चोरी केलेले साहित्य हस्तगत करण्यात आले. एल.डी. तावरे, पोलीस निरीक्षक, दिपक आसकर, सहा. पो.उप नि. निलेश भुसे, पोलीस हवालदार, मंगेश कळसकर, पोलीस हवालदार यांनी केली.

### वंचित बहुजन आघाडी नगरपरिषद प्रचार कार्यालयाचे उद्घाटन



पुसद - येथील नगरपरिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक १३ मधील निवडणूक रिंगणात उभे असलेल्या उमेदवार सौ.रेखा मनोज तुंडलायत यांनी उमेदवारी अर्ज भरून जनसंपर्क कार्यालयाचे आज दिनांक २२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता मोठ्या धुमधडाक्यात संदीप आढाव तालुकाध्यक्ष यांच्याहस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले आहे. याप्रसंगी तालुका अध्यक्ष संदीप आढाव, महासचिव जयानंद उबाळे, निवडणूक निरिक्षक बुद्धरत्न भालेराव, उमेदवार सौ.सोनाली अरुण राऊत, सुरज अर्जुन लोखंडे,मोहम्मद सादीक जिंदरान, मनोज तुंडलायत, मधुकर सोनुने, भा.बौ.महासभेचे अध्यक्ष भारत कांबळे,पत्रकार काळूराम कांबळे, मंचकराव देशमुख,नारायण सारसर, विक्की तुंडलायत, सुरेश पवार,कालु भुरान नौरंगाबादी,राजु बेंद्रे,ओम कांबळे इत्यादी कार्यकर्ते तथा उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हिवरा (सं.) येथे 15 वा वित्त आयोग अंतर्गत कब्रस्थान सौंदरीकरनचे भूमिपूजन



महागाव : आज दि. 22/11/2025 रोजी हिवरा (सं.) येथे 15 वा वित्त आयोग अंतर्गत कब्रस्थान सौंदरीकरन चे भूमिपूजन करण्यात आले यावेळी उपसरपंच शरद पाटील सदस्य राजुभाऊ धोतरकर गावातील प्रतिष्टीत नागरिक तथा व्यापारी सफी शेठ सुरैया. व सत्तार शेठ. यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले यावेळी इकबाल शेठ. मन्नान मौलाना.माजी ग्रामपंचायत सदस्य हिदायतूला खान पठाण.शेख मोहीन.शे फिरोज शे रजाक. आयुब .शे शब्बीर.शे कलिम.शे फिरोज.अफसर भाई.संतोष धोत्रे.ग्रामपंचायत कर्मचारी सुधीर कदम. अशोक स्वप्निल बेलखेडे ,भुसारे.राहुल आंडगे.समाधान मोरे उपस्थित होते.

# कष्टाचे पैसे मिळविण्यासाठी ठेवीदारांचा संघर्ष तीव्र

## बाबाजी दाते महिला बँक प्रकरण ९ डिसेंबरपासून बेमुदत धरणे आंदोलन

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : बाबाजी दाते महिला सहकारी बँकेच्या अंदाजे ४०० कोटी रुपयांच्या अफरातफरी मुळे २०२१ मध्ये बँक अवसायनात गेल्यापासून ठेवीदारांचा लढा सुरू आहे. ठेवीची ८० टक्के रक्कम मिळावी, या मुख्य मागणीसाठी ठेवीदारांनी ०९ डिसेंबरपासून अवसायक कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनातून दिला आहे.

महिलांनी महिलांसाठी चालविलेली ही जिल्ह्यातील पहिली महिला बँक. रोजमजुरी करणारे, छोटे व्यापारी व विविध पतसंस्थांनी विश्वासाने ठेवलेल्या ठेवी बोगस कर्ज प्रकरणे तयार करून तत्कालीन संचालक मंडळ, अधिकारी, ऑडिटर व कर्मचाऱ्यांनी हडप केल्याचा आरोप आहे. सक्तीची वसूली तातडीने सुरू करून ठेवी परत मिळाव्यात, या मागणीवर ठेवीदार ठाम आहेत. अवसायन प्रक्रियेदरम्यान डीआयसीजीसीकडून मिळालेल्या दाव्याची रक्कम परत केल्यानंतर उर्वरित ४० कोटींचे वाटप सुरू असताना अचानक बँक कर्मचाऱ्यांना संपूर्ण रक्कम परतफेड करण्यात आली. ही बाब ठेवीदारांवरील अन्यायकारक असल्याचे निवेदनात नमूद आहे. विशेष लेखापरीक्षणात तब्बल १४२ कर्ज प्रकरणात गंभीर अनियमितता आढळली असून एकूण २०६ जणांवर आरोप ठेवण्यात आले आहेत. या प्रकरणात आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी हस्तक्षेप करून अलीकडेच २० टक्के रक्कम मिळवून दिली होती. ठेवीदारांचे पूर्ण पैसे मिळेपर्यंत हिवाळी अधिवेशनात पाठपुरावा करू असे त्यांनी आश्वासन दिले.

# बसस्थानक परिसरात सहा किलो गांजासह तिघे ताब्यात

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ : शहरातील बसस्थानक परिसरात अंमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून १ लाख ४२ हजार ६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७.५० वाजता करण्यात आली.

अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शहरात गस्त घालत असताना स्थानिक गुन्हे शाखेस ओडिशा राज्यातील एक इसम गांजाविक्रीसाठी येणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार बसस्थानक परिसरात सापळा लावला. त्याठिकाणी निळ्या रंगाची सुटकेस हातात घेऊन संशयास्पदरीत्या थांबलेल्या इसमासोबत गांजा घेण्यासाठी आलेले आणखी दोघे दिसून आले. पंचासमक्ष चौकशी केली असता आरोपींची नावे (१) बेस्नव हरा प्रधान (वय ३१, रा. ओडिशा), (२) प्रशांत रामदास गावंडे (वय ४९, रा. कळंब), (३) हरिओम बाबुलाल ठाकुर (वय ३३, रा. यवतमाळ) अशी समोर आली. त्यांच्याकडून ६ किलो ३ ग्रॅम गांजा किमती रु. १,२०,०६०/- तसेच दोन मोबाईल किमती रु. २०,०००/- असा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला. तिघांविरुद्ध अवधुतवाडी पोलीस ठाण्यात NDPS कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतिश चवरे व त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# साखरा येथे माकडांच्या धुमाकूळाने नागरिक त्रस्त

जनमाध्यम प्रतिनिधी



दिग्रस - तालुका तालुक्यातील साखरा गावात माकडांनी धुमाकूळ घातला आहे यातील माकडे महीला व लहान मुलवर हल्लाचढवीत असुन जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही गावात दहशतीचे वातावरण पसरले आहे परंतु वनविभाग याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत असुन. एखाद्याव्यक्तीचा यामध्ये जीव गेल्यावर यांना जाग येणार का असा संतप्तसवाल गावकरी करीत आहेत.

गावातील झाडावर व घरा वर माकडांचे साम्राज्यसातत्याने वाढत असून मागील एक महिन्या पासून गावात 20 च्या वर माकडे आहेत , लहानमुले, महीला, वृद्ध घराबाहेर पडायला घाबरत आहेत कधीहल्ला करतील हे सांगता येत नाही कीतेक घरावरील टीन पत्रेमाकडांच्या धुमाकूळाने चाळणी-चाळणी झाले आहेत मागील एक ते दोन महिन्यापासून यांचा गावात मुक्काम असल्याने माणसालाआता भीत नाहीत माकडांची दहशत इतकी वाढली की सरळघरात शीरुन खाण्याच्या वस्तु लंपास करीत आहे अनेक वेळामाकडांनी लहान मुलांवर व महीलेवर हल्ला करण्याची शक्यता नाकारता येत नाही वनविभागाने याची दखल घेऊन माकडाना पकडण्यासाठी त्वरित पुढाकार घेणे गरजेचे आहे. अन्यथा माकडांच्या दहशतीत वावरताना जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही वनविभाग याकडे लक्ष देणे गरजेचे आहे असा प्रतिक्रिया गावकरी व्यक्त करीत आहे माकडांना जंगलात पिटाळूनलावावे आणि होणारा त्रास व हानी थांबवावी अशी मागणी साखरा येथील नागरीककरीत आहे.

> माकडांच्या दहशतीने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

# पहिलेच पदावर असताना विकास केला नाही! आता करतील का?

जनमाध्यम प्रतिनिधी



ढाणकी - ढाणकी नगरपंचायत निवडणुकीमध्ये दोन्ही प्रमुख पक्षांनी (काँग्रेस आणि भाजप) दिलेले नगराध्यक्ष पदाचे उमेदवार हे पूर्वी महत्त्वाच्या पदांवर राहिलेले आहेत. मात्र, त्यांच्या कार्यकाळात शहराच्या मूलभूत समस्या, विशेषत: पाणीपुरवठा मार्गी न लागल्याने मतदारांमध्ये रोष व्यक्त होत आहे.

दोन्ही पक्षात उमेदवारी साठी उच्च शिक्षित आणि ढाणकी विकासाच्या कामासाठी धडपड करणाऱ्या उमेदवराला डावल्यामुळे पक्षात अंतर्गत नाराजी असल्याचे बोलल्या जात आहे. निवडणुकीच्या तोंडावर अंतर्गत असंतुष्टता वाढल्यामुळे निवडणुकीत याचा फटका दोन्ही पक्षाला बसणार असल्याचे बोलल्या जात आहे. भाजप पक्षांचे नगरअध्यक्षा उमेदवार व पती,तसेच काँग्रेस पक्षांचे नगरअध्यक्षा उमेदवाराचे पती यांनी पहिले ग्रामपंचायत, नगरपंचायत व जिल्हापरिषद पद उपभोगले असून सुद्धा त्यांनी गावाचा विकास सोडा पण अत्यंत मूलभूत गरजातील पाणी समस्या सोडू शकले नाही ते नगराध्यक्षपदाचे उमेदवार आहेत. आता नागरिकांमध्ये चर्चा आहे की, पहिले या प्रमुख पदांवर असताना त्यांना ढाणकी शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत करता आला नाही. पाणीटंचाईसारख्या ज्वलंत प्रश्नावर अपयशी ठरलेले हे उमेदवार आता नगराध्यक्षपदासाठी मतदारांना स्वीकार्य होईल का?हा कळीचा मुद्दा बनला आहे. त्यामुळे "या जुन्या चेहऱ्यांना नागरिक स्वीकारतील की नवा आणि तिसरा पर्याय निवडतील?"

# अभ्यंकर कन्या शाळेद्वारे मतदान जनजागृती

## पथनाट्याद्वारेमतदारांमध्येजागरूकता

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदार जागृती हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर याच जनजागृतीला चालना देण्यासाठी येथील अभ्यंकर कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी पथनाट्याद्वारे अनोखी जागरूकता मोहिम राबविली.

१८ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान चौक आणि बस स्टँड परिसरात इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थिनींनी मतदार जागृतीसाठी प्रभावी पथनाट्य सादर केले. "मतदान हा हक्क, मतदान ही जबाबदारी" या संदेशावर आधारित पथनाट्याद्वारे त्यांनी नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थिनींच्या जोश पूर्ण अभिनयामुळे परिसरात उपस्थित नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. या जनजागृती उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक निखिल थारकर, दिनेश घुगे,संजय बट्टावर व संजय मनवर यांनी विशेष परिश्रम घेतले. पथनाट्याची संकल्पना, सराव आणि सादरीकरण या सर्व टप्प्यांमध्ये त्यांनी विद्यार्थिनींचे मार्गदर्शन केले. संपूर्ण उपक्रमासाठी मुख्याध्यापिका श्रीमती मोहना गंगमवार तसेच केंद्रप्रमुख श्री. राजेंद्र मेनकुदळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रेरणेमुळे विद्यार्थिनींनी सामाजिक बांधिलकी जपत लोकशाही प्रक्रियेबद्दल जनजागृती घडवून आणली. अभ्यंकर कन्या शाळेतर्फे राबविण्यात आलेला हा उपक्रम नागरिकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रभावी ठरला असून प्रशंसनीय म्हणून गौरवला जात आहे.

# अं.सुर्जी तालुक्यातील सेवा सहकारी सोसायटी सचिवांच्या नियुक्त्या रखडल्या

## सेवा सहकारी सोसायटीच्या कामकाजावर परिणाम

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील सचिवांच्या एकुण १०५ जागा रिक्त होत्या त्यातील ९८ रिक्त जागा भरण्याच्या आदेश काढण्यात आला तर अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ७ सचिवांच्या रिक्त जागेचा आदेश थंड बस्त्यात पडला आहे त्यामुळे तालुक्यातील ३५ सेवा सहकारी सोसायटीच्या वसुलीच्या कामकाजावर परिणाम पडल्यामुळे सोसायटीच्या आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.




सहकार सोसायटीचे कामकाज पाहत असताना अनेक सचिवांवर राजकीय दबाव राहत होता. त्यामुळे राज्य शासनाने सचिवांनी मुक्त वातावरणात आणि पारदर्शक पद्धतीने कामकाजात चालावे यासाठी सचिवांचे संवर्ग ( कॅडर ) बनविण्याचा निर्णय घेऊन जिल्ह्यातील सचिवांच्या रिक्त जागेला भरण्याची परवानगी दिली.

अंजनगाव सुर्जी तालुक्यात सहकार क्षेत्रात दोन परस्परविरोधी गटांचे पॅनल आहेत. त्यातील परिवर्तन पॅनल च्या गटाच्या समर्थक असलेल्या सोसायटीच्या सचिवांची नियुक्ती रखडली असल्याने यात राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोप होत आहे.

ग्रामीण विकासाची जननी म्हणून सहकार मोठ्या प्रमाणात नावारूपाला आल्यामुळे ग्रामीण भागाला बळकटीकरण देण्याचा प्रयत्न झाला. राज्यातील सेवा सोसायटी संस्थेच्या माध्यमातून झालेला ग्रामीण विकास हे जगातील अनेक देशांना एक दिशा देण्यासाठी निश्चितच उपयोगी ठरलेले आहे. शेतकऱ्यांसाठी शेतीसाठी आवश्यक असलेल्या विविध सेवा, सुविधा यांचा पुरवठा करणे यांसारखे अनेक उपक्रम राबविण्यासाठी गावांमध्ये सहकारी तत्त्वावर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या उभ्या करण्यात आल्या असून या सोसाटीचा आणि शेतकऱ्यांचा वेळोवेळी मार्गदर्शन म्हणून कार्यरत सेवा सोसायटी सचिव कामकाजात पाहते.

जिल्हा उप. निबंधकाकडून फाईल आल्यावर आमच्याकडून सगळी प्रक्रिया झाली असून नियुक्ती पत्रांवर स्वाक्षरी केली आहे. नियुक्ती आदेशानंतर जिल्हा देखरेख अध्यक्षांकडे संबंधित सचिवांच्या तक्रारी असल्याने मीटिंगमध्ये ठरावाच्या माध्यमातून अध्यक्षांनी त्यांच्या अधिकार नुसार प्रकरण थांबून ठेवले आहे. येत्या काही दिवसांत सचिवांच्या नियुक्त्या प्रदान करण्यात येणार आहे.

**अनिरुद्ध राऊत**
मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा देखरेख संस्था

## अंबा रुख्मिणी महोत्सव मध्ये विदर्भस्तरीय बँड पथक स्पर्धेचा जल्लोष

**अमरावती/का.प्र.**

महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा, नामक,अंबा-रुख्मिणी महोत्सव -२०२५ विदर्भस्तरीय भव्य बँड पथक स्पर्धा जल्लोषात झाली. यामध्ये शेगाव च्या बँड पथकाने २१००० हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त करून पहिला क्रमांक, अमरावती च्या अशोक बँड पथकाने ११००० रुपयांचे पारितोषिक प्राप्त करून द्वितीय क्रमांक आणि सरस्वती बँड अमरावती ने ५००० रुपयांचे पारितोषिक प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकाविला.

यावेळी अंबा रुख्मिणी महोत्सव समिती चे अध्यक्ष रविराज देशमुख यांनी सर्व विजेत्या टीमचे अभिनंदन केले. तर गायत्री देशमुख व तेजस्विनी वानखडे यांच्याहस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. अमरावती जिल्हा बँड पथक असोसिएशन आणि अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समिती च्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून दीपक शिंदे, अशोक वानखेडे, पडघान, सहदेव तिरळे यांनी परीक्षण केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अमरावती जिल्हा बँड असोसिएशनचे अध्यक्ष गणेश कलाने, सचिव सुरेश गवळी, गणेशदास गायकवाड, अनंत दाभाडे, अशोकराव वानखडे, रुपेश खडसे, दादासाहेब स्वर्गे, प्रा. सुमित तट्टे, नायकराव कडू, श्यामभाऊ नरखेडकर, उमेशभाऊ श्रीखंडे, संतोष माठिया, संतोष साठवणे, मोरेश्वर मुळे, रत्नाप्रभू खापरे, आशिष डुबे, गणेश बांबल, अमोल शेंडे, अंकुश देऊळकर, पांडुरंगजी सराडे, गोपिभाऊ वेरुळकर, वैभव ठाकरे, आकाश ठाकरे,अर्पित डुबे, रोशन भगत, गजानन आमटे यांनी अथक परिश्रम घेतले. बक्षीस वितरणाचे संचालन अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे सचिव अक्षय पुंडेकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुबोध देशमुख यांनी केले. पुढील काळात मोठी स्पर्धा आयोजित करण्याचे आमचे नियोजन असून त्या माध्यमातून विविध कलावंतांना एक व्यासपीठ उभे करण्याचा आमचा मानस आहे. असे प्रतिपादन समितीचे अध्यक्ष रविराज देशमुख यांनी केले.

## ऊर्जा क्षेत्रातील उत्कृष्टतेचा महावितरण व सीएमडी लोकेश चंद्र यांना राष्ट्रीय पुरस्कार

**अमरावती/का.प्र.**

स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासाठी महावितरणने अपारंपरिक ऊर्जेला प्राधान्य देत आतापर्यंत केलेल्या एकूण वीज खरेदीच्या दीर्घकालीन करारांमध्ये तब्बल ६५ टक्के अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केला आहे. यासह विद्युत व ऊर्जा क्षेत्रात केलेल्या विविध कामगिरीची दखल घेऊन १२ व्या नॅशनल अवार्डस् फॉर एक्सलन्स २०२५ इन पॉवर अॅण्ड एनर्जीच्या कार्यक्रमात महावितरण कंपनीला 'पॉवर डिस्ट्रीब्यूशन युटिलीटी ऑफ द इयर' आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना 'एनर्जी इनोव्हेटर ऑफ द इयर' या राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले.




मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात हे दोन्ही पुरस्कार मानव संसाधन विकासाचे विशेषज्ञ डॉ.आर. एल. भाटिया यांच्याकडून महावितरणचे कार्यकारी संचालक परेश भागवत,कार्यकारी अभियंता प्रशांत गोंधळेकर, डॉ. संतोष पाटणी, सचिन घरत, शंतनू एदलाबादकर यांनी स्वीकारले.केंद्र शासनाकडून सन २०३० पर्यंत देशात एकूण वीज निर्मिती क्षमतेमध्ये ५० टक्के अपारंपरिक ऊर्जेचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्यासाठी ५०० गिगावॅट (उं) पर्यंत अक्षय ऊर्जा क्षमता वाढविण्याचे धोरण आहे. त्यास अनुसरून महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ७२ हजार ९१८ मेगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे.

ऊर्जा परिवर्तनामध्ये प्रामुख्याने सौर ऊर्जा क्षेत्रात महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी आतापर्यंत २७७३ मेगावॅट क्षमतेचे ५१२ सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. त्यातून ६ लाख २५ हजारांवर शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे. तर देशात सर्वाधिक ६० टक्के म्हणजे ६ लाख ४७ हजारांवर सौर कृषिपंप महाराष्ट्रात कार्यान्वित करण्यात आले आहे. यासह गेल्या दीड वर्षांमध्ये राज्यातील २ लाख ५० हजारांवर घरगुती ग्राहकांकडे छतावरील सौर ऊर्जा निर्मितीसाठी १ हजारांवर मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले असून या ग्राहकांचे मासिक वीजबिल देखील शून्यवत झाले आहे.

महावितरणकडून विजेच्या मागणीचा अंदाज व त्याचे कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे विश्लेषण करण्यासाठी स्वतंत्र प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्याद्वारे मागणीचा अचूक अंदाज व सर्वात कमी खर्चात वीज खरेदीचे व्यवस्थापन सुरू आहे. सूक्ष्म वीज खरेदीच्या नियोजनाद्वारे विजेचे कुठेही भारनियमन न करता विक्रमी २६ हजार ४९५ मेगावॅट विजेचा सुरळीत पुरवठा करण्यात महावितरणने यश मिळवले आहे, हे विशेष.

## पाथरगाव उपसा सिंचन योजनेच्या पाणी वापर संस्थांना प्रशिक्षण

### २०२५ च्या रब्बीपासून पाणी मिळणार

**अमरावती/का.प्र.**

मोर्शी तालुक्यातील ऊर्ध्व वर्धा प्रकल्पांतर्गत पाथरगाव उपसा सिंचन योजनेचे बांधकाम पूर्ण झाले असून, सन २०२५ च्या रब्बी हंगामापासून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापन पाणी वापर संस्थांमार्फत (पा.वा.सं.) करावयाचे असल्याने, त्यांना सक्षम करण्यासाठी नुकतेच एकदिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

ऊर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अधीक्षक अभियंता मनीष राजभोज, सेवानिवृत्त प्राध्यापक बाळासाहेब शेटे, सेवानिवृत्त जलसंपदा विभाग कार्यकारी अभियंता किशोर वरंभे उपस्थित होते. कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत यांनी प्रास्ताविक केले.राजभोज यांनी 'महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन २००५' या कायद्यानुसार स्थापन झालेल्या ६ पाणी वापर संस्थांना पाण्याचा इष्टतम वापर, पीक पद्धती निवडणे, घनमापन पद्धतीने पाणी वापर करणे



आणि पाणीपट्टी वसुलीच्या अधिकाराचा प्रभावी वापर करून गावाचा विकास करण्याचे आवाहन केले. शेटे आणि श्री. वरंभे यांनी सिंचन कायदे, पा.वा.सं. चा उद्देश, कार्यप्रणाली आणि गट शेती या विषयांवर मार्गदर्शन केले. संत सेवालाल महाराज (जळका), संत पांडुरंग महा. (जळका), एकनाथ महा. (आमला), विश्वेश्वर पा.क.रते. (आमला), परिवर्तन (टेंभुर्णी), आणि समृद्धी (टेंभूर्णी) या सहा संस्थांचे अध्यक्ष, सदस्य प्रशिक्षणात सहभागी झाले होते. त्यांना हस्तांतरण प्रमाणपत्र व उपस्थिती प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

## पायाभूत सुविधांचे युनिक आयडी तयार करा-जिल्हाधिकारी

### पुरस्कारप्राप्त गणेशोत्सव मंडळांचा सत्कार

**अमरावती/का.प्र.**

एकाच प्रकल्पावर दोन निधी उपलब्ध होऊ नयेत, यासाठी पायाभूत सुविधांचे युनिक आयडी तयार करण्यात येत आहे. यावर्षी हा प्रकल्प प्रायोगिक तत्वावरील असला तरी पुढील वर्षीपासून याचा उपयोग करणे आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे बांधकाम आणि कार्य करणाऱ्या कार्यालयांनी पायाभूत सुविधांचे युनिक आयडी तयार करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हा नियोजन सभागृहात आढावा बैठक पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपवनसंरक्षक अर्जूना के. आर., निता कट्टे, आदर्श रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आदी उपस्थित होते.बैठकीत यावर्षीच्या स्पीलचा निधीबाबत आढावा घेण्यात आला. स्पीलच्या निधी मागणी बाबत तातडीने आढावा घेण्यात यावा. काम करणाऱ्या यंत्रणांकडून स्पीलच्या निधीची मागणी घेऊन कार्यान्वयन यंत्रणांनी नियोजनकडे तात्काळ सादर करावी. यामुळे गेल्या दोन वर्षांपासूनची कामे पूर्ण होण्यास मदत होईल. अद्यापही प्रशासकीय मान्यता घेतलेली नसलेल्या विभागांनी येत्या आठ दिवसांत परिपूर्ण प्रस्ताव निधी मागणीसह सादर करावा. येत्या काळात निवडणूक असल्याने



प्रशासकीय मान्यता देण्यास अडचण येणार आहे. त्यामुळे प्रशासकीय मान्यता तातडीने घेण्यात याव्यात.

यावेळी जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाबद्दल एकविरा गणेशोत्सव मंडळ, अमरावती, द्वितीय क्रमांक बद्दल बाल गणेशोत्सव मंडळ, साऊर, ता. भातकुली, तृतीय क्रमांक बद्दल राजे वीर संभाजी मंडळ, चांदुर रेल्वे, तालुकास्तरीय प्रथम क्रमांक बद्दल लोकमान्य उत्सव समिती, शिंदी बु., ता. अचलपूर गणेशोत्सव मंडळांचा सत्कार करण्यात आला. तसेच युनिक आयडी तयार करण्याबाबत सादरीकरण करण्यात आले.

# आमदार राजेश वानखडे यांचे हस्ते विकासकामांचे भूमिपूजन

**अमरावती/का.प्र.**

तालुक्यातील नांदगाव पेठ जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत विविध गावांमध्ये एकूण ६ कोटी रुपयांच्या निधीमधून मंजूर विकास कामांचे भूमिपूजन आमदार राजेश वानखडे यांच्या शुभहस्ते झाले.

या विकास यात्रेत पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, स्थानिक सरपंच, ग्रामसेवक तसेच विविध गावातील स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या भूमिपूजनाचा दौरा पिंपळविहिर येथून सुरू करण्यात आला त्यानंतर डिगरगव्हान, केकतपूर, वाघोली, माहुली जहागीर, सालोरा खुर्द, कठोरा गांधी, दोनद, खानापूर या गावातील विकासकामांचे भूमिपूजन करत मार्गक्रमण करीत नांदगाव पेठ येथे मंजूर विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी मंजूर विकास कामांचा व्यापक आढावा घेऊन भूमिपूजन प्रसंगी आमदार राजेश वानखडे यांनी शासन निधीमधील अंतर्गत शासन पांदन रस्ते विकास योजना, जिल्हा नियोजन समिती (डीपीसी), ग्रामीण मार्ग, जनसुविधा,नागरीसुविधा या योजनांतर्गत व शासनस्तरावरून महत्प्रयासाने मंजूर झालेल्या विविध विकास कामांचे भूमिपूजन केले. यामध्ये प्रामुख्याने पांदन रस्ते: शेतकऱ्यांच्या वहिवाटी व वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले पांदन रस्ते जास्तीत जास्त संख्येने मंजूर करण्यात आले असून यामुळे शेतमालाची वाहतूक सुलभ होईल व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळता येईल.

यावेळी प्रामुख्याने विवेक गुल्हाने- जिल्हा उपाध्यक्ष, प्रदीप गौरखेडे-तिवसा विधानसभा संयोजक, सुभाष श्रीखंडे, विरेंद्र लंगडे-तालुकाध्यक्ष, विजय भुयार- युवा मोर्चा तालुकाध्यक्ष, अजय गुल्हाने - तिवसा शहराध्यक्ष, शुभम बोथे, कार्यकारिणी सदस्य, राजू चरडे, मोरेश्वर इंगळे, उमेश डोईफोडे, अमोल व्यवहारे, दिनकर सुंदरकर, प्रविण अळसपुरे, मनिर्षा गुल्हाने, भारती गेडाम, मोनिकाताई पिहुलकर, प्रीती बुंदिले, अक्षय ठाकरे, भैया चौधरी, अमित भुजाडे, सुधीर कोहळे, बाळासाहेब उगले, राजेश बरबुद्धे, रवी चव्हाण, बाळासाहेब पाचघरे, मनोज यावले, मंगेश महल्ले, ऋषिकेश चांगोले, संदीप पाचघरे, प्रवीण वणवे, मनोज बुंदिले, चेतन पाटील, अजय ठाकरे, प्रमोद जवंजाळ, रवी यादव, रवींद्र जवंजाळ, भैया यादव, राजकुमार पावडे, गंगाधर चौधरी, छत्रपती पटके, नरेश गेडाम, नागेंद्र तायडे, नाना मोरे, पवन लुंगे, मयूर काळे, अंकुश वाघ, तसेच तालुका, मंडल, बूथ स्तरावरील पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



## संक्षिप्त

### जवाहर नवोदय विद्यालयातील परीक्षेचे प्रवेश पत्र संकेतस्थळावर

**अमरावती-** जवाहर नवोदय विद्यालय, अमरावतीचे शैक्षणिक सत्र २०२६-२७ इयता सहावीच्या प्रवेश परीक्षेचे प्रवेश पत्र www.navodaya.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. प्रवेश परीक्षा शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी एकूण ६१ केंद्रावर आयोजित करण्याचे निर्धारित केले आहे. परीक्षार्थी प्रवेश पत्र www.navodaya.gov.in या संकेतस्थळावरून निःशुल्क डाउनलोड करून घेऊ शकतात. अधिक माहितीसाठी प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, अमरावती यांच्याशी संपर्क साधावा.

### रेसीन्नो बायोटेक कंपनीमध्ये विद्यार्थ्यांची निवड

**अमरावती-** नवी मुंबई येथील रेसीन्नो बायोटेक प्रा. लि. कंपनीमध्ये संत गाडगे बाबा अमरावती



विद्यापीठातील बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या दोन विद्यार्थ्यांची कंपनीने निवड केली आहे. विशेष म्हणजे रेसीन्नो बायोटेक प्रा. लि. ही कंपनी विद्यापीठाच्याच माजी विद्यार्थ्यांनी उभारलेली कंपनी आहे. माजी विद्यार्थी डॉ. काफील अहमद यांनी २०१८ मध्ये या कंपनीची उभारणी केली. संशोधन आणि नावीन्यवादी तंत्रज्ञानावर आधारित सदर कंपनी मानवी व पशूवैद्यकीय रोग निदानासाठी कार्य करते. कंपनीच्या प्रतिनिधींनी विद्यापीठात २० विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून दोन विद्यार्थ्यांची प्रकल्पांसाठी निवड केली. विद्यापीठाने उद्योगांशी सामंजस्य वाढवून विद्यार्थ्यांना रोजगार व अनुभव प्रदान करण्यासाठी उचललेले हे महत्वाचे पाऊल असून भविष्यात विद्यार्थ्यांना याचा मोठा लाभ होणार असल्याचे मानले जाते. बायोटेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर यांनी कंपनीच्या प्रतिनिधींचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देवून विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला.

### संविधान रॅलीत तिवसातून सहभाग नोंदवणार

**कुऱ्हा-** भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे वतीने पक्षाचे शताब्दी वर्षा निमित्ताने २६ नोव्हेंबरला देशाचे संविधान देशाला बहाल केल्याचे संविधान दिवशी संविधानाचे रक्षण करण्याचे उद्देशाने पक्षाने लाल झेंडा महारॅली गणेश पेठ भाकप पक्ष कार्यालय ते चिटणीस पार्क होणार आहे.त्या ठिकाणी होणारे जाहीर सभेत पक्षाचे राष्ट्रीय सचिव कामगार नेते कॉ भालचंद्र कांगो नवी दिल्ली व पक्षाचे राज्य सचिव कॉ अॅड.सुभाष लांडे भुमीका मांडणार या लाल झेंडा रॅली करीता तिवसा तालुका मधुन मोठ्या संख्येने जाणार आहे,तसेच शेतकरी शेतमजूर ,कामगारांनी सहभागी होण्याचे आवाहन कॉ.चंद्रकांत वडस्कर,कॉ. प्रकाश सोनोने,राजाभाऊ बाभुळकर,मनोहर वाढोणकर, दिलीप सिंह नाहटा,हसनखॉ पठाण,दिलीप गोहत्रे, जितेंद्र कोरडे, प्रज्वल कुकडे, भाऊराव पाटील,नुर अली शहा, नरेंद्र बावणे,सुरेश मोधळे,केशव तांबे, ज्ञानेश्वर लिलव्हे,सुधाकर मानकर सलीम खॉ,राजु पाखरे, श्रीकृष्ण लांजेवार,सुरेश राऊत रमेश राऊत ,वाकलकर,अंबादास जुवारे,राम कृष्ण वाटकर, निरंजन बेले,गजानन भस्मे, बाबु बावणे,किसनराव सुने,अब्दुल अजीज, नरेंद्र सुरजुसे, ऋषीकेश खानंदे,सदाशिव महंगे,किसन आप्पा मंजु,ओमप्रकाश पाखरे सुदाकर वैध,अशोक राऊत ,विजयसींह नाहटे,सुरेश कळसकर, अशोक बायस्कर, आदित्य बानासुरे आदिंनी केले.

### हव्याप्र मंडळाला आतंराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ कुलगुरूंची सदीच्छा भेट



**अमरावती-** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ वर्धा येथील कुलगुरू डॉ. कुमुद शर्मा यांनी प्रथमच श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला आपल्या शिष्टमंडळासह सदीच्छा भेट दिली. मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, सचिव प्रा. रविंद्र खांडेकर, प्रा. दिपा कान्हेगावकर, डॉ. दिनानाथ नवाथे आदी पदाधिकाऱ्यांनी म. गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ वर्धा च्या शिष्टमंडळाचे स्वागत केले.कुलगुरू डॉ. कुमुद शर्मा, कुलसचिव कादर नवाज़ खान, एसो. प्रो. डॉ. जयंत उपाध्याय, रेसिडेंट रायटर डॉ. भूषण भवे, एम.ओ.यू. समन्वयक डॉ. अनिकेत अनिल आंबेकर और प्रोटोकॉल अधिकारी राजेश यादव या शिष्टमंडळाला मंडळाची ऐतिहासिक स्थापना,स्वातंत्र्य चळवळीमध्ये योगदान, क्रीडा क्षेत्रातील वाटचाल व विस्तृत परिसराची माहीती देण्यात आली.अनंत क्रीडा सभागृहातील जिम्नॅस्टिक, नेताजी सुभाषचंद्र बोस क्रीडा सहभागृह, मेजर ध्यानचंद इंडोअर स्टेडियम, जलतरण विभाग, योग विभागसह शैक्षणिक विभागाला भेटी देत मंडळातील खेळ व शिक्षणाचा नियोजनबद्ध समन्वयाची माहिती घेतली. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे विस्तृत स्वरूप व येथील क्रीडा-शिक्षणाचा यशस्वी वाटचाल पाहून कुलगुरू डॉ. शर्मा व त्यांचेसोबतचे शिष्टमंडळातील पदाधिकारी भारावून गेले होते. यापुढे श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ व आतंराष्ट्रीय विद्यापीठ एका मैत्रिपुर्ण समन्वयातून विद्यार्थी, खेळाडू व कर्मचारी यांच्या हितासाठी क्रीडा-शिक्षण समन्वयातून कार्य करू अशी इच्छा कुलगुरू डॉ. कुमूद शर्मा यांनी व्यक्त केली.

### शिरजगाव मोजारी येथे संविधान दिन

**तिवसा -** शिरजगाव मोझरी येथे परिवर्तन बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था व परिवर्तनवादी चळवळ तिवसाच्या वतीने संविधान दिनाच्या निमित्त संविधान सन्मान बाईक रॅली व रामपाल महाराज धारकर यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधी स्थळापासून या संविधान सन्मान बाईक रॅलीची प्रारंभहोईल. शिरजगाव मोझरी येथे रॅलीचा समारोप होणार आहे तर रात्री ७वाजता येथील बाजार चौकात सप्त खंजेरी वादक.डॉ. रामपालमहाराज धारकर यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम होणार आहे.

# नगरपरिषद निवडणुकांची विदर्भात घुसळण



**विदर्भातील ८० नगर परिषदा आणि २० नगरपंचायत यांच्यातील निवडणुका जाहीर होऊन प्रक्रिया सुरू असून लवकरच विदर्भातील निवडणुकांचे चित्र स्पष्ट होईल.**

**स्था**निक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे त्या-त्या परिसरातील आमदार, पालकमंत्री, खासदार अशा सर्व तत्सम नेत्यांच्या नेतृत्वाची कसोटी लागत असते. तशी विदर्भातही लागणार आहे. मात्र खरी कसोटी लागणार आहे ती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाची. काँग्रेसमध्ये महाराष्ट्र स्तरावर नेतृत्व बदल होऊन जेमतेम चार-पाच महिने झाले आणि हर्षवर्धन सपकाळ यांच्या रूपाने बुलढाणा जिल्ह्याकडे हे नेतृत्व आले आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी या कालखंडात पक्षात नवे चैतन्य फुंकण्याचा प्रयत्न जरूर केला आहे. त्यामुळे आता विदर्भात काँग्रेसला किती यश मिळते त्यावर सपकाळांचे नेतृत्व महाराष्ट्रात कितपत यशस्वी ठरू शकते हे ठरवले जाणार आहे. परिणामी विदर्भातील यशापयश हे काँग्रेसकरिता विशेष महत्त्वाचे राहणार आहे. विदर्भातील आजचे राजकीय चित्र बघता खरी लढत ही भाजप आणि काँग्रेस या दोन पक्षांतच होणार आहे हे निश्चित. त्या खालोखाल वंचित बहुजन आघाडी ही बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांमध्ये आपले थोडेफार का होईना पण अस्तित्व ठेवून आहे. उर्वरित दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस यांना तर आपले अस्तित्व टिकवण्यासाठीच या निवडणुकीत बरीच धडपड करावी लागणार आहे. महाराष्ट्रात आम्ही शक्यतोवर महायुती म्हणून एकत्रच लढू असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वारंवार सांगत असले तरी विदर्भात देखील कुठेच महायुतीतील तिन्ही घटक पक्ष एकत्र लढताना दिसत नाहीत. त्यातच मोठ्या प्रमाणात बंडखोरी देखील झालेली दिसते आहे. सर्वच पक्षांच्या पक्षश्रेष्ठींचे बंडखोरांना विविध आमिषे दाखवून शांत करण्याचे प्रयत्न चालू आहेत. आज दिवसाअखेर जितके प्रयत्न यशस्वी होतील तितके बंडखोर खाली बसतील. अन्यथा बहुतेक ठिकाणी बहुरंगी लढती या स्पष्ट दिसत आहेत.

पश्चिम विदर्भातील नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकीतील राजकारणावर यंदा नातेसंबंधांचा पगडा स्पष्टपणे जाणवतो. विविध पक्षांकडून मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज सादर झालेत. विशेष म्हणजे, या निवडणुकीत कार्यकर्त्यांना संधी देण्याची परंपरा बाजूला सारत अनेक दिग्गज नेत्यांनी आपल्या जवळच्या नातेवाईकांनाच थेट रिंगणात उतरवले. अकोला, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यांतील २५ नगर परिषदांमध्ये तब्बल दहा ठिकाणी नेत्यांच्या पत्नी, वहिनी, भाऊ आणि सून उमेदवार म्हणून उभे आहेत. बुलढाणा जिल्ह्यात कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची वहिनी अपर्णा फुंडकर या नगराध्यक्षपदासाठी रिंगणात उतरल्या आहेत. बुलडाणा नगरपालिकेत शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्या पत्नी पूजा उमेदवार आहेत. त्यांच्या विरोधात माजी आमदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या पत्नी अर्पिता शिंदे रिंगणात उतरल्याने चुरस वाढली. अकोला जिल्ह्यात माजी आमदार नातिकोद्दीन खतीब यांच्या पत्नी रजिया बेगम या वंचित बहुजन आघाडी नगरविकास फ्रंटतर्फे नगराध्यक्षपदासाठी उमेदवार आहेत. अकोटमध्ये माजी राज्यमंत्री रामदास बोडखे यांची सून तसेच माजी नगराध्यक्ष संजय बोडखे यांच्या पत्नी अलका बोडखे यांना काँग्रेसकडून उमेदवारी मिळाली आहे. मूर्तिजापूर येथे भाजप आमदार हरिष पिंपळे यांचे भाऊ उपेंद्र नगरसेवक पदासाठी उमेदवार आहेत. वाशीममध्ये कारंजा नगर परिषदेत भाजप नेते नरेंद्र गोलेच्छा यांची सून निशा यांना उमेदवारी मिळाली. एमआयएमचे युसूफ पुंजाणी यांच्या आई फरिदाबानू व सून फिज्झा यांनाही उमेदवारी जाहीर झाली. या निवडणुकीत महायुती तसेच महाविकास आघाडीतील विविध पक्षांनी स्थानिक पातळीवर निर्णय सोपवत हात वर केले. यामुळे बुलडाण्यात महायुतीचे घटक पक्षच समोरासमोर आले. शिवसेना विरुद्ध भाजप उमेदवार समोरासमोर लढणार आहेत. उमेदवारी मागे घेतल्यानंतर लढती स्पष्ट होईल. नगरसेवक, अध्यक्ष पदासाठी विविध राजकीय पक्षांकडून कार्यकर्ते, पदाधिकारी स्पर्धेत होते. सर्वांनाच उमेदवारी मिळणे शक्य नसल्याने ऐनवेळी बंडखोरी झालेली आहे. काही जणांनी अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली.

भाजप हा 'पार्टी विथ ए डिफरन्स' म्हणून ओळखला जात असला तरी या पक्षाची आता जवळजवळ काँग्रेसच होते आहे की काय असे चित्र दिसू लागले आहे. निवडणुकीच्या तोंडावर इथे प्रत्येक जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात 'इनकमिंग' झाले आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना या सर्वच पक्षातून इलेक्टिव्ह मेरिट असणारे जे जे बंडखोर असतील त्यांना भाजप आपल्याच सामावून घेताना दिसत आहे. त्यामुळे आता भाजपही 'पार्टी विथ ए डिफरन्स' न राहता 'डिफरंट पार्टी' म्हणूनच ओळखली जाईल की काय असे वाटू लागले आहे. तरीही अजूनही भाजपचे अगदी बूथ लेवलपर्यंतचे नेटवर्क भाजपच्या मदतीला येईल हे चित्र या क्षणी तरी दिसते आहे. काँग्रेसमध्ये संघटनात्मक बांधणीच्या नावाने नुसतीच बोंब आहे. प्रत्येक जण स्वतःला नेताच समजतो आहे. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही असे चित्र आहे. नागपुरात सुनील केदार यांच्याविरोधात प्रचंड नाराजी असून मोठ्या प्रमाणात तालुकास्तरावरचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी राजीनामे देऊन बाहेर पडलेत. अशा स्थितीत काँग्रेस आव्हान कसे पेलेल हा प्रश्नच आहे. अर्थात पक्षाच्या नेटवर्कसोबत प्रत्यक्ष उमेदवाराची समाजात असलेली प्रतिमा आणि त्याचा त्या मतदारसंघात असलेला संपर्क हा देखील कामी येईल. त्यामुळे निकाल नेमके काय लागतील हे आज सांगणे कठीण आहे. या निवडणुकीत विदर्भातील सर्वच पक्षाच्या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रतापराव जाधव, राज्यातील मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पंकज भोयर, अशोक उईके, आकाश फुंडकर, आशीष जयस्वाल, तसेच प्रफुल्ल पटेल, नाना पटोले, सुधीर मुनगंटीवार, विजय वडेट्टीवार, कृपाल तुमाने, प्रताप अडसड, रणजीत सावरकर, चैनसुख संचेती, अनिल देशमुख या सर्वांचेच राजकीय अस्तित्व पणाला लागले आहे. अशाही परिस्थितीत आज महाराष्ट्रात आणि केंद्रात भारतीय जनता पक्ष सत्ता स्थानी असल्यामुळे विदर्भात भाजपची हवा चांगली आहे. त्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे ज्येष्ठ मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अशोक उईके असे अनेक ज्येष्ठ मंत्री तसेच वरिष्ठ नेते विदर्भातीलच आहेत. त्यामुळे या क्षणी तरी विदर्भात भाजपला वातावरण अनुकूल दिसते आहे. अर्थात ज्या ठिकाणी स्थानिक उमेदवार चांगल्या प्रतिमेचा आणि चांगल्या संपर्काचा असेल त्या ठिकाणी तो कोणत्याही पक्षाचा असला तरी निवडून येण्याची संधी जास्त राहील. असेही असले तरी विदर्भात भाजप निवडून येण्याची शक्यता जास्त दिसते आहे. अर्थात या निवडणुका आहेत. अखेरच्या क्षणापर्यंत हवेचा झोत कसा येईल आणि परिस्थिती कशी बदलेल हे सांगता येत नाही. त्यामुळे निवडणूक निकाल काय लागेल हे चित्र ३ डिसेंबरलाच स्पष्ट होणार आहे.

**अविनाश पाठक**

## मनपाच्या मतदार यादीमध्ये घोळ

**अमरावती-** निवडणूक आयोग व अमरावती महानगरपालिकेच्या प्रशासनाने प्रारूप मतदार यादीची अधिकृत घोषणा केली. परंतु या मतदार यादीमध्ये मोठ्ठा घोळ झाला आहे.काही प्रभागामध्ये मतदारांची संख्या कमी करण्यात आली आहे तर काही प्रभागात अधिक आहे. म. न. पा. ने आधी घोषित केलेल्या प्रभागनिहाय सीमांकित प्रभागाच्या इतर प्रभागाचा भाग मोठ्या प्रमाणात सामील करण्यात आलेला आहे. उदा. प्रभाग क्र. ८, जोग स्टेडीयम, चपराशीपुरा या प्रभागमधील काही क्षेत्र जसे जमील कॉलनी, यादी क्र. १३८ शांती निकेतन कॉलनी, नवाथेच्या पाठीमागे, स्वास्तिक नगर, पाण्याच्या टाकीजवळ, महाविरनगर १३८, शिवशक्ती नगर, महावीर नगराचा बराच भाग विविध प्रभागात समाविष्ट करण्यात आला आहे.प्रभाग क्र. १८, राजापेठ- संत कंवरराम प्रभागामध्ये नवाथे प्लाटचा दसरा मैदान यादी भाग क्र. ९५, रवि नगर, दुर्गा विहार यादी प्रभाग क्र. ९५, देवरणकर नगर यादी क्र. ९५, दुर्गा विहार यादी क्र. ९६, सबनिस प्लॉट यादी भाग क्र. १२६, पन्नालाल नगर, बडनेरा रोड, यादी भाग क्र. १३६, नवाथे नगर बडनेरा रोड, यादी भाग क्र. १३६, स्वास्तिक नगर पाण्याच्या टाकीजवळ यादी भाग क्र. १३७, हनुमान मंदिर जवळ बडनेरा रोड यादी भागक्र. १३७, जगदळे प्लाट ले-आऊट यादी भागक्र. १३७, रविकिरण कॉलनी यादी भाग क्र. १३८, कृष्णार्पण कॉलनी दसरा मैदान यादी भाग क्र. १३८, न्यु प्रभात कॉलनी चक्रधर नगर यादी भाग क्र. १७३, एकवीरा कॉलनी, सरोज कॉलनी यादी भाग क्र. १९३, टी. टी. नगर, सरोज कॉलनी यादी भाग क्र. १९३, जय नगर, नंदनवन कॉलनी यादी भाग क्र. १९६, शिवाजी नगर यादी भाग क्र. १९८, साईनगर परिसर भाग यादी क्र. २३८, जेवड नगर यादी भागक्र. २३८, जयदत्त कॉलनी जेवड नगर यादी भाग क्र. २३८, जेवड नगर छत्रीतलाव रोड यादी भाग क्र. २३९ इतर प्रभागातील क्षेत्र राजापेठ प्रभागामध्ये सामील करण्यात आले आहेत व राजापेठ प्रभागातील मतदार प्रभाग क्रमांक १० व ११ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.

### अमरावतीमध्ये सहा पालिकांमध्ये

## महायुतीच्या विसर्जनामुळे एकमेकांसमोर आव्हान

**अमरावती/का.प्र.**

नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी काल नाट्यमय घडामोडीनंतर अर्ज माघारीवर अखेर पडदा पडला. जिल्ह्यातील सहा नगरपालिकांमध्ये भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिंदे सेनेने महायुतीचे विसर्जन करून एकमेकांसमोरच आव्हान उभे केल्याचे चित्र आहे.



चिखलदरा नगरपालिकेत दोन दिवसांपुर्वीच मोठी उलथापालथ होऊन राजकीय समीकरणे बदलली. चिखलदरा येथे भाजपकडून फटका बसूनही राष्ट्रवादी अजित पवार गटाने दर्यापुरात भाजपसोबत युती केली. दुसरीकडे, महाविकास आघाडी देखील दुभंगल्याचे दिसून आले आहे.

दर्यापूरमध्ये भाजपने राष्ट्रवादीसोबत युती केली असली, तरी शिंदे गटाने भाजपच्या विरोधात उमेदवार दिला आहे. या ठिकाणी भाजपच्या उमेदवार नलिनी भारसाकळे यांच्या विरोधात शिंदे सेनेने प्रदीप मलिये यांना उमेदवारी दिली आहे. या ठिकाणी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गट देखील रिंगणात असल्याने बहुरंगी लढतीची चिन्हे आहेत.

अंजनगाव सुर्जी नगरपालिकेतही महायुतीत फूट पडली आहे. भाजप आणि शिंदे गट हे एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. शेंदूरजनाघाटमध्ये भाजप आणि शिंदे गट समोरा समोर आले आहेत. अचलपूरमध्ये देखील भाजपसमोर शिंदे सेनेच्या उमेदवाराचे आव्हान आहे. अचलपूरमध्ये भाजपच्या रुपाली माथने यांच्या विरोधात शिंदे गटाच्या रेखा गड्रेल या रिंगणात आहेत. जिल्ह्यातील सर्वात मोठ्या नगरपालिकेत काँग्रेस, प्रहार, एमआयएम सह अपक्ष उमेदवारही रिंगणात आहे. या ठिकाणी बहुरंगी लढतीचे चित्र आहे.

चांदूरबाजार नगरपालिकेत अध्यक्षपदासाठी सात उमेदवार रिंगणात आहेत. त्यातही भाजपच्या उमेदवारासमोर राष्ट्रवादी अजित पवार गटाने आव्हान उभे केले आहे. काँग्रेस आणि प्रहारने या ठिकाणी चूरस निर्माण केली आहे.धामणगाव रेल्वे, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर या नगरपालिकांच्या नगराध्यक्षपदाची निवडणूक लक्षवेधी ठरली आहे. धामणगावात भाजपचे आमदार प्रताप अडसड यांच्या भगिनी अर्चना रोठे-अडसड या रिंगणात आहेत. अंजनगाव सुर्जीत शिवसेना ठाकरे गटाचे आमदार गजानन लवटे यांचे पुत्र यश लवटे हे उमेदवार आहेत. तर दर्यापूरमध्ये अकोटचे भाजपचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पत्नी नलिनी भारसाकळे यांच्यासमोर त्यांच्यात जाऊ काँग्रेसच्या उमेदवार मंदाकिनी भारसाकळे यांचे आव्हान आहे.

काँग्रेस आणि भाजपमध्ये प्रमुख सामना असला, तरी काही ठिकाणी शिवसेना ठाकरे आणि शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार आणि शरद पवार गट तसेच आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार पक्षाचाही प्रभाव असल्याने ही निवडणूक रंगतदार बनली आहे. धामणगावात भाजप आणि काँग्रेसमध्ये थेट लढत होणार आहे. चिखलदरा येथे तिरंगी लढत आहे.

## बहुयामी व्यक्तिमत्व अतुल कोल्हे



**औ**षधक्षेत्रातील पारदर्शकता आणि युवा प्रेरणा या तिन्ही भूमिकांचा संगम घडवणारे नाव म्हणजे अतुल कोल्हे. साध्या पार्श्वभूमीवरून पुढे आलेल्या या व्यक्तिमत्त्वाने गेल्या दोन दशकांपासून 'जनतेसाठी, जनतेसोबत' या भावनेने काम करत, आपल्या कार्याची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.विद्यार्थी दशेतूनच संघर्षाशी सामना करत त्यांनी विज्ञान शाखेतील पदवी आणि एमबीएचे शिक्षण पूर्ण केले. बारा वर्षांच्या नोकरीनंतर, २००२ मध्ये औषध व्यवसायात पाऊल ठेवून त्यांनी जनआधार औषधी सेवा प्रा. लि. ची स्थापना केली. उद्देश स्पष्ट होता,सामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात गुणवत्तापूर्ण औषधे उपलब्ध करून देणे. आज त्यांच्या या उपक्रमामुळे विदर्भातील हजारो रुग्णांना आर्थिक दिलासा मिळत असून, आरोग्य-जागरूकतेची एक सशक्त चळवळ निर्माण झाली आहे.

युवकांमध्ये व्यवसायिक दृष्टिकोन आणि स्वयंरोजगाराची भावना जागृत करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. जनरिक औषधांच्या फ्रँचायझीच्या माध्यमातून अनेक तरुण आज उद्योजक बनले आहेत. 'स्वत: उभे राहा आणि इतरांनाही उभे करा' हा त्यांचा मंत्र विदर्भातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.सामाजिक क्षेत्रातही अतुल कोल्हे यांचे योगदान उल्लेखनीय आहे. रोटरी क्लबचे पूर्व अध्यक्ष आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे उपजिल्हापाल म्हणून त्यांनी आरोग्य शिबिरे, रक्तदान उपक्रम, शैक्षणिक मदत, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण जनजागृती यांसारख्या अनेक प्रकल्पांना दिशा दिली. शाळा कॉलेजमध्ये दिली जाणारी त्यांची प्रेरणादायी व्याख्याने विद्यार्थ्यांना नीती, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देतात.

या संपूर्ण प्रवासात त्यांची पत्नी पूजा कोल्हे यांनी निभावलेली साथ अत्यंत मोलाची आहे. घर, व्यवसाय आणि सामाजिक कार्य या तिन्ही स्तरांवर त्यांनी अतुल कोल्हे यांना दिलेला पाठिंबा अनेक महिला उद्योजिकांसाठी प्रेरणादायी ठरतो. स्वतः अतुल कोल्हे हेही आपल्या यशाचे श्रेय आई अरुणा कोल्हे व वडील हरिभाऊ कोल्हे यांच्या संस्कारांना देतात.कोविडसारख्या कठीण काळातही सेवा थांबवणारे ते नव्हते. रुग्णालयांना सहाय्य, औषध पुरवठा अखंड ठेवणे आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पुढाकार घेणे यातून त्यांनी सेवा म्हणजे कार्य नव्हे, साधना आहे हे सिद्ध केले.आज विदर्भात जनरिक औषधांची चर्चा झाली की सर्वप्रथम आठवण येते ते नाव अतुल कोल्हे. त्यांच्या कार्यात व्यावसायिकता, सामाजिक बांधिलकी आणि मानवतावादी दृष्टिकोनाचा सुंदर मिलाफ दिसून येतो.

जनआधार औषधी ते जनसेवा हा त्यांचा प्रवास केवळ एका उद्योजकाचा नाही, तर एका संवेदनशील आणि कर्तव्यनिष्ठ नागरिकाचा प्रवास आहे. समाजाप्रती असलेल्या निष्ठेने आणि सेवाभावाने त्यांनी दाखवून दिले आहे की एक व्यक्ती इच्छाशक्ती, दृष्टीकोन आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर संपूर्ण समाजात परिवर्तन घडवू शकते.अशा या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाला सलाम.

**अमोल चवणे**
अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ अमरावती

## मतदानासाठी १,८४० अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त

**अमरावती/का.प्र.**

२ डिसेंबर रोजी होणाऱ्या आगामी निवडणुकीसाठा महानगरपालिका आणि नगर परिषद निवडणुकीसाठी १,८४० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये मुख्य केंद्र प्रमुखांसह तीन केंद्र प्रमुखांचा समावेश आहे. जिल्ह्यातील १० नगरपालिका आणि दोन नगर परिषदांमध्ये मतदान होणार आहे. ४१८ मतदान केंद्रे पूर्णपणे तयार करण्यात आली आहेत आणि १५५ प्रभागांमधील ३,५९,०५६ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील.

निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पडतील याची काळजी निवडणूक विभाग घेत आहे. आगामी निवडणुकीत १२ नगर परिषदा आणि २७८ सदस्यांसाठी मतदान होणार आहे.चिखलदरा नगर परिषदेत ३,०६५ सदस्य आहेत. सर्वात कमी सदस्यसंख्या असलेल्या केंद्रासाठी, मुख्य केंद्राध्यक्ष आणि सहकारी केंद्र अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक केंद्रावर चार जणांना नियुक्त केले जाईल, असे पालिकेने म्हटले आहे. निवडणूक विभागाने दिलेल्या मतदारांची सर्वाधिक संख्या अचलपूर नगरपालिकेतील ९९ हजार ६५९ आहे आणि ३ हजार ३६५ मतदाता आहे.

**नगरपालिका निहाय नियुक्ती**

दर्यापूर,केंद्र३९,कर्मचारी १७२,अंजनगाव,केंद्र५२,कर्मचारी २२८,अचलपूर केंद्र११२,कर्मचारी ४९२,मोर्शी,केंद्र४०,कर्मचारी १७६,शेंदूरजनाघाट,केंद्र२२,१६,चिखलदरा,केंद्र१०,कर्मचारी ४४,चांदूर रेल्वे,केंद्र२२,कर्मचारी ९६,चांदूर बाजार,केंद्र२१,कर्मचारी ९२,धामणगाव रेल्वे,केंद्र२१,कर्मचारी ९२,धारणी,केंद्र१७,कर्मचारी ७६,नांदगाव खंडेश्वर,केंद्र१७,कर्मचारी ७६,वरुड,केंद्र४५,कर्मचारी २००.

## नगरपरिषद,नगरपंचायत निवडणुकीत २१० बंडोबा थंडावले

### अध्यक्षपदाचे ३०तर सदस्यांचे १८० अर्जाची माघार

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील १० नगरपरिषदा व २ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी अंतिम क्षणापर्यंत २१० उमेदवारांनी अर्जाची माघार केली. यामध्ये नगराध्यक्षपदाच्या ३० तर सदस्यपदाच्या १८० उमेदवारांचा समावेश आहे. त्यामुळे निवडणूक रिंगणात नगराध्यक्षपदाचे ७७ तर सदस्यपदाचे १३२९ उमेदवार कायम आहेत. याशिवाय छाननीत अर्ज बाद झाल्याने आठ उमेदवारांनी याबाबत न्यायालयात अपील केले आहे.

अर्ज माघारीचा २१ नोव्हेंबर या अंतिम दिवशी अध्यक्षपदाचे २२ तर सदस्यपदाचे १५३ अर्जाची माघार झाली. शेवटच्या क्षणापर्यंत बंडखोरांनी ताणून धरल्याने राजकीय नेत्यांसह उमेदवारांच्या तोंडचे पाणी पळाले होते. कुठे शिष्ठाई झाली तर कुठे स्वीकृत सदस्यांचे गाजर तर कुणाला अन्य काही आश्वासन देऊन शांत बसविण्यात आले आहे. दर्यापूर, धामणगाव व शेंदूर्जना घाट पालिकेत नगराध्यक्षपदासाठी सर्व उमेदवार ठाम राहिल्याने येथे एकही अर्ज माघार झालेला नाही.

नगराध्यक्षपदासाठी चांदूरबाजार, चंदूर रेल्वे च चिखलदरा येथे प्रत्येकी १ तर नांदगाव खंडेश्वर ५, धारणी ३, वरुड २, अंजनगाव सुर्जी ४, अचलपूर ९, मोर्शी ४ तर चिखलदरा येथे १ अर्ज, याशिवाय दर्यापूर, धामणगाव व शेंदूरजना घाट येथे अध्यक्षपदासाठी एकही उमेदवारी अर्ज माघार झालेला नाही.

सदस्यपदासाठी चांदूरबाजार ४, चांदूर रेल्वे ८, नांदगाव खंडेश्वर ५, धारणी ११, धामणगाव, वरुड व दर्यापूर येथे प्रत्येकी ७, अंजनगाव सुर्जी २७, अचलपूर ७७, शेंदूरजना घाट येथे ६, मोर्शी १२ तर चिखलदरा येथे ९ उमेदवारी अर्जाची माघार घेण्यात आल्याने १३२९ उमेदवार कायम आहेत.

छाननी प्रक्रियेत उमेदवारी अर्ज बाद झाल्याने अचलपूर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर व धारणी या ठिकाणी उमेदवारांनी जिल्हा न्यायाधीश यांच्याकडे अपील दाखल केले आहे. यामध्ये नगराध्यक्षपदाच्या अर्जासाठी एक तर सात अपील हे सदस्यपदासाठी अर्ज बाद झाल्याने आहे. यावर २५ नोव्हेंबरपर्यंत निर्णय अपेक्षित आहे व त्यानंतर २६ ला चिन्ह वाटप होणार आहे.

## १८,००० मतदार २० नगरसेवक आणि एका महापौराचे ठरवेल भवितव्य

### धामणगाव नगरपरिषदेसाठी २१ मतदान केंद्रे नियुक्त

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

शहरातील २० नगरसेवक आणि एका महापौराची निवड करण्यासाठी २ डिसेंबर रोजी शहरातील २१ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. या निवडणुकीत १८,१२४ मतदार मतदानाचा हक्क बजावतील असे नगरपालिका निवडणूक अधिकारी रूपेश खंदारे यांनी सांगितले.

निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी २० नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी प्रशिक्षण पूर्ण केले आहे आणि २ डिसेंबर रोजी शहरातील २१ मतदान केंद्रांवर २० नगरसेवक आणि एका महापौराची निवड करण्यासाठी मतदान होणार आहे. या निवडणुकीत १८,१२४ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. यामध्ये ८,७९७ पुरुष, ९,३२६ महिला आणि १ अन्य मतदार यांचा समावेश आहे.

**नगर परिषद/२०२५ च्या निवडणुका नगर पंचायत**

सर्वाधिक मतदारांची संख्या, २,२३५, प्रभाग क्रमांक १० मध्ये आहे. या प्रभागासाठी तीन मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत, तर सर्वात कमी मतदारांची संख्या, १,४२५, प्रभाग क्रमांक ४ मध्ये आहे. ही माहिती नगर निवडणूक अधिकारी आणि संजय गांधी योजनेचे तहसीलदार रूपेश खंदारे आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी आणि मुख्याधिकारी पूनम कळंबा यांनी दिली.

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विनोद तलवार यांनी माघार घेतली**

नगर परिषद निवडणुकीच्या अगदी आधी, धामणगावच्या राजकारणाला अनपेक्षित धक्का बसला आहे आणि गुरुवारी, २० नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार) शहराध्यक्ष आणि माजी नगरसेवक विनोद तलवार यांनी अचानक माघार घेतल्याने शहरात व्यापक राजकीय चर्चा रंगली आहे.



**अधिक महिला मतदार**

एकूण १८,१२४ मतदार आहेत. त्यापैकी ८,७९७ पुरुष, ९,३३६ महिला आणि एक अन्य मतदार आहे. यापैकी महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा ५२९ ने जास्त आहे.

# स्व. डॉ. रमेश गोडबोले पुरस्कार आणि प्रज्ञा प्रबोधिनी

विदर्भातील सुप्रसिद्ध धन्वंतरी स्व. डॉ .रमेश गोडबोले अचानक निघून गेले. त्यांच्या दुःखद निधनाची वार्ता सर्वांसाठीच धक्कादायक होती. डॉ. गोडबोले यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रसन्न, दिलखुलास होते. नावालाच कोकणस्थ असलेले गोडबोले पक्के वऱ्हाडी होते. अतिशय फक्कड, दिलखुलास! त्यांच्या सान्निध्यात आपण एका जिगरबाज व्यक्तीमत्वाशी, मित्राशी बोलतो आहोत याची अनुभूती येत असे. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या कार्यकारणीत आम्ही सोबत होतो. ते मंडळाचे कार्याध्यक्ष होते. पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांचे विश्वासू सल्लागार होते. डॉ. गोडबोले गेले तेव्हा प्रभाकरराव म्हणाले 'आता कोणत्या डॉक्टरकडे जावं प्रश्नच आहे'. कारण रात्री- अपरात्री डॉ. गोडबोले हजर असत. डॉक्टरांना प्रभाकररावांनी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष केले तेव्हा भर सभेत त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. ते म्हणाले, 'व्यायामशाळेच्या स्विमिंग पूल च्या उद्‌घाटनाच्या वेळी मी पौरोहित्य केले होते. त्या पुरोहिताला व्यायामशाळेचे कार्याध्यक्षपद मिळेल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. मी त्यावेळी दक्षिणा घेतली नव्हती. प्रभाकररावांनी आज ही अक्षय दक्षिणा मला दिली.'

डॉक्टरांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. ते निष्णात डॉक्टर आणि सर्जन होते. बडनेरातील त्यांचे श्रीहरी हॉस्पिटल म्हणजे जीवनदान केंद्रच होते. अनेक दुर्धर आजारातील रुग्णांवर डॉक्टरांनी तिथेच उपचार केले आणि यशस्वी शस्त्रक्रियाही केल्या. त्यात श्रीहरी हॉस्पिटलचे वैशिष्ट्य म्हणजे इथे फी भरल्या न भरल्याचा कधी हिशेब नव्हता. डॉक्टरांनी कधी तो फलकावर लिहिला नाही की फीसाठी कधी उपचार अडू दिले नाहीत. पेशंट आला की त्याला धीर दे, त्याचे प्राण वाचव ही वैद्यकीय संहिता त्यांनी आयुष्यभर तंतोतंत आचरणात आणली. सर्व जाती, धर्माच्या पेशंटचे आश्रयस्थान डॉ. गोडबोले होते. 'गोडबोले डाक्टरसाहब को बताना सब ठीक हो जायेगा' असा विश्वास अजाण देणाऱ्या मोहल्यात एक पेशंट दुसऱ्या पेशंटला देत असे. डॉक्टरांनी ही विश्वासार्हता निर्माण केली होती.

डॉक्टर अष्टपैलू होते. पेशंटची नाडी बोटांनी अचूक ओळखणाऱ्या डॉक्टरांची बोटं कीर्तनातल्या विणेवर सहज संचार करीत असत. निरूपणाचा अभंग असो वा कीर्तनातील दृष्टांत डॉक्टर इतक्या तन्मयतेने सांगत की कौसल्येचे डोहाळजेवण आपणच केलं आणि रामाचा जन्म आपल्याच माजघरात झाला याचा प्रत्यय श्रोत्यांना येत असे. त्यांच्या कीर्तन शैलित प्रसन्नता होती, सहजता होती. डॉक्टरांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची त्याला जोड लाभत असे. दिलखुलासपणा आणि मनाचा उमदेपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास वैशिष्ट्य होते. साध्या चहाच्या गप्पातून डॉक्टर एखादा किस्सा असा काही सांगत की चहाची आणि मैफिलीची गोडी दुप्पट होत असे. त्यातही डॉ. विनोद कोलवाडकर आणि डॉ. गोडबोले सोबत असले तर अच्छेखाला उठू देत नसत.

डॉक्टर सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यात खूप रस घेत असत. वडिलोपार्जित राम मंदिराचा त्यांनी कायापालट केला. गाडगेबाबांच्या नावाने रक्तपेढी सुरू करून सोपानवर जबाबदारी दिली. अनेक किर्तन महोत्सवांचे आयोजन केले. वक्ता दशसहस्त्रेषु प्राचार्य राम शेवाळकरांच्या अमृत महोत्सवी सत्कार समारंभाचे ते मुख्य संयोजक होते. लॉयन्स, रोटरी या संस्थातही ते पदाधिकारी होते. मुख्य म्हणजे ते सहृदयी, संवेदनशील 'माणूस' होते. हा हाडामासाचा माणूस अनेकांसाठी देव झाला. त्यांचे देवकार्य त्यांच्या पश्चात सुरू राहण्यासाठी डॉ. विदुलाकाकू, सोपान, प्रा. मोहन काटे यांनी संकल्प केला, अमृतवक्ता श्री. विवेकजी घळसासी यांनी आणि इतर सर्व सख्यांनी साथ दिली. त्यातून 'डॉ. रमेश गोडबोले स्मृती पुरस्कार' सुरू झाला. समाजासाठी झिजणाऱ्यांना हा पुरस्कार देऊन डॉक्टरांना आदरांजली अर्पण केल्या जाते. यावर्षी अमरावतीच्या 'प्रज्ञा प्रबोधिनीला' हा पुरस्कार दिला जाणार आहे.






**प्रज्ञा प्रबोधिनी :**

'पारधी' या शब्दात उपेक्षा, अपमान, अंधश्रद्धा, दारिद्र्य, संताप, गुन्हेगारी आणि किळस या साऱ्या शब्दांचा मिलाप झाला आहे. जनावरांपेक्षाही निकृष्ट जीवन जगणाऱ्या पारध्यांचा पडाव शहराच्या पुलाखाली आपण बघतच आहोत. त्यांची आपल्याला चीडही येते आणि किळसही वाटते. पण हे निकृष्ट जगणे का ? त्याचा मागोवा कोणी घेत नाही. शेकडो वर्षे मानसिक गुलामगिरीत राहणारा भटका, विमुक्त समाज स्वातंत्र्योत्तर कालखंडातही त्याच अंधार कोठडीत चाचपडत पडला आहे. या समाजाला त्या अंधार कोठडीतून बाहेर काढणारी काही प्रकाश बेटं महाराष्ट्रात आहेत. अमरावती जिल्ह्यात 'प्रज्ञा प्रबोधिनी' हे प्रकाश बेट आहे.

पारधी समाजाच्या उत्थानासाठी आयुष्य वेचणारे गिरीश प्रभुणे असो की अमरावतीची प्रज्ञा प्रबोधिनी असो ही न संपणारी कहाणी आहे. कारण तिचा आदिकाळ जसा पुरातन आणि गडद आहे तसा तिचा अंतकाळही प्रदीर्घ आहे. परंतु या न संपणाऱ्या कहाणीला आपल्या प्रामाणिक प्रयत्नांनी सुखांताकडे नेणाऱ्या प्रज्ञा प्रबोधिनीचा बावीस - तेवीस वर्षाचा प्रवास खूप मोठा पल्ला गाठणारा आहे. राजकीय परिवर्तनाच्या तुलनेत सामाजिक परिवर्तन हे दीर्घकालीन असते. कारण त्यात सत्ताकारणाच्या प्रेरणा नसतात आणि भौतिक प्रलोभनांचे पडाव मैलो गणती दूर असतात. अडचणी, उपेक्षा, घरचं खाऊन लष्करच्या भाकरी थापण्याची तयारी आणि बंदिस्त मानसिक चौकटीतून बाहेर पडणारी समर्पणाची वृत्ती लागते. अमरावतीच्या प्रज्ञा प्रबोधिनीने सेवा, शिक्षण आणि संस्कार हे त्रिसूत्री घेऊन अमरावती जिल्ह्यातील चाळीस पारधी बेड्यांवर सुरू केलेले कामही त्या समर्पणाचे आणि सामाजिक जाणिवेचे मूर्तीमंत प्रतिक आहे. प्रारंभी जिल्ह्यातील पारधी बेड्यांची माहिती गोळा करणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे, त्यांच्या दैनंदिनीचा अभ्यास करणे, त्यांच्याशी सलगी वाढविणे अशा प्राथमिक पण आवश्यक स्वरूपाच्या कार्याला प्रारंभ करण्यात आला. प्रज्ञा प्रबोधिनीचे त्या बावीस -तेवीस वर्षातील सर्वात महत्त्वाचे यश म्हणजे या उपेक्षितांच्या अंतरंगात त्यांनी विश्वासार्हता निर्माण केली. समाजाच्या मुख्य प्रवाहाशी त्यांना जोडण्याचा भक्कम प्रयत्न केला.

शाळांना शत्रू समजणारी मुले पुस्तकाशी मैत्री करू लागली आणि उच्च शिक्षण घेऊन पदवी व पदव्युत्तर झाली आहेत. गावकुसही नशीबी नसणारी मातुम भोसले ही महिला गावची सरपंच झाली आणि आता तर अनेकांनी गावाचे नेतृत्व केले आहे. ही घटनाकारांना अपेक्षित स्वप्नपूर्तीच आहे. प्रज्ञा प्रबोधिनीच्या कार्यामुळे बायकोची इज्जत वेशीवर टांगणारा पारधी पुरुष तिच्या सन्मानाची चिंता करताना आता दिसतो. दारूच्या नशेत तर् असणाऱ्या बाया -बापड्या संस्कारांच्या वलयात आल्या आहेत. उकिरड्यावर फुसके फटाके उकसणारी पारधी मुले शिकून सवरून फटाक्याची नवी पाकीटं उकलीत आहेत. दिवाळीत शिळेपाते गावभर मागणारी पारधी माता आपल्या सन्मानाच्या चुली पेटवून गोडधोड शिजवू लागल्या आहेत. पारंपारिक सण, उत्सव साजरे केले जात आहेत. आपली इभ्रत सांभाळायला अंगभर कपडा नसणाऱ्या पारधी मुलींनी आता शाळा - महाविद्यालयांचे गणवेश अंगावर चढवले आहेत. सण उत्सव साजरे करत आहेत. पारधी मुला- मुलींसाठी वडुरा, हिंगलासपूर, धानोरा फसी, मार्डी, दिवानखेड, शेंदोळा, वाघोली या गावांमध्ये संस्कार वर्ग चालविले जातात. बचत गट निर्माण करण्यात आले आहेत. शेतीसाठी निःशुल्क बी -बियाणे, कर्ज सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांचे जीवनमान उंचावले आहे. श्री मंगल पारधी बहुउद्देशीय सेवा संस्था या संस्थेची स्थापना, स्व. नाराजी देशमुख कृषी संजीवनी योजना, माधव आरोग्य रक्षक योजना, निःशुल्क औषधोपचार आणि आरोग्य शिबिरे, रोजगार मेळावे, प्रशिक्षण कार्यक्रम अशा बहुविध अंगाने प्रज्ञा प्रबोधिनीने पारधी समाजाला भरभक्कम आधार देऊन त्यांचे आत्मभान जागविले आहे. सरस्वती आणि लक्ष्मीच्या प्रसन्नतेची ही प्रतीकं प्रज्ञा प्रबोधिनीच्या प्रयत्नांनी निर्माण झाली आहेत. उपेक्षितांना आत्मभान देणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी, १४ एप्रिल २००३ ला प्रज्ञा प्रबोधिनीची स्थापना झाली. या बावीस वर्षाच्या प्रवासात अव्याहत, निस्वार्थी आणि प्रामाणिक प्रयत्नांमुळे पारधी मुलांसाठी लोक वर्गणीतून 'विवेकानंद छात्रावास' प्रज्ञा प्रबोधिनीने निर्माण केला. या छात्रावासात आज २६ मुलं निवासी आहेत. त्यांच्या खाण्यापिण्याची, राहण्याची शिक्षणाची सर्व व्यवस्था विनामूल्य केल्या जाते. इतकेच नव्हे तर या मुलांना प्लंबिंग, इलेक्ट्रिकल व विविध रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे केल्या जाते. अमरावतीच्या बापट परिवाराने त्यांचे तीर्थरूप स्व. नीलकंठ -सुलभा बापट यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिलेल्या देणगीतून 'कर्मयोग' सभागृह आकाराला आले आहे. तिथे हे प्रशिक्षण चालते. मुलं कर्मयोगी होतात.

या मुलांचा अभ्यास घेण्यासाठी, त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी निवासी शिक्षिकेचीही व्यवस्था प्रबोधिनीने केली आहे. विवेकानंद छात्रावासातील शिस्त, स्वच्छता, दैनंदिनी, उपक्रमशीलता उपेक्षित मुलांचे भविष्य उज्वल करीत आहे. प्रज्ञा प्रबोधिनीच्या कार्याचे आणखी एक महत्त्वाचे फलित म्हणजे या उपेक्षित समाजात विश्वास, जिव्हाळा, प्रेम, आपुलकी निर्माण करून त्यांच्यातील स्त्री-पुरुषांचे नेतृत्व त्यांनी गावोगावी उभे केले आहे. हे अत्यंत कठीण कार्य आहे. त्यामुळे आपणही माणसं आहोत, आपल्यातही परिवर्तन होऊ शकते, आपली मुलेही भरारी घेऊ शकतात हा आत्मविश्वास या समाजात निर्माण होणे हे प्रज्ञा प्रबोधिनीच्या अविरत कार्याचे फलित आहे. या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने २०१८ साली फुले- शाहू- आंबेडकर पुरस्कार देऊन प्रबोधिनीला गौरविले आहे.

प्रबोधिनीचे अध्यक्ष माझे मित्र, श्री. अविनाश देशपांडे, सचिव श्री. मुकुंद पांडे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी या कार्यात स्वतःला झोकून दिले आहे. आज उभा झालेला विवेकानंद छात्रावास त्यांच्या अव्यहात प्रयत्नांचे फळ आहे. या सर्वांना सलाम!

'सेवा है यज्ञकुंड, समिधासम हम जले' या ब्रीद वाक्याप्रमाणे समाजाच्या यज्ञकुंडात आपल्या तन-मन धनाने समिधा अर्पण करणारे कर्मयोगीच 'कर्मयोग' सभागृह निर्माण करू शकतात. या यज्ञकुंडात आपल्याही चार समिधा पडल्या तर हे सेवाकुंड अधिक प्रज्वलित होईल. प्रज्ञा प्रबोधिनीच्या कार्याला मानाचा मुजरा आणि स्व. डॉ . रमेश गोडबोले यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

**- डॉ. किशोर फुले**
(९४२३१२४६०८)

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **श्री.गणेश विठोबा ठाकरे,** रा.बोडना, ता.जि.अमरावती यांनी **सौ.उज्वला अमोल अवघड** यांच्याशी खालील मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे--

**मालमत्तेचे वर्णन**

सब रजिस्ट्रार नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण विद्यमान कचेरीचे कक्षेतील व जि.प. अमरावती चे हद्दीतील मौजे-बोडणा, ता.जि.अमरावती येथील भूमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक २२८, भोगवटदार वर्ग-१,मधील एकुण सामाईक क्षेत्रफळ ७ हे.०३ आर, आकार रु.१९.३५ पै. यातील माझे पक्षकार यांच्या मालकी व ताब्यातील क्षेत्रफळ २ हे.३३ आर. अधिकारी पोट खराब ० हे.१८ आर. असे एकूण २ हे.५१ आर, आकार रु.६.७७ पै. यापैकी ० हे.८१ आर (२ एकर कोरडवाहू जमीन) यात असलेल्या झाडाझुडपासह, खोडाबारासह, माती गोट्यासह, जलपाषाणासह असून त्या शेतजमिनीची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

- पुर्वेस - सुरेश विठोबाजी ठाकरे यांचे शेत
- पश्चिमेस - गणेश विठोबाजी ठाकरे यांचे उर्वरित शेत
- उत्तरेस - प्रमोद रामभाऊ ठाकरे यांचे शेत
- दक्षिणेस - पिंपळखुटा ते बोडना रोड/रस्ता

तरी सर्व लोकांना जाहीर सुचनेनुसार कळविण्यात येते की, **सौ.उज्वला अमोल अवघड** यांना सुचित करण्यात येते की, वर वर्णन केलेली मिळकत **गणेश विठोबा ठाकरे हे** तुम्हाला विक्री करण्यास इच्छुक व तयार आहेत. त्यानुसार माझे पक्षकार दि.०५.०६.२०२५ रोजी केलेल्या ईसारचिठ्ठीनुसार खरेदी खत नोंदविण्याच्या ठरलेल्या दिवशी म्हणजेच १५.१०.२०२५ रोजी व दि.१५.१०.२०२५ रोजी केलेल्या मुदतवाढीच्या लेखानुसार दि.२१.११.२०२५ रोजी सुध्दा तयार होते व दुय्यम निबंधक कार्यालय, अमरावती येथे हजर सुध्दा होते. परंतु सौ.उज्वला अमोल अवघड या दि.२१.११.२०२५ रोजी खरेदी खत नोंदवून घेण्याकरीता जाणीवपुर्वक उपस्थित राहिल्या नाही. तरी या जाहीरनाम्याद्वारे सौ.उज्वला अमोल अवघड यांना सुचित करण्यात येते की, तुम्ही माझे पक्षकाराला खरेदीखत नोदवून घेण्याची तारीख ०७ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कळवावी. त्यानुसार माझे पक्षकार आवश्यक त्या कागदपत्रासह विद्यमान दुय्यम निबंधक कार्यालय, अमरावती येथे हजर राहतील. अन्यथा माझे पक्षकाराने तुमचेसोबत केलेला खरेदी-विक्रीचा व्यवहार रद्द होईल व अशा परिस्थितीत तुमचा कोणताही उजर राहणार नाही.

**अमरावती**
**दिनांक २०.११.२०२५**

**(ॲड.लोमेश पी.खोपे)**
मो.नं.९९६०११७१६१
द्वारा-ॲड.पी.एच.पिंपळगांवकर
**गोविंद** वैभव कॉलनी, गोंडबाबा मंदिरासमोर
एम.आय.डी.सी.रोड, अमरावती,
ता.जि.अमरावती

## संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

### -फळ पिक विम्यासाठी संत्रा उत्पादक शेतकरी आक्रमक !

**हिवरखेड/प्रतिनिधी :-** जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना २०२४-२५ विमा परतावा शेतकऱ्यांच्या खात्यात व्याजासह जमा करणेबाबत बाबत मोर्शी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष वाळके यांच्या नेतृत्वात मोर्शी तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयात ६ तास ठिय्या आंदोलन करण्यात आले.



प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारीत फळपिक विमा योजने अंतर्गत सन २०२४ - २०२५ या वर्षामध्ये आंबिया बहारामध्ये मोर्शी वरूड तालुक्यासह संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी कोट्यावधी रुपयांचा विमा हप्ता भरून फळ पिक विमा योजनेत मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला असतांना रब्बी हंगाम संपल्यावर ४५ दिवसांत परतावा जाहीर करणे क्रमप्राप्त असतांना हंगाम संपून सहा महिने लोटले तरी ट्रिगर व परतावा जाहीर करण्यात न आल्याने संत्रा बागायतदारांना फळ पिक विमा परताव्याची प्रतीक्षा आहे.

हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार कृषी विभागाने लागलेले ट्रिगर विमा कंपनीला पाठविलेले असून जिल्ह्यातील ६७ महसूल मंडळांपैकी फळ पिक विमा काढलेल्या ४७ महसूल मंडळांमध्ये ९५ ट्रिगर लागलेले असतांना सुद्धा शासन व विमा कंपनीच्या दुर्लक्षितपणामुळे जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकरी विमा मदतीपासून वंचित असल्याचा आरोप रुपेश वाळके यांनी केला.

युनिव्हर्सल सोम्पो इन्शुरन्स विमा कंपनीकडून मोर्शी वरूड तालुक्यासह अमरावती जिल्ह्यातील हजारो पात्र विमाधारक शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे फळ पिक विम्याचे कोट्यावधी रुपये वाटप करण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे नवीन २०२५- २०२६ चा हवामानावर आधारित फळ पिक विमा काढण्यासाठी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना पुन्हा कर्जबाजारी व्हावे लागणार आहे तर काही शेतकरी आंबिया बहार विम्यावर बहिष्कार टाकणार असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पिक विमा योजनेपासून वंचित राहावे लागणार आहे.

शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या, शेतकऱ्यांना विमा मदतीपासून वंचित ठेवणाऱ्या युनिव्हर्सल सोम्पो इन्शुरन्स विमा कंपनीवर कार्यवाही करून तत्काळ फळ पिक विम्याचे पैसे मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न झाल्यास बुधवार दिनांक २६ नोव्हेंबर पासून जिल्ह्यातील सर्व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांच्या तर्फे देण्यात आला. यावेळी विनोद ठोके, हितेश साबळे, अनिकेत राऊत, कांचन कुकडे, प्रकाश डागवार, दिलीप पेठे, संजय साबळे, पवन कटोलकर, श्रीराम भामकर, प्रवीण आखरे, सतीश घोरमाडे, राजेश पेठे, नामदेव चढोकर, सागर ठाकरे, सुभाष चौधरी, अरुण राऊत, नरेश चौधरी, रवींद्र गांजरे, दिनेश गांजरे, गणेश घोरमाडे यांच्यासह संत्र उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांनी महाविस्तार मोबाईल ॲपचा वापर करावा

### -विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील शेतकरी बांधवांसाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'महाविस्तार (MahaVISTAAR-AI)' हे आधुनिक मोबाईल ॲप विकसित केले असून, शेतकऱ्यांना डिजिटल सेवा एका ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी हे ॲप अत्यंत उपयुक्त आहे. शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती व विकाससंदर्भात तांत्रिक सल्ला, हवामान अंदाज आदी बाबतची माहिती या ॲपव्दारे सुलभरित्या उपलब्ध होते. यानुषंगाने शेतकरी बंधुनी महाविस्तार मोबाईल ॲपचा वापर करावे. असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

या ॲपद्वारे पिकांसंबंधी तांत्रिक सल्ला, हवामानाचा अचूक अंदाज, मृदा आरोग्यपत्रिका, खतमात्रा गणक, किड व रोग ओळख व त्यांचे व्यवस्थापन, शेती मालाचे बाजारभाव तसेच विविध कृषी शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांना सहज मिळणार आहे. स्थानिक शेतीविषयक माहितीही या ॲपमध्ये उपलब्ध करण्यात आली आहे.

महाडीबीटी प्लॅटफॉर्मला महाविस्तार ॲपशी जोडण्यात आले असून भविष्यात कृषी विभागाच्या सर्व सेवा व योजनांचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना हे एकच ॲप वापरावे लागणार आहे. त्यामुळे राज्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी हे मोबाईल ॲप डाउनलोड करून वापर करणे अत्यंत आवश्यक आहे, असे कृषी विभागाव्दारे कळविण्यात आले आहे.

ॲपमधील विविध सेवा, सुविधा, चॅटबॉटचा वापर वाढावा आणि 'महाविस्तार' ॲपचा विस्तार राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहचावा यासाठी 'महाविस्तार' मोबाईल ॲप डाऊनलोड करुन अधिकाधिक शेतकऱ्यांनी वापर करावे. असे आवाहन कृषी विभागाव्दारे करण्यात आले आहे.

## विदर्भ क्रिकेट संघटनेद्वारे १५ वर्षाखालील शालेय खेळाडूंसाठी निवड चाचणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भ क्रिकेट संघटना नागपूर द्वारा आयोजित विदर्भातील सर्व जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण विभागातील शाळेमधील प्रतिभावंत खेळाडूंचा शोध घेण्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये विदर्भ क्रिकेट संघटना तर्फे निवड चाचणी घेण्यात येणार आहे. या निवड चाचणीसाठी फक्त शाळेमधील १५ वर्षाखालील खेळाडूंसाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात येणार आहे. या निवड चाचणीसाठी नागपूर येथून विदर्भ क्रिकेट संघटनेचे निवड समितीचे सदस्य येणार आहेत. या निवड चाचणी करता कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क किंवा फी आकारण्यात येणार नाही याची नोंद जिल्ह्यातील सर्व खेळाडू व शाळांनी घ्यावी. अमरावती जिल्ह्यातील शाळेच्या प्राचार्य /मुख्याध्यापक यांना कळविण्यात येत आहे की आपल्या शाळेतील इच्छुक क्रिकेट खेळाडूंची यादी शाळेच्या लेटर पॅडवर शाळेच्या क्रीडा शिक्षकाचे नाव व त्यांचा मोबाईल क्रमांक सह खेळाडूचे नाव, जन्म तारखेसह बोनाफाईड प्रमाणपत्र सोबत जोडून श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रिकेट मैदानावर अल्लाद लोखंडे व योगेश नवाथे यांचे कडे दिनांक २५/११/२०२५ पर्यंत जमा करावी. यानंतर कोणाचेही आवेदन स्वीकारण्यात येणार नाही. निवड चाचणी खालील वयोगटातून करण्यात येईल. १५ वर्षाखालील खेळाडू १/९/२०१० नंतर जन्मलेले व ३१/८/२०१३ च्या पहिले वयोगट फक्त १२ ते १५ वर्ष वयोमर्यादा राहणार आहे. निवड चाचणीसाठी सर्व शाळांनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन विदर्भ क्रिकेट संघटना नागपूर जिल्हा समितीचे अध्यक्ष नितेश उपाध्याय,अमरावती जिल्हा क्रिकेट संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, विदर्भ क्रिकेट संघटनेचे जिल्हा संयोजक डॉ. दीनानाथ नवाथे यांनी केले आहे. निवड चाचणी दि. २९/११/२०२५ रोजी घेण्यात येईल. याकरता सर्व खेळाडूंनी सकाळी ८:४५ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रिकेट मैदानावर स्वतःच्या क्रिकेट साहित्य सोबत उपस्थित राहायचे आहे.

## जाहीर नोटीस

आमचे पक्षकाराने **राजेंद्र पांडुरंग अंबाडकर,** रा.गणेश विहार, अमरावती दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्वत्र लोकांस या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकारांचे वडील **स्व.पांडुरंग श्रावणजी अंबाडकर** यांच्या मालकीची खालील वर्णनाची मालमत्ता आहे.

**मिळकतीचे वर्णन -** गणेश विहार सह.गृहनिर्माण संस्था लिमि.(२) अमरावती महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात भूमापन क्र.५१/२/९, वार्ड क्र.६७(डी-१), मालमत्ता क्र.४९६ हे घर असून ते प्रत्यक्ष आमचे पक्षकाराचे ताब्यात व वापरात आहे. सदरहू मालमत्ता ही आमचे पक्षकाराचे वडीलांचे मृत्यूनंतर आमचे पक्षकाराचे आई, तीन बहिणी, एक भाऊ व माझे पक्षकार यांची सामाईक मालकीची झालेली आहे. परंतु आम्हा वारसांपैकी कोणीतरी या घराचा सौदा करणार असल्याचे समजल्यावरुन ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

या मालमत्तेचे अद्यापपर्यंत वाटणीपत्र झालेले नसून वारसांचे प्रमाणपत्र सुध्दा प्राप्त करण्यात आलेले नाही. करीता या मालमत्तेचा कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री, गहाण, लीज, इत्यादी व्यवहार करु नये. असा कोणताही व्यवहार केल्यास तो आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अमरावती
दि.२२.११.२०२५

**(ॲड.चंद्रशेखर डोरले)**
अंबागेटचे आत, अमरावती
मो.नं.९३७०१५४५१९,
८३२९२२९१४९

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.७००/२०२५ ने.ता.२३.१२.२०२५

**अर्जदार -** १. श्री.धनराज बकाराम दोड, वय ४९ वर्षे, धंदा - शेती
२. देवेंद्र धनराज दोड, वय २१ वर्षे, धंदा - शिक्षण
३. प्रथमेश धनराज दोड, वय १९ वर्षे, धंदा - शिक्षण
सर्व रा.सिंभोरा, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार-निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ची पत्नी तर अर्जदार नं.२ व ३ ची आई नामे **वंदना धनराज दोड** ही दिनांक **०८.०९.२०२२** रोजी, **सिंभोरा,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १८.१२.२०२४ (शिक्का)

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६०१/२०२५
**अरुणा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२३.१२.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Aruna Sureshrao Gadhave, Age 65 Yrs. Occu.: Household R/o Hanuman Mandir, Samor Near Datta Treders, Ravi Nagar, H.V.P.M. Amravati
2. Manjushri Rahul Gaikwad, Age 42 Yrs. Occu.: Household R/o Near Hanuman Mandir, Ravi Nagar, Ukali, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुरेश वामनरावजी गाढवे** हे दिनांक 25.11.2014 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अरुणा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अरुणा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २०.११.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## निविदा

**विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती या ईमारतीच्या दुरुस्तीकरीता/डागडुजीचे काम करण्याकरीता पात्र कंत्राटदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| **कामाचे स्वरुप -** | मागील बाजूस टाईल्स बसविणे आणि ईतर डागडुजीचे काम/दुरस्ती करणेबाबत |
| **कामाची अंदाजित रक्कम** | रु.५,१०,०००/- |

**टिप -** कंत्राटदाराने पात्रता व अनुभवाचे दाखले जोडून काम मागणीचा अर्ज स्वहस्ताक्षरात मर्यादा कोटेशनसह दि.२८ नोव्हेंबर २०२५ रोजी, बंद पाकिटात कार्यालय, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती, सहकार संकूल, कांता नगर, अमरावती येथे सकाळी ११.०० ते ३.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

**दिनांक २०.११.२०२५**

**अध्यक्ष,**
**सहकार कल्याण निधी उपसमिती तथा**
**विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,**
**अमरावती**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ७६
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अकोल्यातील 'दुफळी' संपविण्याचा शिंदे सेनेचा डाव

## कॅप्टन अडसूळ यांच्याकडे अकोल्याची सूत्रे तर बाजोरियांना भंडा-याची जबाबदारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

*आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची चाहूल लागत असतानाच शिंदे गटाने राज्यातील ४० जिल्ह्यांसाठी संपर्क प्रमुखांची नवीन फेररचना जाहीर केली आहे. अकोला जिल्हा संपर्क प्रमुखपदी कॅप्टन अभिजीत अडसूळ यांची नियुक्ती हा या फेरबदलातील सर्वात महत्त्वाचा निर्णय ठरला आहे. तर आतापर्यंत अकोला जिल्ह्याची धुरा सांभाळणारे गोपीकिशन बाजोरिया यांना थेट भंडारा जिल्ह्याची जबाबदारी देण्यात आली आहे. हा निर्णय केवळ नियमित नेमणुकीपुरता मर्यादित नसून, गेल्या अनेक महिन्यांपासून अकोल्यातील शिंदे सेनेत उफाळून आलेल्या अंतर्गत संघर्षावर पक्षश्रेष्ठींनी आखलेला 'फायनल स्ट्रोक' असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.*





अकोल्यात शिंदे सेनेच्या जिल्हा संघटनेत गेल्या काही महिन्यांपासून खुलेपणाने गट-तट तयार झाले होते. संपर्क प्रमुख गोपीकिशन बाजोरिया यांच्या कार्यशैलीवरून असंतोष उसळला होता. पक्ष निधीतील गैरवाटप, पदाधिकाऱ्यांवरील सावत्र वागणूक, स्थानिक पदाधिकारी वर्गाला विश्वासात न घेता दिल्या जाणाऱ्या नियुक्त्या, तसेच विरोधी गटांशी असलेले मधुर संबंध — या सर्व मुद्द्यांचा पाढाच पक्ष प्रमुख एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या समोर अनेक पदाधिकाऱ्यांनी वाचला होता.

हा रोष इतका वाढला की काही पदाधिकाऱ्यांनी 'बाजोरिया हटाव, पार्टी बचाव' असा नारा देत सार्वजनिक सभा घेतली, बंड पुकारले आणि त्यांच्या प्रतिमादहनापर्यंत प्रकरण पोहोचले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाताना दिसत असल्याने पक्षातील ज्येष्ठांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला, परंतु मतभेद इतके खोलवर गेले होते की समाधानकारक तोडगा निघणे कठीणच ठरत होते.

अकोल्यातील या अंतर्गत कलहामुळे संघटनात्मक कामकाज ढेपाळू लागले होते. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा कलह पक्षाला महागात पडू शकतो, या पार्श्वभूमीवर काही पदाधिकाऱ्यांनी बाजोरिया यांच्याशी समेटाचा प्रयत्न केला होता. परंतु संघर्षाचे वटवृक्ष एवढे रुजले होते की केवळ 'समजावून सांगा' पद्धतीने प्रश्न सुटणे शक्य नव्हते. याच पार्श्वभूमीवर शनिवारी जाहीर झालेल्या जिल्हा संपर्क प्रमुखांच्या यादीत बाजोरिया यांना अकोल्यातून भंडाऱ्यात हलविण्यात आले, तर अकोल्याची धुरा कॅप्टन अभिजीत अडसूळ यांच्याकडे सोपविण्यात आली. हा निर्णय म्हणजे 'दूधात बुडालेला काटा काढणे' असा विश्लेषकांचा सूर आहे.

कॅप्टन अभिजीत अडसूळ हे पक्षातील सौम्य, समन्वयक व संघटनात्मक दृष्ट्या शिस्तप्रिय नेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे अकोला जिल्ह्यातील भांडणाऱ्या गटांना एकत्र आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर मोठी असेल. नियुक्त्यांचे पत्र येताच काही स्थानिक पदाधिकाऱ्यांनी 'अखेर न्याय झाला' अशा भावना व्यक्त करत खाजगीत आनंदोत्सव साजरा केल्याची चर्चा देखील राजकीय वर्तुळात होत आहे.

**शिंदे सेनेची रणनीती – 'गोंधळाला पूर्णविराम' की 'नव्या संघर्षाची सुरूवात'?**

बाजोरिया यांना भंडाऱ्यात पाचारण करण्याचा निर्णय हा 'अकोला शांत करा' या धोरणाचा भाग आहे की 'नव्या समीकरणांची चाचणी' हे येणारे दिवसच सांगतील. पण एक गोष्ट स्पष्ट आहे अकोल्यातील शिंदे सेनेचा अंतर्गत संघर्ष हा निवडणूक वेळी पक्षासाठी गंभीर डोकेदुखी ठरू शकत होता. अडसूळ यांच्या नियुक्तीमुळे या संघर्षावर पडदा पडून संघटन पुन्हा उभारी घेईल का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

## डवले कॉलेजचा विद्यार्थी शाश्वत ठाकरे ठरला इन्स्पायर अवॉर्डचा मानकरी

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला डवले कॉलेजचा वर्ग ११ वीचा विद्यार्थी शाश्वत शांताराम ठाकरे या बाल वैज्ञानिक विद्यार्थ्याने जिल्हास्तरीय इन्स्पायर अवॉर्ड विज्ञान प्रदर्शनीत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. शाश्वत ठाकरे या विद्यार्थ्याच्या विज्ञान प्रतिकृती ची निवड ही राज्यस्तरावर होणाऱ्या विज्ञान प्रदर्शनीसाठी झालेली आहे. अकरावी शिकणाऱ्या शाश्वत ठाकरे याने एक्सीडेंट डिटेक्शन अँड नोटिफिकेशन सिस्टीम नावाचे नाविन्यपूर्ण मॉडेल सादर केले. त्याच्या या मॉडेलची निवड भंडारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शना साठी झालेली आहे.



सत्र २०२३- २४ मधील या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत एकूण ८२ वैज्ञानिकांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी फक्त सहा प्रतिकृतींची निवड ही राज्यस्तरावर झालेली आहे. अकोला येथे आयोजित जिल्हास्तरीय इन्स्पायर अवॉर्ड प्रदर्शनीत विद्यालयांचा सहभाग होता. हे मॉडेल अधिक उत्कृष्ट बनवण्यासाठी त्याला होली क्रॉस कॉन्व्हेंटचे भाटिया सर यांचे मार्गदर्शन मिळाले. त्याच्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश डवले, संस्थेच्या संचालिका मृणालिनी डवले यांनी त्याचे अभिनंदन केले. यावेळी प्रा. प्राची घीनमीने, प्रा. कविता बलिंगे, प्रा. वैशाली निवाने, प्रा. श्वेता तायडे, प्रा. दिपाली चिकटे, प्रा. वररुची खेडकर, प्रा. रजनी पांडे , प्रा. स्वाती बोरोडे, प्रा. श्रद्धा देशपांडे, प्रा. इतिका दुबे, प्रा. पारिजात पुनसे, सागर लोखंडे, श्याम सुलताने, किशोर स्वर्गे व शिक्षक, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिकस्पर्धा रब्बी हंगाम २०२५

**अकोला :** राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतक-यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतक-यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छा मनोबलामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यायावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल.

यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतक-यांचे योगदान मिळेल, तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर शेतक-यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

## हिवरखेड नगर परिषद निवडणुकीत रंगणार जोरदार मुकाबला!

### जनसेवेच्या नावाखाली दलबदलूंचा आटा–पिटा; १०६ उमेदवार रिंगणात

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

हिवरखेड नगर परिषद स्थापन झाल्यानंतर होणाऱ्या पहिल्याच निवडणुकीत चुरशीची लढत रंगणार आहे. नामांकन अर्ज परत घेण्याची मुदत संपताच नगराध्यक्ष पदासाठी ७ आणि नगरसेवक पदासाठी तब्बल ९९ असे मिळून १०६ उमेदवारांनी अंतिम रणांगण गाठले आहे. त्यामुळे हिवरखेडमध्ये राजकीय तापमान चांगलेच वाढले असून जोरदार सामना रंगण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

नगराध्यक्ष पद ओबीसी महिला राखीव घोषित झाल्याने अनेक पुरुष इच्छुकांची स्वप्ने धुळीला मिळाली. मात्र महिलांनी पुढाकार घेत सर्वच प्रमुख पक्षांतून जोरदार दावेदारी समोर आली आहे. काँग्रेसच्या सुनंदाताई सुरेश गिऱ्हे, भाजपच्या सुलभाताई रमेश दुतोंडे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तर्फे कु. आचल सुरेश ओंकारे, प्रहार–शिंदेगट युतीतर्फे शोभाताई मधुकर घुंगड, वंचित



बहुजन आघाडीतर्फे कल्पना सुनील अस्वार, तसेच अपक्ष उमेदवार म्हणून साबिया अंजुम नसीम सौदागर व सुनंदा रमेश भड या सातही महिला उमेदवारांनी नगराध्यक्षपदासाठी रंगात प्रवेश केला आहे.

नगरसेवक पदासाठी २० जागा असून त्यापैकी १० महिला राखीव आहेत. या जागांसाठी तब्बल ९९ उमेदवार उभे राहताच प्रत्येक प्रभागात बहुकोणी लढतीचे चित्र अधिकच स्पष्ट झाले आहे. नगराध्यक्ष आणि नगरसेवक मिळून एकूण २१ जागांसाठी १०६ उमेदवार असल्याने हिवरखेडच्या निवडणुकीत प्रचंड रंगत निर्माण झाली आहे. अखेर कोण बाजी मारते आणि उदयास येणाऱ्या पहिल्या नगरपरिषदेत कोण सत्ताधीश बनते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या संपूर्ण निवडणुकीत दलबदलूंच्या हालचालींनी वेगळेच वारे वाहू लागले असून नागरिकांची अक्षरशः दमछाक होत आहे. विविध पक्षांनी अनेक इच्छुकांना उमेदवारी नाकारल्याने नाराजांचे प्रमाण वाढले आणि त्यातूनच मोठ्या प्रमाणावर दलबदल सुरू झाला. 'जनसेवा' हे कारण पुढे करत नेतेमंडळी एका पक्षातून दुसऱ्या गटात धाव घेताना दिसत आहेत. त्यांच्या बॅनर्सवरील बदलत्या प्रतीकांमुळे नागरिक गोंधळून जात असून 'हा आता कुठल्या पक्षात आहे?' असा प्रश्न सर्वांना पडत आहे. दलबदलू नेत्यांनी 'जे काही होईल, पण आम्ही जनतेची सेवा करणारच' असा सूर लावला असला, तरी त्यांच्या हालचालींमागे वैयक्तिक स्वार्थ आहे की खरी जनतेची तळमळ हे समजून घेण्याचा प्रयत्न मतदार करत आहेत. वाढत्या दलबदलामुळे राजकीय समीकरणे गुंतागुंतीची बनली असून अंतिम मतदानापर्यंत हे चित्र आणखी रंगतदार होण्याची दाट शक्यता आहे. हिवरखेडमध्ये पहिल्याच निवडणुकीत अशी रंगतदार राजकीय लढत पाहायला मिळत असल्याने स्थानिकांचे लक्ष आता पूर्णपणे निकालाकडे वळले आहे.

## दोन दिवसीय कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

नुकतेच अत्याधुनिक एंडोस्कोपी वर एका महत्त्वपूर्ण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाने गॅस्ट्रिक कॅन्सरचे लवकर निदान करण्यासाठी प्रगत एंडोस्कोपिक तंत्रज्ञानाची परिवर्तनशील क्षमता अधोरेखित केली. जागतिक स्तरावर गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी व एंडोस्कोपी क्षेत्रातील अग्रणी मानले जाणारे डॉ. केन्शी याओ या कार्यशाळेत उपस्थित होते. ही ऐतिहासिक कार्यशाळा डॉ. सौरभ मुकेवार, तसेच डेमॉन्स्ट्रेटर डॉ. शुभंकर गोडबोले , डॉ. भूषण भावरे (कन्सल्टंट – गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी) यांच्या प्रयत्नांनी आणि डायरेक्टर अँड चीफ ऑफ युनिट डॉ. श्रीकांत मुकेवार यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली.

**सार्वजनिक सूचना**

मी AMAR DADARAO WARTHE हे जाहीर करतो की माझे नाव चुकीने AMAR DADARAO WARATHE असे नोंदविण्यात/मुद्रित करण्यात आले आहे.

माझे योग्य नाव AMAR DADARAO WARTHE आहे. पुढे सर्व ठिकाणी मला AMAR DADARAO WARTHE या नावाने ओळखण्यात यावे.

## मूंगीलाल बाजोरिया विद्यालयाचा 'माजी विद्यार्थी स्नेह संमेलना'ची तयारी सुरू



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात आपल्या शैक्षणिक कारकिर्दीने इतिहास घडविणाऱ्या मूंगीलाल बाजोरिया विद्यालयाच्या माजी विद्यार्थी स्नेह संमेलनाची जोरदार तयारी विद्यालयाच्या माजी विद्यार्थी कार्यकारिणी समितीच्या वतीने सुरू करण्यात आली आहे. नववर्षात दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी मुंगीलाल बाजोरिया विद्यालयांच्या सभागृहात हे आयोजन होत असून यात सन १९४९ च्या पहिल्या बॅच पासून ते मागील वर्षापर्यंतच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे या कार्यक्रमात स्वागत होणार आहे. माजी विद्यार्थी समिती कार्यकारिणीत विविध बॅच मधील ४० माजी विद्यार्थी समाविष्ट करण्यात आले आहेत. विद्यालयाचे माजी विद्यार्थी व माजी आ गोपीकिसन बाजोरिया यांच्या अध्यक्षतेत यावर्षीचे हे भव्यदिव्य स्नेह संमेलन पार पडणार आहे. यावर्षी सुमारे पाचशे माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा समितीचा मानस असून या स्नेह संमेलनात बालपणीच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी ५५ प्रकारचे बालपणीचे खाद्यपदार्थ असलेले स्टॉल्स तसेच बालपणातील खेळ व रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम व विद्यालयातील सर्व शिक्षकवर्गाचा सन्मान करण्यात येणार आहे. या एकदिवसीय सोहळ्यात बाहेरगावाहून येणाऱ्या माजी विद्यार्थ्यांसाठी निवासाची सोय देखील करण्यात येणार आहे. या स्नेह संमेलन सोहळ्याच्या सफलतेसाठी विविध विद्यार्थी समित्या गठीत करण्यात येणार आहेत.

## प्रा. संतोष कुटे क्लासेस तर्फे मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी नोंदणी सुरू

### SC, ST, OBC विद्यार्थ्यांसाठी BARTI, ARTI, TRTI महाज्योतीच्या माध्यमातून शासकीय शिष्यवृत्ती व मोफत मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रा. संतोष कुटे क्लासेस, अकोला यांच्या मार्फत SC विद्यार्थ्यांसाठी BARTI, मातंग समाजासाठी ARTI, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी TRTI तसेच OBC विद्यार्थ्यांसाठी महाज्योती या शासकीय संस्थांच्या माध्यमातून पोलीस, आर्मी भरती, बँकिंग, कॉम्बाईन तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठी मोफत प्रशिक्षण व शिष्यवृत्तीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत तिसऱ्या बॅचसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून १०वी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना दरमहा १०,००० रुपये विद्या–वेतन बँक खात्यात जमा होणार असून सहा महिन्यांच्या कालावधीत एकूण ६०,००० रुपयांचे



विद्यावेतन मिळणार आहे. त्याचबरोबर १२,००० रुपये पुस्तकांसाठी आणि ५,००० रुपये कपड्यांसाठी स्वतंत्र अनुदान विद्यार्थ्यांना देण्यात येईल. फॉर्म भरणे, परीक्षेचे स्वरूप, पेपर पॅटर्न आणि अभ्यासाची दिशा या सर्व बाबींवर विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शन दिले जाणार आहे. पोलीस आणि आर्मी भरती इच्छुकांसाठी स्वतंत्र शारीरिक प्रशिक्षणाची सुविधाही उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी प्रा. संतोष कुटे क्लासेस, डॉ. दीपक मोरे हॉस्पिटल मागे, राम नगर, अकोला येथे प्रत्यक्ष भेट देऊन किंवा ९८५०३९८०८७ या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करावी, असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे. सदर योजनेच्या माहिती संदर्भात दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ ला सकाळी १० वाजेपासून मार्गदर्शन कार्यशाळेचे प्रा संतोष कुटे क्लासेस रामनगर येथे आयोजन करण्यात आले आहे विद्यार्थ्यांनी सदर मार्गदर्शन कार्यशाळेच्या लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

## थकित करापोटी पश्चिम झोन येथील मालमत्तावर सीलची कारवाई



■ प्रतिनिधी | अकोला ■

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त विजय पारतवार आणि सहा. आयुक्त गजानन घोंगे यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पश्चिम झोन अंतर्गत रामपीर नगर, खैर मोहम्मद प्लॉट येथील वार्ड क्रं. बी -१० मालमत्ता क्रं. ७०३, शेख चांद शेख इब्राहिम यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये २,४४,३२६/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या मलमत्तावर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईत सहा. कर अधिक्षक राजेश जाधव, कर वसुली लिपिक इकबाल हुसैन, प्रकाश मालगे, सै. अजहर आदींची उपस्थिती होती.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांनी आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून सील, जप्ती व लीलाव सारख्या अप्रीय कारवाई टाळावे असे आवाहन मनपा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे.

## लायन्स सफायरची चित्रकला स्पर्धा संपन्न

**अकोला :** जागतिक बाल दिनावावर मुलांमध्यील छंद जोपासण्याच्या दृष्टीने लायन्सं क्लब अकोला सफायर व क्रीम स्टोन आईस्क्रीम पार्लरच्या संयुक्त विद्यमाने बालकांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

## कै. काकासाहेब ठोंबरे स्मृती सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने दोन दिवसीय व्याख्यानमाला

■ प्रतिनिधी | अकोला ■

वाचकांच्या बौद्धिक विकासासाठी अनेक उपक्रम राबविणाऱ्या स्थानिक कै काकासाहेब ठोंबरे स्मृती सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने वाचनालयाच्या संस्थापिका स्व बेबीताई हरिदास यांच्या स्मृती प्रित्यर्थ दोन दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. २९ व ३० नोव्हेंबर रोजी सायं ६ वाजता जठारपेठ रोडवरील रा.तो. आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या दोन दिवशीय व्याख्यान मालेत प्रख्यात लेखिका, बहुभाषिक समीक्षक, संस्कृत व अध्यात्मिक तज्ञ डॉ. धनश्री लेले या विविध विषयावर व्याख्यान सादर करणार आहेत. शनिवार दि २९ नोव्हेंबर रोजी साय ६ वाजता अविनाश देव यांच्या अध्यक्षतेत आयोजित या व्याख्याना च्या प्रथम पुष्पात डॉ. लेले या ज्ञानेश्वरीतील कर्मयोग या विषयावर व्याख्यान



सादर करणार आहेत. तर रविवार दिनांक ३० नोव्हेंबर रोजी सौ. केतकी किशोर देशपांडे यांच्या अध्यक्षतेत आयोजित द्वितीय पुष्पात त्या अध्यात्म म्हणजे नेमके काय या विषयावर संबोधित करणार आहेत. सर्वांसाठी मोफत असणाऱ्या या दोन दिवशीय व्याख्यानाचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष डॉ. किशोर पिंपरकर, उपाध्यक्ष अरुणराव समर्थ, डॉ. राजेंद्र मेंडकी, सौ मोहनी मोडक, सौ मंजिरी ठोसर, सदस्य श्रीमती विजयाताई ठोसर, कमलाकर कुलकर्णी, राजू सांगवीकर, गुंजन लांडगे समवेत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले.

## विटेक्स– २०२६ च्या व्यापार व औद्योगिक प्रदर्शनीची जय्यत तयारी सुरू

■ प्रतिनिधी | अकोला ■

विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, अकोलाच्या वतीने व्यापारी, उद्योजकांच्या नवउत्पादनाला स्थान मिळण्यासाठी दि २ जानेवारी ते ५ जानेवारी २०२६ दरम्यान स्थानीय गोरक्षण संस्थांनच्या मैदानात आयोजित विदर्भ इंडस्ट्रीज अँड ट्रेड एक्सपो अर्थात विटेक्स–२०२६ प्रदर्शनीची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. पश्चिम विदर्भातील व्यापार, उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी चेंबर चे हे द्वितीय आयोजन असून गतवर्षीच्या सफल आयोजना नंतर हे चार दिवसीय आयोजन करण्यात आले आहे. गोरक्षण संस्थांनच्या विशाल प्रांगणात आयोजित या प्रदर्शनीत औद्योगिक, कृषी व गृहपयोगी विविध साहित्या सह लज्जतदार फूड झोन मिळून १९० स्टॉल उभारण्यात येत असून या स्टॉलच्या नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गतवर्षी प्रमाणे या वर्षी या चार दिवसीय प्रदर्शनीत दीड लाखांच्या वर नागरिक व उद्योग व्यापार क्षेत्रातील मान्यवर भेटी देणार असल्याची आशा व्यक्त होत असून यात विविध औद्योगिक, रिअल इस्टेट, होम डेकोर, मशनरी, ॲग्रो उत्पादने, बँकिंग, वित्तीय सेवा, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल, लाइफटाइल, स्टार्टअप व सेवा क्षेत्रातील ख्यात नाम प्रतिष्ठानचे स्टॉल्स सेवेसाठी उपलब्ध होणार आहेत. या चार दिवसीय औद्योगिक प्रदर्शनीत औद्योगिक तज्ञ, खरेदीदार, वितरक, व्यापारी, उद्योजक यांचा थेट संवाद राहणार असून अनेक ज्ञानवर्धक व प्रबोधनात्मक तांत्रिक सेमिनार, पॅनल चर्चासत्रे व व्यापार नेटवर्किंग होणार आहे. नव्या विश्वाच्या नव्या दालनात पोहचण्यासाठी ही आगळीवेगळी प्रदर्शनी प्रभावी ठरणार असून व्यापारी, उद्योजक व नवीन प्रतिष्ठानच्या ब्रँडची प्रतिष्ठा व विश्वास वाढविण्यासाठी या प्रदर्शनीच्या माध्यमातून सुवर्णसंधी उपलब्ध करण्यात आली आहे. आपल्या व्यवसायाच्या नवनिर्मितीचा प्रारंभ या प्रदर्शनीच्या माध्यमातून करावा असे आवाहन करण्यात आले आहे. विदर्भ चेंबरचे माजी अध्यक्ष अशोक दालमिया, अशोक गुप्ता, वसंत बाछुका, रमाकांत खेतान, विक्रमादित्य गोयनका, श्रीकिशन अग्रवाल, रुपेश राठी, सज्जन अग्रवाल, सलीम डोडिया, संतोष छाजेड, सौ. दीपाली देशपांडे, सौ. रजनी महल्ले, शांतीलाल भाला, शैलेंद्र कागलीवाल, श्रीकांत गोयनका, हरिश लाखानी, योगेश अग्रवाल दीपक वाटमारे, बार्शीटाकळी, बिपिन गांधी, खामगाव, दिनेश पालडिवाल, शेगाव, अविन अग्रवाल, मुर्तिजापूर, नितीन भारुका, मुर्तिजापूर, महेंद्र तरडेजा, अकोट, निखिल अग्रवाल, अकोटअमरीश पारेख, इंजि अनुराग अग्रवाल, सीए प्रशांत लोहिया, आनंद अग्रवाल डऔरा, हिमांशू खंडेलवाल, रमेश कदम, केतन गुप्ता, मनोज अग्रवाल, पियुष खंडेलवाल, ओम अग्रवाल, प्रतीक अग्रवाल, प्रणय कोठारी, रितिक अग्रवाल आदी पदाधिकारी मेहनत घेत आहेत.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३५२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# बंडखोरांच्या घरी बावनकुळे यांना चहा पिण्याची आली वेळ

## बंडखोरी संपली, प्रशांत बुरले माघारी : बावनकुळे यांची मनधरणी मोहीम यशस्वी

**वर्धा/ रवींद्र लाखे**

वर्धा नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारणाची तापमान पातळी चांगलीच वाढली आहे. भाजपमध्ये उसळलेल्या बंडखोरीमुळे 'शिस्तबद्ध पक्ष' असे समजले जाणारे पक्षचित्र पूर्णपणे ढासळल्याचे दृश्य वर्ध्यात निर्माण झाले होते. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीवरून कार्यकर्ते एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले होते, तर वरिष्ठ नेतृत्वावर नाराजीचा सूर चांगलेच तीव्र झाला होता.



स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जाहीर होताच अनेक इच्छुक पुढे येणार हे अपेक्षित होते, मात्र पक्षाच्या अधिकृत उमेदवारीला विरोध करून थेट बंडाचे बिगुल वाजवणारे प्रशांत बुरले हे यंदाचे 'राजकीय केंद्रबिंदू' ठरले. या बंडामुळे पक्षश्रेष्ठींचे नागपूर-मुंबई-वर्धा धावे सुरू झाल्या. परिस्थिती एवढी चिघळली की, महाराष्ट्राचे प्रभारी आणि कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना स्वतः वर्ध्यात दाखल होऊन 'मनधरणी मोहीम' राबवावी लागली.

**बावनकुळ्यांचा 'घरपोच चहा' आणि राजकीय संदेश**

मनधरणी इथेच थांबली नाही. बैठक संपल्यानंतर कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे स्वतः प्रशांत बुरले यांच्या घरी गेले आणि चहा घेतला. यामुळे राजकारणाच्या बड्या खेळाडूंनी छोट्या कार्यकर्त्यांही महत्त्वाच्या असतात, याचा संदेश दिल्याचे चित्र तयार झाले. चहा निमित्त कानमंत्र? की भविष्यातील राजकीय समीकरणांची बीजे? अशी चर्चा सध्या शहरात रंगू लागली आहे.

### हेरिटेजमधील बैठक आणि राजकीय नाट्य

शहरातील हेरिटेज हॉलमध्ये झालेली बैठक तशी 'सामान्य मीटिंग' नव्हती. ही बैठक म्हणजे बंडखोरी विझवण्याची कार्यवाही होती. अनेक नाराज कार्यकर्ते, काही मानलेले तर काही अजूनही असंतुष्ट अशा वातावरणात अखेर प्रशांत बुरले यांनी आपला अर्ज मागे घेतल्याची घोषणा केली. त्याच क्षणी वातावरणात विरघळलेली शांतता आणि समाधानाचा निश्वास यातून ही बैठक यशस्वी ठरल्याचे स्पष्ट झाले.

**मतपेटी अंतिम निकाल देणार**

भाजपमध्ये आग विझली असली तरी तिची राख निवडणुकीच्या निकालानंतर पुन्हा धगधगते का? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

कारण बुरले यांनी अर्ज मागे घेतला असला तरी त्यांच्या समर्थकांचा रोष निवडणूक यंत्रणेला किती साथ देईल याबाबत साशंकता आहे.

वर्धा नगरपरिषद निवडणूक ही केवळ मतदान प्रक्रिया नसून पक्षांतर्गत 'सत्ता विरुद्ध स्वाभिमान' याची लढत ठरली आहे. आता सगळ्यांचे लक्ष जनतेवर आणि मतपेटीवर. कारण बंड थांबतं, पण त्याचा परिणाम मतांमध्ये दिसतो.

# अस्वलीच्या हल्ल्यात तिघे जखमी

## हेटिकुंडी येथील घटना : गाव परिसरात भीतीचे वातावरण

**कारंजा(घा.)/जनमाध्यम**

तालुक्यातील हेटीकुंडी येथे गुरूवार २० रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास अस्वलीने गावात प्रवेश करून ग्रामस्थांवर हल्ला केला. यात तिघे व्यक्ती जखमी झाले. थेट गाव परिसरात अस्वलीने येत मनुष्यावर हल्ला चढविल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ज्ञानेश्वर हिंगवे, चंद्रकला वाघमारे व ओमशक्ती साठे यांच्याकडे राहणा-या गुराख्याचा जखमीत समावेश आहे.

प्राप्त माहितीनुसार, हेटिकुंडी या गावातील ओमशक्ती साठे यांच्याकडे राहणा-या गुराख्यासह ज्ञानेश्वर हिंगवे व चंद्रकला वाघमारे यांच्यावर गाव परिसरात प्रवेश केलेल्या अस्वलीने हल्ला चढवित त्यांना जखमी केले. घटनेची




माहिती मिळताच वन विभागाच्या अधिका-यांनी तातडीने हेटिकुंडी हे गाव गाठले. तोवर ग्रामस्थांनी जखमींना तातडीने रुग्णालयाकडे रवाना केले होते. जखमींना सुरूवातीला कारंजा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे प्राथमिक उपचारानंतर जखमींना नागपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. गावात पोहोचलेल्या वनविभागाच्या चमूने अस्वलीला जंगलात हाकलून देण्यासाठी सलग दोन तास प्रयत्न केले. ग्रामस्थ व वनविभागाची चमू यांच्या सामुहिक प्रयत्नामुळे अस्वलीने जंगलाच्या दिशेने धूम ठोकली. या घटनेमुळे हेटिकुंडीसह परिसरातील नागरिकांमध्ये जंगली जनावरांबाबत कमालीची भीती निर्माण झाली आहे.

# सलग तीन दिवसांत डुकरे कुटुंबातील तिघांचा मृत्यू; शहर शोकमग्न

**सेलू अभय बेदमोहता** - काय दुर्दैव म्हणावे असा उद्गार प्रत्येकाच्या



तोंडी ऐकू येत आहे. प्रभाग क्रमांक १० मध्ये राहणाऱ्या अरुण श्रीराम डुकरे यांच्या कुटुंबावर अगदी तीन दिवसांच्या अंतराने दु:खाचा जणू डोंगरच कोसळला. आई, पत्नी आणि एकुलता एक मुलगा हे तिघेही सलग तीन दिवसांत या जगाचा निरोप घेऊन गेल्याने डुकरे कुटुंब तसेच संपूर्ण परिसर शोकसागरात बुडाला आहे. साध्यासुध्या परिस्थितीत संसार उभा करणारे अरुण डुकरे हे येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर असलेल्या बुलढाणा अर्बन बँकेच्या गोदामात सुरक्षारक्षक म्हणून काम करतात. पत्नी माला, आई अंजना आणि मुलगा तुषार हा त्यांच्या आयुष्याचा गाभा होता. १८ नोव्हेंबर रोजी त्यांचा एकुलता एक अविवाहित मुलगा तुषार अरुण डुकरे (वय ३५) याचे सेवाग्राम रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. काही दिवसांपासून आजारी असलेल्या तुषारच्या मृत्यूने घरातील आनंद कायमचा हरपला.या दुःखाची वार्ता नागपूर येथे असलेल्या अरुण यांच्या वृद्ध मातेस अंजना श्रीराम डुकरे (वय ८५) यांच्यापर्यंत पोहोचली दुसऱ्याच दिवशी, मुलगा आणि सासू यांच्या मृत्यूचा जबर धक्का बसलेली अरुण यांची पत्नी माला अरुण डुकरे (वय ६५) ह्या तिसऱ्या दिवशी,सलग तीन दिवसांत तीन जवळच्या व्यक्तींचा मृत्यू अशा प्रकारे आलेल्या या दु:खाच्या मालिकेने अरुण डुकरे हे शब्दशः कोलमडून गेले आहेत.





शहरातील डुकरे आडनावाची ३० ते ४० कुटुंबे या घटनेमुळे शोकमग्न झाली असून, संपूर्ण परिसरात वातावरण दरवळले आहे ते केवळ विषण्णतेने. या घटनेने स्थानिक नागरिक भावनिक झाले आहेत आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून एक समान भावना उमटते इतकं मोठं दुःख कोणावरही येऊ नये.

# आता शौचालयांची होणार तपासणी : आमचे शौचालय, आमचे भविष्य मोहीम

**वर्धा/जनमाध्यम**

शौचालय ही केवळ एक सोय नाही, तर आरोग्य, प्रतिष्ठा आणि सुरक्षिततेची गरज आहे, यावर केंद्र व राज्य शासनांनी विशेष भर दिला आहे. या दृष्टिकोनातून 'आमचे शौचालय, आमचे भविष्य' या मोहिमेचे जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असून, १० डिसेंबरपर्यंत नागरिकांच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक शौचालयांची तपासणी होणार आहे, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालक अधिकारी पराग सोमण यांनी स्पष्ट केले.

या मोहिमेंतर्गत गावातील सर्व शौचालयांची स्थिती तपासली जाणार असून, दुरुस्ती, देखभाल आणि रंगरंगोटी यावर खास लक्ष केंद्रित केले जाईल. शाळा आणि अंगणवाड्यांतील शौचालयांवरही ताबडतोब काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अपूर्ण किंवा खराब स्थितीत असलेल्या शौचालयांची माहिती ग्रामपंचायतींकडून घेऊन त्यांचे सुशोभीकरण करण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही सुरू केली आहे.शौचालये बांधली गेली असली



तरी वापर होत नसेल तर त्याविषयी ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये स्वयंसहायता गट, युवक मंडळे, शाळा, अंगणवाडी आणि ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित केला जाईल.

स्वच्छता, सुरक्षित मलनिस्सारण आणि आरोग्य यासाठी जनजागृतीचा संपूर्ण कार्यक्रम राबवला जाणार आहे.या अभियानाच्या यशस्वी राबवणीसाठी तालुकास्तरीय यंत्रणेची बैठक झाली, ज्यात उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रफुल लोखंडे यांनी प्रभावित अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन केले. अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना गौरव देऊन प्रोत्साहन देण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनाने सर्व नागरिकांनाही या मोहिमेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. शौचालये सुरक्षित व स्वच्छ ठेवण्याच्या या मोहिमेने आरोग्याच्या दृष्टीने जिल्ह्यात मोठा सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा आहे.

नागरिकांनीही या आवाहनाला प्रतिसाद देते, तर आपले गाव आणि परिसर सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त राहील, असे पराग सोमण आणि प्रफुल लोखंडे यांनी नमूद केले.

# नांदोरा डफरे येथे शेतकऱ्यांना सघन कपाशी लागवडविषयी मार्गदर्शन

**वर्धा/ जनमाध्यम**

कृषि विज्ञान केंद्र सेलसूराच्यावतीने नांदोरा (डफळे) येथील निखील डफळे यांच्या शेतावर प्रक्षेत्र दिनानिमित्त सघन कपाशी लागवड विषयी मार्गदर्शन करण्यात आले.कृषि विज्ञान केंद्र, सेलसुराच्या वतीने कपाशी पिकावरील विशेष कापूस प्रकल्प राबविण्यात येत आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपुरद्वारे संचालित कपाशीसाठी सघन लागवड प्रणाली अंतर्गत सन २०२५ -२६ दरम्यान देवळी येथील नांदोरा (डफरे) गावामध्ये प्रगतीशील शेतकरी निखील डफरे यांच्या शेतावर प्रक्षेत्र दिवस व प्रत्यक्ष भेट कार्यक्रमाचे आयोजन वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. जीवन कतोरे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

कपाशीची अतिरिक्त होणारी वाढ थांबविणे आवश्यक असून कोरडवाहू कपाशीमध्ये झाडांची संख्या वाढविली तर उत्पन्न जास्त येईल असे मार्गदर्शन कृषिविद्या विषयतज्ञ डॉ. रुपेश झाडोदे यांनी केले. तसेच हिरवळीचे खत व सेंद्रिय खते वापरण्यावर भर दिला. शेतकऱ्यांनी यांत्रीकीकरणावर भर द्यावा व शेतीतील खर्च कसा कमी करता येईल याबाबत कृषि अभियांत्रिकी विषयतज्ञ डॉ सविता पवार यांनी मार्गदर्शन केले.बदलत्या वातावरणामुळे येणारे रोग, त्याचे नियंत्रण व व्यवस्थापन तसेच रबी पिक व्यवस्थापन करतांना बीजप्रक्रिया अवश्य करावी, असे मार्गदर्शन पिक संरक्षण विषयतज्ञ डॉ.निलेश वझिरे यांनी केले. तसेच निंबोळी अर्क, नीम ऑईल व जैविक कीटकनाशकांचा वापर करण्यास सांगितले. अंकुर सीड्सचे संशोधन अधिकारी डॉ. समिर वडयाळकर यांनी पारंपारिक पद्धतीपेक्षा सघन कपाशी लागवड केल्याने झाडांची संख्या तीनपट वाढून १० ते २० टक्के पर्यत उत्पादन वाढते तसेच सघन व अतिघन प्रणालीमधील फरक शेतकऱ्यांना पटवून दिला.यावेळी शास्त्रज्ञ व शेतकरी यांनी निखील डफरे यांच्या प्रक्षेत्र भेटी दरम्यान कपाशी पिकाचे निरीक्षण केले. कार्यक्रमाचे संचलन व आभार विस्तार शिक्षण विषयतज्ञ डॉ. अंकिता अंगाईतकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकारीता किशोर उगलमुगले, गणेश वायरे, ऋतुजा कोरडे, वासिम खान यांचे मोलाचे सहकार्य लाभले, कृषी विज्ञान केद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख यांनी कळविले आहे.

# कापूस पिकावरील लाल्या रोगाच्या नियंत्रणासाठी उपाययोजना

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा कृषि विभागातील वर्धा, सेलू व देवळी तालुक्यातील काही गावांमध्ये कापुस पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव आलेला आहे. या रोगाला आटोक्यात आणण्यासाठी शेतकऱ्यांनी उपाययोजना कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

कापुस पिकावरील लाल्या रोग उद्भवण्याची दोन प्रमुख कारणे आहेत. एक तर तुडतुडे किडींचा प्रादुर्भाव आटोक्यात नसल्यास आणि दुसरे म्हणजे पर्यावरणाची स्थिती आणि मुख्य सुक्ष्म पोषण घटकांची कमतरता. जर रात्रीचे तापमान २१ डिग्री सेल्सीअसपेक्षा कमी झाले तर पाने लाल होण्यास सुरुवात होते. लाल पाने हा कपाशी पिकातील शारीरीक विकार असून तो बोंड



धारणा झाल्यापासून ते बोंड परिपक्वतेकडे वाढत जातो. झाडाच्या पानातील हरीत द्रव्य प्रकाशाच्या सहाय्याने अन्न तयार करुन आंतरप्रकियेने ते झाडाच्या विविध भागात पोहचवण्याच्या नैसर्गिक क्रियेमध्ये विविध कारणामुळे बाधा उत्पन्न होऊन पानातील हरीतद्रव्याचे प्रमाण कमी होते व त्याची जागा ॲन्थोसायनीन हे रंगद्रव्याचे घेते आणि या द्रव्यामुळे पानाला लाल रंग येतो. रस शोषण किडीच्या नियंत्रणाकरीता पाऊस निघून गेल्यावर तसेच पावसाळ्यात दिर्घकाळ पाऊस न आल्यास संरक्षित ओलिताची व्यवस्था करावी. कपाशीला पाण्याचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी. बोंडे भरण्याच्या अवस्थेत २.० टक्के डीएपी या खतांच्या फवारण्या कराव्या. मॅग्नेशियमची कमरता रोखण्यासाठी आठवड्यातून एकदा मॅग्नेशियम सल्फेट २० ते २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जमिनीत ओलावा नसल्यास तातडीने पाण्याचे नियोजन करावे. पाणी देतांना एकाच ठिकाणी पाणी स्थिर राहू नये याची काळजी घ्यावी, असे उपविभागीय कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

## संक्षिप्त

### जनावरे घेऊन जाणाऱ्या ट्रकच्या क्लिनरला मारहाण

**पुलगाव-** जनावराची वाहतूक करणाऱ्या वाहनाच्या क्लिनरला



चौघांनी काठ्यांनी मारहाण केली. ही घटना विरूळ टोल नाका परिसरात बुधवारी घडली.याप्रकरणी मोहम्मद गुलाम रसूल मोहम्मद अली नबी (४०, रा. कामगार नगर बर्डी, नागपूर) यांनी पुलगाव पोलिसात तक्रार दिली. त्यावरून अथर्व संजय घोगडे रा. येळाकेळी, पीयूष विनोद निंबाळकर रा. आनंदनगर वर्धा, मयंक गोपाल खंडागळे रा. नालवाडी, अर्श ज्ञानेश्वर खैरकार रा. तिवारी लेआऊट यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारकर्ता हा समृद्धी महामार्गावर वाहन क्रमांक एमएच ४० बीजी ९१६४ यावर क्लिनर म्हणून काम करतो. नागपूर ते तेलंगणा राज्यात वाहनात जनावर घेऊन जात होता.

### जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

**हिंगणघाट-**बैलाने शिंग मारल्याने जखमी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सावित्री तोडासे (वय ८९) रा. रिमडोह, असे मृतकाचे नाव आहे. हिंगणघाट तालुक्यातील रिमडोह येथील सावित्री तोडासे या बैलाने शिंग मारल्याने गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी नोंद केली.

### सेलू (काटे) इसमाचा मृत्यू

**वर्धा/ सेलू (काटे)** - शिवारात फिट येवून नाल्यात पडल्याने पाण्यात बुडून इसमाचा मृत्यू झाला. ही घटना २० नोव्हेंबर रोजी घडली. मृताचे नाव बालाजी कामडी (५२) रा. गणेशनगर असे आहे. सेलू (काटे) शिवारात बालाजी कामडी गुरे चारण्यासाठी गेले होते. अचानक फिट येऊन नाल्यात पडल्याने पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

# खत कंपन्यांच्या मनमानीला कोण घालणार लगाम?

**समुद्रपूर/ जनमाध्यम**

गेल्या दहा वर्षांत रासायनिक खतांच्या किमतीत दुप्पट-तिप्पटीने अनियंत्रित वाढ झाली आहे. कीटकनाशक व तणनाशकांचे दरही अवाढव्य वाढले असून, यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. असा भांडवलदारांची मनमानी आणि बाजारपेठेतील त्यांचा दबा यावर शेतकऱ्यांमध्ये संताप वाढतो आहे. शेतकऱ्यांना खत कंपन्यांच्या मनमानीवर कोण लगाम घालणार? हा प्रश्न वेळोवेळी केला जात असला तरी परिणामकारक तोडगा अजून दिसत नाही.शेतीत काम करणाऱ्या मजुरांच्या दरांमध्येही तितकीशी स्थिरता नाही. मजूर उपलब्धतेनुसार ठिकठिकाणी मजुरीत वाढ होत असून, शेतकऱ्यांना दिवसभर कामासाठी २०० ते ४०० रुपये देणे भाग पडते. शेतकऱ्यांना वाढणाऱ्या उत्पादन खर्चाचा तडाखा सहन करावा लागतो, परंतु त्यांना त्याच्या जोडीला विक्री किमतीत अपेक्षित वाढ मिळत नाही. त्यामुळे शेतकरी संकटग्रस्त होऊन शेतीतून दूर होत आहे.सरकारने खतांच्या निर्मिती आणि विक्रीवर नियंत्रण ठेवत संकट कमी करण्यासाठी उपाययोजना चालू केल्या असल्या तरीही खत कंपन्यांच्या मनमानीवर प्रभावी नियंत्रण अद्याप दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर मालाला न्याय्य दर देण्यासाठी न्यायालयीन मार्ग अंगीकारावा लागेल का, असा विचारही करावा लागत आहे.शेतकरी संघटनांनी आणि कृषी धोरणकर्त्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस कृती करण्याची गरज आहे, अन्यथा शेतीचा पोशिंदा असलेला बळीराजा हळूहळूच शेतकरीहितापासून दूर जात आहे.

# हिंदी विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रो.कुमुद शर्मा यांची हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला भेट

**वर्धा/ जनमाध्यम**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी आपल्या शिष्टमंडळासह अमरावती येथील प्रसिद्ध श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला नुकतीच सदिच्छा भेट दिली. मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, कोषाध्यक्ष आचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे सचिव डॉ. माधुरीताई चेंडके, प्राध्यापक रवींद्र खांडेकर व दीपा कान्हेगावकर यांनी कुलगुरू व शिष्टमंडळाचे स्वागत केले. डॉ. माधुरी चेंडके यांनी हनुमान



व्यायाम प्रसारक मंडळाची सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी कुलगुरू प्रो. शर्मा यांनी कुस्ती विभाग, क्रीडा सभागृह, जिम्नास्टिक विभाग नेताजी सुभाषचंद्र बोस क्रीडा सभागृह, मेजर ध्यानचंद इंडोर स्टेडियम, जलतरण विभाग, योग विभाग यांचे निरीक्षण केले. यावेळी त्यांच्या समवेत कुलसचिव कादर नवाज खान, असोसिएट प्रोफेसर डॉ. जयंत उपाध्याय, आवासीय लेखक डॉ. भूषण भावे, एम ओ यू समन्वयक डॉ. अनिकेत अनिल आंबेकर, प्रोटोकॉल अधिकारी राजेश यादव उपस्थित होते. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला भेट दिल्यानंतर कुलगुरू प्रोफेसर प्रमोद शर्मा म्हणाल्या की मंडळाचे कार्य आणि प्रतिष्ठा संपूर्ण देशभर आहे. स्वातंत्र्य काळापासून आजपर्यंत मंडळाने युवाशक्तीला खेळ,शिक्षण आणि राष्ट्रभक्तीची मूल्य शिकवून जे काम केले आहे ते केवळ एका संस्थेपूरतेच मर्यादेत नाही तर ते राष्ट्रीय स्तरावरील अद्वितीय कार्य होय.

# स्थानबद्ध आरोपीला बुटीबोरीतून अटक

**हिंगणघाट** - येथील पोलिस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळे २५ गुन्हे दाखल असलेल्या आरोपीस पोलिसांनी अटक केली. भोजराज तुकाराम जंगले (३०, रा. खंडोबा वॉर्ड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.आरोपीवर गांजा विक्री, दारूविक्री व शरीरा विरुद्धचे असे एकुण २५ गुन्हे दाखल आहेत. यामुळे परिसरात भीती निर्माण झाली आहे. त्यांच्याविरुद्ध एमपीडीए प्रस्ताव होण्याची भीती निर्माण झाल्याने तो झाला होता. पोलिस त्यांच्या मार्गावर होते. अशातच आरोपी हा बुटीबोरी येथे असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी बुटीबोरी येथे जात आरोपीस अटक केली. ही कारवाई पोलिस निरीक्षक अनिल राऊत यांच्या आदेशाने सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक वानखेडे, पद्माकर मुंडे, प्रशांत ठोंबरे, राजेश शेंडे, आशिष नेवारे, रोहित साठे, मंगेश वाघमारे व सायबर शाखेचे अनुप कावळे व मीना कौवर्ती यांनी केली. पुढील तपास पोलिस करत आहेत.



जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३५४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

रविवार, २३ नोव्हेंबर २०२५
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# डॉ.विजय भटकर कार्यगौरवार्थ प्रेरणादायी सोहळा
# ‘मामाच्या गावात जाऊया’ संकल्पनेत विविध क्षेत्रातील कर्तृत्वजणांचा गौरव







**अमरावती/का.प्र.**
आपल्या अलौकीक कार्याने संपूर्ण जगाचे लक्ष वेधणारे शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ विजय भटकर यांच्या मातोश्री स्व . निर्मलाताई पांडूरंगजी भटकर यांच्या जयंती प्रित्यर्थ झालेल्या ‘मामाच्या गावाला जाऊया ’ या दिवसभऱ्याच्या अभिनव तथा वैशिष्टपूर्ण उपक्रमात विविध सामाजिक कार्याची पूर्तता करण्यात आली.

यावेळी मंचकावर करजगाव शिक्षण संस्थेतील शशांकपंत सोनार, मदनलाल भूसारी, सुरेंन्द्रपंत गणोस्कर, माणीकराव मडघे, अजिंक्यपंत सोनार, नितीन रहाटे, संदीप पंत सोनार, रविकिरण जावरकर यांचीही उपस्थिती होती. ग्रामीण भागाला दिशादर्शक ठरणारा उपक्रम कुलगुरु डॉ मिलींद बारहाते, डॉ विजय भटकर यांचा जीवनपट अतीशय प्रेरणावर्धक प्र - कुलगुरु डॉ महेंद्र ढोरे, डॉ भटकर या पृथ्वीतलावावरील कर्मयोगी संत हेमंत काळमेघ जगविख्यात व्यक्तींच्या कार्याला यथोचित उजाळा देणारा उपक्रम भैय्यासाहेब मेटकर सामाजिक सांत्वनाने परिवाराला भक्कम आधार प्राप्त झाला प्रा. दिपाली मालखेडे मामाचे गाव करजगावातील बालपणाचे डॉ भटकर यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व कार्यक्रमाध्यक्ष संदीपपंत सोनार कार्यक्रमाचा शुभारंभ शंकरराव शिक्षण संस्था, करजगांव संस्थेमधील विद्यार्थी सहभागाने पर्यावरण संदेश दिंडी ने झाला. डॉ भटकर यांच्या आजी स्व शांताबाई कृष्णाजी चौधरी यांच्या त्याकाळच्या निवासस्थान स्थळी तूळशी रोपण करण्यात आले. परतीच्या दिंडी प्रवासात शंकरराव शिक्षण परिसरात प्रा गजानन भारसाकळे यांनी संस्थेचे आधारस्तंभ माजी खासदार स्व डॉ अ. ग उपाख्य भाऊसाहेब सोनार यांच्या स्मृती प्रित्यर्थ वृक्षारोपन केले.

## पर्यावरण संदेश दिंडी तथा संशोधन मॉडेल स्पर्धा ठरले कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण

यानंतर ‘ग्रामीण भागाचा उत्कर्ष’ या विषयांवर संशोधन मॉडेल स्पर्धा झाली.या स्पर्धेचे उद्घाटन आनंद यादव यांनी तथा परीक्षण प्रा गजानन पदमने, डॉ दुर्गेश वेले, डॉ मंदार देशमुख, डॉ पंकज अर्डक, प्रा. जयंत इंगोले, डॉ अमित गावंडे, प्रा. शशीकांत ठाकरे, प्रा महेश पुंडकर यांनी केले. दुपार सत्रात या कार्यक्रमाच्या निमित्याने निवड केलेल्या विविध क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या प्रा. अभिजीत झाडे द्वारे संचलन असलेल्या विद्यार्थी सहभागाच्या प्रश्नमंजुषा कार्यक्रमात अत्यंत मार्मिक मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये श्री शंकरराव शिक्षण संस्था करजगांव यांना ज्ञान गंगा, प्रा डॉ नरेंद्र त्र्यं. माने, प्रा प्राची प्रविण बुरघाटे, गणेश रामेकर, डॉ विकास के.शेवाने यांना साहित्य रत्न, प्रा सागर पासेबंद, प्रा अरविंद देशमुख, प्रकाशराव साबळे, सागर उत्तमराव देशमुख यांना सेवा महार्षि, डॉ आशीष सोनार, सविता प्रविण जावरकर, जानवी दिनेश भटकर यांना शिक्षण रत्न’ ॲड शीतल यदुराज मेटकर, ओवी धनंजय वव्हेकर यांना ‘कला रत्न’यशश्री अभिषेक रोटे यांना ‘महाराष्ट्र सावित्री’ प्रा. प्रविण खांडवे यांना ‘पर्यावरण सेवा’ डॉ गोपाल शेषराव झामरे यांना अध्यात्म योगी धनश्री अखिल भटकर यांना ग्राम वैभव, अमृता संदीप सोनार, जानवी निलेश अस्वार व सानिया नासिर खाँ यांना क्रीडा रत्न पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

यावेळी सभागृहामध्ये डॉ दिलीप मालखेडे अमर रहे च्या घोषणा देण्यात आल्या.तसेच स्पर्धेमध्ये आपल्या अप्रतिम संशोधन मॉडेल कृतीचे प्रदर्शन करणाऱ्यासर्व विजयी स्पर्धकांना प्रत्येकी दोन हजार रुपये, गौरव चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यामध्ये अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय बाभूळगांव अकोला, एल. सी. खेरडे ज्यू कॉलेज, करजगांव, तक्षशीला इन्स्टीटयूट ऑफ इंजिनिअरींग,दारापूर, श्री शिवाजी सायन्स कॉलेज, अमरावती, शिवाजी स्कूल ऑफ आर्किटेक्चर अकोला, श्री शिवाजी कला, वाणिज्य व सायन्स कॉलेज, अकोला, प्रो राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, बडनेरा, दत्तात्रय बॉयोटेक इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. दर्यापूर इत्यादी संस्थांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या सुरवातीपासून ते शेवटपर्यंत कार्यक्रमात ऑन लाईन उपस्थिती देऊन तथा आपल्या मनोगतात मामाच्या गावातील बालपणीच्या आठवणींना उजाळा देऊन डॉ विजय भटकर यांची पूर्णवेळ उपस्थिती कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट ठरले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शंकरराव शिक्षण संस्था करजगांव, स्व दादासाहेब काळमेघ स्मृति प्रतिष्ठान, अमरावती, स्व. श्रीधर देशमुख उपाख्य मालक प्रतिष्ठान, निंबा, ग्रामपंचायत मुरंबा, गाडगेबाबा मंडळ, दर्यापूर तथा माजी विद्यार्थी संघटना अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, बाभूळगांव - अकोला या संस्थेच्या पदाधिकारी, प्राध्यापक ,शिक्षक व कर्मचारी यांनी तथा अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय बाभूळगांव - अकोला येथील प्रा दुश्यंत झामरे, प्रा. आदित्य गणगणे, प्रा राहूल वातीले, प्रा. अक्षय काळमेघ, प्रा. रजनिकांत जाधव, प्रा स्वप्नील बोबडे, डॉ आनंद ताथोड, डॉ मधूकर पाटील, डॉ सुनिल अग्रवाल, प्रा सुधीर ढोमणे, राहूल जवंजाळ, उमेश इंगळे व सारंग काकड यांनी अथक परीश्रम घेतले. गायक तेजस कडू व संच यांच्या द्वारे शुभारंभ पूजनास गोपाला गोपाला व सांगता वेळी राष्ट्र वंदना या दोन्ही गायनाने संपूर्ण सभागृहाचे लक्ष वेधले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ आशीष सोनार, संचलन प्रा गजानन भारसाकळे तथा आभार प्रदर्शन प्रा गजानन पदमने यांनी केले.

## संक्षिप्त

### डॉ.रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार

**अमरावती :** यंदाचा स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार कार्यक्रम २३ नोव्हेंबर रोजी, स्थानिक श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृहामध्ये सायंकाळी ६ वाजता आचार्य जितेंद्रनाथ महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मागील वर्षी सदर पुरस्काराचे पहिले वर्ष होते.मागील वर्षीचा पुरस्कार संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पीटला देण्यात आला होता तर यावर्षीचा पुरस्कार अमरावती येथील पारधी सेवा प्रकल्प प्रज्ञा प्रबोधिनीला देण्याचे निवड समितीने एकमताने ठरविले आहे. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शहरातील मान्यवरांची एक आयोजन समितीही स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये प्रमुख्याने स्व.डॉ. रमेश गोडबोले यांच्या निकटवर्तीयांचा समावेश आहे. पुरस्काराचे स्वरुप १ लक्ष गौरव राशी, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे असणार आहे. या कार्यक्रमाला अनेक मान्यवर मंडळीची उपस्थिती लाभणार आहे.



### पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये फार्मसी सप्ताह

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप द्वारा संचालित पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये ६४ वा राष्ट्रीय फार्मसी सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशनच्या (Indian Pharmaceutical Association) निर्देशानुसार यावर्षीच्या सप्ताहाची मध्यवर्ती संकल्पना ‘फार्मसिस्ट: लसीकरणाचे समर्थक’ अशी होती. कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट लसीकरण जागरूकता फार्मसिस्ट लसीकरणाचे महत्त्व लोकांपर्यंत कसे पोहोचवू शकतात आणि या आरोग्य मोहिमेत त्यांची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.सदर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीप्ती बी. रुईकर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित माननीय डॉ. दिलीप भाऊराव चऱ्हाटे (वैद्यकीय अधिकारी) पी. आर.पोटे पाटील आयुर्वेदिक कॉलेज अमरावती तसेच महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

### आज हॅपी स्ट्रीट्स अमरावती ‘संडे फंडे’ साठी शहर सज्ज

**अमरावती-** महानगरपालिकेद्वारे शहरात हॅपी स्ट्रीट्स अमरावती हा उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे. मोर्शी रोडवरील वेलकम पॉईंट येथे सकाळी ६ वाजल्यापासून सुरू होणाऱ्या या उपक्रमात नागरिकांना Sunday yevekee Funday' असा संदेश देत विविध उपक्रमांचा आनंद अनुभवण्याचे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे. कार्यक्रमांतर्गत स्पोर्ट्स, झुंबा, गेम्स यांसह सर्व वयोगटांसाठी आकर्षक शारीरिक आणि मनोरंजक उपक्रम राबवले जाणार आहेत. फिट इंडियाआणि स्वच्छ सर्वेक्षण २०२५च्या शहरातील भावनेतून नागरिकांमध्ये आरोग्य आणि उत्साहाची भावना निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, वाहनमुक्त रस्त्यावर सामूहिक फिटनेसचा अनुभव घेण्यासाठी आणि कुटुंबासह सकाळचा आनंददायी वेळ घालवण्यासाठी हा उपक्रम मोठ्याप्रमाणावर उपयुक्त ठरणार आहे.नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून Happiness Unlimited. या संकल्पनेला साथ देण्याचे आवाहन मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

## या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने युनिटी पदयात्रा

**तिवसा/ वार्ताहर**
वरिष्ठ व कनिष्ट महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना व आय. क्यू. एस. सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारताचे लोहपुरुष आणि राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ‘मेरा युवा भारत’ युवा व खेल मंत्रालय भारत सरकार यांच्यामार्फत देशभर विशेष अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय पदयात्राचे आयोजन ३१ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान तिवसा येथील या.द.व. देशमुख कला वाणिज्य महाविद्यालया आयोजन केले आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन तिवसा येथील गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे आणि नगरीचे नायब तहसीलदार आशिष नागरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख अध्यक्षस्थानी होते. मान्यवरांनी हिरवी झेंडी दाखवून पदयात्रेचा शुभारंभ केला. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. ही पदयात्रा या.द.व. देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय दिवसा येथून सुरू होऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, पेट्रोल पंप, शहीद स्मारक मार्ग पुन्हा महाविद्यालयात येऊन पदयात्रेचा समारोप करण्यात आला, पदयात्रेमध्ये कृष्णाबाई दंदाळे विद्यालय तिवसा, देवराव दादा विद्यालय तिवसा येथील विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदविला. प्रा. डॉ. सोनटक्के यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले तर स्नेहल बासुतकर यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला आय.क्यू.एस.सी समन्वयक डॉ. श्याम गेडाम, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. रवींद्र पाटील,पर्यवेक्षिका प्रा.इंदा पवार, अधीक्षक महेश अवघड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा. योगेश देशमुख, प्रा. वृषाली जगताप, प्रा. खुशबू कुठे, प्रा, पूजा भोयर, प्रा. राजकुमार तिडके, प्रा, भरत गोंजारे, संदीप चक्रनारायण प्रा. विनोद खडसे, डॉ. साकेत देशमुख डॉ. सारीपुत्र भालेकर डॉ. शंतनू पानबुडे प्रा. शुभम सोनवणे प्रा. गणवीर प्रा. आठवले डॉ. गावंडे प्रा.सृष्टी वानखेडे प्रा. गुंजन वानखडे प्रा. दीप्ती गौरखेडे प्रा. दिपाली तायडे, प्रा .कापसे, प्रा. सुयश बोडके, प्रा. समीक्षा ढोबळे यांचे सहकार्य लाभले.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यपर्व सप्ताह

**शिराळा/ वार्ताहर**
श्री गुरूदेव सेवा मंडळ, शिराळा येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यपर्व सप्ताह विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ध्यान-चिंतनाने झाली. ध्वजारोहण अध्यक्ष रामनिवास दादा देशमुख यांच्या हस्ते पार पडले.पहिल्या सत्रात तीर्थस्थापना व पादुका पूजन दीपक बिजागरे व गीता बिजागरे यांच्या हस्ते करण्यात आले.राजाभाऊ बोके (वरखेड) व राजीव डांगे (आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक) यांनी प्रार्थना व योग-प्राणायामाचे महत्त्व स्पष्ट केले.सप्ताहभर विविध भजन मंडळांनी भजन-कीर्तन आणि गजानन गीतमाला कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमात



मनोजभाऊ देशमुख, विजयराव देशमुख, राजुभाऊ गंधे, जयंत आमले यांसह अनेक मान्यवरांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री गुरूदेव सेवा मंडळातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. अखेर महाप्रसादाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## तक्षशिला इन्स्टिट्यूट, येथे आर्थिक जनजागृती व आरोग्य विमा मार्गदर्शन कार्यक्रम

**दारापुर -** तक्षशिला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिआरिंग ॲंड टेक्नोलॉजी, दारापुर येथे इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल च्या सहकार्याने ‘आरोग्य विमा व आर्थिक जनजागृती’ या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते शेखर अंबेकर (व्यवस्थापक, स्टार इन्शुरन्स) यांनी वित्तीय



साक्षरतेचे महत्त्व स्पष्ट करत आरोग्य विमा आणि आर्थिक सुरक्षेविषयी उपयुक्त माहिती दिली. विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या विविध विमा योजनांची माहिती या सत्रातून मिळाली.कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. एन. एस. घोटकर यांनी कार्यक्रमाची उद्दिष्टे मांडली. सूत्रसंचालन देवेंद्र चोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. एन. एस. घोटकर यांनी केले.कार्यक्रमाला डीन डॉ. एस. टी. वरघट, प्रशासकीय अधिकारी हेमंत धुमाळे, तसेच अध्यापक व कर्मचाऱ्यांची उपस्थिती लाभली. प्राचार्य डॉ. इंगोले यांनी अशा उपयुक्त उपक्रमांचे पुढेही आयोजन करण्यात येईल असे सांगितले.

## महिलांना आवळा प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण

**वलगाव -** कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत शारदा नारायण कृषी विज्ञान मंडळ तर्फे आवळा प्रक्रिया उद्योग या विषयावरील शेतीशाळा प्रशिक्षण महिलांसाठी घेण्यात आले.वलगाव येथे आयोजित या कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूर येथील गृह वैज्ञानिक डॉ. अर्चना काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली आवळ्याचे लोणचे, शरबत, कॅंडी, इ. चविष्ट पदार्थ तयार करण्याचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण उपस्थित महिलांना देण्यात आले. या कार्यक्रमाला आत्मा तर्फे बी. टी. एम. रूपाली चौधरी तथा



शारदा नारायण कृषी विज्ञान मंडळाच्या वतीने प्रमोद जोशी,आशिष जोशी उपस्थित होते. या प्रशिक्षण कृषी शाळा कार्यक्रमाला गावातील महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सदर कृषीशाळेचा लाभ घेतला.

## महापारेषण अमरावती परिमंडळ आंतरमंडळीय क्रीडा स्पर्धा अकोला

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहरं**
महापारेषण अमरावती परिमंडळाच्या आंतरमंडळीय क्रीडा स्पर्धा अकोला येथील वसंत देसाई क्रीडा संकुलात उत्साहात पार पडल्या. मुख्य अभियंता संजीवकुमार भोळे यांच्या मार्गदर्शनाखाली, अधीक्षक अभियंता संजय काटकर यांचे नियोजन आणि कार्यकारी अभियंता विनोद हंबर्डे व त्यांच्या टीमच्या समन्वयामुळे स्पर्धेचे उत्तम आयोजन साध्य झाले.




स्पर्धेला सुरुवात स्काऊट-गाईडच्या शिस्तबद्ध पथसंचलनाने झाली. विविध खेळ प्रकारात अनेक अनुभवी अधिकारी-कर्मचारी तसेच नवीन विद्युत सहाय्यकांनी उत्कृष्ट खेळ केला.महिला कबड्डी संघ या वर्षी प्रथमच परिमंडळ स्तरावर उभा राहिला असून संघातील खेळाडूंनी प्रभावी कामगिरी करून दाद कमावली.

पुरुष कबड्डीत अकोला संघाने रोमांचक सामन्यात अमरावती संघावर विजय मिळवला. हॉलीबॉल आणि क्रिकेटमध्येही अकोला संघ विजयी ठरला. क्रिकेटमध्ये संग्राम गोरे, स्वप्नील बोरखडे, जितेश राऊत यांनी उत्तम खेळ केला.कॅरममध्ये शेख मुराद व जाधव यांनी पुन्हा वर्चस्व सिद्ध केले. ब्रीजमध्ये प्रशांत गादे व जयंत वाघमारे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. बॅडमिंटनमध्ये पुरुष व महिला गटात अनेक खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. टेबल टेनिसमध्ये पंकज यादव व आंडे विजेते ठरले.मैदानी स्पर्धांमध्ये १०० मी. धावण्यामध्ये गुप्ता, २०० व ४०० मी. मध्ये आदित्य टिटो, १५०० मी. मध्ये अमोल दहातोंडे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. भालाफेकमध्ये सचिन पाटील यांनी अनुभवी खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद मिळवले.

स्पर्धेचे संपूर्ण नियोजन, भोजन व्यवस्था व शिस्तबद्ध आयोजनाबद्दल खेळाडूंनी समाधान व्यक्त केले. समारोप प्रसंगी सर्व विजेता व उपविजेता संघांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.मुख्य अभियंता संजीव भोळे यांनी सर्व खेळाडूंना लवकरच नागपूर येथे होणाऱ्या परिमंडळस्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

## शिराळा येथे भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाला प्रतिसाद


**शिराळा -** येथील दादाजी धुनीवाले संस्थान, शिराळा तर्फे २६ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर या कालावधीत भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. आठ दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात महारुद्राभिषेक, नर्मदा तिर्थ स्थापना, संगीत-मय भागवत कथा, तसेच विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता कथेला प्रारंभ झाला. कथा सत्रे दररोज सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ या वेळेत होत असून २ डिसेंबर रोजी सायं. ६ वाजता कथा समाप्ती होणार आहे. कथाव्यास म्हणून प्रेममुर्ती ह. भ. प. शिवदास महाराज श्रुंगारे (यवतमाळ) यांचे अमृतमय प्रवचन भाविकांचे मार्गदर्शन करीत आहे.दर दिवशी सायंकाळी हरिपाठ, भजने व किर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला संस्थान अध्यक्ष मनोजभाऊ देशमुख, शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर, खा. बळवंतभाऊ वानखेडे, प्रिर्ती बंड, अलका देशमुख, अभय महल्ले, शिराळा सरपंचा अंकिता तायडे, उपसरपंच अनिकेत खाडे, तसेच उपस्थित राहणार आहेत.



# सिटीलँड व्यापारी संकुलामध्ये चोरांचा धुमाकूळ

## एकाच रात्री पाच दुकानात चोरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर मार्गावरील बोरगाव धर्माळे स्थित सिटीलॅड व्यापारी संकुलामध्ये शुक्रवारी मध्यरात्री चोरांनी धुमाकूळ घातला.संकुल मधल्या ५ दुकानांना निशाणा बनवून आरोपींनी येथून लाखोंचा मुद्देमाल लंपास केला. या घटनेमुळे व्यापा-यांमध्ये भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच






पोलीस उपायुक्त श्याम घुगे, नांदगाव पेठचे ठाणेदार दहातोंडे पथकासह तिथे दाखल झाले. त्यांनी संपूर्ण परिसराचे निरीक्षण केले आणि अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे.

माहितीनुसार सिटीलैड व्यापारी संकुलातील टी लाईन मध्ये असणाऱ्या तरुण कलेक्शन, वर्षा साडी, साई साडी व इतर दोन प्रतिष्ठानमध्ये चोरी झाली. मागच्या बाजूने आलेल्या चोरट्यांनी कटरच्या साह्याने दुकानाचे कुलूप तोडले आणि आत शिरले. आरोपींनी तरुण कलेक्शन मधून ३७ हजार कॅश, चांदीचे ४० नाणे,१५० ग्रॅमच्या दोन मुर्त्या चोरी केल्या. हे दुकान कमलेश गगलानी यांची आहे तसेच प्रदीप सोजरानी यांच्या वर्षा साडीज मधून हजारोचा माल लंपास केला.अमरलाल बख्तार यांच्या साई साडी आणि मोहन टेक्स्टाईल, चंचल साडी या दुकानात चोरीचे प्रयत्न करण्यात आले. या घटनेमुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये दहशत निर्माण झालेली आहे. दुकानातील सेंट्रल लॉक आरोपी तोडू शकले नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मार्केटच्या मुख्य प्रवेश द्वारा जवळ सुरक्षा रक्षक तैनात असल्यामुळे☞ (पान २ वर)

# अग्निशमन अधीक्षक केंद्रे व अधिकारी पावडे निलंबित

## मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचे आदेश

### -राजेश मोहन आत्महत्या प्रकरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** महापालिकेच्या अग्निशमन विभागात फायर फायटर म्हणून कार्यरत राजेश वासुदेव मोहन यांच्या आत्महत्या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी अग्निशमक अधीक्षक संतोष केंद्रे (वय ३२) आणि मुख्य अग्निशामक अधिकारी लक्ष्मण पावडे (वय ५०) तसचे खाजगी सावकार रामकृष्ण शिंदे विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाची तात्काळ दखल घेत मनपा आयुक्त सौम्य शर्मा यांनी अग्निशामक अधिकारी लक्ष्मण पावडे व अधीक्षक संतोष केंद्रे यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे आदेश



गुरुवारी उशीर रात्री काढले. यामुळे महानगरपालिकेमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

माहितीनुसार राजेश मोहन कुटुंब एमआयडीसी फायर ब्रिगेड कार्यालय बडनेरा येथील सरकारी वसाहतीत राहत होते. मृतक राजेश मोहन यांना तिन्ही आरोपी शारीरिक व मानसिक त्रास देत होते. यामुळे त्यांना गुरुवारी विष प्राशन करून आत्महत्या करावी लागली. अग्निशमन अधीक्षक संतोष केंद्रे यांनी मोहन राहत असलेले क्वार्टर खाली करण्याचे आदेश बजावले होते. विभागातील सोसायटी बंद केली होती. राजेश मोहन यांचे पगाराचे बेसिक आकृतीबंध आराखडा या संदर्भात हायकोर्टात प्रकरण दाखल☞ (पान २ वर)

# महाप्रसादाच्या नावावर दुकानदाराला लावला ३३ हजाराचा चुना

## गाडगे नगर ठाण्याच्या हद्दीतील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** हनुमान मंदिरात महाप्रसाद असल्याच्या नावावर एका किराणा दुकानदाराला ३३ हजाराने फसविण्यात आल्याची घटना गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत समोर आली आहे. या प्रकरणात अशोक कृपालदास चांदवानी (वय ६६ ,कृष्णा नगर गल्ली नंबर १) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात



आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ☞ (पान २ वर)

# अखेर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घेतली माघार

### एमआयएम पक्षाने केला होता आरोप

## घरांवर झेंडे लावण्यासाठी कर पावतीची अट शिथिल

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** नगर परिषदच्या निवडणुकीत उमेदवारी अर्जाच्या फॉर्ममध्ये स्थानिक नगरपालिका निवडणूक अधिकाऱ्याने निवडणूक आयोगाचे निर्देश नसलेले नियम टाकल्याने आणि आता त्याबाबत माघार घेणारे लेखी पत्र एमआयएम पक्षातर्फे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला स्थानिक नगर परिषद प्रशासनाने दिले आहे. त्यामुळे या प्रकारामुळे सर्वत्र एकच खळबळ



उडाली असून अशा बेजबाबदार निवडणूक अधिकाऱ्याविरुद्ध तातडीने कार्यवाही करण्याची मागणी जनतेत होत आहे.

याबाबत वृत्त असे की, स्थानिक नगरपरिषद निवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेऊन दोन दिवसाचा कार्यकाळ लोटत चालला☞ (पान २ वर)

## माहुली जहागीरच्या सरपंचांना 'सर्वोच्च' दिलासा

# प्रीती बुंदीले सरपंचपदी कायम

## उच्च न्यायालयाच्या आदेशावर स्थगिती

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** माहुली जहागीर ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रीती बुंदीले यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा आणि निर्णायक दिलासा मिळाला आहे. ग्रामपंचायतीत निर्माण झालेल्या अनिश्चिततेला सर्वोच्च न्यायालयाने पूर्णविराम देत त्यांना सरपंच पदावर पुन्हा सर्व अधिकारांसह कायम राहण्याचा मार्ग मोकळा करून दिला आहे.



मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने लाच प्रकरणात ४ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रीती बुंदीले यांना अपात्र ठरवणारा आदेश दिला होता. या निर्णयाविरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात तात्काळ याचिका दाखल केली होती. सुनावणीदरम्यान त्यांच्या बाजूने अँड. निलेश गावंडे यांनी सखोल आणि ठोस कायदेशीर युक्तिवाद सादर करत उच्च न्यायालयाच्या आदेशावर ☞ (पान २ वर)

# प्रा.नरेंद्र राऊत राष्ट्रवादी कॉंग्रेस किसान सभा प्रदेश उपाध्यक्षपदी

## आ.संजय खोडके व आ.सुलभा खोडके यांनी केले अभिनंदन

**अमरावती/प्रतिनिधी :-** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी किसान सभा प्रदेश कमिटी मध्ये उपाध्यक्ष पदी प्रा.ॲड. नरेंद्र राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार तसेच प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे व राष्ट्रवादी किसान सभाचे राज्याध्यक्ष ॲड.वसंतराव मनकर यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली राष्ट्रवादी पक्षाचे ध्येय धोरणे सर्व



सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व शेतकऱ्यांच्या जीवनात सुख -समृद्धी येण्यासाठी तसेच राष्ट्रवादी किसान सभा मजबूत करण्याच्या दृष्टीने पक्षाने त्यांचेवर☞ (पान २ वर)

# दुचाकीच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू, एक जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** रस्ता ओलांडताना दुचाकी स्वाराने दिलेल्या धडकेत एका वृध्द इसमाचा मृत्यू झाला असून दुसरा जखमी आहे. ही घटना परतवाडा ते अंजनगाव सुर्जी मार्गावर राऊत यांच्या शेता जवळ समोर आली आहे. विश्वास लक्ष्मण राणे (वय ६२, रा.कुऱ्हा देशमुख) असे मृत वृद्धाचे नाव आहे. तर डॉ. रामविलास मालू जखमी आहे. माहितीनुसार विश्वास राणे आणि डॉ. रामविलास मालू गुरुवारी सायंकाळी सात वाजताच्या सुमारास घरून कामासाठी निघाले




होते. अंजनगाव सुर्जी मार्गावर ज्ञान कुंज स्मृती स्थळाजवळ डॉ. मालू यांनी आपली चारचाकी रस्त्याच्या कडेला पार्क केली. आणि तेथून दोघे रस्ता ओलांडत होते. दरम्यान राऊत यांच्या शेताजवळ ☞ (पान २ वर)

# स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार वितरण आज

## पारधी सेवा प्रकल्प प्रज्ञा प्रबोधिनी होणार सन्मानित

**अमरावती/प्रतिनिधीः-** यंदाचा स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार कार्यक्रम रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी, स्थानिक श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृहामध्ये सायं. ६.०० वाजता प.पू. आचार्य जितेंद्रनाथ महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

मागील वर्षी सदर पुरस्काराचे पहिले वर्ष होते. मागील वर्षीचा पुरस्कार संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पीटला देण्यात आला होता तर यावर्षीचा पुरस्कार अमरावती येथील पारधी सेवा प्रकल्प प्रज्ञा प्रबोधिनीला देण्याचे निवड समितीने एकमताने ठरविले आहे. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी





शहरातील मान्यवरांची एक आयोजन समितीही स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये प्रमुख्याने स्व.डॉ. रमेश गोडबोले यांच्या निकटवर्तीयांचा समावेश आहे.

सेवा तसेच आध्यात्मिक ☞ (पान २ वर)

# वाढत्या थंडीत हौशी मराठी राज्य नाटय स्पर्धेला प्रेक्षकांचा वाढता प्रतिसाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित ६४ वी हौशी राज्य नाट्य स्पर्धा प्राथमिक फेरी अमरावती येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पं. दे. मेडिकल कॉलेज परिसर येथे दि.१४ पासून सुरवात झाली असून वाढत्या थंडीत सादर होणाऱ्या नाटकांना प्रेक्षकांचा प्रतिसाद सुद्धा वाढतो आहे . शनिवारी (दि.२२) पंचशील बहुउद्देशीय संस्था, परतवाडा या



संस्थेचे उत्तरायण हे फक्त २ कलावंतांचा सहभाग असलेले गणेश वानखडे लिखित आणि दिग्दर्शित नाटक सादर झाले. या नाटकात गणेश वानखडे यांनीच अभिनय सुद्धा केला असून अनुराधा वाठोडकर यांनी स्त्री भूमिका साकारली आहे.

फक्त दोनच कलावंत असलेल्या या नाटकाचे नेपथ्य - संजय काळे, पार्श्व संगीत - वैभव ओगले, प्रकाशयोजना - सौरभ शेंडे, रंगभूषा - सानवी वानखेडे आणि वेशभूषा - वैभवी शेळके यांनी केली आहे.

पडदा वर जाताच प्रेक्षासमोर न्यायपालिकेच्या परिसरातील बागेचे दृश्य दिसायला लागते जिथे फक्त एक बेंच आणि दोन मोडे ठेवलेले असतात. जिथे नाट्य घडत जाते. पती - पत्नीच्या ☞ (पान २ वर)

# राजू बाविस्कर यांच्या 'काळया निळया रेषा 'या आत्मकथनावर आज चर्चासत्र

**अमरावती/प्रतिनिधीः-** सत्यशोधक लहूजी साळवे यांच्या जयंती निमित्त, स्मृतीशेष खैरूजी गंगाराम इंगोले यांच्या द्वितीय स्मृती दिना निमित्त आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार यांच्या बँड कलावंत मातंग समाजाच्या दु:ख वेदनेला अधोरेखित करणा-या 'काळ्या निळ्या रेषा' या आत्मकथनावर चर्चासत्र व प्रकट मुलाखत कार्यक्रमाचे आयोजन अमरावती येथे रविवार दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता तक्षशीला महाविद्यालय श्याम नगर येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अमरावतीचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी प्रा डॉ.बाळकृष्ण सरकटे विचारवंत व लेखक यवतमाळ हे राहणार आहेत .या चर्चासत्रात या आत्मकथनावर भाष्य करण्यासाठी साहित्याच्या अभ्यासक व



सामाजिक कार्यकर्त्या प्र.डॉ. नंदाताई तायवाडे, प्रा. दीपक वानखडे महात्मा फुले महाविद्यालय अमरावती, प्रा.छायाताई बडगे संशोधक विद्यार्थी व साहित्याचे अभ्यासक, राजाभाऊ हातागडे संशोधक विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणुन या आत्मकथनाचे लेखक राजीव बाविस्कर जळगाव हे स्वतः उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ बी.टी.अंभोरे, प्रा. डॉ. विजय खडसे, सुधीर कुमार स्वर्गीय, गोपाल आमटे, सुनील हिवराळे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात☞ (पान २ वर)

# खल्लार येथे आसरा मेडीकोजचा आज शुभारंभ

**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार येथील मुख्य बाजार चौकात एका नविन




मेडिकलचे ग्राहकांच्या सेवेत आगमन होत आहे. जुमळे परिवारातील दर्शन ज्ञानेश्वर जुमळे यांचे नविन प्रतिष्ठान आसरा मेडीकोज हे आज (दि.२३) पासून सुरु होत आहे. जुमळे परिवाराच्या या नविन प्रतिष्ठानच्या शुभारंभास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जुमळे परिवाराने केले आहे.

## उषाताई देशपांडे यांचे निधन

अमरावती : स्व. ॲड. कृष्णराव देशपांडे यांच्या सुविद्य पत्नी, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती (निवृत्त) रवी देशपांडे, प्रसिद्ध सनदी लेखापाल राजीव देशपांडे आणि हेमा संजय पांगारकर यांच्या मातोश्री उषाताई कृष्णराव देशपांडे यांचे दिनांक २२ रोजी नागपूर येथे देहावसान झाले.

# शिंदे सेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख घोषित


## आ.नरेंद्र भोंडेकरांवर अमरावतीची जबाबदारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे सेनेच्यावतीने संघटनात्मक घोषणा केली आहे. त्यानुसार ४० जिल्हासाठी निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा संपर्कप्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे. पार्टीने वरिष्ठ नेता, आमदार खासदार यांच्यावर ही जबाबदारी टाकली

### वाशिम जगदीश गुप्ता, अकोला अभिजीत अडसूळ यांच्याकडे




आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका होईपर्यंत त्यांना



जिल्ह्यामध्ये राहण्याचे निर्देश देण्यात आले आहे. अमरावती जिल्ह्याची जबाबदारी भंडारा चे आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्यावर सोपविण्यात ☞ (पान २ वर)

# अचलपूरमध्ये २२९ जन्म दाखले रद्द

## भाजप नेता किरीट सोमय्या यांचा दावा

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर नगर परिषदेच्या वतीने सीआरएस पोर्टलवर जारी केलेल्या जन्म दाखल्यामधून २२९ जन्म दाखले रद्द करण्यात आले असल्याची माहिती भाजपा नेता किरीट सोमय्या यांनी दिली आहे. त्यांनी सांगितले की अचलपूर नगरपालिका जन्ममृत्यू विभाग प्रमुख एस एस बोबडे यांनी त्यांना दिलेल्या पत्रामध्ये माहिती दिली आहे की नगर परिषदेच्या सीआरएस पोर्टलवर २२९ जन्म दाखले रद्द करण्यात आले आहे. तसेच हिंगोली मध्ये ५८१ आणि नांदेडमध्ये ८२ अवैध दाखले रद्द झाले आहे.नांदेड जिल्हा परिषद आरोग्य विभाग द्वारा कम्प्युटर ऑपरेटर याला सेवेतून बरखास्त करण्यात आले आहे. या संदर्भात आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी सोमय्यांना माहिती दिली आहे. हिंगोली मध्ये ५८१ जन्म आणि ३३ मृत्यू प्रमाणपत्र रद्द झाले आहे. किरिट सोमय्या गेल्या काही ☞ (पान २ वर)



विनीत
श्री. ज्ञानेश्वर रा. जुमळे, सौ अलकाताई ज्ञानेश्वर जुमळे
श्री किशोर म. महानकर, सौ सोनालीताई कि. महानकर





सारांश
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
रविवार,२३ नोव्हेंबर२०२५ E-paper - www.janmadhyam.com


# बदलत्या दहशतवादाचे आव्हान


डॉ. सुनीलकुमार गुप्ता


भारत दशकानुदशके दहशतवादाच्या धोक्याशी झुंज देत आला आहे, परंतु या धोक्याचे स्वरूप आता बदलले आहे. १९८०-९० च्या दशकात प्रथम पंजाब, नंतर जम्मू-कश्मीरमध्ये पसरलेला दहशतवाद आज देशाच्या अनेक राज्यांमध्ये व शहरांमध्ये सक्रिय वा सुप्त स्वरूपात रुजला आहे. लष्कर-ए-तय्यबा आणि जैश-ए-मोहम्मदसारखे नॉन स्टेट ॲक्टर्स आता केवळ सीमेपलीकडूनच नव्हे, तर स्थानिक नेटवर्क, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सूक्ष्म आर्थिक मार्गांनी 'प्रॉक्सी वॉरफेअर'च्या माध्यमातून देशाच्या आतपर्यंत पोहोचत आहेत. लाल किल्ल्यानजीक झालेल्या स्फोटाने हे दाखवून दिले आहे.

ह तपासानंतरच्या पुनरावलोकन अहवालांचा उपयोग प्रशिक्षण, शहरी सुरक्षा नकाशे तयार करणे आणि गुप्तचर व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी केला जाऊ शकतो. आता केवळ तपासावर लक्ष केंद्रित करून चालणार नाही तर पूर्वानुमानाधारित पोलिसिंगवर (प्रेडिटिव्ह पोलिसिंग) लक्ष केंद्रित केले पाहिजे. या क्षेत्रात तंत्रज्ञान निर्णायक ठरणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ड्रोन निरीक्षण आणि डिजिटल फॉरेन्सिक यांसारखी साधने पोलिसिंगला नव्या दिशेने नेत आहेत. नॅटग्रिडच्या पुढच्या टप्प्यात राज्यांच्या डेटानेटस्नाही जोडले जाणार आहे, ही संपूर्ण रचना अधिक सशक्त करणारी ठरेल. परंतु शेवटी सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मानवी घटक. जमिनी स्तरावर तैनात अधिका-यांची जागरुकता, तपास अधिका-यांची दूरदृष्टी आणि विविध यंत्रणांतील समन्वयच कोणतीही आपत्ती टाळू शकतो. तंत्रज्ञान सहाय्य करू शकते, परंतु प्रत्यक्ष जमिनीवरील कार्य मानवी बुद्धीच पार पाडते.

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेला स्फोटाने देश पुन्हा हादरला. भारतासारख्या विशाल लोकशाही राष्ट्रात शांतता टिकवून ठेवण्यासाठी सातत्यपूर्ण जागरुकतेची आवश्यकता असते, हे या स्फोटाने पुन्हा एकदा दाखवून दिले. या हल्ल्याकडे केवळ हिंसाचार म्हणून पाहून चालणार नाही, तर भीतीद्वारे अस्थिरता पसरवू पाहणा-या शक्तींकडून दिलेला हा एक नियोजित संदेश आहे. राष्ट्रीय तपास संस्था, दिल्ली पोलिसांची विशेष शाखा आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षक (एनएसजी) यांच्या पथकांनी कसून तपास सुरू केला आहे. प्राथमिक अहवालांनुसार या स्फोटात वापरण्यात आलेली 'इम्प्रोव्हाइज्ड एस्प्लोसिव्ह डिव्हाइस' (आयईडी) अत्यंत नियोजनपूर्वक बसविण्यात आली होती. महत्त्वाची बाब म्हणजे हरियाणा आणि उत्तर प्रदेश येथे मोठय़ा प्रमाणात स्फोटक सामग्री जप्त करण्यात आली होती, जी याच कटाचा एक भाग असल्याचे दिसते.


भारत दशकानुदशके दहशतवादाच्या धोक्याशी झुंज देत आला आहे, परंतु या धोक्याचे स्वरूप आता बदलले आहे. १९८०-९० च्या दशकात प्रथम पंजाब, नंतर जम्मू-कश्मीरमध्ये पसरलेला दहशतवाद आज देशाच्या अनेक राज्यांमध्ये व शहरांमध्ये सक्रिय वा सुप्त स्वरूपात रुजला आहे. लष्कर-ए-तय्यबा आणि जैश-ए-मोहम्मदसारखे नॉन स्टेट ॲक्टर्स आता केवळ सीमेपलीकडूनच नव्हे, तर स्थानिक नेटवर्क, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सूक्ष्म आर्थिक मार्गांनी 'प्रॉक्सी वॉरफेअर'च्या माध्यमातून देशाच्या आतपर्यंत पोहोचत आहेत. लाल किल्ल्यानजीक झालेल्या स्फोटाने हे दाखवून दिले


भारतात १९८०-९० च्या दशकात प्रथम पंजाब, नंतर जम्मू-कश्मीरमध्ये पसरलेला दहशतवाद आज देशाच्या अनेक राज्यांमध्ये व शहरांमध्ये सढिय वा सुप्त स्वरूपात रुजला आहे. लष्कर-ए-तय्यबा आणि जैश-ए-मोहम्मदसारखे नॉन स्टेट ॲक्टर्स केवळ सीमेपलीकडूनच नव्हे, तर स्थानिक नेटवर्क, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सूक्ष्म आर्थिक मार्गांनी 'प्रॉक्सी वॉरफेअर'च्या माध्यमातून देशाच्या आतपर्यंत पोहोचत आहेत.

आजचा दहशतवाद हा सीमांच्या पलीकडे गेला आहे. युरोप, मध्य पूर्व आणि दक्षिण आशियामध्ये आपण पाहतो आहोत की, प्रॉक्सी वॉर हे सामान्य बनले आहे. यामध्ये विचारधारा आणि तंत्रज्ञान यांचा वापर शस्त्र म्हणून केला जात आहे. या अस्थिर भौगोलिक प्रदेशाच्या मध्यभागी असलेल्या भारताला या बहुपेडी आव्हानांचा दररोज सामना करावा लागतो. लाल किल्ल्याजवळ झालेला हा हल्ला केवळ जीवितहानीसाठी नव्हता, तर राष्ट्राच्या प्रतीकांवर आणि जनसुरक्षेवरील विश्वासावर प्रहार करण्याचा प्रयत्न होता.

दहशतवादाचा वित्तपुरवठा, अवैध शस्त्रास्त्रांचे जाळे, धार्मिक कट्टरतावादी, मूलतत्त्ववादी साहित्य आणि सायबर गुन्हे या जागतिक धोक्यांनी सर्व देशांना आत्मसुरक्षेकडे आणि राष्ट्रीय हितसंरक्षणाकडे अधिक लक्ष केंद्रित करण्यास भाग पाडले आहे. भारताची अंतर्गत सुरक्षा धोरणेही या बदलाचे प्रतिबिंब आहेत. मागील दोन दशकांत देशाने एक एकात्मिक सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली उभारली आहे. राज्य पोलीस दल, केंद्रीय संस्था आणि अर्धसैनिक संघटनांमध्ये आता तत्काळ माहितीविनिमय आणि स्पष्ट आदेश साखळी निर्माण झाली आहे.

लाल किल्ल्याच्या घटनेनंतर ज्या वेगाने प्रतिसाद देण्यात आली, फॉरेन्सिक पथकांची तैनाती झाली आणि विभागांमध्ये समन्वय साधला ती भारताच्या सुरक्षाव्यवस्थेची विकसितता दर्शवते. एनआयए, मल्टी एजन्सी सेंटर आणि नॅशनल इंटेलिजन्स ग्रिड (नॅटग्रिड) यांसारख्या संस्थांची स्थापना या परिवर्तनाचा कणा ठरली. विशेषत नॅटग्रिडने स्थलांतर, बँकिंग, दूरसंचार आणि वाहतूक अशा अनेक मंत्रालयांतील आकडेवारी जोडून गुप्तचर संस्थांना संशयास्पद हालचालींचे डिजिटल ट्रेल काही मिनिटांत उपलब्ध करून देण्याची क्षमता निर्माण केली आहे. हरियाणा आणि उत्तर प्रदेशात एका दिवसात मोठय़ा प्रमाणात स्फोटक सामग्रीचा शोध लागणे ही या प्रणालीच्या कार्यक्षमतेची साक्ष आहे.



प्रत्येक राज्यात दहशतवादविरोधी दले (एटीएस), तत्पर प्रतिसाद पथके, फॉरेन्सिक तपास यंत्रणा आणि बॉम्ब निपियता तंत्रज्ञान उपलब्ध आहे. तपास अधिका?यांना मोबाईल फॉरेन्सिक साधने, प्रशिक्षण आणि नियमित मॉक ड्रिलच्या माध्यमातून सज्ज केले जात आहे. विशेषत दिल्ली, महाराष्ट्र, गुजरात आणि उत्तर प्रदेश यांनी दहशतवादविरोधी क्षमतेत आपले सामर्थ्य सिद्ध केले आहे.

लाल किल्ल्याचा स्फोटाने हे लक्षात आणून दिले आहे की सुरक्षा म्हणजे केवळ प्रतिक्रिया नव्हे, तर पूर्वानुमानदेखील आहे. आधुनिक दहशतवादी कमी खर्च, स्थानिक सामग्री आणि अनपेक्षित वेळ यांचा उपयोग करताहेत. पोलीस आणि गुप्तचर यंत्रणांसाठी खरी कसोटी म्हणजे असे नमुने आधीच ओळखणे. आपल्याला अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्रांकडूनही शिकण्याची गरज आहे. ९/११ च्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेने केवळ बाह्यच नव्हे, तर अंतर्गत सुरक्षा व्यवस्थाही इतकी सक्षम केली की तेथे अशा प्रकारची मोठी घटना पुन्हा घडलेली नाही. यामध्ये जनतेची भूमिकादेखील अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक दहशतवादी घटनांमध्ये स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेने आणि माहितीच्या आधारे निर्णायक परिणाम साधला आहे. आज सामुदायिक सहभाग हा अंतर्गत सुरक्षेचा अविभाज्य भाग बनला आहे. प्रत्येक दुर्घटना आपल्याला शिकवण देत असते. त्या शिकवणींना संस्थात्मक रूप देणे आवश्यक आहे.

लाल किल्ल्याजवळील या स्फोटाची चौकशी अद्याप सुरू आहे आणि पुढील काही दिवसांत सुरक्षा संस्था या हल्ल्याचे सूत्रधार आणि कारणे उघड करतील. भारताची अंतर्गत सुरक्षा यंत्रणा आज पूर्वीपेक्षा अधिक सक्षम आहे, पण धोकेही तेवढ्याच वेगाने रूपांतरित होत आहेत. दहशतवादी संघटना आता अधिक संघटित, आधुनिक तंत्रज्ञानसज्ज आणि संसाधनसंपन्न झाल्या आहेत. म्हणूनच पोलीस आधुनिकीकरण, फॉरेन्सिक विज्ञान आणि गुप्तचर सहकार्य यामधील गुंतवणूक दीर्घकालीन राष्ट्रीय प्राधान्य बनवणे आवश्यक आहे. सुरक्षेच्या क्षेत्रात आत्मसंतोषाला स्थान नाही. भारताची सुरक्षा प्रणाली आता केवळ प्रतिसादाची नव्हे, तर सहनशीलता आणि आत्मविश्वासाची प्रतीक बनली आहे. लाल किल्ला शतकानुशतके अनेक संकटांचा आणि इतिहासांचा साक्षीदार राहिला आहे. मात्र प्रत्येक वेळेस राष्ट्र अधिक बलवान बनून उभे राहिले आहे. यावेळीही तसेच होईल अशी अपेक्षा करूया.

# शेख हसीनांचे भवितव्य

सध्या भारताच्या आश्रयाला असलेल्या बांगला देशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना बांगलादेशातील लवादाने मानवतेच्या विरोधात अपराध केल्याच्या कारणावरून मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. त्यामुळे शेख हसीना यांचे एकूणच भवितव्य आता संकटात सापडले आहे. बांगलादेशात फेब्रुवारी महिन्यात सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत, त्या निवडणुकात भाग घ्यायला शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग पक्षाला या आधीच बंदी घालण्यात आली आहे. मुळात अवामी लीग या पक्षावरच तेथे बंदी लागू आहे त्यामुळे बांगलादेशात सत्तेवर येण्याचा त्यांचा मार्ग बंद झाला आहे.

बांगलादेशात जे नवीन सरकार सत्तेवर येईल ते सरकार या फाशीच्या शिक्षेच्या संबंधात काय निर्णय घेईल यावर बरेच काही अवलंबून आहे. स्वतः शेख हसीना यांनी हा निर्णय फेटाळून लावला असून आपल्या विरोधातील खटला हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयात चालवावा अशी मागणी त्यांनी केली आहे. शेख हसीना भारताच्या आश्रयाला असल्याने त्या जोपर्यंत येथे आहेत तोपर्यंत त्यांच्या जीविताला कोणताही धोका नाही, हे जरी खरे असले तरी त्या येथे परावलंबी किंवा परदेशी आश्रयावर किती दिवस राहणार हाही प्रश?न आहे. शेख हसीना या बांगलादेशच्या चार टर्म पंतप्रधान होत्या आणि पंतप्रधान पदाची त्यांची पाचवी टर्म सध्या सुरू होती. पण गेल्या वर्षी जुलै-ऑगस्ट महिन्यात त्यांच्या सरकारच्या विरोधात



आंदोलकांनी मोठा उठाव केला.

त्यावेळी त्यांनी आपल्या सरकारच्या विरोधातील आंदोलन शस्त्राच्या बळावर दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. आंदोलकांवर लष्कराकडून सर्रास गोळीबार केला गेला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका समितीच्या अहवालानुसार आंदोलकांवर करण्यात आलेल्या गोळीबारात सुमारे चौदाशे लोक ठार झाले आहेत. परंतु तरीही हे आंदोलन शमत नाही हे पाहिल्यानंतर स्वतः शेख हसीना या आपल्या काही सहकाऱ्यांसह भारतात पळून गेल्या. कालच्या घडामोडीनंतर त्यांचे बांगलादेशात परतणे जवळपास अशक्य झाले आहे. वास्तविक शेख हसीना यांनी अत्यंत समर्थपणे बांगलादेशचा राज्यकारभार चालवला आणि या देशाला त्यांनी बऱ्यापैकी आर्थिक सुस्थितीत आणून ठेवले.

इस्लामिक कट्टर पंथीयांचा मोठा प्रभाव असलेल्या या देशात शेख हसीना यांनी सेक्युलर पद्धतीने राज्यकारभार चालवताना समाजातल्या सर्व धर्मीयांना सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून दिली होती. त्यांच्या आवामी लीग या पक्षाचे नाव पूर्वी पूर्व पाकिस्तान अवामी मुस्लीम लीग असे होते, पण त्यांनी आपल्या पक्षाच्या नावातून मुस्लीम हा शब्द वगळला. त्यांच्या या कृतीतूनच त्यांची सेक्युलर प्रतिमा स्पष्ट होते. पाकिस्तान प्रमाणेच बांगला देशचा राजकीय इतिहासही रक्तरंजित राहिला आहे. शेख हसीना यांचे वडील शेख मुजीबुर रहमान यांनी बांगलादेश स्वतंत्र करण्यासाठी मोठेच योगदान दिले आहे. ते नंतर राष्ट्रप्रमुखही झाले; पण १९७५ मध्ये त्यांची हत्या करण्यात आली.

त्यावेळी त्यांच्या घरातील तब्बल १७ जणांना ठार मारले गेले. मात्र त्यावेळी हसीना आणि त्यांची बहीण रेहाना विदेशात असल्यामुळे त्या सुदैवाने बचावल्या. बांगलादेशच्या या आधीच्या पंतप्रधान बेगम खलिदा या बांगलादेशचे राष्ट्र प्रमुख झियाउर रहमान यांच्या कन्या आहेत. पण झियाउर रहमान यांचीही १९८१ मध्ये हत्या झाली. बांगलादेशचा राजकीय इतिहास या दोन महिला नेत्यांच्या नेतृत्वाखालील राजकारणाच्या अनेक रंजक घडामोडीने व्यापला आहे. आज शेख हसीना यांचे राजकीय भवितव्य अंधुक दिसत असले तरी बेगम खलिदा जिया मात्र बांगलादेशातील राजकारणात अजूनही सक्रिय आहेत. अर्थात आज त्यांची प्रकृती त्यांना साथ देत नाही.

त्यामुळे येत्या फेब्रुवारीत बांगलादेशात निवडणूक झाल्या आणि त्यांचा पक्ष सत्तेवर आला तरी त्या पुन्हा पंतप्रधान होण्याची शक्यता कितपत आहे याची शंका आहे. सध्या बेगम खलिदा झिया यांचा मुलगा तारीख रहमान हा आपल्या पक्षाची धुरा सांभाळतो आहे. फेब्रुवारीतील निवडणुकीनंतर बांगलादेशात सत्तेवर येणाऱ्या सरकारवर शेख हसीना यांचे भवितव्य अवलंबून आहे. भावी सरकार उदारमतवादी असले तरच शेख हसीना यांच्या मृत्युदंडाच्या शिक्षेबाबत फेरविचार होऊ शकतो, अन्यथा त्यांचे भवितव्य अंधकारमय आहे हे मात्र निश्चित.

# स्थानिक निवडणुकांची मोर्चेबांधणी

राज्यात २९ महानगरपालिका, ३२ जिल्हा परिषदा, ४२ नगर पंचायत, ३३६ पंचायत समिती आणि २४६ नगरपरिषदा आहेत. सध्या नगरपालिका, नगर परिषद आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकीला गती आली आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांचा व्यापही मोठा आहे आणि मतदारयाद्यांपासून मतदान केंद्रे, मतदान यंत्रे ही सर्व व्यवस्था करण्याचे मोठे आव्हान राज्य निवडणूक आयोगासमोर असेल. साहजिकच एका टप्प्यात सर्व निवडणुका होण्याचा संभव कमी. वेगवेगळ्या टप्प्यांत त्या होऊ शकतात. एक खरे; या निवडणुकांसाठी सर्वच राजकीय पक्ष आता कामाला लागले आहेत. २०२४ सालच्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीची कामगिरी सुमार होती; पण गेल्या वर्षीच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र महायुतीने भरघोस यश मिळवून लोकसभा निवडणुकीतील अपयश धुऊन काढले होते.




तथापि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची समीकरणे अगदी निराळी असतात. त्यातही शहरी आणि ग्रामीण भागातील राजकारण हे निरनिराळ्या पद्धतीने चालते. त्यामुळेच नगरपालिका वा जिल्हा परिषदा या निवडणुका एकत्रित लढवायच्या की स्वतंत्रपणे याचा पेच सर्वच राजकीय पक्षांसमोर असेल. या निवडणुका लढवताना सर्वच पक्षांच्या ताकदीचा कस लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शेवटच्या निवडणुका झाल्या त्या २०१५ ते २०१८ या काळात. त्यावेळी असणारे राजकीय चित्र आणि आताचे राजकीय चित्र यात जमीन अस्मानाचा फरक पडला आहे.

मुख्य फरक म्हणजे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांत पडलेली फूट. दोन्ही पक्षांचा एकेक गट सत्तेत तर एकेक गट विरोधकांत आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका जरी अशाच लढविल्या गेल्या असल्या, तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत युती वा आघाडी म्हणून निवडणुका लढविणे वाटते तितके सोपे नाही. नगरपालिका निवडणुकांसाठी काही ठिकाणी युतीची समीकरणे जुळत आहेत. अनेक ठिकाणी उमेदवारी अर्जही दाखल केले जात आहेत. काही ठिकाणी अनपेक्षित युतीही दिसून येत आहे. मात्र उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने आघाडीत निवडणूक लढविण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्यावर ते अद्याप तरी ठाम आहेत असे दिसते. शिवाय काँग्रेसच्या विरोधामुळे मनसे आता काय भूमिका घेणार याकडेही लक्ष आहे.

अर्थात, त्यात आश्चर्यकारक असे काही नाही. राज्यातील महापालिकांचा विचार केला तरी गेल्या निवडणुकांत राज्यभर एकसारखे चित्र दिसत नाही. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली येथे मुख्यतः शिवसेनेचा दबदबा होता- अर्थातच अविभाजित शिवसेनेचा. मुबंईत भाजपने देखील २०१७ सालच्या निवडणुकीत ८२ जागा जिंकल्या होत्या. नवी मुंबईत अविभाजित राष्ट्रवादी काँग्रेसने बाजी मारली होती, तर उल्हासनगर येथे भाजपला सर्वाधिक जागा जिंकता आल्या होत्या. भिवंडीमध्ये काँग्रेसचा बोलबाला होता तर वसई-विरार येथे बहुजन विकास आघाडीने एकहाती सत्ता मिळविली होती. आता फूट पडलेल्या पक्षांनी तोच आधार मानून जास्त जागांची मागणी केली तर जागावाटप हा वादाचा मुद्दा होणार यात शंका नाही.

उदाहरणार्थ, मुंबईत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने भाजपकडे अधिक जागांची मागणी करण्यासाठी दबाव वाढविला आहे अशी वदंता आहे. त्यास भाजप राजी झाला तर भाजपला २०१७ ची पुनरावृत्ती करणे अशक्य होईल. मात्र शिवसेनेत फूट पडल्यानंतर मूळच्या शिवसेनेतून मोठ्या प्रमाणावर नगरसेवक आपल्या पक्षात आले असल्याचा शिंदे यांचा जागा मागण्यासाठीचा युक्तिवाद असणार. हे नगरसेवक आले ते आपल्याला पुन्हा संधी मिळावी यासाठीच हे निराळे सांगावयास नको.

# सोनाक्षी सिन्हाने ३० किलो वजन कमी करण्यासाठी .....

दबंग गर्ल सोनाक्षी सिन्हा आणि तिचा पती झहीर इक्बाल कायमच आपले रिल्स आणि त्यांच्या व्हिडीओद्वारे मनोरंजन करत असतात. सध्याच्या घडीला आपल्याला दिसणारी ही फीट सोनाक्षी कोणेकाळी चांगलीच जाडी होती. वजन कमी करण्याचे मनावर घेतल्यावर सोनाक्षीने सर्वात महत्त्वाचा पर्याय निवडला तो पिलेट्सचा. सोनाक्षीचे वजन हे आधी ९५ किलो होते. ते आता सध्याच्या घडीला ६० इतके झालेले आहे.

सोनाक्षीने तिच्या वजन कमी करण्याविषयी मुद्द्यावर भारती टीव्ही पॉडकास्टवर अनुभव सांगितला. हर्ष लिंबाचिया आणि भारती सिंग यांच्यासोबत गप्पा मारताना तिने विविध विषयांवर गप्पा मारल्या. यामध्ये खासकरुन तिने वजन कसे कमी केले यावेळी तिला कोणत्या गोष्टींमधून जावे लागले अशा विविध गोष्टींवर चर्चा केली.

सोनाक्षी म्हणते, कोणत्याही व्यक्तीसाठी, वजन कमी करण्याचा प्रवास आव्हानात्मक असतो. वजन कमी करण्यासाठी दृढनिश्चय आणि उत्साहाची आवश्यकता असते. मी लहानपणापासूनच जाड असल्याने, वजन कमी करण्यासाठी मला प्रचंड मेहनत घ्यावी लागली होती. मला वजन करण्यासाठी तब्बल अडीच वर्षे घालवावी लागली होती.

सोनाक्षी १८ वर्षांची असताना ट्रेडमिलवर ३० सेंकंद सुद्धा धावू शकत नव्हती. त्यानंतरच तिने ठरवलं की, हे असे जीवन जगायचे नाही. यावर अधिक बोलताना सोनाक्षी म्हणते, वजन कमी करण्याच्या विचाराने तुमचे वजन कमी होत नाही. म्हणूनच तिने योगा, जिम आणि कार्डिओ व्यायामापासून ते पायलेट्स आणि वेट ट्रेनिंगपर्यंत सर्व काही करून पाहिले.दबंग गर्लने ३० किलो वजन कमी करण्याबद्दल सविस्तर सांगितले. ती म्हणाली, 'मी सहा महिन्यांपूर्वी पिलेट्स करायला सुरुवात केली आणि ते मला खरोखरच जमले. त्या मशीनवर तुम्ही हजारो व्यायाम करू शकता, त्यामुळे ते कधीही कंटाळवाणे नसते. आपण दररोज काहीतरी नवीन करू शकतो. म्हणूनच मला पिलेट्स रिफॉर्मरवर व्यायाम करायला आवडते. 'सध्या तिचे थोडे वजन वाढल्यामुळे, ती गरोदर असल्याच्या अफवा या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहेत. या प्रश्नावर ती हसत म्हणाली, 'मी १६ महिन्यांपासून गरोदर आहे,'

# 'महावतार' चित्रपटासाठी विकी कौशलने केला मद्यपान आणि मांसाहाराचा त्याग





सध्याच्या घडीला बॉलीवूडमध्ये विकी कौशलचा दबदबा निर्माण झालेला आहे. 'छावा' या चित्रटानंतर विकी कौशल हा ए श्रेणीतील कलाकारांमध्ये गणला जाऊ लागला आहे. त्यामुळेच विकीची मानधनाची रक्कमही आता चांगलीच वाढली आहे. बॉलीवूडमध्ये भाव वधारल्यानंतर, विकीने आपल्या अभिनय कौशल्याकडे आणि पात्राकडे सर्वाधिक लक्ष केंद्रीत केले आहे.


आगामी 'महावतार' चित्रपटात विकी हा विष्णू देवांच्या सहाव्या अवतारामध्ये आपल्याला दिसणार आहे. विकीने परशुरामाची भूमिका वठवण्यासाठी केवळ लूकवर मेहनत घेतली नाही. तर या चित्रपटासाठी त्याने मांसाहार आणि मद्यपानाचाही त्याग केला आहे.

महावतार या चित्रपटाचा पहिला लूक देखील समोर आला आहे.

अलीकडे कलाकार त्यांच्या भूमिकांबाबत हे प्रचंड सजग झालेले दिसून येत आहे. नितेश तिवारीच्या रामायणाच्या भाग १ मध्ये काम करताना रणबीर कपूरनेही मांसाहार आणि मद्यपानाचा त्याग केला होता.

महावतार संदर्भात या चित्रपटाचा दिग्दर्शक अमर कौशिक याने स्वतःही मांसाहार आणि मद्यपानाचा त्याग केल्याचे आता समोर आलेले आहे. त्यामुळे सध्या विकी कौशलच नाही तर दिग्दर्शक अमर कौशिकनेही 'महावतार'साठी मांस आणि मद्य सोडल्याचे वृत्ताची जोरदार चर्चा सुरु आहे. महावतारची घोषणा गेल्या वर्षी करण्यात आली होती. मॅडॉक फिल्म्स या चित्रपटाची निर्मिती करत असून, २०२६ च्या डिसेंबर महिन्यात हा चित्रपट प्रदर्शित होणार होता. परंतु आता मात्र हा चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित होणार असल्याचे वृत्त आहे.

# अभिनेत्री परिणीती चोप्राने दाखवली मुलाची पहिली झलक




बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री परिणीती चोप्रा विविध कारणामुळे नेहमी चर्चेत असायची. तिचा चाहतावर्ग देखील मोठा आहे. राघव चड्डासोबत लग्नबंधनात अडकल्यानंतर परिणीती मोठ्या पडद्यावर झळकली नाही. तिला पुन्हा मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहते आतुर झाले आहेत. पण ती पुन्हा कधी कमबॅक करणार याबद्दल कोणतीही माहिती समोर आलेली नाही. मात्र, परिणीतीने सोशल मीडियावर एक फोटो पोस्ट केला आहे. या फोटोवर नेटकऱ्यांनी भरभरून कमेंट्स केल्या आहेत.

काही दिवसांपूर्वीच अभिनेत्री परिणीती चोप्रा आणि राघव चड्डा आईबाबा झाले आहेत. दोघेही याचा आनंद घेत आहेत. १९ ऑक्टोबरला परिणीतीने गोंडस बाळाला जन्म दिला. जन्मलेले बाळ मुलगा असून या बाळाची पहिली झलक परिणीतीने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून शेअर केली आहे. एका महिन्यानंतर परिणीतीने बाळाचा झलक दाखविली आहे. या फोटोला सुंदर कॅप्शन देत अभिनेत्रीने बाळाचे नावही जाहीर केले आहे.

परिणीतीसोबतच राघव यांनी देखील त्यांच्या सोशल मीडियावरुन आपल्या चिमुकल्यासोबतचे सुंदर फोटो शेअर केले आहेत. या फोटोंकडे पाहून परिपूर्ण कुटुंब असल्याची भावना चाहत्यांनी व्यक्त केली आहे. 'जलस्य रूपम्, प्रेमस्य स्वरूपम् तत्र एव नीर', असे कॅप्शन दिले आहे. त्यांनी आपले मुलाचे नाव नीर ठेवले आहे. या नावाचा अर्थही परिणीतीने सांगितला आहे. 'आमच्या हृदयाला जीवनाच्या या शाश्वत थेंबात शांतता मिळाली. आम्ही त्याचं नाव ठेवलं 'नीर' शुद्ध, दिव्य, आणि असीम', असे तिने पोस्टमध्ये म्हटले आहे.

२०२३ मध्ये परिणीती चोप्रा आणि राधव चड्डा लग्नबंधनात अडकले. ऑगस्ट महिन्यात परिणीतीने गरोदर असल्याचे सांगितले होते.


# 'धुरंधर'चा ट्रेलर पाहून प्रेक्षकांच्या अंगावर अक्षरशः काटा




'द सर्जिकल स्ट्राइक' या सुपरहिट चित्रपटातून देशभर 'द सर्जिकल स्ट्राइक' फेम मिळवलेले दिग्दर्शक आदित्य धर यांच्या आगामी 'धुरंधर' या चित्रपटाचा बहुप्रतिक्षित ट्रेलर अखेर प्रदर्शित झाला आहे. हा ट्रेलर प्रदर्शित होताच, प्रेक्षकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. जवळपास ४.०७ मिनिटांच्या या ट्रेलरमध्ये जबरदस्त ॲक्शन आणि प्रत्येक कलाकाराचा 'खतरनाक' अवतार पाहायला मिळतोय. हा थरार अनुभवताना अक्षरशः अंगावर काटा येतो. आदित्य धर यांनी या चित्रपटात जबरदस्त ॲक्शन आणि तगडी स्टारकास्ट यांचे समीकरण उत्तम जुळवण्यात यश मिळवले आहे, हे ट्रेलर पाहून स्पष्ट होते. आदित्य धर यांनी पुन्हा एकदा पाकिस्तान आणि दहशतवाद या ज्वलंत विषयांवर आधारित कथा प्रेक्षकांच्या भेटीला आणली आहे आणि त्यात मल्टीस्टार कलाकारांचा तडकासुद्धा आहे. ट्रेलर पाहिल्यानंतर अनेक सिनेरसिकांनी आणि चाहत्यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली असून, या चित्रपटाबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.दिग्दर्शक आदित्य धर यांच्या 'धुरंधर' चित्रपटाचा जवळपास चार मिनिटांचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून, यामध्ये प्रेक्षकांना अर्जुन रामपाल, अक्षय खन्ना, आर. माधवन, संजय दत्त आणि रणवीर सिंह यांच्यासारख्या तगड्या कलाकारांच्या भूमिकांची झलक पाहायला मिळते. ट्रेलरवरून प्रत्येक भूमिकेला पडद्यावर चांगला स्क्रीनटाइम मिळाला असेल, हे स्पष्ट होते. या चित्रपटात अक्षय खन्ना आणि अर्जुन रामपाल यांच्या खलनायकी भूमिका अत्यंत क्रूर आणि भयानक असल्याचे दिसून येते.

खलनायक माणसांना जणू बाहुल्याच समजतात आणि त्यांच्यावर अत्याचार करतानाचे सीन्स पाहून अक्षरशः अंगावर काटा येतो. ट्रेलरच्या सुरुवातीलाच हा चित्रपट वास्तविक कथेवर आधारित असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अर्जुन रामपाल हा एका अत्यंत हिंसक पद्धतीने ओळख करून दिलेल्या मेजर इक्बाल नावाच्या आयएसआय एजंटच्या भूमिकेत आहे.

# 'आजकाल मला सेटवर खूप भीती वाटते......




आर माधवन बॉलीवूड मधील लोकप्रिय अभिनेता आहे. आजवर त्याने अनेक चित्रपटांत काम केलं आहे. करिअरच्या सुरुवातीलाच त्याने त्याच्या हटके स्टाईलने अनेकांची मनं जिंकली होती. त्याला त्याचे चाहते लाडाने मॅडी म्हणतात. आर माधवनने अभिनयाचा कोणताही वारसा नसताना इंडस्ट्रीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली.

आर माधवनने फक्त बॉलीवूडमध्येच नाही तर इतर भाषेतील चित्रपटांतही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. मणी रत्नम ते राजकुमार हिराणी यांसारख्या अनेक लोकप्रिय दिग्दर्शकांबरोबर त्याने काम केलं आहे.

पुढच्या वर्षी त्याला अभिनय क्षेत्रात ३० वर्ष पूर्ण होणार आहेत. अशातच त्याने प्रत्येक चित्रपटाच्या सुरुवातीला त्याला भीती वाटते असं सांगितलं आहे.

**आर माधवनची प्रतिक्रिया**

'मिर्ची प्लस'सह संवाद साधताना त्याने याबद्दल सांगितलं आहे. आर माधवन म्हणाला, 'आजकल मी सेटवर जातो तर मला खूप भीती वाटते. मला सेटवर पहिल्या दिवशी सगळे बघून, मॅडी संपला, आता याला अभिनय येत नाही. असं म्हणत असतील असं वाटतं. मला असं वाटतं की माझे असिस्टंट माझ्याकडे बघून बोलतात की, आता वेळ आली आहे, दुसऱ्या कोणाला तरी संधी देण्याची. याला काही येत नाही. माझी ही भीती प्रत्येक चित्रपटाच्या वेळी वाढत जाते.'

आर माधवनने पुढे अजय देवगणबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला आहे. तो म्हणाला, 'जेव्हा मी त्याच्याबरोबर शैतानमध्ये काम केलं. तेव्हा मला वाटलं की मी त्याला एकटंच सोडायला हवं, त्याला कदाचित फार बोलायला आवडत नाही. पण, एकदा त्याची ओळख झाली की तो खूप छान वाटतो, खूप गोष्टींबद्दल बोलतो, तो समजून घ्यायला थोडा वेळ घेतो. त्याच्यामध्ये एक निरागसता आहे. मला त्याचा खूप अभिमान वाटतो.'

माधवनने यापूर्वी चित्रपटांमधून ब्रेक घेण्याबद्दलही सांगितलेलं. त्याच्याकडे येणाऱ्या भूमिकांबरोबर तो कनेक्ट होत नसल्याने त्याला २-३ वर्षांचा ब्रेक घ्यायचा होता. याबद्दल तो म्हणालेला, 'मला ब्रेक घ्यायचा होता, कारण मला माझ्या कामामुळे खूप विचित्र वाटत होतं. मी एका तामिळ गाण्यासाठी स्वीत्झर्लंड येथे शूटिंग करत होते त्यावेळी मी नारंगी रंगाची पँट आणि हिरव्या रंगाचं शर्ट घातलेलं आणि तेव्हा तेथील एक शेतकरी माझ्याकडे रागाने बघत होता आणि बडबड करत होता त्यावेळी मी त्याच्याकडे पाहिलं आणि म्हणालो, तू चेन्नईमध्ये ये मग कळेल तुला मी कोण आहे. मी खूप रागावलेलो, पण, मला नंतर जाणवलं की मी त्याला खूप महत्त्व देत आहे.'आर माधवनला जरी कामामुळे भीती वाटत असली तरी यावर्षी मात्र त्याने अनेक चित्रपटांत महत्त्वपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. त्याने 'केसरी चॅप्टर २'मध्ये अक्षय कुमार आणि अनन्या पांडेबरोबर महत्त्वपूर्ण भूमिका साकारली. या चित्रपटाला प्रेक्षकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला. यानंतर त्याने 'आप जैसा कोई'मध्येही मुख्य भूमिका साकारली

# टीव्ही अभिनेत्री रुपल त्यागीने केला साखरपुडा




अभिनेत्री रुपल त्यागीला 'सपने सुहाने लडकपन के' या मालिकेमुळे मोठी लोकप्रियता मिळाली. यात तिने गुंजन नावाच्या भूमिका साकारली होती. मात्र यानंतर ती लाईमलाईटमध्ये दूर राहिली, याच दरम्यान आता रुपल तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. रुपल हिने गुपचूप साखरपुडा उरकला असून याचे फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

रुपल हिने बॉयफ्रेंड नोमिश भारव्दाजसोबत साखरपुडा केला आहे. नोमिशनं गोव्यात रूपलला प्रपोज केलं. ज्याचे फोटो तिने सोशल मिडियावर शेअर केले असून चाहत्यांकडून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. फोटो पोस्ट करत रुपल हिने भ्ंएष्ठ म्हणत नोमिश याला लग्नासाठी होकार दिला आहे.

रूपलनं एका मुलाखतीत सांगितलं की, 'नोमिशसोबत तीची ओळख एका कॉमन मित्रामुळं झाली. मी त्याला जेव्हा पहिल्यांदा भेटले तेव्हाचवाटलं की हाच तो माणूस आहे ज्याच्यासोबत आयुष्य घालवणार आहे.' नोमिश मुंबईचा असून सध्या लॉस एंजेलिसमध्ये काम करतो. दरम्यान, रुपल आणि नोमिश ५ डिसेंबर २०२५ मध्ये लग्न करणार असल्याची माहिती मिळत आहे.

रुपल त्यागी हिच्याबद्दल सांगायचं झालं तर, तिने 'कसम से', 'एक नई छोटी सी जिंदगी', 'हमारी बेटियों का विवाह' आणि 'सपने सुहाने लडकपन के' या टीव्ही मालिकांमध्ये काम केले आहे. याशिवाय ती 'झलक दिखला जा', 'बिग बॉस सीझन ९'मध्ये देखील दिसली.


# डायटिंग करताना ही ठरू शकते मोठी चूक?

कार्बोहायड्रेट कमी करून प्रथिनांचे सेवन जास्त केलं तर रक्तातील साखरेची पातळी आपोआप नियंत्रणात येते असे अनेकांना वाटते. पण, प्रत्यक्षात दूध, चिकन, अंडी किंवा डाळीसारखी प्रथिनेयुक्त अन्नपदार्थदेखील रक्तातील साखरेवर परिणाम करू शकतात. काही लोकांमध्ये तर प्रथिनेयुक्त आहार जास्त खाल्ल्यावरच इन्सुलिन अचानक वाढतं आणि रक्तातील साखरेची पातळी स्थिर न राहता उलट वाढायला लागते. या प्रक्रियेचा नेमका मेकॅनिझम काय आहे आणि प्रथिनेयुक्त अन्न खातानाही पोर्शन कंट्रोल म्हणजे योग्य प्रमाणात खाणे का गरजेचं आहे, यावर तज्ज्ञ काय सांगतात हे जाणून घेऊ या.

याबाबत माहिती देताना, दिल्ली अपोलो हॉस्पिटलच्या एंडोक्रायनॉलॉजीचे सीनियर कन्सल्टंट, डॉ. एस. के. वांगनू यांनी सांगितले की, 'माझ्याकडे एक रुग्ण आला होता, स्वतःची थोडीशी वाढती रक्तातील साखरेची पातळी आटोक्यात आणण्यासाठी तो कार्बोहायड्रेट आणि फॅट कमी करून प्रथिनेयुक्त आहार घेत होता. तो व्यायामही नियमित करत होता. पण, तरीही त्याच्या रक्तातील साखरेची पातळी कमी होत नव्हती. उलट काही दिवसांनी ते आणखी वाढत होते. हे पाहून एक मोठा प्रश्न पडला, जेव्हा कार्बोहायड्रेट कमी आहेत, फॅटस् कमी आहे आणि आहार व व्यायाम नीट आहे, तरीही रक्तातील साखरेची पातळी वाढते; असे का घडते ते समजून घ्या.

**इन्सुलिन आणि त्याची कारणं**

सामान्यतः पोषण आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणाच्या चर्चेत कार्बोहायड्रेट्सलाच जास्त महत्त्व दिले जाते, कारण ते थेट रक्तातील साखर वाढवतात. पण, एक महत्त्वाची गोष्ट अनेकदा दुर्लक्षित राहते — प्रथिनांमुळेही इन्सुलिन वाढू शकते आणि काही वेळा ते कार्बोहायड्रेटपेक्षा जास्त वाढू शकते. विशेषतः ६० ते ७५ ग्रॅमसारखे जास्त प्रमाणात प्रथिने एका जेवणात घेतल्यास शरीराच्या प्रतिदिन आवश्यक असलेल्या ६० ग्रॅम प्रथिनाच्या मर्यादेपेक्षा ते खूपच जास्त होते. अशा परिस्थितीत एका वेळी ७५ ग्रॅमपेक्षा जास्त प्रथिने खाल्ल्यास तुमची रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते.




कार्बोहायड्रेट्स रक्तातील साखर वाढवतात म्हणून स्वादुपिंड शरीरात इन्सुलिन सोडतो — हे सर्वांना माहीत आहे, पण काही प्रथिनेयुक्त पदार्थ रक्तातील साखर फारशी न वाढवता इन्सुलिनसाठी जबरदस्त सिग्नल देतात.

यामागचं मुख्य कारण म्हणजे अमिनो ॲसिड्स. ल्युसिन, आयसोल्युसिन, व्हॅलीन, लाइसिन आणि आर्जिनिन ही अमिनो ॲसिड्स इन्सुलिन वाढवण्यात खूप प्रभावी आहेत. जेव्हा ही अमिनो ॲसिड्स रक्तात प्रवेश करतात, तेव्हा ती स्वादूपिंडाला अतिरिक्त इन्सुलिन सोडण्याचा संदेश देतात.

अनेक वेळा हा प्रतिसाद कार्बोहायड्रेट्ससारखाच किंवा त्याहूनही जास्त असू शकतो. दीर्घकाळ असे घडू लागले तर स्वादूपिंडावर ताण येतो, इन्सुलिन सोडणाऱ्या पेशी थकतात आणि हळूहळू त्यांची कार्यक्षमता कमी होते. गंभीर परिस्थितीत त्या पेशींचा नाशही होऊ शकतो. इन्सुलिनचं संतुलित प्रमाण ठेवणं शरीराच्या रक्तातील साखरेच्या नियंत्रणासाठी खूप गरजेचं आहे.

**कोणत्या प्रथिनेयुक्त पदार्थांमुळे इन्सुलिन वाढू शकते**

**१. दुग्धजन्य पदार्थ (दूध, दही, चीज)**

हे प्रथिनांमध्ये समृद्ध असतात आणि इन्सुलिन वाढवणारे अमिनो ॲसिड्स मोठ्या प्रमाणात असतात. व्हे प्रथिने तर विशेषतः जोरदार इन्सुलिन प्रतिसाद निर्माण करतो,

म्हणूनच वर्कआउटनंतर दूध किंवा व्हे प्रोटीन घेतलं जातं—ते स्नायूंमध्ये पोषकद्रव्यं पोहोचवण्यासाठी इन्सुलिनचा वापर करते.

**२. अंडी**

कार्बोहायड्रेट्स कमी असले तरी अंडी ल्युसिन आणि लाइसिनने भरलेली असतात आणि हलका पण महत्त्वपूर्ण इन्सुलिन प्रतिसाद देतात.

**३. चिकन, टर्की, लीन मीट**

यामध्ये ल्युसिन आणि आर्जिनिन मोठ्या प्रमाणात असल्याने इन्सुलिन वाढतं. कार्बोहायड्रेट नसतानाही हे इन्सुलिन वाढवतात—विशेषतः जास्त प्रमाणात प्रथिनांचे सेवन केल्यास.

**४. मासे आणि समुद्री अन्न**

सॅल्मन, ट्युना, कॉड यांसारखे मासे हे प्रथिनांनी समृद्ध असतात आणि त्यातील आर्जिनिनमुळे इन्सुलिन वाढवतात.

**५. वनस्पतीजन्य प्रथिने (सोया, मसूर, मटार)**

सोया प्रथिनांमध्ये ब्रॅन्च्ड चेन अमिनो ॲसिड्स असल्यामुळे इन्सुलिन लक्षणीय वाढतं. म्हणजे कार्बोहायड्रेट कमी असलं तरी प्रथिनांमुळे इन्सुलिन वाढू शकतं.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते — प्रथिने हा निरुपद्रवी किंवा नेहमीच सुरक्षित असलेला घटक नाही. विशेषतः टाइप २ डायबिटीस किंवा इन्सुलिन रेझिस्टन्स असणाऱ्या व्यक्तींनी प्रथिनेही योग्य प्रमाणात सेवन करणे आवश्यक आहे.

प्रथिनांसह फायबर आणि हेल्दी फॅट्स घेतल्यास इन्सुलिनचा प्रतिसाद संतुलित करण्यास मदत होते.

खेळाडूंना किंवा स्नायू वाढवू इच्छिणाऱ्यांना हा इन्सुलिन प्रतिसाद फायदेशीरही ठरू शकतो, कारण इन्सुलिन पोषकद्रव्यं स्नायूंमध्ये पोहोचवून स्नायू निर्मितीत मदत करतो.

# थंडीतील योग्य आहार कोणता ?

हिवाळा हा आरोग्याच्या दृष्टीने अनुकूल असल्याने, या काळात पचायला जड असलेले गोड पदार्थ आणि बाजरीची भाकरी तुपासह खाल्ल्यास शरीरातील वात विकार कमी होतात, असा सल्ला वैद्य विजय कुलकर्णी यांनी दिला आहे.



यंदा पावसाळा लांबल्याने हिवाळ्याला दिवाळीनंतर सुरुवात झाली.. उत्तराखंडमधील वाऱ्यांमुळे राज्यातील काही भागात थंडीची लाट आली आहे. नाशिकमध्येही तापमान नऊ अंश सेल्सियसपर्यंत पारा घसरला. त्यामुळे अनेकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवत आहेत. संधीवात, दमा असे वेगवेगळे आजार डोके वर काढत आहेत.

हिवाळा खरे तर आरोग्याच्या दृष्टीने अतिशय अनुकूल असा काळ असतो. हिवाळ्यात हेमंत आणि शिशिर असे ऋतू येतात. सध्या हेमंत ऋतू आहे. पावसाळा संपल्यानंतर हळूहळू थंडीचा जोर वाढत असल्याने काही जणांना त्वचेला कोरडेपणा, डोके जड होणे, सर्दी, काहींना सांधेदुखीचा त्रास होण्याची शक्यता असते. विशेषत्वाने कफ आणि वात हे विकार हिवाळ्यात वाढतात. त्यामुळे हिवाळ्यात दररोज अंगाला थोडेसे तेल लावून आंघोळ करणे म्हणजेच अभ्यंगस्नान करणे हे आवश्यक असते.

अभ्यंगस्नान वर्षभर केले पाहिजे. त्यामुळे आपली त्वचा उत्तम राहते. वात विकार होत नाहीत. हिवाळ्यात आपल्याला भूकदेखील चांगली लागते. या अनुषंगाने आपला आहार आरोग्यदायी हवा. पचायला जड असे अन्न देखील या काळात त्रास देत नाही. म्हणून ज्यांना मधुमेह नाही, त्यांनी गोड चवीचे आणि पचायला जड असलेले पक्वान्न अवश्य घ्यावे. गरम आणि ताजा असाच आहार हिवाळ्यात घ्यावा. शिळे अन्न टाळावे. बाहेरचे देखील शक्यतो खाऊ नये.

ज्यांना बाजरीची भाकरी पचते, त्यांनी गायीच्या तुपाबरोबर बाजरीची भाकरी अवश्य घ्यावी. इतरांनी मात्र ज्वारीची भाकरी किंवा पोळी खावी. या काळात भात देखील चांगला पचतो. फलाहार देखील उत्तम करावा .च्यवनप्राशसारखे प्रतिकारशक्ती उत्तम करणारे असे औषध वैद्यांच्या सल्ल्याने अवश्य घ्यावे. सकाळी पोट साफ झाल्यावर रिकाम्या पोटी एक ते दोन चमचे प्रकृतीनुसार ते घ्यावे. थोड्यावेळाने त्यावर देशी गाईचे गरम ताजे दूध प्यावे.

दुधात च्यवनप्राश कधीही मिसळून घेऊ नये . या काळात आवळा खाणेदेखील उत्तम असते. आवळ्याचे मोरावळ्यासारखे औषध तयार करून ठेवावे.

हे औषध घेतल्यास पोटाचे विकार यामुळे कमी होतात. खजुराचे देखील गाईच्या तुपाबरोबर केलेले सेवन हिवाळ्यात आरोग्यदायी ठरते .बदाम, काजू, पिस्ता, काळा मनुका हे देखील थोड्या प्रमाणात हिवाळ्यात आरोग्याला उपकारक ठरू शकते.

या काळात व्यायाम चांगल्या पद्धतीने करून शरीर कमावता येते सूर्यनमस्कार हा हिवाळ्यातील एक उत्तम व्यायाम प्रकार होय. योगासने अवश्य करावीत. जोर, बैठका हे श्रमाचे व्यायाम मात्र ज्यांना पेलवतील, त्यांनीच करावेत. याप्रमाणे हिवाळ्यात चांगले आरोग्य राहण्यासाठी वरील प्रमाणे आपली ऋतुचर्या ठेवावी, असा सल्ला वैद्य विजय कुलकर्णी यांनी दिला आहे.

# उकडलेला बटाटा आहे आरोग्यासाठी उत्तम

दैनंदिन आहारात बटाटा ही एक नेहमीची भाजी असते, पण बहुतांश लोक तो तळून किंवा शिजवून खातात. मात्र तळलेल्या बटाट्यापेक्षा उकडलेला बटाटा शरीरासाठी अधिक फायदेशीर ठरतो. कारण उकडल्याने त्यातील पोषक घटक टिकून राहतात आणि शरीर त्यांचे शोषण सहजपणे करू शकते. उकडलेल्या बटाट्यामध्ये फायबर, झिंक, लोह, कॅल्शियम, कॅरोटीनॉइड्स, फ्लेव्होनॉइड्स आणि फिनोलिक सिडसारखे अँटी-ऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात आढळतात, जे आपले आरोग्य सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

जाणून घ्या उकडलेल्या बटाट्याचा आहारात समावेश केल्याने नेमके कोणते आरोग्यदायी फायदे होतात

**पचनसंस्था मजबूत ठेवतो** उकडलेल्या बटाट्यातील फायबर पचनक्रिया सुरळीत ठेवते. त्यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो आणि आतड्यांची हालचाल सुधारते.




**हाडे आणि सांध्यांसाठी लाभदायक :** यामध्ये असलेले व्हिटॅमिन C, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम हाडे मजबूत ठेवतात आणि संधिवात किंवा ऑस्टिओपोरोसिसचा धोका कमी करतात. त्यामुळे सांधेदुखीने त्रस्त लोकांनी आहारात उकडलेला बटाटा जरूर समाविष्ट करावा.

**वजन कमी करण्यास मदत :** बऱ्याचजणांचा गैरसमज आहे की बटाट्यामुळे वजन वाढते. परंतु उकडलेल्या बटाट्यामध्ये कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असते. त्यामुळे पोट बराच वेळ भरलेले राहते, अनावश्यक खाणं कमी होतं आणि वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

# थंडीत डोळ्यांची काळजी घ्या...

थंडी वाढणार असल्याचे संकेत हवामान खात्याने दिले असून या काळात शरीरासोबतच डोळ्यांचीही विशेष काळजी घेणे अत्यावश्यक आहे, असा सल्ला नेत्रतज्ज्ञांनी दिला आहे. थंड वारे, कोरडी हवा आणि स्क्रीनसमोर वाढलेला वेळ या सगळ्यांचा परिणाम थेट डोळ्यांवर होत असून डोळे कोरडे पडणे, लालसरपणा, चुरचुरणे आणि दृष्टी धूसर होणे या तक्रारी वाढू शकतात.

हिवाळ्याच्या मोसमात अवकाळी पावसाने हजेरी लावली असल्यामुळे थंडी काहीशी लांबली आहे. मात्र थंडीच्या दिवसात डोळ्यांची काळजी तितकीच महत्त्वाची आहे. या काळात हवेतील आर्द्रता कमी होते. त्यामुळे डोळ्यांचा नैसर्गिक ओलावा कमी होतो. यासाठी घरात ह्यूमिडिफायर वापरणे, पुरेसे पाणी पिणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने आर्टिफिशियल टिअर्स (कृत्रिम अश्रू) वापरण्याचा सल्ला दिला जात आहे.



थकवा आणि झोपेअभावी डोळ्यांत कोरडेपणा येतो. दररोज किमान सात ते आठ तासांची झोप घेतल्यास डोळ्यांना विश्रांती मिळते आणि ते ताजेतवाने राहतात. डोळ्यांत खाज, लालसरपणा, पाणी येणे किंवा दृष्टी धूसर होणे या तक्रारी वाढल्यास स्वउपचार न करता नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.''

बाहेर पडताना डोळ्यांवर थंड वाऱ्याचा आणि धुळीचा थेट परिणाम होतो. त्यामुळे सनग्लासेस किंवा संरक्षणात्मक चष्मा वापरणे आवश्यक आहे. हे डोळ्यांना थंडी, धूळ आणि तीव्र प्रकाशापासून बचाव करत असल्याची माहिती सिव्हिल रुग्णालयाच्या नेत्रतज्ज्ञ डॉ. शुभांगी अंबाडेकर यांनी दिली.

गाजर, पालक, बदाम, अक्रोड आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स असलेले पदार्थ डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

व्हिटॅमिन ए, सी आणि ई यांचा पुरवठा केल्यास दृष्टीसंबंधी त्रास कमी होऊ शकतो.

प्रत्येक २० मिनिटांनी २० सेकंद स्क्रीनपासून दूर पाहण्याचा सल्ला दिला जातो. असे केल्यास डोळ्यांवरील ताण कमी होतो.

# वजन कमी आणि सौंदर्यासाठी आवळा

शरीर निरोगी ठेवण्यासाठी योग्य आणि संतुलित पोषण मिळणे अत्यंत आवश्यक असते. व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने परिपूर्ण असलेला आवळा हा आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त मानला जातो. केस, त्वचा आणि पचनाशी संबंधित अनेक समस्या दूर करण्यासाठी आवळ्याचा वापर फायदेशीर ठरतो. आहारात आवळ्याचा समावेश अनेक प्रकारे करता येतो – काहीजण तो भाजी स्वरूपात खातात, तर काहींना कच्चा आवळा खाणे आवडते.



रस तयार करण्यासाठी लागणारे साहित्य – आवळा, कच्ची हळद, आले, कढीपत्ता आणि काळी मिरी.हा रस तयार करण्याची पद्धत अगदी सोपी आहे. एका आवळ्यासोबत कच्च्या हळदीचा एक छोटा तुकडा, आल्याचा तुकडा आणि चिमूटभर काळी मिरी घ्या. हे सर्व घटक मिक्सरमध्ये एकत्र वाटून रस तयार करा. सकाळी रिकाम्या पोटी हा रस प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात.

दररोज या रसाचे सेवन केल्याने त्वचेला नैसर्गिक तेज येते, केस मजबूत व मऊ राहतात आणि वजन कमी होण्यासही मदत होते. जर तुम्हाला केसगळती कमी करायची असेल आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक आणायची असेल, तर या पेयाला तुमच्या दिनक्रमाचा भाग जरूर बनवा.

वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत आवळ्याची भूमिका महत्त्वाची आहे. तो शरीरातील चयापचय वाढवतो आणि चरबी जळण्याची गती सुधारतो. याशिवाय भूक आणि अनावश्यक खाण्याची इच्छा नियंत्रित ठेवण्यासही तो मदत करतो. त्यामुळे निरोगी केस, त्वचा आणि सडपातळ शरीर हवे असल्यास आवळ्याचा आहारात नियमित समावेश करा.

# थंडीतील सुपरफूड! डिंकाचे खास लाडू

हिवाळा सुरु होताच आपल्या आहारात अशा काही पदार्थांची गरज भासते, जे शरीराला उष्णता, ताकद आणि रोगप्रतिकारशक्ती देतात. आपल्या आजी-नानी थंडीच्या दिवसांत बनवणाऱ्या पारंपरिक पदार्थांमध्ये डिंकाचे लाडू हा सर्वात पौष्टिक आणि ऊर्जा देणारा पदार्थ आहे. डिंकाचे लाडू फक्त चविष्टच नाहीत तर आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर मानले जातात.

चला तर पाहूया डिंकाचे लाडू खाण्याचे फायदे आणि त्यांची सोपी **रेसिपी.**

**डिंकाचे लाडू खाण्याचे जबरदस्त फायदे**

**१) हाडे आणि सांधे मजबूत करतात**

आयुर्वेदानुसार डिंक हा कॅल्शियमने समृद्ध असतो. त्यामुळे डिंकाचे लाडू हाडांची घनता वाढवतात आणि त्यांना अधिक मजबूत बनवतात.

सांध्यांमध्ये होणारी वेदना, कडकपणा आणि हिवाळ्यात वाढणारा त्रास कमी करण्यासही यांचा मोठा फायदा होतो.

**२) शरीराला नैसर्गिक उष्णता मिळते**

थंडीमध्ये डिंकाचे लाडू हा पारंपरिक उष्ण असलेला पदार्थ आहे.

डिंक शरीराचे तापमान संतुलित ठेवतो, थंडी लागणे, अंग गोठणे यांसारख्या त्रासांपासून बचाव करतो.

तसंच या लाडूंमध्ये लागणारे शुद्ध तूप देखील उष्ण असल्याने शरीराला अतिरिक्त ऊर्जा मिळते.

**३) रोगप्रतिकारक शक्ती वाढते**

हिवाळ्यात सर्दी, खोकला, ताप यांसारख्या तक्रारी वाढतात.

डिंकात असलेले अँटिऑक्सिडंट्स शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि हंगामी आजारांपासून बचाव करतात.

**४) त्वचा आणि केसांसाठीही फायदेशीर**

डिंकाचे लाडू त्वचेच्या आरोग्यासाठी उत्तम आहेत.



यातील तूप व सुकेमेवे त्वचेला ओलावा देतात, कोरडेपणा कमी करतात, आणि केसांची मुळे मजबूत ठेवतात.

विटामिने केस आणि त्वचा दोन्हीही निरोगी राहतात.

**डिंकाचे लाडू बनवण्यासाठी लागणारी सामग्री**

डिंक — १०० ग्रॅम गहू पीठ — २५० ग्रॅम देशी तूप — ३०० ग्रॅम (अंदाजे) पिठीसाखर — २५० ग्रॅम मेवे (बादाम, काजू) — १०० ग्रॅम खोवलेला नारळ — ५० ग्रॅम वेलदोडा पूड — १ छोटा चमचा

डिंकाचे लाडू बनवण्याची सोपी पद्धत

१. कढईत सुमारे २०० ग्रॅम तूप गरम करा.२. आता डिंक थोडा-थोडा घालून फ्राय करा.डिंक फुलून हलका सोनेरी झाला की बाहेर काढा.३. थंड झाल्यावर डिंक थोडा जाडसर कुटून घ्या.४. त्याच कढईत उरलेले तूप घाला आणि त्यात गहू पीठ मंद आचेवर गोल्डन होईपर्यंत भाजा.५. भाजलेले पीठ मोठ्या भांड्यात काढा.६. आता बदाम-काजू हलके भाजून घ्या आणि नारळ थोडा भाजून घ्या.७. सर्व भाजलेलं पीठ, कुटलेला डिंक, भाजलेले मेवे, नारळ आणि वेलदोडा एकत्र मिसळा.

८. मिश्रण थोडंसं गार झाल्यावर त्यात पिठीसाखर मिसळा.(मिश्रण फार गरम असेल तर साखर वितळते, त्यामुळे जरा थंड होऊ द्या.)९. हाताने गोल लाडू वळा.१०. पूर्णपणे थंड झाल्यावर एअरटाइट डब्यात साठवा.अश्या प्रकारे स्वादिष्ट, पौष्टिक आणि उष्णता देणारे डिंकाचे लाडू टायर होतील.हिवाळ्यात दररोज एक लाडू खाल्ल्यास ऊर्जा, उष्णता, हाडांचे आरोग्य आणि रोगप्रतिकारक शक्ती चारही गोष्टी उत्तम राहतात.

# आशा-निराशेच्या हिंदोळ्यावर

स्त्रियांच्या नैराश्याचे कारण अनेकदा त्यांच्या भूतकाळात लपलेले असते. गतकाळातील आठवणी, प्रसंग यांची तुलना करत आलेल्या नैराश्यातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशन योग्य ठरते. सविताताई (नाव बदलले आहे) या एक महिन्यापासून स्वत:च्या नकारात्मकतेवर काम करत होत्या. त्यांना त्यांच्या आयुष्यात जवळ जवळ तीन वेळा नैराश्य आले होते. पहिल्या दोन्ही वेळेला जेव्हा त्यांना नैराश्य आलं होतं तेव्हा त्यांनी मानसोपचार घेऊन त्याला थोपवलं होतं. आता मात्र जेव्हा त्यांना तिसऱ्यांदा नैराश्याने ग्रासले तेव्हा त्यांनी मानसोपचारा 'बरोबरच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार समुपदेशनही सुरू केले. 'मला आता या मानसिक दुखण्यातून बरं व्हायचंच आहे. त्यामुळे तुम्ही सांगाल त्याप्रमाणे मी वागेन आणि विचारांमध्ये बदल करेन.''

सविताताई सत्राला आल्यावर स्वतविषयी बोलताना हे सगळं स्पष्ट सांगत होत्या. 'माझा नवरा या सगळ्या बाबतीत बराच सजग आहे. त्याने मला सर्व प्रकारचं सुख माझ्या पायाशी आणून ठेवलं आहे. जेव्हा त्याला माझ्या बाबतीतला त्रास जाणवला तेव्हा तोच मला सायपाट्रिस्टकडे घेऊन गेला होता आणि त्या वेळी त्याने मला भरपूर जपलं. आताही जेव्हा मला नैराश्य आलंय तेव्हा त्यानेच मला पुन्हा सायपाट्रिस्टकडे पाठवलं.'' आपल्या नवऱ्याबद्दल त्यांना वाटत असलेली कृतज्ञता त्यांच्या बोलण्यातून जाणवत होतीच.

'खरोखर कौतुकास्पद आहे त्यांचं वागणं!'' असं वाखाणताच सविताताई अजूनच खुलल्या. 'खरंय, असा नवरा मिळायला भाग्य लागतं!'' हे सांगतानाच त्यांच्या डोळ्यांच्या कडा किंचित ओलसर झाल्या. सविताताईंच्या या अशा त्यांच्या यजमानांच्या प्रति भावुक होण्याला त्यांची सामाजिक पार्श्वभूमीही कारणीभूत होती. त्या अशा कुटुंबात वाढलेल्या होत्या, ज्यात मुलींना दुय्यम स्थान होते. मुलगा हवा या अट्टहासामुळे त्यांना पाच बहिणी झाल्या आणि त्यातील दोन जणींना त्यांच्या पालकांनी जन्माला येऊच दिले नव्हते.

**'खरोखर कौतुकास्पद आहे त्यांचं वागणं!'' असं वाखाणताच सविताताई अजूनच खुलल्या. 'खरंय, असा नवरा मिळायला भाग्य लागतं!'' हे सांगतानाच त्यांच्या डोळ्यांच्या कडा किंचित ओलसर झाल्या. सविताताईंच्या या अशा त्यांच्या यजमानांच्या प्रति भावुक होण्याला त्यांची सामाजिक पार्श्वभूमीही कारणीभूत होती. त्या अशा कुटुंबात वाढलेल्या होत्या, ज्यात मुलींना दुय्यम स्थान होते. मुलगा हवा या अट्टहासामुळे त्यांना पाच बहिणी झाल्या आणि त्यातील दोन जणींना त्यांच्या पालकांनी जन्माला येऊच दिले नव्हते.**

घरात त्यांना आणि त्यांच्या बहिणींना मिळणारी दुय्यम वागणूक, हेटाळणी आणि त्यात भरीला शीघ्रकोपी वडील यामुळे सविताताईंची मानसिक घुसमट लहानापासून सुरू झाली. त्याच वेळी सविताताईंना नैराश्य सुरू झाले. त्या दिवसभर रडायच्या किंवा झोपून राहायच्या. घरात त्यांची पुन्हा हेटाळणी सुरू झाली, पण त्या वेळी त्यांना स्वतला समजत नव्हतं की, त्यांना काय होतं. त्याच सुमारास त्यांचं लग्न लावून दिलं गेलं, पण साविताताईंची आगीतून फुफाट्यात अशी अवस्था झाली. सासरचे लोक तशाच प्रकारचे भेटले होते. नवरा दिवसभर नोकरीच्या निमित्ताने बाहेर, त्यामुळे आलेलं एकटेपण, त्यात लग्नानंतर लगेचच त्यांना दिवस गेले. बाळंतपणासाठी त्यांना माहेरी जाऊ दिले नव्हते. या सगळ्याचा पुन्हा त्यांना मनस्ताप झाला आणि दुसऱ्यांदा त्यांना नैराश्य जाणवायला लागले.

'पण आता का मला नैराश्य आलं आहे? काही समजत नाही मला. एकतर आता पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलंय. आता आमच्या लग्नाला वीसेक वर्षेही झाली. माझा नवरा आणि मुलगाही समजून घेणारे आहेत. माझ्या नैराश्याला जाणतात. सपोर्ट करतात.'' सविताताई त्यांच्या पुन्हा आलेल्या नैराश्याचे विश्लेषण करत होत्या, पण त्यांना सांगता काही येत नव्हते. मात्र त्यांच्या बोलण्यातून एक गोष्ट सतत जाणवत होती ती म्हणजे त्यांच्या यजमानांची स्तुती. त्या खूप वेळा त्यांच्याबद्दल बोलत असायच्या, पण नेहमी एकट्याच सत्रांना येत होत्या. त्या वेळी त्यांना त्याबद्दल विचारले असता त्या म्हणून गेल्या, 'तो सतत बिझी. माझ्यासाठी त्याला वेळ कुठे? माझ्या अकाऊंटला एक रक्कम महिन्याला टाकली की, तो मोकळा होतो. मला त्याने सगळी सूट दिली आहे. शॉपिंग, किटी पार्टीज, पिकनिक्स मी सगळं करू शकते असं त्याचं म्हणणं, पण माझ्याशी बोलायला किंवा माझ्याबरोबर बोलायला त्याला वेळ नसतो. सतत बिझनेस बिझनेस.

त्यांना नैराश्य का आलं हेही आता उघड झालं होतं. घरातील सदस्यांचा एकमेकांशी असलेला संवाद हा नव्हताच. साविताताईंची बोलण्याची, व्यक्त होण्याची, मिसळण्याची गरज भागत नव्हती. त्यामुळे त्यांना पुन्हा एकदा नैराश्याने गाठले.

एक चांगली बाब ही होती की, त्यांना या अवस्थेतून बाहेर पडायचे होते आणि मुख्यत्वे स्वतच्या अवलंबित्वावर मात करायची होती. समुपदेशनाच्या माध्यमातून तो मार्ग त्यांना सापडत होता. सगळ्यात आधी सविताताईंच्या विचारांवर आणि सवयींवर काम सुरू झाले. कारण बऱ्याचदा त्या एकटेपणातून निराश, चिंताग्रस्त आणि तणावात यायच्या. एकटेपण हे त्यांनी ओढवूनही घेतले होते. त्यांचे एकटेपण हे



रिकामेपणातून आलेले होते हेही त्यांच्या सत्रांतून जाणवलं. सततचे नकारात्मक विचार त्यांना शिथिल करत होते. सारखं बसून असल्यामुळे अंगात आळस आला आणि खाणंपिणं व झोप अनियमित झाली. त्यामुळे सविताताईंना प्रत्येक दिवस आखून देण्यात आला जिथे व्यायाम/योगाभ्यास, छंद जोपासणे, घरातील काही वेगळ्या कामांकरता वेळ देणे इत्यादी पर्याय सुचवण्यात आले..

त्याचबरोबर त्यांना पुढाकार घेऊन त्यांच्या यजमानांबरोबर संवाद साधण्यास आणि सविताताईंना काय सलते हे त्यांच्याशी मोकळेपणाने बोलण्यासाठीही काही पद्धती सांगितल्या गेल्या. त्याचा परिणाम अर्थातच सकारात्मक झाला. हीच पद्धत त्यांना मैत्रिणीच्या बाबतीतही अंगीकारायला सांगितली गेली. त्यामुळे सविताताई अधिकाधिक उत्साही होऊ लागल्या.

'मी माझ्या नवऱ्याला स्पष्ट आणि शांतपणे माझ्या मनातला सल बोलून दाखवला. तोही काही क्षण भावुक झाला. त्या दिवसापासून आम्ही दोघे एकत्र मॉर्निंग वॉक घेतो. मला आता सेक्युअर वाटायला लागलंय. हरवलेलं गवसतंय अशी माझी अवस्था आहे. खूप छान वाटतंय.'' सविताताईंच्या या बोलण्यातून आशा, आनंद आणि सुरक्षिततेची भावना डोकावत होती. नैराश्यावरची मात्रा त्यांना लागू पडत होती.

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला वाघाचा आधार लाभला

चांदोलीच्या जंगलात तीन वाघ कॅमेऱ्यात कैद झाले तरी त्यांचे वास्तव्य येथे नाही या सत्यावर उपाय शोधत ताडोबा-अंधारीतून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाकडे 'तारा' या वाघिणीचे हस्तांतर या आठवड्यात झाले. हा दक्षिण महाराष्ट्राच्या जंगलांना मिळालेला नवजीवनाचा श्वास ठरू शकतो. तो तसाच ठरावा ही महाराष्ट्राच्या वन खात्याकडून अपेक्षा आहे.

गेली अनेक वर्षे वाघांशिवाय पडझड अनुभवत असलेल्या चांदोली-कोयना पट्ट्याला या एका ऑपरेशनने नवी दिशा दिली आहे. पश्चिम घाटाच्या या दगडी कड्याकपारीत वाघ या शिखर-भक्षकाचा अभाव हा केवळ पर्यावरणीय मुद्दा नव्हता, तर संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेचा तोलच ढासळलेला होता. जंगलाची पुनरुत्पादन क्षमता कमी झाली होती. 'तारा'चे आगमन हा या तुटलेल्या साखळीला पुन्हा एकत्र जोडण्याचा टप्पा आहे. वाघ असल्यावर जंगलातील प्रत्येक प्रजातीला नैसर्गिकरीत्या आपली मर्यादा कळते. त्या त्या प्राण्यांचा वेग, हालचाल आणि जीवनशैली सुधारते आणि त्यामुळे हळूहळू जंगलाची आरोग्यवस्था जोर पकडते. सह्याद्रीचा हा फायदा थेट सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांपर्यंत पोहोचू लागेल. वाघ म्हणजे पर्यटनाचा आत्मा. दशकभरापासून चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या नावाला वैभव होते, पण वास्तवाचा त्याला आधार नव्हता. पर्यटकांना सफारीची भावना असूनही वाघ दिसत नसल्याने चांदोली आणि कोयना पट्टा पर्यटकांच्या यादीत मागे पडत होता.

तारा आल्यावर पर्यटकांचा कल पुन्हा जंगलाकडे वळेल, याचा थेट फायदा स्थानिक होमस्टे, हस्तकला, ग्रामीण पर्यटन मार्गदर्शक आणि खाद्यपदार्थ उत्पादकांना होईल. सह्याद्रीत येणारा प्रत्येक पर्यटक हा स्थानिक अर्थव्यवस्थेच्या चक्राला हातभार लावणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे तेथील गावकऱ्यांना रोजगाराच्या नव्या शक्यता निर्माण होतात. पर्यावरण शिक्षण, ईको-ट्रेल्स, बर्डिंग गाइड्स, स्थानिक स्वयंसहाय्यता गट यांना यामुळे नवे दार उघडते; परंतु 'तारा'ची गोष्ट फक्त पर्यटनाभोवती फिरत नाही.

सह्याद्रीत कोयना, वारणा, कृष्णा खोऱ्यांतील जलस्रोत हे या हिरव्यागार कड्यांच्या आरोग्यावर अवलंबून आहेत. जंगल दाट असेल तर पावसाचे पाणी हळूहळू जमिनीत मुरते आणि पुढे नद्यांना नियमित प्रवाह देत राहते. पण गेल्या काही वर्षांत जंगल नष्ट होत गेल्याने पाण्याची अनियमितता वाढली.



सांगली, कोल्हापूर सारख्या जिल्ह्यांमध्ये दरवर्षी पूरस्थिती तीव्र होत गेली. वाघ आल्यावर जंगलातील अतिक्रमण आणि बेकायदेशीर चराईवर प्रशासनाची नजर वाढते. वाघ असलेल्या क्षेत्रात लोक जाणीवपूर्वक सावध राहतात जंगलावर अधिक नियंत्रण ठेवले जाते. यामुळे जलस्रोतांचे दीर्घकालीन संरक्षण होते आणि नैसर्गिक नियंत्रण मिळते. हवामान बदलामुळे पावसाची स्वरूपे अधिक आक्रामक होत असताना अशा स्थिर जंगलाची गरज अधिकच वाढली आहे. या प्रकल्पाचा विस्तारित परिणाम कोकण आणि उत्तर कर्नाटकापर्यंतही जाणवेल. सह्याद्री, अंबोली, दांडेली हा नैसर्गिक प्राणी कॉरिडॉर इतिहासात जिवंत होता; पण शहरीकरण, रस्ते, खाणी, विद्युत प्रकल्प यांनी त्याच तुकडे-तुकडे केले. 'तारा'सारखे वाघ स्थलांतरित झाल्यावर या कॉरिडॉरकडे पुन्हा एकदा शास्त्रीय दृष्टीने पाहण्याची गरज निर्माण होते. वाघांची ये-जा होत असेल तर हत्ती, गवा, अस्वल, वनकुत्रा यांच्या हालचालीही सुव्यवस्थित राहतात. जैवविविधता फक्त वाघावर अवलंबून नसली तरी वाघ हा त्या विविधतेचा मुख्य सूचक असतो. कोकणातील जंगलांवर खाणकाम किंवा अनियोजित रस्त्यांचे दडपण वाढले की अशा वाघ प्रकल्पांमुळे पर्यावरणीय अनुमतीच्या निकषांत काटेकोरपणा येतो. मात्र या प्रकल्पात धोकेही कमी नाहीत. वाघाला हवा असलेला अखंड जंगल पट्टा आज अनेक भागांत तुटलेला आहे. चांदोली, कोयना, राधानगरीला जोडणारा पट्टा अजूनही अनेक ठिकाणी अरुंद किंवा व्यत्यय आणणारा आहे. गावांची वाढ, व्यावसायिक शेती, जंगल रस्ते या सगळ्यामुळे वाघाला फिरण्यासाठी हवी असलेली शांतता कमी होते.

मानवी-वन्यजीव संघर्षाची शक्यता वाढते. जनावरांवर हल्ले झाले तर स्थानिक लोकांचा विरोध उफाळू शकतो. म्हणूनच जलद आणि सन्मान्य पद्धतीने भरपाई देणारी यंत्रणा, सतत जनजागृती आणि गावकऱ्यांचा थेट सहभाग हे तीन स्तंभ अनिवार्य आहेत, तर दुसरीकडे, सह्याद्रीत शिकार प्राणी पुरेसे नसल्यास वाघ टिकू शकणार नाही.

ताडोबात विपुल असलेले सांबर-गवा सह्याद्रीत कमी प्रमाणात दिसतात, त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने त्यांच्या वाढीकडे लक्ष द्यावे लागेल. या सगळ्यांवर शेवटचा आणि सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे राजकीय इच्छाशक्ती.

प्रशासनातील सातत्य नसले तर अशा प्रकल्पाचे भवितव्य धोरण बदलांमध्ये अडकते. तरीही एक गोष्ट निर्विवाद आहे, वाघाचे आगमन म्हणजे निसर्गाचा आत्मविश्वास परत येणे. वाघ असताना जंगलातील वृक्षांचे पुनरुज्जीवन अधिक वेगाने होते, कारण शाकाहारी प्राण्यांचा ताण कमी होतो. दाट जंगलाने कार्बन शोषण वाढते आणि हवामान बदलाचे दडपण कमी करण्याची नैसर्गिक क्षमता वाढते. झरे आणि ओहोळ पुन्हा जिवंत होतात. पक्षी, साप, कासव, कीटक, औषधी वनस्पती यांची संख्या वाढते. हे सर्व मिळून एक मजबूत परिसंस्था तयार करते आणि ही परिसंस्था हवामान बदलाच्या संकटात माणसाला आधार देणारी सर्वात शक्तिशाली ढाल आहे. ऑपरेशन 'तारा' हे म्हणून केवळ एका वाघिणीचे स्थानांतरण नसून संपूर्ण सह्याद्रीचा पुनर्जन्म आहे.

दक्षिण महाराष्ट्राच्या पर्यावरणीय आणि आर्थिक भविष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रकल्पाला मिळणारा लोकसहभाग, वैज्ञानिक व्यवस्थापन आणि राजकीय बांधिलकी. वाघाचे पाऊल सातारा, सांगली, कोल्हापूरच्या मातीत पुन्हा उमटले तर तो निसर्गाचा विजय असेल आणि हवामान बदलाच्या अंधाऱ्या भावी दिवसांना तोंड देण्यासाठी या प्रदेशाला वाघाच्या रूपाने मिळालेला सर्वात मोठा मित्र असेल.


फक्त तो मित्र जंगलातच राहिला पाहिजे माणसांच्या घरापर्यंत त्याला येऊ न देणे ही जबाबदारी वन विभागाची!

# लग्न करता महागडे....

'कीर्तनी येई सद्गुरू राया, मतिमंद मी काहीच नेणे, सांख्य अथवा गुणा' अशा निरूपणाने सुरुवात करत महाराजांनी 'पुंडलिक वरदा हारी विठ्ठल' असा गजर करताच समोर जमलेल्या हजारोंच्या जनसमुदायाने जोरदार प्रतिसाद दिला. तो बघून ते क्षणभर भारावले. मुलीच्या साक्षगंधावरून कितीही टीका झाली तरी श्रोते आपल्यावर तेवढेच प्रेम करतात, तेव्हा स्पष्टीकरण देण्याची संधी आज साधायचीच असे मनाशी ठरवत त्यांनी व्यासपीठावरील देवाला साष्टांग दंडवत घातला.

बळेच डोळ्यात पाणी आणत ते म्हणाले, 'हे देवा, ईश्वरा, भगवंता, मी उभ्या आयुष्यात कधीही चुकलो नाही. होय, मी म्हटले 'लग्न होता साधे साजिरे, तरी होतील ना पोरे, मग कशाला हवा रे डामडौल' पण हे सारे माझ्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या गरिबांसाठी होते. त्यांनी थाटामाटात लग्ने करू नयेत असे मला सांगायचे होते. माझे अनेक भक्त श्रीमंत आहेत. माझ्यावर अपार प्रेम करूनही ते त्यांच्याकडील लग्नात भरपूर पैसा खर्च करतात. त्यावर कुणी बोलत नाही. तुझ्या कृपेने मी श्रीमंत झालो व मुलीच्या इच्छेचा मान राखला तर एक बाप म्हणून मी काय गैर केले तूच सांग देवा! प्रबोधन करणे हा माझा व्यवसाय आहे. तो मी इमानेइतबारे करत असताना माझ्या खासगी आयुष्यात इतरांनी नाक खुपसण्याची गरज काय? आता मी 'लग्न करता महागडे, एक पाऊल पडते पुढे, तरी चार शब्द खडे, सुनावती' असे म्हणायचे काय? तूच कौल दे आता देवा! 'देवा मी एक पामर, काय खोटे, काय खरे, आता धाव रे सत्वर, वाचिव मला'

आजवर मी भरपूर बिदागी घेतली असली तरी झिजलो मात्र गरिबांसाठी. त्यात कधी खंड पडू दिला नाही. हे ठाऊक असूनही टीकाकारांना जलनवायू सुटण्याचे कारण काय? तिरुपती बालाजीनेसुद्धा लग्नासाठी कर्ज काढले होते अशी आख्यायिका आहे. त्यामुळेच भक्त त्याला पैसे दान करतात. माझी तर तीही अपेक्षा नाही. मिळेल त्या बिदागीवर समाधान मानणारा मी माणूस. त्यातून चार पैसे उधळले तर एवढे विचारजंतू वळवळण्याचे कारण काय? त्यातल्या एकाने मला तुकारामांचा दाखला देत 'ऐसे संत झाले कळी, तोंडा तंबाखूची नळी' असे हिणवले. त्यानंतर रागाच्या भरात मी डोक्यावरचा फेटा उतरवण्याचा निर्णय जाहीर केला. नंतर घरच्यांनी तसेच शेकडो श्रोत्यांनी



किमान लग्न होईपर्यंत तरी असे करू नका या शब्दात विनवले. मग मात्र मी खंबीर होत टीकाकारांना सामोरा गेलो व लग्न आणखी धूमधडाक्यात करीन, असे जाहीर केले. हाच खंबीरपणा आयुष्यभर जोपासण्यासाठी आता तुझी साथ हवी आहे देवा!

लोक म्हणतात धनवानांना धर्म नसतो. ना जात असते ना पंथ. माझे तसे नाही देवा. माझा पंथ कीर्तनकाराचाच. साठवलेला पैसा अशा समारंभातून उधळला तर गरिबांचेच भले होते. अर्थव्यवस्थेला चालना मिळते हे या टीकाकारांना कोण समजावून सांगणार? तेव्हा देवा आता तूच कौल दे. 'केले सारे गरिबांसाठी, तेच लागले माझ्या पाठी. आता सांग मी कुठल्या गाठी, बांधूनी ठेवू!' यानंतर महाराज हमसून हमसून रडू लागले. अख्खा मंडप आता देव काय कौल देतो याकडे डोळ्यात प्राण आणून बघू लागला. तेवढ्यात देवासमोरचा दिवा विझला. मंडपात देवाने कौल नाकारला अशी चर्चा सुरू झाली व श्रोते उठून जाऊ लागले.

'अरे, थांबा, हा कौल नाही, दिवा वाऱ्याने विझला' असे महाराज ओरडून सांगू लागले पण ऐकायला कुणी थांबलेच नाही.